**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**पृ. शी.** : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

**मु. शी.** : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री सय्यद पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली चर्चा.

( प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला........

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंदर्भातील जी चर्चा उपस्थित केलेली आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना उत्पादक खर्चाच्या आधारावर मालास भाव दिला पाहिजे. किमान 1200 रुपये भावाची त्यांची मागणी आहे. केंद्र सरकारने गव्हास 1 हजार रुपये भाव दिलेला आहे. परंतु विदर्भातील शेतकऱ्यांचा गहू 600 रुपयेप्रमाणे खरेदी करण्यात आला. त्यामुळे नाईलाजास्तव गव्हाचा आधारभूत भाव 1 हजार रुपये करण्यात आला. परंतु धान पिकाच्या बाबतीत शेतकऱ्यांना न्याय देण्यात आलेला नाही. धान उत्पादन करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना फार कसरत व मेहनत घ्यावी लागते. गव्हाचे पीक काढण्याच्या दृष्टीने तेवढी मेहनत किंवा खर्च

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

येत नाही, परंतु धान पिकाच्या बाबतीत फारच मेहनत घ्यावी लागते व त्यास खर्चही बराच येतो. धानाचे पीक घेण्याच्या दृष्टीने शेती नांगरावी लागते, रोपं वाळवावी लागतात, पाणी द्यावे लागते, त्यानंतर ती रोपं काढून चिखलामध्ये त्यांची लावणी करावी लागते. तो चिखल एकदा नाही तर दोनदा रुळवावा लागतो व त्यानंतर त्या रानामध्ये पट्टे मारुन रोपं लावली जातात. अशाप्रकारे धान उत्पादक शेतकरी हे रात्रंदिवस काम करुन पीक घेत असतात. धानाची रोपं लावल्यानंतर शेवटपर्यंत त्यांना अथांग मेहनत व परिश्रम घ्यावे लागतात. आज त्यांना अशाप्रकारची शेती करणे परवडत नाही. कारण, आज रोजंदारी फार वाढलेली आहे. आज 80 रुपयांच्या वर मजुरी झालेली आहे. असे असतानाही आपण त्यांच्या धानास योग्य भाव देत नाहीत, हे योग्य नाही. धान पिकाच्या बाबतीत केंद्र सरकारने मूल्य निर्धारणा केली असून त्यांनी आधारभूत किंमत ही 1 हजार रुपये ठरवलेली आहे. धान पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना आपण उत्पादक खर्चाच्या आधारे किंमत देऊन, यामध्ये इंडस्ट्रीजच्या दृष्टीने पाहिले तर त्यांना मुनाफा होण्याच्या दृष्टीनेही आपण धानास 1200 रुपये भाव दिला पाहिजे, अशी माझी याप्रसंगी मागणी आहे. सन 2001 च्या जणगननेनुसार राज्यात 1 कोटी 21 लाख शेतकरी हे खातेदार होते, त्यापैकी तब्बल 88 लाख 86 हजार शेतकरी अल्पभूधारक आहेत. सदरची टक्केवारी 80 टक्के असून याचे कारण एकच आहे, ते म्हणजे, आज शेतकऱ्यांच्या कुटुंबातील भावांभावांमध्ये हिस्से पडलेले आहेत. छोटया छोटया तुकडयांमध्ये त्यांना आज शेती करणे परवडत नाही. त्यामुळे याबाबतीत आपण निश्चित अशाप्रकारचे धोरण आखले पाहिजे. आज जे अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांना मोठे बागायतदार शेतकरी आपल्या शेतीमध्ये नोकर म्हणून ठेवत आहेत. त्यामुळे आपण या शेतकऱ्यांचा विचार करुन जर त्यांच्या शेतीमालास योग्य भाव दिला तर त्यांना अशी वेळ येणार नाही व ते आत्महत्याही करणार नाहीत. आज शेतकऱ्यांच्या अंगमेहनतीनुसार शेतीमालास भाव मिळत नसल्यामुळेच त्यांची आर्थिक उन्नती होत नाही. एकूण कृषि पुरवठा हा 54 टक्के असून तो सहकारी बँकामार्फत व सोसायटयांकडून केला जातो.

नंतर श्री.रोझेकर.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ MAP/ SBT/ प्रथम श्री.पुरी......... 10:50

श्री.केशवराव मानकर.........

उर्वरित कर्जपुरवठा 42 टक्के हा व्यावसायिक बँकांकडून, 4 टक्के कृषि कर्ज ग्रामीण बँकांकडून होत असले तरी शेतीला हंगामी पायाभूत सुविधांसाठी होणा-या पतपुरवठयाची स्थिती अतिशय चिंताजनक आहे. एकूण कृषि पुरवठा 12 हजार 84 कोटी रुपयांवर पोहोचला आहे. कर्ज वितरण 6970 कोटी रुपयांचे झाले आहे. हे प्रमाण बघितले तर 1 कोटी 21 लाख खातेदारांपैकी 36 लाख खातेदारांना कर्ज पुरवठा होऊ शकलेला नाही. 36 लाख खातेदारांमध्ये आत्महत्या करणा-या शेतक-यांचे प्रमाण अधिक आहे. वितरण समितीने 26575 विविध कार्यकारी सेवा सोसायटयांपैकी 19500 सोसायटयांचे सन 2004 मध्ये ऑडिट केले होते. 3265 सोसायटयांची वसूली अत्यंत चिंताजनक आहे आणि त्यांची टक्केवारी बघितली तर 30 टक्क्यांपेक्षाही कमी आहे, या सोसायटया शेतक-यांना कर्ज देऊ शकत नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. शासनाला या निमित्ताने मी विनंती करु इच्छितो की, या शेतक-यांचे 7/12 उतारे कोरे केले पाहिजेत, संपूर्ण कर्जमाफी दिली पाहिजे. सन 2003 मध्ये सरकारने 432 कोटी रुपयांची व्याजमाफी जाहीर केली त्याचा लाभ 15 लाख शेतक-यांना मिळाला व नवीन कर्जाची निर्मिती पायाभूत विकासासाठी केली. 846 कोटी रुपये कर्जाचे सहाय्य देऊन शेतक-यांचा भार सैल केला, त्याबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. परंतु, परिस्थिती अशी आहे की, राज्यातील 85 लाख शेतकरी अजूनही कृषि कर्ज पुरवठयापासून वंचित आहेत. कर्ज पुरवठा पाहिजे त्या प्रमाणात शेतक-यांना मिळत नाही.

सभापती महोदय, व्याजाच्या दरासंदर्भात प्रत्येक सदस्याने या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांना 6 टक्के दराने तातडीने सरकारने कर्ज पुरवठा केला पाहिजे, त्याचे नियोजन करुन मागच्या कर्जाचे समायोजन 6 टक्कयाने केले पाहिजे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेजसंबंधी बोलावयाचे झाले तर 825 कोटी रुपये कर्जावरील व्याजमाफी देतांना 6 जिल्हयांमध्ये 9.33 लाख खातेदारांना 1407 कोटी रुपयांच्या कर्जाचे पुर्नगठण केले आहे. परंतु, यामुळे या 6 जिल्हयातील शेतक-यांचा प्रश्न संपलेला नाही. यंदा या जिल्हयामध्ये 2205 कोटी रुपयांचे कर्ज वाटप करावयाचे असतांना 1254 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झाले आहे आणि या 6 जिल्हयामध्ये अंदाजे 18 लाख शेतक-यांपैकी केवळ 4 लाख 73 हजार शेतक-यांना कर्ज मिळू शकले, ही शोकांतिका आहे, पाहिजे त्या प्रमाणात कर्ज पुरवठा होत नाही, ही स्थिती यामधून पहावयास मिळते.

...2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर..........

सभापती महोदय, मी मागे याच विषयावर भाषण करतांना याचा उल्लेख केला होता. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केला आहे की, आणेवारीची पद्धत बदलली पाहिजे, परंतु अद्याप सरकारने यासंबंधी निर्णय घेतलेला नाही. शेतक-यांची आर्थिक स्थिती चांगली करावयाची असेल तर ब्रिटिश काळापासून सुरु असलेली आणेवारीची पद्धत बदलली पाहिजे. यासंबंधी शासनाने निश्चित धोरण आखले पाहिजे. पुढच्या अधिवेशनापर्यन्त सरकारने यासंबंधी कुठलाही निर्णय घेतला नाही तर अशासकीय विधेयक आणून सभागृहासमोर हा विषय मांडावा लागेल, असे मला वाटते. शेतक-यांना न्याय द्यायचा असेल तर सरकारनेच यासंबंधी तातडीने निर्णय घेतला पाहिजे. 3 पोते धान झाले तर 100 टक्के उत्पादन झाल्याची नोंद करण्यात येते, हे दुर्देव आहे. आपला प्रगत देश आहे, रासायनिक खते, किटकनाशके, पाण्याच्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. असे असतांना 3 पोते, 4 पोते धान झाल्यावर 100 टक्के उत्पादन झ ाल्याची नोंद होत असेल तर ते शेतक-यांचे दुर्देव आहे. दु:खाने सांगावेसे वाटते की, सरकार मात्र शेतक-यांच्या या भावना विचारात घेत नाही.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा या ठिकाणी मांडणार आहे. धान उत्पादक शेतक-यांची स्थिती चांगली होईल की वाईट होईल हे सांगता येणार नाही. हे आता काळच ठरविणार आहे. धान उत्पादक जिल्हयांमध्ये गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर हे प्रमुख 4 जिल्हे आहेत.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 10:55

श्री.केशवराव मानकर ..........

केंद्र सरकारने एन.बी.एच.सी. सारख्या खाजगी कंपन्यांना धान खरेदीचे आदेश दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने त्याला ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्या कंपनीबरोबर जे अॅग्रीमेंट झालेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, गनी डिफरंस, व्याज दर, गोडावून चार्जेस आणि देखरेखीसाठी लागणारा पैसा आम्ही घेणार नाही. हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. त्या कंपनीला सरकार प्रती क्विंटल 140 रुपये देणार आहे. त्यामध्ये 4 रुपये 67 पैसे हमाली, 19 रुपये 14 पैसे ट्रान्सपोर्टिंग चार्ज, 8 रुपये 80 पैसे शोक, 5 रुपये देखरेख, 12 रुपये 60 पैसे गोडावून चार्जेस, 21 रुपये 60 पैसे व्याज दर, 48 रुपये गनी बॅग (बोरी) आणि 19 रुपये गनी बॅग घसारा असे एकूण 139 रुपये 61 पैसे म्हणजे 140 रुपये प्रती क्विंटलला जास्त देणार आहेत. त्या कंपनीने गनी डिफरंस, व्याज दर, गोडावून चार्जेस आणि देखरेखीसाठी लागणारा पैसा आम्ही घेणार नाही, असे म्हटलेले आहे. हे चार्जेस कमी करुन 75 रुपये शिल्लक राहतात, ते शेतक-यांना दिले पाहिजेत. हे पैसे शेतक-यांना दिले तर त्यांना 820 रुपये भाव मिळू शकतो, अशी माझी आग्रहाची मागणी आहे. शेवटचा मुद्दा मांडून मी माझे बोलणे थांबविणार आहे. धान उत्पादक शेतक-यांच्या मालावर प्रक्रिया करणा-या राईस मिलला सबसिडी दिली गेली. राईस इंडस्ट्रीज उभारली गेली. परंतु खाजगी कंपन्या, सेवा सहकारी सोसायटया, मार्केटींग फेडरेशन ही शासकीय यंत्रणा पूर्णपणे कोलमडलेली आहे. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी सहकार क्षेत्राची उभारणी केली, हे क्षेत्र आता छिन्नविच्छिन्न होण्याच्या अवस्थेत आहे. म्हणून सहकारी चळवळ वाचविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. खरेदी संदर्भात शासनाने निश्चित असे धोरण स्वीकारले पाहिजे आणि ते शेतक-यांच्या, व्यापा-यांच्या हिताचे आहे की, खाजगी कंपन्यांच्या हिताचे आहे हे बघितले पाहिजे. शेतक-यांना न्याय देण्यासाठी शासनाने यावर उपाययोजना करावी. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शेतक-यांचा 7/12 चा उतारा कोरा केला पाहिजे, त्यांचे कर्ज माफ केले पाहिजे आणि पुन्हा ही वेळ येऊ नये म्हणून उपाययोजना केली पाहिजे. सभापती महोदय, माझी वेळ संपल्याचे आपण वारंवार बेल वाजवून माझ्या निदर्शनास आणून देत आहात. अन्यथा मला काही उपाययोजना सांगावयाच्या होत्या. शासनाने योग्य उपाययोजना करावी, एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

...2...

27-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) C-2

GRB/ MAP/ SBT/ प्रथम श्री.रोझेकर ......... 10:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता आपण रिप्लाय सुरु करु.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर द्यावे, असा आम्ही आग्रह धरला होता.

**उपसभापती** : खालच्या सभागृहामध्ये या चर्चेला कोणी उत्तर दिले ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या चर्चेला खालच्या सभागृहामध्ये कृषी मंत्री, सहकार मंत्री आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही चर्चा उपस्थित करतांना आम्ही अशी अपेक्षा केली होती की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या चर्चेला उत्तर दिले पाहिजे. हा राज्यातील शेतक-यांचा महत्वाचा विषय आहे. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री सभागृहामध्ये नसल्यामुळे उत्तर पुढे ढकलण्यात यावे. या चर्चेला माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले पाहिजे. हा राज्यातील शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. रोज शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. आजही शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत.

**उपसभापती** : मी आपल्या म्हणण्याचा मान ठेवतो. माननीय मुख्यमंत्री महोदयांकडून आपण फायनल उत्तर घेऊ.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृह तहकूब करा. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित असतांना उत्तर झाले पाहिजे.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP/ यापूर्वी श्री.बोरले..... 11:00

श्री.जगदीश गुप्ता : काल 10 टक्के लोकांच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा सुरु होती, त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित होते. आज या ठिकाणी राज्यातील शेतक-यांचा म्हणजे एकूण 65 टक्के लोकांच्या जीवन मरणाचा तसेच जिव्हाळयाच्या प्रश्नावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मात्र माननीय मुख्यमंत्री सदनात उपस्थित नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतक-यांच्या प्रश्नावरील चर्चेला उत्तर देतांना सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, सहकार मंत्री यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. शेतक-यांच्या प्रश्नांबाबत या सरकारला किती आत्मीयता आहे, हेच त्यांच्या उपस्थितीवरुन दिसून येते. तसेच शेतक-यांच्या प्रश्नांच्या बाबतीत हे सरकार किती गंभीर आहे हेही यावरुन दिसून येत आहे.

प्रा.वसंत पुरके : आज राष्ट्रपती महोदया नाशिकला येणार आहेत म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना तेथे जावे लागले, त्यामुळे आज ते सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर आपल्याला या चर्चेवर माननीय मुख्यमंत्र्यांचेच उत्तर हवे आहे असा आपला आग्रह असेल तर प्रथम या चर्चेला संबंधित खात्याचे जे राज्यमंत्री येथे उपस्थित आहेत त्यांना त्यांच्याशी संबंधित मुद्यांवर उत्तर देण्याची अनुमती द्यावी आणि नंतरही आपला आग्रह कायम असेल तर माननीय मुख्यमंत्री देखील यासंबंधीचे उत्तर सभागृहात देतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सदर चर्चेला माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित असतांना आम्हाला उत्तर ऐकावयाचे आहे. म्हणून सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी, अशी आमची सूचना आहे.

**उपसभापती** : माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी या सभागृहामध्ये उपस्थित असतील त्यावेळी ते या चर्चेला उत्तर देतील. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सभागृहामध्ये बोलावून घेऊन याबाबत त्यांच्याशी चर्चा करतो. तोपर्यंत या चर्चेवरील उत्तराला तरी आपण सुरुवात करु या.

श्री.पांडुरंग फुंडकर : शेतक-यांच्या आत्महत्येवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित झाले पाहिजेत, अशी आमची सर्वांची आग्रही मागणी आहे.

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

आज या ठिकाणी या चर्चेला संबंधित खात्याचे राज्यमंत्री उत्तर देत आहेत. माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री,सहकार मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. उपरोल्लेखित मंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृह स्थगित करण्यात यावे.

( विरोधी पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य आपल्या जागेवर उभे राहून बोलतात.)

**उपसभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांना माझी एकच विनंती आहे की, या सभागृहात आपण विरोधी पक्ष नेते आहात आणि या सभागृहाचे नेते उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील या ठिकाणी आता उपस्थित नाहीत. मी त्यांच्याशी यासंदर्भात चर्चा करतो तोपर्यंत आपण या प्रस्तावावरील उत्तर देण्यास माननीय राज्यमंत्र्यांना अनुमती द्यावी.

( माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहामध्ये प्रवेश करतात.)

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये आलेले आहेत.

**उपसभापती** : आपल्या म्हटल्याप्रमाणे माननीय उप मुख्यमंत्री या सभागृहामध्ये उपस्थित झालेले आहेत. या चर्चेला संबंधित खात्याच्या राज्यमंत्र्यांना त्यांचे उत्तर देण्यास सुरुवात करु द्यावी, अशी मी आपल्याला मघाशी विनंती केली होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या दिवशी हा प्रस्ताव सभागृहामध्ये चर्चेसाठी आला त्या दिवशी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करतांना माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नव्हते. या दोघांपैकी एकाने तरी सभागृहात चर्चा ऐकावयाला हजर असले पाहिजे, अशी आम्ही अपेक्षा केली होती. आता या चर्चेला उत्तर या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले पाहिजे. राज्यातील लाखो शेतक-यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर गेले तीन दिवस चर्चा सुरु आहे आणि त्या चर्चेला उत्तर देण्यासाठी माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. शेतक-यांच्या प्रश्नांच्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही प्रश्न महत्वाचा असू शकत नाही म्हणून माननीय मुख्यमंत्री उत्तर देण्यासाठी आल्याशिवाय आम्ही उत्तर ऐकणार नाही.

( गोंधळ )

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या विषयावर या सदनामध्ये आणि खालच्या सदनामध्ये चर्चा झालेली आहे. या सदनामध्ये ही चर्चा लांबल्यामुळे खालच्या सदनामध्ये या चर्चेला

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ SBT/ MAP/ यापूर्वी श्री.बोरले..... 11:00

श्री.आर.आर.पाटील.....

शासनाच्या वतीने उत्तर दिले गेलेले आहे. या चर्चेच्या उत्तराला खालच्या सदनामध्ये संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सुरुवात केली होती, या विषयाशी संबंधित काही प्रश्नांची उत्तरे सभागृहाने मागितल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्याची अंतिम उत्तरेही दिली होती. शासनाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिल्यानंतरही सभागृहाचे समाधान झाले नसेल आणि पुन्हा कोणाच्या काही शंका, प्रश्न, मागण्या असतील तर त्यावर जरुर शासनातर्फे मीही उत्तर देईल, सन्माननीय मंत्रीही उत्तर देतील. म्हणून सध्याच्या परिस्थितीत तरी या खात्याच्या माननीय राज्यमंत्र्यांना उत्तर देण्यास सभागृहाने परवानगी द्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी खालच्या सभागृहाला महत्वाचे समजावे आणि वरच्या सभागृहामध्ये सदर चर्चेवर उत्तर देण्यासाठी उपस्थित नसावे. हे अपेक्षित नाही. सदर चर्चेवर उत्तर देण्यासाठी व संबंधित इतर माननीय मंत्र्यांचे उत्तर ऐकण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित असलेच पाहिजे, अशी आमची आग्रही मागणी आहे. त्याशिवाय आम्ही या चर्चेवरील उत्तर ऐकणार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आज नाशिक येथे माननीय राष्ट्रपती महोदयांचा पूर्वनियोजित कार्यक्रम होता, त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना तेथे जाणे आवश्यक होते. या खात्याशी संबंधित माननीय राज्यमंत्र्यांना उत्तर देण्यासाठी परवानगी देण्यात यावी.

(गोंधळ )

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या सभागृहामध्ये एवढया महत्वाच्या आणि जिव्हाळया प्रश्नावर या पध्दतीने जर चर्चा होत असेल तर आम्ही येथे बसणार नाही. या विषयावर आम्ही चर्चा उपस्थित करुन आम्हाला जर न्याय मिळत नसेल तर आम्ही येथे बसण्यात काहीही मतलब नाही.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकत्र बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी म्हणून कोणत्याही चर्चेचे उत्तर कोणताही मंत्री सरकारच्या वतीने तसेच माननीय सभापतींच्या परवानगीने देऊ शकतो. म्हणून या चर्चेवरील उत्तराला सुरुवात करण्याकरिता परवानगी देण्यात यावी.

......4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( गोंधळ )

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे जर होत असेल तर आम्ही येथे कशासाठी बसावयाचे ?

यानंतर श्री.गागरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय मुख्यमंत्र्यांनी ही चर्चा उद्या ठेवण्याची परवानगी मागितली. काल आम्ही या विषयावर चर्चा करण्यासाठी तयार होते. परंतु माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, उद्या उत्तर देतो. त्यांना वेळ काढून न्यायची होती. काल तर ते माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना प्रोत्साहन देत होते.

**उपसभापती** : सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील येथे आलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, या चर्चेला मी उत्तर देणार आहे. त्याप्रमाणे त्यांनी उत्तराला सुरुवात करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही अशी अपेक्षा केली होती की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी म्हटल्यानुसार ते स्वत: आज सभागृहात उपस्थित राहून उत्तर देतील. काल सच्चर समितीच्या अहवालावर चर्चा करण्यासाठी व उत्तर देण्यासाठी उशिरापर्यंत सभागृह चालू ठेवले. तुम्ही मुस्लिमांच्या दाढया कुरवाळता. मुस्लिमांचे लांगुलचालन करता. शेतकऱ्यांकरिता काहीच करीत नाही. काल याबाबत आम्ही काही तक्रार केली नाही. आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर हवे आहे, अशी आमची सुरुवातीपासून मागणी आहे व तशी नम्र विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या चर्चेचे उत्तर माननीय मुख्यमंत्री यांनीच दिले पाहिजे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी यावर उत्तर देण्याचे अमान्य केलेले नाही. आज राष्ट्रपती महोदयांचा नियोजित कार्यक्रम असल्याने माननीय मुख्यमंत्री तिकडे गेलेले आहेत. तोपर्यंत संबंधित मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : मुख्यमंत्री महोदयांनी उद्या त्यांना येथे उपस्थित राहता येणार नाही असे काल का सांगितले नाही ? उद्या उत्तर देतो असे माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या सदनाच्या नियमाप्रमाणे व प्रथेप्रमाणे काम चालले पाहिजे. केवळ मोठयाने बोलून सभागृहाचे नियम बदलता येणार नाही. माननीय सदस्यांनी

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

मोठमोठयाने बोलून सभागृहाचे कामकाज चालणार नाही. मी वारंवार सांगतो की, सभागृहात उत्तर देण्यास आम्ही सक्षम आहोत. शासनामार्फत उत्तर देण्यास आम्ही तयार असल्यामुळे आपण ऐकले पाहिजे. सभागृह आपल्याच मनाप्रमाणे चालले पाहिजे ही भूमिका विरोधी पक्षाच्या सदस्यांनी सोडली पाहिजे. माननीय सभापती महोदयांनी सांगितल्यानुसार उत्तराच्या भाषणास सुरुवात करतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तुम्ही शेतकऱ्यांची दिशाभूल करीत आहात. माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी काल स्वत: कबूल केले होते व म्हणाले होते की, मी स्वत: उत्तर देणार आहे. परंतु उत्तर देण्यासाठी आज ते उपस्थित नाहीत. शासनाची टाळण्याची भूमिका असेल तर आम्ही सभागृहाच्या कामकाजात भाग घेत नाही. जोपर्यंत माननीय मुख्यमंत्री येत नाहीत, तोपर्यंत आम्ही वेलमध्ये खाली बसतो. तुमचे कामकाज चालू द्या, आम्ही सभागृहाच्या कामकाजात भाग घेणार नाही.

(विरोधी पक्षाचे सदस्य "शेतकऱ्यांना न्याय द्या" अशा घोषणा देतात)

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये बसतात)

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा प्रस्ताव सदनामध्ये मांडला त्या दिवसापासून या क्षणापर्यंत आम्ही मागणी केलेली आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयाबाबत चर्चा चालू असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहिले पाहिजे व त्याचे उत्तर दिले पाहिजे. माननीय मुख्यमंत्री काल एकदा सभागृहात आले. कारण त्यांचा इंटरेस्ट शेतकऱ्यांबद्दल नव्हता, फक्त सच्चर समितीच्या अहवालाबाबत होता. आम्ही विनंती करत होतो की, सकाळी 10 वाजता सदनाचे कामकाज सुरु झाले आहे, आता सायंकाळचे सात वाजले आहेत. आता आपण कामकाज थांबवू व नंतर चर्चा करु. पण माननीय मुख्यमंत्र्यांच्या आग्रहाखातर पिठासीन अधिकाऱ्यानीही वेळ वाढविली. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या चर्चेला उत्तर दिले. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न हा संपूर्ण महाराष्ट्राचा प्रश्न आहे, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रावर हा अन्याय होत आहे. त्यामुळे या प्रश्नाला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. उपमुख्यमंत्री हे वैधानिक पद नाही त्यामुळे आम्हाला मुख्यमंत्र्यांकडून उत्तर हवे आहे. त्यांनी उत्तर केंव्हा द्यायचे हे तुम्ही ठरवावे तोपर्यंत आम्ही वेलमध्ये खाली बसतो.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये बसतात)

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसून बोलतात.)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अशा पद्धतीने आमच्यावर अन्याय होणार असेल व शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नासंबंधी शासन अशा प्रकारे भूमिका घेणार असेल तर आम्ही सर्व सन्माननीय सदस्य वेलमध्ये बसू व आम्ही एकही शब्द बोलणार नाही, कामकाजात भाग घेणार नाही.

**उपसभापती** : माझी आपल्याला अशी विनंती आहे,.....आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे... काल विधानसभेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा झाली त्यावेळी संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी उत्तर देण्यास सुरुवात केली व शेवटी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, आपण यासंदर्भात खात्री करुन घ्यावी......

(सर्व सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री. दिवाकर रावते (वेलमध्ये बसून ) : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी काल असे सांगितले होते की, या ठरावावर उद्या उत्तर दिले जाईल....

**उपसभापती** : शेतकऱ्यांची आत्महत्या हा महत्वाचा विषय आहे. या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यंचा सहभाग असणे आवश्यक आहे. आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापती महोदयांकडे जाऊन दहा मिनिटे चर्चा करावी असे मला वाटते. तरी माझी सर्व गटनेत्यांना विनंती आहे. मी आपणासर्वांच्या विनंतीचा मान ठेवला आहे. आपणही माझे ऐकावे. शेवटी आपणा सर्वांना या सभागृहाचे कामकाज चालवायचे आहे. माननीय श्री. फुंडकर साहेब, आपण तसेच अन्य सर्व गटनेत्यांनी माननीय सभापतींच्या दालनात यावे तेथे आपण याबाबत चर्चा करु. त्यासाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी तहकूब करतो. सभागृहाची बैठक 11 वाजून 25 मिनिटांनी पुन: सुरु करण्यात येईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.12 ते 11.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

...................

यानंतर श्री. सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगिती नंतर --- )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक 11.40 वाजेपर्यंत स्थगित करतो.

सभागृहाची बैठक 11.25 ते 11.40 पर्यंत स्थगित झाली.

( यानंतर श्री. सरफरे .... एच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर** :

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**उपसभापती** : माननीय सभापतींच्या दालनामध्ये सर्व गट नेत्यांची बैठक झाली. या बैठकीमध्ये असे ठरले आहे की, नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेला माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये उत्तर दिले जाईल. माननीय मुख्यमंत्र्याचे चर्चेला उत्तर सुरु होण्यापूर्वी संबंधित खात्याचे मंत्री व राज्यमंत्री चर्चेला उत्तर देण्यास सुरुवात करतील. माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भातील आजचा हा निर्णय अपवादात्मक परिस्थिती म्हणूनच सर्व गटनेत्यांच्या संमतीने माननीय सभापतींच्या अध्यक्षतेखाली झालेला आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा निर्णय अपवादात्मक म्हणून लागू करता कामा नये.

**उपसभापती** : सभागृहातील चर्चेला उत्तर देण्याचा अधिकार हा संबंधित खात्याचा मंत्र्यांना असतो. परंतु या चर्चेचे गांभीर्य आणि गट नेत्यांनी केलेली विनंती व सूचना यांच्या अनुषंगाने घेण्यात आलेला निर्णय मी सभागृहामध्ये सांगितला आहे.

आता मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. दुपारी 1.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( 11.42 ते 1.00 पर्यंत सभागृह स्थगित )

-----

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेला प्रस्ताव**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सदनाचे माननीय उपसभापती ....

**सभापती** : आपण मला माझ्या दालनामध्ये भेटला होता.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचे माननीय उपसभापती यांच्या संदर्भात विधानसभा सभागृहामध्ये चर्चा झाली परंतु या सर्वोच्च सभागृहामध्ये ....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सुरु झालेले नाही त्यामुळे हरकतीचा मुद्दा कसा काय उपस्थित होऊ शकतो ?

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य मला माझ्या दालनामध्ये भेटले होते. मी त्यांना सांगितले की, सभागृह सुरु झाल्यानंतर याबाबतीत योग्य वेळी जरुर बोलण्यासाठी वेळ देईन. आता प्रश्नोत्तराचा तास आहे. त्या अगोदर नियम 289 अन्वये सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यासंदर्भात त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता मी त्यांना दोन मिनिटे परवानगी देत आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात मी सुध्दा औचित्याचा मुद्दा मांडणार आहे असे मी म्हटले आहे.

**सभापती** : ज्यावेळी मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना बोलण्याची संधी देईन त्यावेळी आपल्याला सुध्दा बोलण्याची संधी देईन.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी एका गंभीर प्रश्नाच्या संदर्भात नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे. त्यासंदर्भात आपण मला दोन मिनिटे बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. गेल्या दोन-तीन दिवसांपासून सर्व वृत्तपत्रांमध्ये एक बातमी सारखी येत आहे की, उल्हासनगरमधील एका शिक्षकाने एका 17 वर्षाच्या मुलीवर गेल्या दहा महिन्यांपासून बलात्काराचे सत्र सुरु केले आहे. परवा मी स्वत: उल्हासनगरमध्ये जाऊन या प्रकरणाची माहिती

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते .......

घेतली. संबंधित व्यक्ती हे शिक्षक नाहीत. मला शेकडो शिक्षकांचे फोन आले. ते कोणत्या शाळेत शिक्षक आहेत याची माहिती घेतली. ते शिक्षक नाहीत. संबंधित व्यक्ती श्री. लाल तनवानी यांचा खासगी कोचिंग क्लास आहे. ते शिक्षक नसून संस्था चालक आहेत. त्यांच्याकडून दहा वर्षे खाजगी क्लासमध्ये शिकणाऱ्या एफ.वाय.बी.कॉम.च्या विद्यार्थीनीवर अन्याय आणि अत्याचार झालेला आहे. मी संबंधित पोलीस स्टेशनला गेलो. पोलीस स्टेशनकडून मला कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. हे प्रकरण अत्यंत गंभीर आहे. यासंदर्भात शासनाने दखल घेऊन निवेदन करावे म्हणून मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, नियमाप्रमाणे दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये अशा पध्दतीचा एखादा विषय असेल तर त्याबाबत प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन तो विषय आपण चर्चेला घेऊ शकतो. सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये ज्या विषयाच्या संदर्भात प्रस्ताव दिलेला आहे असा कोणताही विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत नसल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या मी या प्रस्तावाला अनुमती देऊ शकत नाही. मात्र सन्माननीय सदस्यांनी या निमित्ताने एका गंभीर बाबीकडे लक्ष वेधलेले आहे. मी सन्माननीय गृहमंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी सदनामध्ये याबाबतीत तातडीने निवेदन करावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : निवेदन करण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचा जो औचित्याचा मुद्दा आहे त्यासंदर्भात माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण प्रश्नोत्तराचा तास सुरु करुया आणि तो संपल्यानंतर मी आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी देईन.

श्री. जयंत प्र.पाटील : ठीक आहे.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT/ KTG/

**पृ. शी. / मु. शी.** : तोंडी उत्तरे

**विदर्भातील दर्यापूर व अंजणगाव (जि.अमरावती) येथील शासकीय धान्य गोदामातील अधिकाऱ्यानी धान्याचा केलेला गैरव्यवहार**

(1) * 33796 **प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील, श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर , श्री. सय्यद पाशा पटेल , श्री. विनोद तावडे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. रमेश निकोसे , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मु.पो.अंजनगांव व दर्यापूर (जि.अमरावती) येथील सरकारी गोदामामध्ये झालेल्या धान्याचा घोटाळा 62 कोटीचा झाल्याचे अन्न व नागरी पूरवठा विभागाच्या ऑडिटमध्ये उघड झाले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी या घोटाळ्यास कारणीभूत असणारे भूसंपादन अधिकारी श्री.दिनकर काळे, अचलपूरचे उपविभागीय अधिकारी राम सिध्दभट्टी यवतमाळचे उपविभागीय अधिकारी धनंजय गोगटे ह्यांना दिनांक 29 ऑगस्ट, 2007 रोजी वा त्या सुमारास निलंबित केले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या तिघांचा झालेल्या घोटाळ्यामध्ये नेमका काय सहभाग होता, त्यांनी किती रुपयांचा घोटाळा केल्याचे उघडकीस आले आहे व या सर्व प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास, दोषी व्यक्तिविरुध्द काय कारवाई करण्यांत आली वा येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) अंजनगांव व दर्यापूर येथील शासकीय धान्य गोदामात अनुक्रमे रु. 27,42,564/- आणि रु. 39,81,324/- या प्रकारे रु. 67,23,888/- चा घोटाळा झ ााल्याचे निदर्शनास आले आहे.

(2) या प्रकरणी नमूद केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना शासन आदेश दिनांक 23 ऑगस्ट, 2007 अन्वये निलंबित करण्यात आले आहे,

(3) प्रस्तुत प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षकीय जबाबदारी पार पाडण्याच्या कर्तव्यात कसूर केल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने त्यांचे विरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, कोटीमध्ये नाही पण लाखो रुपयांचा घोटाळा झालेला आहे. ज्या अधिकाऱ्यांनी तो घोटाळा केलेला आहे त्या अधिकाऱ्यांची ग्रेड काय आहे, त्यांचे पद कोणते ? त्या घोटाळ्याच्या कालावधीमध्ये त्या ठिकाणी जिल्हा पुरवठा अधिकारी, तालुका पुरवठा अधिकारी, तहसीलदार यांनी किती वेळा भेटी दिल्या होत्या आणि त्यांचे त्याबाबतीत रिमार्क्स काय आहेत ? त्या गोडाऊनमध्ये किती माल होता याबाबतची माहिती शासनाकडे आहे काय ?

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.33796.....)

डॉ.राजेंद्र शिंगणे : दर्यापूर आणि अंजनगाव येथील गोडाऊनमध्ये धान्य घोटाळा झालेला असून त्यामध्ये 11 अधिकारी होते. दोन डीएसओ, एसडीओ, तहसिलदार, गोडाऊनकिपर त्याचप्रमाणे पुरवठा निरीक्षक असे हे अधिकारी आहेत. या सर्व अधिका-यांवर नियमानुसार कारवाई केलेली आहे. सर्व अधिका-यांवर विभागीय चौकशी सुध्दा प्रस्तावित केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे गोडाऊनला भेट देऊन गोडाऊनमध्ये माल आहे की नाही, माल कधी आला, कधी गेला हे तपासण्याची जाबबादारी एसडीओ, पुरवठा अधिकारी किंवा डीएसओ यांची असून त्यांनी वेळोवेळी भेटी दिलेल्या आहेत. त्या भेटी दिल्यानंतर सुध्दा अशा पध्दतीने हा घोटाळा झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : निलंबित केलेल्या अधिका-यांची नांवे काय आहेत ? निलंबन ही शिक्षा नाही. कारण सहा महिन्यामध्ये चौकशी करुन कारवाई केली नाही तर त्या व्यक्तीस पुन्हा रिइन्स्टेट केले जाते. तेव्हा या अधिका-यांना बडतर्फ कराल काय ? या अधिका-यांची नावे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : अधिका-यांची नांवे याप्रमाणे आहेत. एसडीओ काळे, दुसरे एसडीओ सिध्दभट्टी, एसडीओ गोगटे, तहसिलदार कुमरवार, पारनाईक, थोरात, पुरवठा निरीक्षक ढोक, राठोड, देशपांडे आणि गोडाऊनकिपर माकुडे आणि नाकट .

श्री. दिवाकर रावते : अधिका-यांवर निलंबनाची कारवाई केल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. त्यांची खातेनिहाय चौकशी होत असल्याचे देखील मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. या प्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे काय ? नसल्यास, तो दाखल केला जाईल काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : अंजनगाव आणि दर्यापूर या ठिकाणी धान्य घोटाळा झालेला आहे. अंजनगाव येथील पोलीस स्टेशनमध्ये 125/6 कलमा खाली दिनांक 1.2.2006 रोजी आणि दर्यापूर पोलीस स्टेशनमध्ये दिनांक 1.8.2006 रोजी कलम 104, 401 आणि इसेन्शियल कमॉडिटी ॲक्ट अंतर्गत हा गुन्हा येत असल्यामुळे त्या कायद्याच्या कलम 307 खाली गुन्हा दाखल केलेला आहे.

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.33796.....)

श्री. श्रीकांत जोशी : गेल्या आठवड्यामध्ये मका घोटाळ्याचा प्रश्न देखील आम्ही उपस्थित केला होता. धान्याच्या होणा-या खरेदीमध्ये प्रचंड तूट जाणवते हे कागदोपत्री सिध्द झालेले आहे. यामध्ये बोनाफाईड तूट किती आहे आणि मालाफाईड तूट किती आहे ? महसूल कर्मचारी संघटनेने हे काम आम्ही करणार नाही, हे आमचे काम नाही असे सांगितलेले आहे. मालाची खरेदी, खरेदी विक्री संघ करतो आणि तो माल सांभाळण्याची जबाबदारी तहसिलदार, उपजिल्हाधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपविली जाते आणि त्यामध्ये हे अधिकारी भरडले जातात. या प्रकरणी मालाफाईड चोरी किती झाली ? मालाची चुकीच्या पध्दतीने हाताळणी केल्यामुळे नेमके किती नुकसान झाले याची चौकशी सरकार करत नाही असे महसूल कर्मचारी संघटनेचे म्हणणे आहे. या प्रकरणी ज्या अधिका-यांवर दोषारोप केलेले आहेत त्यानी गोडाऊनची तपासणी केली नाही. ह्युमिडिटीमुळे वजन कमी झालेले आहे किंवा नाही यासंबंधीचा अहवाल दाखल झालेला आहे काय ? या प्रकरणी ज्यांचे मालाफाईड इण्टेन्शन आहे त्यांच्यावर कारवाई केलेली आहे काय, की केवळ हे प्रकरण दडपण्यासाठी थातूरमातूर केस केलेली आहे, याचे मंत्री महोदयांनी स्पष्टीकरण करावे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ ता.प्र.क्र.33796............. 11:35

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अंजनगाव आणि दर्यापूर येथील धान्य घोटाळ्याच्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे आणि सूचना केल्याप्रमाणे पोलीस तपासामध्ये हे सर्व मुद्दे अंतर्भूत होणार आहेत. त्यांनी दोन प्रकारच्या घोटाळ्याचा संदर्भ सांगितला आहे. दोन प्रकारच्या कमतरतेमुळे धान्य कमी झाले असल्यामुळे निश्चितपणे पोलीस तपासामध्ये ही बाब तपासून घेण्याच्या सूचना दिल्या जातील. अधिकाऱ्यांवर कारवाई केली, त्यांचे निलंबन केले आणि विभागीय चौकशी सुध्दा करीत आहोत. निव्वळ अधिकाऱ्यांवर कारवाई केली अशातला भाग नाही. या संदर्भात ज्या ज्या दुकानदारांनी हे चोरलेले धान्य विकत घेतले, ज्या व्यापाऱ्यांनी धान्य विकत घेतले, अंजनगाव किंवा दर्यापूर येथे असलेले स्वस्त धान्य दुकानदार आणि इतर व्यापारी यांच्यावरही गुन्हे दाखल केले असून त्यांना सुध्दा अटक झालेली आहे. म्हणून ही सर्व कारवाई पूर्ण करुन संबंधित जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा एकूण 67.23 लाख रुपयांचा भ्रष्टाचार आहे. संबंधितांना निलंबीत केल्याचे मंत्रीमहोदयांनी सांगितले. पोलिसांनी अटक केली का याबद्दल माहिती दिलेली नाही. सहा महिन्यात त्यांची विभागीय चौकशी पूर्ण करु असे म्हटले आहे. यासाठी जे अधिकारी नेमले जातील, ते महसूल विभागाचे आहेत की बाहेरच्या विभागातून घेतले जातील? त्यांना चौकशीचे जे आदेश दिले आहेत त्या चौकशी आदेशाच्या कक्षेमध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश आहे? ज्यांना अटक झाली ते किती वेळ अटकेमध्ये होते? त्यांनी जामिनासाठी कुठे अर्ज केला होता/

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, जवळपास 11 लोकांवर कारवाई केल्यानंतर काही जणांना अटक सुध्दा झाली होती. तहसीलदार, पुरवठा निरीक्षक किंवा एफएसआय असतील, काहींनी अटकपूर्व जामीन घेतला, काहींना अटक झाल्यानंतर जामीन मिळाला. साधारणत: 1.8.2006 रोजी गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधितांना ताबडतोब अटक करण्यात आली आणि ताबडतोब जामीन दिला गेला. काही लोकांनी अटकपूर्व जामीन घेतला होता.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, हा घोटाळा नेमका कशा प्रकारचा होता? नेमके किती क्विंटल धान्य बाहेर विकले गेले आणि त्याची किंमत काय होती? प्रत्यक्ष धान्यामध्ये घट आल्यामुळे दोषी धरले का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33796..............

डॉ.राजेंद्र शिंगणे : अंजनगावला जो धान्य घोटाळा झाला त्यामध्ये 2808 क्विंटल गहू कमी झाला. त्याची किंमत रु.18.81 लाख होती. अंजनगाव येथे तांदूळ 913.16 क्विंटल कमी झाला आणि त्याची किंमत रु.8.31 लाख होती. दर्यापूर येथे गहू 3221 क्विंटल कमी झाला आणि त्याची किंमत रु.21.58 लाख होती. दर्यापूर येथे तांदूळ कमी झाला 2003 क्विंटल आणि त्याची किंमत रु. 18.23 लाख होती. ही तूट लक्षात आल्याबरोबर संबंधितांवर तसेच व्यापारी आणि स्वस्त धान्य दुकानदार यांच्यावर कारवाई केली. गोडावूनमध्ये तूट आलेली नव्हती. विक्री न होता गोडावूनमधून लंपास झालेला माल स्थानिकांना विकलेला दिसतो. पोलीस चौकशीमध्ये सर्व गोष्टी समोर येतील. या अनुषंगाने मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, अलिकडच्या काळामध्ये राज्यात अनेक ठिकाणी अशा प्रकारचे घोटाळे समोर येत आहेत. मोठया प्रमाणावर अशा घटना घडत आहेत. या संदर्भात महसूल आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या कर्मचारी तसेच अधिकाऱ्यांना गोडावूनच्या संदर्भातील प्रशिक्षण मागच्या काळात दिले जात होते. उत्तरप्रदेशमधील गाझियाबाद येथे हापूर गावी इन्स्टिटयूट आहे त्याठिकाणी गोडावूनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना गोडावून मॅन्युअलप्रमाणे गोडावूनचे मेंटेनन्स, अकाऊंट ठेवणे, इन्स्पेक्शन करणे याचे प्रशिक्षण दिले जाते........

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 33796** .........

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

तशा प्रकारचे प्रशिक्षण अलिकडच्या काळात आपल्या राज्यामध्ये यशदा किंवा इतर संस्थांच्या माध्यमातून घेऊन कर्मचा-यांना प्रशिक्षित करण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या घोटाळयाच्या संदर्भात प्रामुख्याने सन्माननीय सदस्य श्री. डायगव्हाणे साहेबांनी मागणी केलेली आहे की, सहामहिन्याच्या आत या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईल काय? या घोटाळयात केवळ 3 हमालांना दोषी ठरवून या घोटाळयाला पूर्ण विराम देण्याचा प्रयत्न चालू आहे, ही गोष्ट खरी आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये जे अधिकारी कर्मचारी निलंबित झ ाालेले आहेत त्यांची नियमानुसार 6 महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करावी लागणार आहे. पोलिसांच्या माध्यमातून तसेच आपण जी विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. विभागीय चौकशी ही शासनाच्या माध्यमातून होत असते ती चौकशी सुध्दा सहा महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे हा मुद्दा केवळ हमालांपुरता मर्यादित न राहता यासंदर्भात जे जे अधिकारी, कर्मचारी दोषी असतील त्या सर्वांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

----------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोयना विस्थापिंताचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२) * ३५६७५ श्री. अरविंद सावंत, श्री. अनिल परब , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. सुरेश जेथलिया , श्री.परशुराम उपरकर , श्री. गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरण व जलविद्युत प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबियांच्या पुनर्वसनासाठी राखून ठेवलेली जमिन भूषण स्टिल या खाजगी कंपनीला शासनाने दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना धरणग्रस्त कुटुंबियापैकी काही कुटुंबे आजही निवारा व शेतजमिनीसाठी वणवण भटकत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विस्थापित कुटुंबाना रायगड जिल्ह्यात राखून ठेवलेली जमिन अद्यापपावेतो न देण्याची काय कारणे आहेत,

(४) असल्यास, रायगड व ठाणे जिल्ह्यांमध्ये कोयना प्रकल्पग्रस्तांच्या एकूण ६२ वसाहती असून त्या सर्वांना आवश्यक त्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त वसाहतीतील अपूर्ण कामे तातडीने पूरी करण्याबाबत शासनाने काय कारवाई केली आहे ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्या करिता :** (१) नाही,

(२) नाही.

(३) रायगड जिल्ह्यात विस्थापितांच्या कुटबांना राखून ठेवलेल्या जमिनी नाहीत.

(४) होय,

(५) पुनर्वसित वसाहतीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

श्री. अरविंद सावंत : सन्माननीय सभापती महोदय, मुंबई मध्ये अनाधिकृतपणे बांधकाम केलेल्या झोपडपट्टयांचे पुनर्वसन करुन त्यांना चांगल्या इमारतीत राहण्यासाठी जागा देण्यात आलेल्या आहेत. परंतु ज्या शेतक-यांनी आपल्या जमिनी धरणासाठी दिलेल्या आहेत, 30-30,40 -40 वर्षानंतर सुध्दा त्यांचे पुनर्वसन आज पर्यंत झालेले नाही. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आज अशी किती कुटुंबे आहेत की, ज्यांचे आजपर्यंत पुनर्वसन झाले नाही ? तसेच मूळ खातेदारांच्या एकत्रित कुटुंबातील वारस व्यक्तीची खातेफोड शासनाने करुन न घेतल्याने मूळ खातेदारांच्या कुटुंबातील वारसदार व्यक्तिंना पर्यायी जमिनीपासून वंचित ठेवले आहे हे खरे आहे काय? असल्यास अशा कुटूंबाना एक एकर जमीन देण्याचा शासनाने 2004 साली निर्णय घेतला होता त्यानुसार त्यांना तशा प्रकारची जमीन देण्यात आली नाही अशी किती कुटुंबे आजही शिल्लक आहेत?

...3

**ता.प्र.क्र. : ३५६७५** .........

डॉ. राजेंद्र शिंगणे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पुनर्वसनाच्या संदर्भात अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. कोयना प्रकल्पाची 1953 मध्ये सुरुवात झाली होती व 1976 मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले होते. संपूर्ण महाराष्ट्राला वीज पुरवण्यासाठी या प्रकल्पाची निर्मिती झाली होती. जवळपास 25599 हेक्टर जमीन या प्रकल्पात गेलेली आहे. या प्रकल्पाच्या पुनवर्सनाच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित होत असतात. कोयना धरणाच्या प्रकल्पग्रस्तांना जमीन देण्याचा प्रश्न असेल, वसाहती निर्माण करुन त्या वसाहतींना नागरी सुविधा देण्याचा प्रश्न असेल, प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत ही गोष्ट खरी आहे. मागच्या वेळेस आपण अनेक खातेदारांना सातारा, सांगली,सोलापूर, रायगगड, ठाणे या जिल्हयांमध्ये या लोकांचे पुनर्वसन करण्यचा प्रयत्न केला होता. असे असतांना सुध्दा वारंवार शिष्टमंडळ शासनाकडे येते आणि आमचे पुनर्वसन करा किंवा नियमानुसार आम्हाला जी देय जमीन आहे ती द्या अशा प्रकारची मागणी करीत असतात. या प्रकल्पातील किती लोकांचे अजूनपर्यंत पुनर्वसन करावयाचे आहे किती लोकांना जमीन द्यावची आहे याचा स्पेसिफिक आकडा अजूनपर्यंत तयार झालेला नाही ही जी वस्तुस्थिती आहे ती शासन मान्य करीत आहे. या प्रकल्पाच्या संदर्भात वारंवार तक्रारी येतात म्हणून 17.11.2007 रोजी शासनाने विभागीय आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे. कोयना प्रकल्पाच्या संदर्भात जे जे प्रश्न असतील मग ते जमीन देण्याच्या संदर्भात असतील, भुखंड देण्याच्या संदर्भात असतील,प्रकल्प ग्रस्तांना दाखले देण्याच्या संदर्भातील असतील, नागरी वसाहतींना सोयी देण्याचे प्रश्न असतील अशा सर्व प्रश्नांची या ठिकाणी ताबडतोबीने माहिती घ्यावी, 5-6 जिल्हयामध्ये जे प्रकल्प ग्रस्त असतील त्या सर्वांची माहिती घेण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती आपण स्थापन केलेली असून यामध्ये विभागीय आयुक्त कोकण विभाग हे सहअध्यक्ष असून, जिल्हाधिकारी सातारा ,जिल्हाधिकारी सांगली जिल्हाधिकारी सोलापूर, जिल्हाधिकारी ठाणे जिल्हाधिकारी रायगड, जिल्हाधिकारी रत्नागिरी आणि उपआयुक्त, पुनर्वसन पुणे विभाग या सर्वांची आपण समिती स्थापन केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 13:20

ता.प्र.क्र.35675.............

डॉ.राजेंद्र शिंगणे...........

ही समिती पुढील तीन महिन्यांत प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न जाणून घेऊन किती प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यावयाचा आहे याबाबत आढावा घेऊन त्यांना न्याय देण्याचे काम त्या समितीवर सोपविलेले आहे. येत्या पहिल्या आठवड्यात त्या समितीची पहिली बैठक होणार आहे. प्रकल्पग्रस्तांच्या काही अडचणी असतील तर त्यांनी त्या त्या विभागाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे तशी नोंद करावी अशाप्रकारची जाहिरात वर्तमानपत्रात देणार आहोत. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात तीन महिन्यात कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोयना धरण बांधून 30-35 वर्षे झाली. 'आधी पुनर्वसन आणि नंतर प्रकल्प' असे राज्य शासनाचे धोरण असताना अद्यापपर्यंत या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नाही. या ठिकाणी जेव्हा जेव्हा कोयना प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित झाला, त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांकडून अमूक अमूक समिती नेमली आहे, त्या समितीचा रिपोर्ट आल्यानंतर कार्यवाही करू अशाप्रकारची उत्तरे दिली जातात. शेतकऱ्यांनी कोयना प्रकल्पासाठी आपल्या जमिनी दिल्या, परंतु त्यांचे पुनर्वसन न झाल्यामुळे ते आज वणवण फिरत आहेत. तेव्हा या प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न किती दिवसांत सोडविणार आहात याबाबत मंत्रिमहोदय ठामपणे उत्तर देतील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सुटले नाहीत अशातला भाग नाही. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्न करीत आहे. जमीन वाटपा संदर्भात सांगू इच्छितो की, सातारा जिल्ह्यात -2885, सांगली जिल्ह्यांत- 263, सोलापूर जिल्ह्यात- 2353, रायगड जिल्ह्यात 571आणि ठाणे जिल्ह्यात 409 खातेदारांना जमिनींचे वाटप करण्यात आलेले आहे. एकूण 6441 खातेदारांना जमिनींचे वाटप करण्यात आलेले आहे. त्याच बरोबर ठाणे व रायगड या दोन जिल्ह्यांत नागरी वस्त्या तयार केलेल्या आहेत. त्याठिकाणी नागरी सुविधा पुरविण्याचे काम केलेले आहे. यासाठी ठाणे जिल्ह्यांत 471 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे तर रायगड जिल्ह्यांसाठी 10.65 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न पुढील तीन महिन्यांत सोडविण्यात येतील.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35675.............

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, काही वन अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना अंधरात ठेवून स्वत:च्या नावावर केलेल्या आहेत. तेव्हा याची सखोल चौकशी करणार काय ? यामध्ये जे दोषी अधिकारी असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ? आतापर्यंत किती प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना वन विभागासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. त्यांच्याकडे अशी स्पेसिफिक तक्रार आली असेल तर त्यांनी ती माझ्याकडे द्यावी. त्या तक्रारीची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई केली जाईल. रायगड जिल्ह्यातील 8 व ठाणे जिल्ह्यांतील 98 प्रकल्पग्रस्तांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात आलेले आहे.

श्री.भास्करराव जाधव : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांकडे दुर्लक्ष झालेले आहे हे माननीय मंत्रिमहोदयांनी मान्य केलेले आहे. रायगड व ठाणे जिल्ह्यांमध्ये कोयना प्रकल्पग्रस्तांच्या 62 वस्त्या आहेत. त्याठिकाणी शासनाने किती खर्च करण्याचा निर्णय घेतला होता, त्यापैकी किती खर्च करण्यात आला याची विगतवारी मंत्रिमहोदय देतील काय ? वसाहतीतील अपूर्ण कामे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यासाठी 471 कोटी रुपये व रायगड जिल्ह्यासाठी 10.65 कोटी रुपये शासन खर्च करणार आहे....

श्री.भास्करराव जाधव : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यासाठी शासन किती खर्च करणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यासाठी किती तरतूद केलेली आहे याची आकडेवारी आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवतो. नागरी वस्त्यांतील अपूर्ण कामे 31 डिसेंबरपूर्वी पूर्ण करण्यात येतील.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35675....

**सभापती** : याबाबतीतील माहिती माननीय मंत्रिमहोदय पटलावर ठेवणार आहेत. त्यांनी त्यामध्ये तरतूद किती ठेवलेली आहे, याचीही माहिती पटलावर ठेवावी व तीन महिन्यांमध्ये आपण जो कार्यक्रम पूर्ण करणार आहात, त्यामध्ये रत्नागिरी जिल्हयाला प्राधान्य द्यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, यामध्ये रत्नागिरी जिल्हयासाठी तरतूद नसेल तर निश्चितपणे तशाप्रकारची तरतूद केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वारंवार मी कोयना विस्थापितांचे एक प्रकरण मांडत आहे. श्री.मुकुंद कदम हे 1955-56 मध्ये रायगड जिल्हयातील कॅम्पमध्ये विस्थापित झाले, त्यानंतर दिवा-पनवेल रेल्वेमार्गाच्या निमित्ताने त्यांना पुन्हा नोटीस देण्यात आली, त्यानंतर तळोजा एमआयडीसीच्या निमित्ताने त्यांना पुन्हा नोटीस मिळाली व त्यानंतर पुन्हा नवी मुंबईच्या विकासासाठी त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे. एकाच विस्थापिताला अशाप्रकारे चार-चारवेळा विस्थापित करण्याचे काम सरकार करीत आहे, हे योग्य आहे का ? आपले 10-12 वर्षांचे नियोजन असते. आपण फक्त आता त्यांना तेथून उठवा नंतर पुढचे पुढे बघू, असेच आपले याबाबतीत धारेण आहे. आज या विस्थापितांच्या 7/12 भरलेल्या असल्यामुळे त्यांना कोणत्याही बँकाकडून कर्जही मिळत नाही. अशाप्रकारे जर आपण त्यांना प्रत्येक ठिकाणाहून विस्थापित करणार असाल तर त्यांनी जगावे कसे ? विस्थापितांना न्याय देण्याच्या दृष्टीने स्पेसिफीक अशाप्रकारचे आश्वासन देऊन त्यांना 8-10 दिवसांमध्ये विस्थापितांच्या वस्त्यांना भेट देऊन त्यांना आपण काही हाक देणार आहात की नाही ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, अशा ज्या वस्त्या आहेत, त्यांचे वारंवार पुनर्वसन होत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आता एका विस्थापिताचे उदाहरण दिले. एका विस्थापिताला आपण एका ठिकाणाहून उचचले व दुसऱ्या ठिकाणी त्यास स्थलांतरित केले, परंतु पुन्हा त्याला दुसऱ्यांदा व तिस-यांदा नोटीस देण्यात आलेली आहे. त्यामुळे या स्पेसिफीक केसबाबतीत आपण अधिवेशन संपल्यानंतर पहिल्या आठवडयात त्या वस्तीत जाऊन त्यांचे पुनर्वसन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35675....

**सभापती**....

व्यवस्थित होण्याच्यादृष्टीने जरुर प्रयत्न करावेत. तसेच आपण त्या वस्तीस ज्यादिवशी भेट देणार आहात त्यादिवशी तेथील स्थानिक आमदारांनाही सोबत घेऊन जाता आले तर त्यांना जरुर घेऊन जावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विस्थापितांच्या प्रश्नासंदर्भात आपण जे निर्देश दिले त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देऊ इच्छिते. पंरतु अनेक वर्षापासून हा प्रश्न चिघळत पडलेला आहे. सर्वच जिल्हयातील विस्थापितांचे आपण काय पुनर्वसन केले आहे आणि त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? याबाबतचा तपशीलवार अहवाल पुढील अधिवेशनापर्यंत सभागृहासमोर मांडण्यात यावा व तो आपण मांडणार का ? तसेच पुणे जिल्हयामध्येही जे धरणग्रस्त विस्थापित झालेले आहेत, त्यांच्या संबंधीचाही अहवाल आपण सभागृहासमोर ठेवावा.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, आपण तसा अहवाल सादर करणार आहोत. याबाबतीत विभागीय आयुक्तांच्या नेतृत्वाखाली समिती स्थापन केली जाईल व 3 महिन्यांमध्ये या संपूर्ण प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भातील कोणत्या प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे, याची माहिती आपण घेणार आहोत. पुढील अधिवेशनामध्ये मार्च महिन्यांपर्यंत निश्चितपणे यादृष्टीने 3 महिने पूर्ण होतील, त्यावेळी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी ज्या वस्तीचा उल्लेख केला व त्याबाबतीत आपण जे निर्देश दिल्याप्रमाणे त्या भागातील सर्व सन्माननीय सदस्यांना एकत्रिपणे घेऊन त्या वस्तीतील नागरिकांना न्याय देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात सहकारी पतसंस्थांसाठी "सहकार नियामक आयोग" स्थापन करण्याबाबत**

**(३) * ३३९५८ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यतील ३० हजारांहून जादा सहकारी पतसंस्थांना आर्थिक शिस्त लावण्यासाठी व त्यांच्या आर्थिक कारभारावर कायदेशीर नियंत्रण ठेवण्यासाठी 'सहकार नियामक आयोग' स्थापन करण्याची राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आयोगाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर आयोग किती कालावधीत कार्यान्वीत करण्यात येणार आहे ?

**श्री.जयप्रकाश दांडेगांवकर, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही,

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सहकार नियामक आयोग राज्यात स्थापन करण्याबाबत शासनापुढे कोणत्या अडचणी आहेत ? नसल्यास, आयोग नेमण्याबाबत नकारात्मक भूमिका घेण्याची कारणे काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, पत संस्थांवर नियंत्रण रहावे म्हणून आपण राज्यात विभागीय टास्कफोर्स केलेला असून जिल्हास्तरावरही तशाप्रकारची यंत्रणा निर्माण केलेली आहे. त्यामुळे सध्या तरी वेगळया नियामक आयोगाची आवश्यकता वाटत नाही. जेव्हा आवश्यकता निर्माण होईल, तेव्हा त्यादृष्टीने विचार करण्यात येईल.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.33958 पुढे सुरु</u>...........

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सहकारी पतसंस्था मोठया प्रमाणावर आहेत. काही पतसंस्था चांगल्या आहेत, काही संस्थांमध्ये कोटयावधी रुपयांचा घोटाळा झाला आहे. ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यानी चळवळ उभी केली आणि शासनाच्या निदर्शनास अनेक गोष्टी आणून दिलेल्या आहेत. या पतसंस्थांवर सहकारी कायद्यामार्फत नियंत्रण ठेवले जाते. माझ्या माहितीतील दोन-तीन पतसंस्था अशा आहेत ज्या गेल्या पाच वर्षांपासून बंद आहेत. त्या संस्थांच्या पदाधिका-यांनी ऑडिटरला मॅनेज केले, सहकार विभागातील अे.आर.ओ.ला मॅनेज केले. ठेवीदारांनी ठेवी परत मिळविण्यासाठी चार-पाच वर्षे प्रयत्न केले मात्र सहकारी कायद्याने काहीही उपाययोजना केली नाही. एक चांगली चळवळ महाराष्ट्रामध्ये सुरु असतांना काही पतसंस्था अशा पद्धतीने काम करीत असतील तर शासनाकडून याविषयी सकारात्मक विचार करण्यात येईल काय ?

सभापती महोदय, त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी सिस्टिम तयार करण्याबाबत प्रश्न विचारला. एखादी नवीन सिस्टिम तयार करुन त्यामार्फत कायदेशीर नियंत्रण ताबडतोबीने आणण्याची गरज आहे, या मताशी मीही सहमत आहे. याबाबत सरकार सकारात्मक विचार करेल काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी जी परिस्थिती विषद केली आहे, ती बरोबर आहे. गेल्या दोन-तीन वर्षामध्ये पतसंस्थांमध्ये, अर्बन बँकांमध्ये समस्या निर्माण झाल्या आहेत, हे मी मान्य करतो. 26618 पतसंस्थांपैकी 462 पतसंस्था समस्याग्रस्त झाल्या आहेत. या संस्थांचे ऑडिट, टेस्ट ऑडिट करण्यात आले आहे व काही दोष पुढे आले आहेत. सहकारी कायद्याच्या कलम 41 (ग), कलम 78 व कलम 83, 88 यानुसार चौकशी करण्यात येते, अशी चौकशी सुरु आहे. तथापि, मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. बँका, पतसंस्था यामधील आर्थिक गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. हा सर्व जनतेचा पैसा आहे, त्यावर नियंत्रण राहण्यासाठी या विभागातील, या विषयातील तज्ञ सदस्यांच्या संमतीने एक समिती नियुक्त करुन त्या समितीच्या शिफारशींच्या आधारावर नियंत्रण राहील आणि कठोर शिक्षेची तरतूद राहील, अशी व्यवस्था सरकारच्यावतीने करता येईल.

...2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.33958 पुढे सुरु...........</u>**

श्री.दिलीप देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सूचना केल्याप्रमाणे वेगळी समिती असावी, हे मला मान्य असतांना मला सन्माननीय मंत्रीमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, सध्या अस्तित्वात असलेला सहकारी कायदा हा मुळात कार्यक्षम आहे, त्याची अंमलबजावणी करावयास हवी, ती कठोरपणे होत नाही. यासंदर्भात शासन काय करणार आहे ? कारण वर्षानुवर्षे संस्थांचे ऑडिट होत नाही, दिवसेंदिवस शासकीय लेखापरीक्षक कमी होत चालले आहेत, खाजगी लेखापरीक्षकांना लेखापरीक्षणाचे काम देण्याचा निर्णय झाला, परंतु तरीही योग्य पद्धतीने लेखापरीक्षण होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या सहकार कायद्यातील तरतुदींची नीटपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासन काय करणार आहे ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे या तीन वर्षात माणसांच्या वागण्यामध्ये, वृत्तीमध्ये बदल झाल्यामुळे या अडचणी निर्माण झाल्या आहेत. पूर्वीही कायदा होता, सुसंस्कृतपणा होता, माणसांमध्ये एवढया भानगडी निर्माण निर्माण होत नव्हत्या, उपलब्ध शासकीय लेखापरीक्षकांकडूनच सर्व लेखापरीक्षण पूर्ण होत होते. एक-एक करीत शासकीय लेखापरीक्षक निवृत्त व्हावयास लागले त्यामुळे खाजगी लोकांना लेखापरीक्षणाचे काम दिले. खाजगी लोकांकडे काम देऊन सुध्दा बँकांमध्ये किंवा इतर सहकारी संस्थांमध्ये अडचण निर्माण झाली. आहे त्या कायद्याची अंमलबजावणी झाली तर निश्चित नियंत्रण राहू शकते. परंतु, या सहकारी कायद्यातील ज्या स्टेप्स आहेत त्यात पुष्कळ वेळ जातो. चार-पाच वर्षांनंतर दोष मृदू होतो आणि ख-या गुन्हेगारांवर कडक कारवाई होत नाही. कलम 83, कलम 88 खाली झालेल्या अनेक चौकशांमधील दोषी लोकांपैकी अगदी कमी लोकांना सजा होऊन वसूली झ ाली आहे.

यानंतर श्री.बोरले.........

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.33958**.........

श्री.जयप्रकाश दांडेगावकर .........

या सर्व गोष्टींचा फेर आढावा घेण्याबात एकत्र बसून अस्तित्वात असलेल्या कायद्यामध्ये बदल करावयाचा काय किंवा काही नवीन सुधारणा करावयाची काय यादृष्टीने विचार करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख आणि सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख यांनी दोन मुलभूत प्रश्न विचारले. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या प्रश्नाला नेमके उत्तर दिले नाही. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी असा प्रश्न विचारला की, लेखापरीक्षकांना मॅनेज केले जाते, अधिका-यांना मॅनेज केले जाते. मॅनेज करणे हे काय प्रकरण आहे आणि ते सहकार खात्याचे अंग आहे काय ? कोणताही घोटाळा झाल्यानंतर तो मॅनेज करणारे हे सर्कल आहे काय, त्याच्या माध्यमातून हे प्रश्न सोडविले जातात काय ? माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, माणसांच्या वर्तणुकीत बदल झालेला आहे. सहकार खात्यामध्ये असे फार क्वचित अधिकारी आहेत की, ते भ्रष्ट्राचारा पासून दूर आहेत. साध्या गोष्टींसाठी सुध्दा डेप्युटी रजिस्ट्रार, रजिस्ट्रार किंवा त्या खालचे अधिकारी असोत त्या ठिकाणी फक्त भ्रष्टाचार चालतो. माझ ा प्रश्न असा आहे की, मॅनेज करणे हा काय प्रकार आहे, याची माननीय मंत्री महोदयांना माहिती आहे काय आणि माहिती असेल तर त्यावर आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.जयप्रकाश दांडेगांवकर : सभापती महोदय, या प्रश्नाशी हे सर्व संबंधीत नाही. आता मॅनेजमेंटचा काळ आहे. हे इव्हेंट मॅनेजमेंट आहे. यामध्ये नवे मॅनेजमेंट निर्माण झाले असतील तर त्या मॅनेजमेंटला कसे दुरुस्त करता येईल याचा विचार केला जाईल.

-------

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील वालिवली (जि.अंबरनाथ) येथे शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन बेकायदेशीरपणे उत्खनन करत असल्याबाबत**

**(4) * 35123** **श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील वालिवली (ता.अंबरनाथ) येथील भूमापण क्र.188, 179 तसेच गट 220/1/1, कट क्र. 216 व 177 आणि 177/2 तसेच 178 या शासकीय जमिनींवर अतिक्रमण करुन बेकायदेशीररित्या उत्खनन करण्यात येत असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे, प्रांताधिकारी, उल्हासनगर यांचेकडे परिसरातील शेकडो नागरिकांनी दिनांक 21 डिसेंबर, 2006 रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी करण्यात येत असलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता** : (1) नवीन अंबरनाथ, साई वालिवली, वडवली या गावच्या ग्रामस्थांनी त्यांच्या गावाच्या बाजूला असलेल्या डोंगरात दगडखाणी सुरु झालेल्या असल्याने व त्या दगडखाणींपासून त्रास होत असल्याबाबत दिनांक 21 डिसेंबर, 2006 रोजी प्रांताधिकारी उल्हासनगर यांचेकडे तक्रार केली आहे.

(2) होय, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर विभाग, उल्हासनगर व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी केलेल्या चौकशी मध्ये मौजे वालिवली, ता.अंबरनाथ येथील सरकारी जमीन गट नं.188, 216 या जागेमधून श्री.विश्वनाथ पनवेलकर यांनी वेळोवेळी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडून तात्पुरत्या स्वरुपाचे परवाने घेवून उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे. तथापि, आता गट नं. 188 व 216 च्या सरकारी जमिनी डंपिंग ग्राऊंडसाठी कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेकडे वर्ग करण्यात आल्या असून, कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेला दिनांक 1/08/2007 रोजी या जमिनीचा ताबा देण्यात आलेला आहे. सदर शासकीय जमिनीमधून अनधिकृतरित्या उत्खनन झालेले असल्याचे आढळून आलेले नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जगन्नाथ शेवाळे : सभापती महोदय, नवीन अंबरनाथ, साई वालिवली, वडवली या परिसरामध्ये बेकायदेशीररित्या उत्खनन करण्यात येत असल्याची तक्रार शासनाकडे आलेली आहे काय आणि आली असेल तर त्याची चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, असे प्रश्नाचे स्वरुप आहे. माननीय मंत्री महोदयांनी

..3...



**ता.प्र.क्र. 35123 ..........**

श्री.जगन्नाथ शेवाळे ..........

उत्तरामध्ये तक्रार आल्याचे मान्य केले आहे, चौकशी केल्याचेही मान्य केले आहे आणि चौकशी अंती काय आढळून आले तर कोणतेही बेकायदेशीर कृत्य आढळून आलेले नाही. वेळोवेळी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडून त्या खाण मालकाला तात्पुरत्या स्वरुपाचे परवाने देण्यात आले होते. त्या परवान्याच्या आधारावर त्यांनी उत्खनन केलेले आहे. म्हणून त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. माझ्या माहिती प्रमाणे खाण परवाने नागरी वसतीच्या जवळ दिले जात नाहीत. नागरी वसतीतील लोकांना प्रदुषणाचा, ध्वनी प्रदुषणाचा त्रास होणार नाही हे बघून परवाने दिले जातात. या उत्खननासंदर्भात तेथील हजारो नागरीकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. तात्पुरत्या स्वरुपातील परवाने वारंवार देण्यात आलेले आहेत. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "त्यांनी वेळोवेळी तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचेकडून तात्पुरत्या स्वरुपाचे परवाने घेऊन हे उत्खनन केले असल्याचे आढळून आले आहे." माझा प्रश्न असा आहे की, तात्पुरत्या स्वरुपाचे परवाने किती दिवसासाठी दिले जातात, कशाच्या आधारावर दिले जातात आणि त्याचे निकष काय आहेत ?

श्री.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, नवीन अंबरनाथ, साई वालिवली, वडवली या परिसरातील नागरिकांनी दिनांक 21.12.2006 रोजी तक्रार दिली होती.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35123....

डॉ.राजेंद्र शिंगणे......

सभापती महोदय, शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन त्या ठिकाणी बेकायदेशीर उत्खनन केलेले आहे. त्यामुळे तेथील लोकांच्या घरांच्या भिंतीला तडे जाणे,जनावरे मृत्युमुखी पडून एकुणच पर्यावरणाला धोका निर्माण होणे,अशा स्वरुपाची ती तक्रार होती. ही तक्रार शासनाकडे आल्यानंतर विभागीय अधिकारी,तहसिलदार या सर्वांनी त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली आणि त्यांनी केलेल्या पाहणीअंतर्गत ज्यावेळी ते प्रत्येक गावामध्ये गेले त्यावेळी त्यांना असे आढळून आले की, तेथील लोकांच्या धरांच्या भिंतीला कोठेही तडा गेल्याचा प्रकार आढळून आला नाही. कोणत्याही भागामध्ये उत्खनन करतांना शासनाचे काही नियम आहेत, अटी आहेत,शर्ती आहेत. या नियमानुसार कोणत्याही ठिकाणी उत्खनन करतांना पोल्यूशन बोर्डाची एन.ओ.सी.घ्यावी लागते,सात-बाराचा नकाशा पाहिला जातो व तेथील सात बाराच्या उता-यावर इतर लोकांची नोंद असेल तर त्याचीही एन.ओ.सी.घेतली जाते. या ठिकाणी उत्खननाची परवानगी देत असतांना गावापासून,वस्तीपासून जवळपास 200 मीटर अंतर दूर जर उत्खननाचे ठिकाण असेल तर परवानगी दिली जाते. मुंबई उत्खनन,1985 च्या कायद्यातील कलम 11/18 च्या नियमानुसार विनासुरुंग उत्खनन करण्यासाठी 50 मीटर आणि सुरुंग लावून उत्खनन करण्यासाठी 200 मीटर एवढे अंतर वस्ती ते उत्खननाने ठिकाण या दोघांमध्ये असणे आवश्यक आहे. ठाणे जिल्हयातील उपरोल्लेखित भाग हा खाणीपासून एक किलोमीटर अंतरावर असल्यामुळे दिलेल्या परवानग्या योग्य आहेत,यासंदर्भात शासनाच्या संबंधित विभागातर्फे सर्व तपासणी झालेली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे जिल्हा हा खाणीच्या दृष्टीने आता माननीय राज्यमंत्री महोदयांनी ज्या काही अटी,नियम,शर्ती वाचून दाखविल्या त्यांना काळे फासणारा जिल्हा आहे. गेली 4 वर्षे सातत्याने आम्ही या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहोत. ठाणे जिल्हयामध्ये खनिकर्माच्या नावाखाली स्त्याच्या बाजूचे डोंगरच्या डोंगर खाऊन टाकलेले आहेत. आपण ज्यावेळी भिवंडी रोडवरुन नाशिकला जाता त्यावेळी रस्त्याच्या उजव्या बाजूला जरा वळून बघितले तर आपल्या असे लक्षात येईल की, तेथील रस्त्यालगतचा जवळजवळ 20 चौरस किलोमीटरचा परिसर खाऊन टाकलेला आहे. हे कोणत्या नियमामध्ये बसते ? यासंदर्भात सरकारच्या महसूल खात्याने

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...... ता.प्र.क्र.35123....

चौकशी नेमल्यावर त्या चौकशी अंतर्गत केलेल्या कारवाईमध्ये खाणीचा मालक राहिला बाजूला आणि बिचा-या गरीब रोज एकूण 100 रुपयेही न कमविणा-या 100 ट्रकचालकांना अटक केले. यामध्ये एकूण 100 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार खाणीच्या मालकांनी केला आणि अटक झाली त्या गरीब ट्रकचालकांना, त्या ट्रकचालकांना सोडविण्यासाठी त्यांच्या घरच्यांकडे पैसेही नव्हते. एवढी सगळी अनियमितता यासंदर्भात ठाणे जिल्हयामध्ये आहे. या उत्तरामध्ये असे सांगितलेले आहे की, 188 आणि 216 या दोन सा-बाराच्या उता-यावरती आम्ही परवानगी दिलेली आहे,आम्ही प्रश्न विचारलेला आहे की, ठाणे जिल्हयातील वालिवली ( ता.अंबरनाथ ) येथील भूमापण क्रमांक 188,179 तसेच गट 220/1/1,गट क्रमांक 216 व 177 आणि 177/2 तसेच 178 या गटांबाबत माहिती विचारलेली आहे. आम्ही सहा गटांबद्दल विचारले त्यापैकी आपण उत्तरामध्ये फक्त दोन गटांची माहिती सांगितली की, त्यांनी नियमानुसार परवानगी घेतलेली आहे परंतु प्रश्नामध्ये विचारलेल्या उर्वरित चार गटांचे काय ? त्यांच्याबद्दल उत्तर आलेले नाही. एकंदरीत जे ठाणे जिल्हयामध्ये खनिकर्माचे काम चालू आहे, त्याच्यामध्ये जी अनियमितता आहे त्यासंदर्भात आपल्या शासनाकडून एक चौकशी नेमण्यात आली होती, त्या चौकशीअंतर्गत जी कारवाई होणे आवश्यक होती ती झालेली नाही. पोलीस आणि महसूल खाते यांच्या संगनमताने जे काही झालेले आहे,ते अतिशय खेदजनक आहे. यासंदर्भात महसूल खाते 200 कोटी रुपये खाऊन बसलेले आहे आणि बिचारे गरीब ट्रकचालक अटकेत आहेत. यामध्ये शासन गांभीर्याने लक्ष घालणार का ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये ठाणे जिल्हयातील मोठया प्रमाणामध्ये उत्खननासंबंधी जी परिस्थिती सांगितली आहे,त्यामध्ये कशा प्रकारे भ्रष्टाचार आहे,तेथे कसे नियमबाहय काम चालू आहे यासंबंधी त्यांनी माहिती दिली,यासंबंधी संपूर्ण चौकशी शासनामार्फत आम्ही करु आणि शासनाला जर असे आढळून आले की,एखाद्या पर्टिक्यूलर खाणीमध्ये नियमबाहय काम होत असेल तर त्याची चौकशी करण्यात येईल. यासंबंधी तेथील स्थानिक लोकांची तक्रार जिल्हाधिका-यांकडे आलेली नाही. प्रश्नाच्या आधारावर ज्यावेळी या ठिकाणी तक्रार आली,त्याठिकाणी संबंधित अधिकारी पाहणीकरिता

....3



JPK/ D/ MMP/ प्रथम श्री.बोरले...... 13:40

गावांमध्ये गेले.  पाहणी केली असता,तेथील कोणत्याही शेतक-याच्या घराच्या भिंतीला तडे गेलेले नाहीत किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही,असे त्यांना आढळून आले आणि तसा त्या पाहणी करणा-या अधिका-यांकडून शासनाला अहवालही प्राप्त झालेला आहे.  सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाश शेवाळे म्हणाले की, असे होते, अमुक होते,तमुक होते,कारवाई होत नाही.  शासनातर्फे या ठिकाणी खाणमालकांना जे परवाने दिले गेलेले आहेत, ते नियमबाहय नसून नियमाला धरुन आहेत.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/ MMP/ पूर्वी कु.खर्चे 13:45

ता.प्र.क्र.35123

श्री.नारायण राणे .....

जेथे खाण सुरु आहेत, तेथे खाजगी व सरकारी जमीन आहे. मनुष्यवस्तीपासून 200 मीटरपेक्षा जास्त अंतरावर असेल तर परवानगी देता येते. सदरील अंतर तीन किलोमीटरपेक्षा जास्त आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांच्या प्रश्नावर मला अधिक काही सांगावयाचे नाही. ही तक्रार व प्रश्न ठाण्याचे नगराध्यक्ष आणि खाजगी खाणमालक यांच्या अंतर्गत वादातून निर्माण झालेला आहे. या प्रश्नाबाबत मला सर्व काही माहिती आहे. माननीय सदस्यांनी जेवढा प्रश्न विचारला आहे, तेवढेच मी उत्तर देऊ इच्छितो. त्यांना नियमाप्रमाणे परवागनी दिलेली आहे. तेथे कोणत्याही नदीचे व गावाचे नुकसान झालेले नाही. त्या भागात बेकायदेशीर खाणी असतील तर त्यांच्यावर कारवाई करुन त्या बंद केल्या जातील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री यांच्या निदर्शनास मी आणून देऊ इच्छितो की, चार वर्षापूर्वी या सभागृहात खाणीबाबत चौकशी आयोग नेमला गेला होता. सदरील चौकशी ठाणे क्राईम ब्रँचकडे होती. श्री.देशपांडे नावाचे अधिकारी चौकशी करीत होते. त्यांनी शंभर ट्रक चालकांना अडवून त्यांना नोटीसा पाठवून अटक केली आहे, त्यांच्यावर कारवाई झ ाली का ? खाणमालकांना किंवा खाणीचे उत्पन्न मिळणाऱ्या व्यक्तींना अटक करुन कारवाई करण्याऐवजी गरीब खाणकामगारांना अटक करुन त्यांना शिक्षा देणे चुक आहे. त्यापेक्षा खाणमालक किंवा खाणीचे उत्पन्न मिळविणाऱ्यांवर कारवाई केली तर बरे होईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी उपप्रश्न विचारला आहे. मुळ प्रश्नात उल्लेख असलेल्या गट क्र.220/1/1 गट क्र.216, 216, 177, 177/2 तसेच 178 या गटांची माहिती उत्तरामध्ये नाही. सदरील प्रश्नाचेही उत्तर सभागृहात देण्यासारखे नाही का ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, या उत्तरामध्ये लपविण्यासारखे काहीही नाही. सर्व्हे क्र.188 व 216 यांना परवानगी दिलेली आहे, यामध्ये सरकारी जमीन आहे. दुसरा सर्व्हे नंबर 181/1, 185 असून खाजगी मालकीचा आहे, त्यास परवानगी दिलेली आहे

-----

.....2

PNG/ D/ MMP/

**चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील सात गाव शेत**
**शिवारात शेतमजूरांवर वीज कोसळल्याबाबत**

**(५) * ३४०४६ श्री. गिरीश गांधी , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , प्रा. फौजीया खान :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील सात गाव शेत शिवारात सप्टेंबर, २००७ ते ऑक्टोबर, २००७ वा त्या दरम्यान वीज पडून पाच शेतमजूरांचा मृत्यू होऊन सात शेतमजूर गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या अपघातात मृत्यू पावलेल्या शेतमजूरांच्या कुटूंबांना तसेच जखमी झालेल्या शेतमजूरांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) राजुरा तालुक्यातील शेत शिवारात एक व्यक्ती वीज कोसळून मरण पावलेला आहे.

(२) व (३) घटनेची चौकशी करण्यात येऊन मयताचे वारसास शासनाच्या स्थायी आदेशानुसार मदत दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

श्री.गिरीष गांधी : सभापती महोदय, उत्तरामध्ये जी माहिती दिलेली आहे, त्याच्याशिवाय अशी माहिती हवी आहे की, शासनाच्या स्थायी आदेशानुसार कोणती मदत करण्यात आली आहे ?.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयातील राजूरा तालुक्यातील सातगाव शेत शिवारात एका घटनेत वीज पडून शेतमजूराचा मृत्यू झालेला आहे. त्यांना स्थायी आदेशाप्रमाणे मदत करीत असताना दिनांक 6.11.2007 रोजी 50 हजार रुपये मदत म्हणून देण्यात आलेले आहेत. या घटनेत ज्यांचे वय 18 वर्षाच्या आत आहे, त्यांनाही मदत केलेली आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, येथे सात शेतमजूर गंभीर जखमी झाल्याचे म्हटले आहे. मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, त्यांना मदत दिलेली आहे. या सात व्यक्तींची चौकशी कोणी केली आहे ? हे प्रकरण खरे आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सातगाव शेत शिवारात किती व्यक्ती मृत पावल्या आहेत, त्याची चौकशी संबंधित तलाठी व तहसिलदार यांनी केलेली आहे.

यानंतर कु.धनश्री.....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ D/ MMP/ 13:50

ता.प्र.क्र.34046......

श्री. गिरीश गांधी : सभापती महोदय, रोजंदारीवर जे शेतमजूर काम करीत असतात त्यांच्यासाठी मदत करण्याकरिता आपत्कालीन यंत्रणा तयार करण्याची शासनाची योजना आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने काही स्थायी आदेश देऊन मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मागील चार वर्षाच्या काळामध्ये विदर्भामध्ये व मराठवाडयामध्ये आपण पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, वीज कोसळून मृत होणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. शासनाने अशाप्रकारे मृत होणाऱ्या व्यक्तीच्या कुटूंबाला एक लाख रुपये किंवा 50 हजार रुपये मदत म्हणून दिलेले असले तरी यासंदर्भात अजून काही उपाययोजना शासनाला करता येणे शक्य आहे काय याबाबत विचार करण्यात येईल. अलिकडील काळात वीज पडून मृत पावणाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे त्या मागील कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात राज्य पातळीवर अभ्यास गटाची निर्मिती करण्याचे शासनाने ठरविले आहे. आआयटीएम व आयएमडी कुलाबा, आयआयटी, पवई यांच्या समवेत चर्चा करुन अभ्यास गटाची स्थापना शासनाने केलेली आहे. या अभ्यास गटाच्या माध्यमातून विदर्भ आणि मराठवाडयामध्ये चार वर्षामध्ये वीज पडण्याच्या घटनेशी पर्यावरणाचा किंवा इतर कोणत्या बाबीशी संबंध आहे काय याची तपासणी करण्यात येईल. दिनांक 10 डिसेंबर, 2007 रोजी यासंदर्भात एक बैठक घेण्यात येणार आहे.

................

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील सहकारी बँकामधील जनतेच्या ठेवी आर्थिक गैरव्यवहारामुळे अडकल्याबाबत**

**(६) * ३५५९४ श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. अरविंद सावंत , श्री. अनिल परब , श्री. सुरेश जेथलिया , डॉ. निलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २९ सहकारी बँकामध्ये त्यांच्या आर्थिक गैरव्यवहारांमुळे सुमारे ७५२ कोटी रुपयांच्या ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक गैरव्यवहारांवरुन काही सहकारी बँका लिक्विडेशनमध्ये काढण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सहकारी बँकामधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केल्या आहेत काय, असल्यास, त्या कोणत्या,

(४) असल्यास, आर्थिक दिवाळखोरीतील बँकाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, दोषी संचालकांवर काही कारवाई करण्यात आली आहे काय ?

**श्री. जयप्रकाश दांडेगावकर,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता**: (१) होय, राज्यातील सुमारे २८ सहकारी बँकांमध्ये ७५००० अडचणीतील ठेवीदार असून त्यांच्या अंदाजे रुपये ११९ कोटीच्या ठेवी अडकल्या आहेत.

(२) होय,

(३) नागरी सहकारी बँकामधील ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी कलम १०१/९१ अन्वये सुमारे १ लाख प्रकरणांमध्ये अंदाजे रुपये ८१० कोटीच्या वसुलीसाठी कार्यवाही चालू असून जुलै, २००७ पासून ४५०० प्रकरणांमध्ये वसुली करण्यात आली आहे, व दिनांक १.७.२००७ पासून ७२ कोटीच्या ठेवी परत करण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) ठेवी परत मिळत नसलेल्या ९ नागरी सहकारी बँकांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८३ अन्वये चौकशीची व अर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कलम ८८ ची कार्यवाही चालू आहे. १९ नागरी सहकारी बँकांवर संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासक नियुक्ती करण्यात आली आहे. ७ नागरी सहकारी बँकांच्या दोषी संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या विस्तृत लेखी उत्तरामुळे माझे समाधान झालेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयानी विस्तृत लेखी उत्तर दिलेले आहे. मला येथे प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण ज्या संचालकांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत त्या संचालकांनी किती रकमेचा अपहार केलेला आहे याची माहिती आपल्याकडे आहे काय ?

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.35594.....

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, आवाजाची व्यवस्था योग्य नसल्यामुळे प्रश्न ऐकू येत नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे लेखी उत्तरामुळे समाधान झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या संचालकांना दोषी ठरवून त्यांच्याविरुध्द फौजदारी खटले दाखल करण्यात आले, त्या संचालकांनी किती रकमेचा भ्रष्टाचार केलेला आहे व अद्यापि किती लोकांवर आपण गुन्हे दाखल केलेले आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, किती संचालकांवर खटला दाखल केलेला आहे असा आपण प्रश्न विचारला आहे काय ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला वाटते मी विचारलेला प्रश्न अद्यापि आपल्या लक्षात आलेला नाही. साऊंड सिस्टिम योग्य नसल्यामुळे आपल्याला प्रश्न ऐकू आला नसल्यास मी काहीही करु शकत नाही. हा प्रश्न मी आपणास पुन्हा एकदा सांगतो. प्रश्न असा आहे की, सहकारी बँकांमधील आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या किती संचालकांविरुध्द आपण फौजदारी खटले दाखल केलेले आहेत. त्या संचालकांनी किती रकमेचा भ्रष्टाचार केलेला आहे, हा प्रश्न कोणत्या बँकेमध्ये निर्माण झालेला आहे, तसेच खटला दाखल करण्यात आलेले संचालक कोणत्या बँकेचे आहेत व अद्यापि किती संचालकांवर गुन्हा दाखल करण्याचे बाकी आहे ?

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 35594 .....

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ठेवी परत मिळत नाहीत अशा बँका मी उत्तरात सांगितल्याप्रमाणे 28 आहे. साधारणत: 9 बँकांची 83 प्रमाणे चौकशी झालेली आहे आणि 21 बँकांची 28 प्रमाणे कारवाई झा ालेली असून 17 वर प्रशासक नियुक्त केला आहे आणि 7 बँकांवर फौजदारी गुन्हे दाखल केलेले आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या 28 सहकारी बँकांमध्ये ज्या ठेवी आहेत त्यापैकी किती ठेवींचा विमा उतरविण्यात आलेला आहे आणि त्यानुसार किती ठेवीदारांना विम्याचे किती पैसे मिळाले आहेत ? तसेच या बँकांचे जे संचालक होते त्यांच्यावर आपण जे फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत त्यांचे स्वरूप काय आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, फौजदारी गुन्ह्यांचे स्वरूप फौजदारीच आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, फौजदारी गुन्ह्यांचे स्वरूप हे वेगवेगळे असते, उदा. संचालकांनी बोगस कागदपत्रो करून कर्जवाटप केले किंवा कर्ज वाटप न करता परस्पर पैसे काढले वगैरे तर असे अनेक वेगवेगळे प्रकार फौजदारी गुन्ह्यांमध्ये असू शकतात त्याप्रमाणे कोणत्या स्वरूपाचे गुन्हे त्यांच्यावर दाखल केले आहेत ? हा माझा प्रश्न आहे.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी यापूर्वीच पतसंस्थांच्या प्रश्नाच्या वेळी सांगितले आहे त्याप्रमाणे या वर्षभरामध्ये ही प्रकरणे वाढली आहेत आणि त्यामुळे प्रत्येक वेळी ....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांकडे आता आमच्या प्रश्नांची योग्य ती माहिती नसेल तर ते ती पटलावर ठेवू शकतात किंवा आपण हा प्रश्न तोवर रोखून ठेवावा.

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांचा प्रश्न असा होता की, यामध्ये तत्सम बँकांचे संचालक गुंतले असतील तर त्यांची नावे आपण सांगू शकाल का ? ती आता आपल्याकडे असतील तर आपण सांगावीत अन्यथा ती पटलावर ठेवावी. तसेच सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा प्रश्न असा होता की,या संचालकांवर आणि बँकांवर आपण जे फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत असे सांगता तर ते गुन्हे कोणकोणत्या स्वरूपाचे आहेत ?

...... टी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सदरहू संचालकांची नावे आणि अन्य माहिती आता माझ्याकडे नाहीत पण आपल्या आदेशाप्रमाणे मी ती नावे सभागृहाच्या पटलावर ठेवीन. तसेच गुन्ह्यांच्या स्वरूपाबाबत जी सविस्तर माहिती पाहिजे आहे ती देखील मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्न विचारण्यापूर्वीच मी आपल्याला विनंती करीन की, आपण कृपया हा प्रश्न राखून ठेवावा. त्यानंतर मी माझा पहिला प्रश्न असा विचारते आहे की, 752 कोटी पैकी 72 कोटीच्या ठेवी परत करण्यात आलेल्या आहेत असे या ठिकाणी उत्तरात आपण म्हटले आहे तर या सगळ्या बँकांमध्ये पुण्याच्या अजित सहकारी बँकेचा देखील समावेश आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण या बँकांच्या संचालकांवर जे फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल केलेले आहेत ते फौजदारी गुन्हे ज्यांच्यावर आहेत त्यापैकी अनेकांनी अटकपूर्व जामीन घेतलेला आहे किंवा त्यातील काही जामिनावर असण्याची शक्यता आहे. तेव्हा त्यांचा जामीन रद्द करून त्यांना अटक करण्याची शिफारस आपण केलेली आहे काय ? नसल्यास, तशी शिफारस आपण कराल काय ? तसेच या बँकांतील 700 कोटीच्या ठेवी परत न मिळत असल्याने खातेदार महाराष्टभर भ्रमिष्ट झाल्यासारखे फिरत आहेत. असे असताना ज्यांना यामध्ये जामीन मिळालेला आहे त्यांचा जामीन रद्द करून त्यांना अटक करण्याची शिफारस आपण केली पाहिजे नाही तर त्या लोकांना आपण संरक्षण देत आहात असाच त्याचा अर्थ होतो. तरी आपण अशी कारवाई करणार का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या बँकांतील कोणत्याही संचालकांना सरकार संरक्षण देणार नाही. उलट त्यांचेवर कडक अशी कारवाई केली जाईल. तसेच आता सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या जमानती रद्द होण्यासाठी शासन पुढाकार घेईल. पतसंस्थांच्या बाबतीत मी जे बोललो तेच या बँकांच्याबाबतीतही आहे. आज असे होते की, एखाद्या बँकेच्या बाबतीत अशी काही माहिती आली की लगेचच त्या बँकेपुढे ठेवीदारांच्या रांगा लागतात आणि मग लोकांनाही वेळेवर पैसे मिळत नाहीतृ म्हणून या बाबतीतील नवे धोरण आणण्याची आवश्यकता आहे. कायद्याची भीती राहील असे काही करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आता येथे सांगितले गेले त्याप्रमाणे काही संचालकांनी बोगस काम केलेले आहे, खोटे कागदपत्रे

...... टी 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सादर करून कर्ज घेतलेले आहे आणि त्यामुळे या संस्था अडचणीत येतात. म्हणूनच या सगळ्या संचालकांकडून कोठल्याही मार्गाने त्यांची प्रॉपर्टी अटॅच करून, त्यांनी जेथे कोठे पैसा लपविला असेल तो शोधून काढून वसूल करण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच त्यांचा जामीन झाला असेल तर तो रद्द करण्याचे देखील प्रयत्न सरकारतर्फे केले जातील. दुसरे असे की, यामध्ये पुण्यातील अजित सहकारी बँकेची जी माहिती पाहिजे ती मी इतर माहिती बरोबर सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, या सहकारी बँका आणि त्यांचे संचालक हे बोगस कागदपत्रांच्या आधारे कर्ज वाटप करतात आणि त्यामुळे या बँका बुडतात. मी एक जबाबदार सदस्य म्हणून आपल्याला सांगू इच्छितो की, नागपूर मधील नागपूर महिला सहकारी बँक आहे पण ती देखील अशीच डुबली आहे. ....

( यानंतर श्री. बरवड .... यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 35594 ...... श्री. सागर मेघे .....

जेव्हा संचालक मंडळ होते तेव्हा ठेवीदारांचे जे पैसे बुडाले त्यासंदर्भात ज्यावेळी कर्ज वसुलीचा प्रश्न आला तेव्हा कलम 101 बद्दल निर्णय झाला. हायकोर्टाचा असा निर्णय आहे की, जोपर्यंत 50 टक्के पैसे जमा होत नाही तोपर्यंत आयुक्त असतील किंवा नागपूरचे स्थानिक रजिस्ट्रार असतील त्यांनी स्टे देऊ नये. एका प्रकरणामध्ये हायकोर्टाचा निर्णय असल्यामुळे 50 टक्के पैसे जमा न होता अधिकाऱ्यांनी स्टे दिला. एकीकडे ठेवीदारांना पैसे मिळाले नाहीत. वसुलीच्या संदर्भात अधिकाऱ्यांनी जोरात वसुली करावयास पाहिजे होती. ती न करता त्यांनी स्टे दिला. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्यांनी त्या प्रकरणातील स्पेसिफिक नाव द्यावे. अधिकाऱ्यांनी चुकीचा स्टे दिला असेल तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. दिलीपराव देशमुख : सभापती महोदय, ही अत्यंत गंभीर बाब आहे. जवळपास 28 सहकारी बँकांमध्ये लोकांच्या 119 कोटी रुपयांच्या ठेवी अडकलेल्या आहेत. माझा प्रश्न थोडासा वेगळा आहे. गुन्हा घडल्यानंतर कायदेशीर कारवाई करणे, अटक करणे वगैरे ज्या बाबी आहेत ते राज्य सरकार करते व त्यांनी ते करावे, हे ठीक आहे परंतु हा घोटाळा केवळ सहा महिन्यांमध्ये किंवा एका वर्षात झालेला नाही. काही वर्षांमध्ये तो घोटाळा झालेला असेल. खालच्या लोकांमध्ये भीती असली पाहिजे. सहकार कायद्यातील कलम 82, 83, 87, 79 ही कलमे बऱ्याचदा आपल्या विरोधकांना घाबरविण्यासाठी वापरली जातात. आर्थिक शिस्त आणण्यासाठी ही कलमे वापरली जातात. मी कोणत्याही बँकेचे नाव घेत नाही पण पुण्यासारख्या शहरामध्ये असे दिसून येते की, तेथील बँकांमध्ये अशा प्रकारचे घोटाळे झालेले आहेत. सहकार आयुक्तांचे कार्यालय पुणे शहरामध्ये आहे. तसेच डी.डी.आर. आणि वरिष्ठ अधिकारी त्या ठिकाणी असताना त्यांच्या वेळीच महत्वाच्या बँकांना भेटी झाल्या असत्या आणि त्यांनी तेथील कारभार तपासून पाहिला असता तर एवढ्या मोठ्या प्रमाणात 75 हजार ठेवीदारांना जो मानसिक त्रास सहन करावा लागला, त्यांना जी आर्थिक झळ पोहोचली, ते झाले नसते. म्हणून संपूर्ण सहकार कायद्यामध्ये गतिमानता आणि पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. या गोष्टींमुळे महाराष्ट्राची सहकार चळवळ बदनाम होत आहे. याबाबत माननीय मंत्रिमहोदय काय ॲक्शन घेणार आहेत ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ SBT/ KTG/

ता. प्र. क्र. 35594 ......

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव देशमुख यांनी जे सांगितले त्यातील बरेचसे म्हणणे बरोबर आहे. परंतु आपण जोपर्यंत शासकीय ऑडिट करीत होतो तोपर्यंत ऑडिट रिपोर्ट येणे, त्याची पाहणी करणे वगैरे होत होते. जेव्हापासून खाजगी ऑडिटर्सना परवानगी दिलेली आहे तेव्हापासून शासनापर्यंत त्या सर्व बाबी येत नाहीत. जेव्हा अशी तक्रार येते किंवा वर्तमानपत्रात बातमी येते त्यानंतर कलम 83 ची चौकशी आणि टेस्ट ऑडिट लावून त्या पध्दतीची कार्यवाही करतो. त्यामध्ये अल्टरनेट ऑडिट म्हणजे एक वर्ष शासकीय ऑडिट आणि एक वर्ष खाजगी ऑडिट अशी सुधारणा आणण्याचा विचार आहे. तसेच बँकेच्या "ए","बी","सी","डी"ग्रेड प्रमाणे ए.आर.,डी.डी.आर.,जॉइन्ट रजिस्ट्रार पासून आयुक्तांपर्यंत काही बँकांच्या बाबतीत जिल्हा पातळीवर, विभागीय पातळीवर, राज्य पातळीवर समित्या करुन दर सहा महिन्यांनी त्या बँकांची पाहणी करण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या ठिकाणी बँकेच्या आर्थिक दिवाळखोरीविषयी बराच ऊहापोह झालेला आहे. आर्थिक दिवाळखोरी म्हणजे नक्की काय ? त्याचे नक्की निकष प्रत्येक बँकेला निश्चित करुन दिलेले आहेत काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या बँका रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे चालतात. त्याप्रमाणे त्यांना निकष दिलेले आहेत. त्याचप्रमाणे राज्य शासनाचा काही प्रमाणात कंट्रोल आहे. ते निकष कंट्रोलमध्ये नसतील तर बँक दिवाळखोरीत निघाली असे त्यातून स्पष्ट होते.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

-----

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2005-2006चे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक हिशेब सभागृहामोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2007-2008 चे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन 2006-2007चे सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : सुधारित अंदाज सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (पणन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचा सन 2006-2007चा एकोणपन्नासावा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहामसेर ठेवण्यात आला आहे.

-

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळाचा सन 1991-1992, 1992-1993 व 1993-1994 चा अनुक्रमे बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने माथाडी व असंराक्षित कामगार मंडळ नागपूरचा सन 1995-1996, 1996-1997, 1997-1998, 1998-1999 व 1999-2000 चा अनुक्रमे बावीसावा, तेवीसावा, चोवीसावा, पंचवीसावा व सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगारा मंडळाचा सन 2003-2004चा बारावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मी आपल्या अनुतीने सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्याकरिता या मंडळाचा सन 2002-2003, 2003-2004 व 2004-2005 चा अनुक्रमे बावीसावा, तेवीसावा व चोवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

-

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबादचा सन 2004-2005 व 2005-2006 चा अनुक्रमे पाचवा व सहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-

श्री. प्रकश शेंडगे : सभापती महोदय, पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळाचे 1991-1992 पासूनचे अहवाल आता 10-15 वर्षानंतर सभागृहासमोर ठेवले जात आहेत. नियमाप्रमाणे एक वर्षानंतर हे अहवाल सभागृहासमोर ठेवले गेले पाहिजे. हे अहवाल इतक्या उशिरा आल्यानंतर सदस्यांना त्यांचा काय अभ्यास करायचा ? यापुढे हे अहवाल उशिरा येणार नाहीत याबाबतीत संबधितांना आपण सूचना द्याव्यात.

**सभापती** : मंडळांचे वेगवेगळे अहवाल सभागृहासमोर सादर केले जातात. हे अहवाल लवकर येतील यादृष्टीकोनातून प्रयत्न करणे जरुरीचे आहे. संबंधितांना मी तसे निदेश देतो.

श्री. गणेश नाईक : होय.



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणी संदर्भातील तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. हसन मुश्रीफ (विधी व न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी प्रस्ताव पुस्तुत करतो की, "मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांच्या तपासणी संदर्भातील दिनांक 2 ऑगस्ट, 2007 रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेने नियुक्त केलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेली मुदत विधानपरिषदेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त वाढवून देण्यात यावी.

**सभापती** : प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 14:10

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "आदिवासींची मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असलेल्या ता.चिखलदरा, जि.अमरावती येथील शेत जमिनीवर व महिलांच्या वसतिगृहाकरिता इमारतींची बांधकामे करण्यासाठी शासनाने अकृषक परवानगी दिल्याने सदर परिसरात बांधकामाची परवानगी दिल्यास पर्यावरणाचा धोका निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी यांनी "नागपूर शहरात नव्याने बांधण्यात येत असलेल्या अनेक मजली इमारतींना अग्नी सुरक्षेचे सर्व नियम पायदळी तुडवून व कुठलीही खातरजमा न करता अग्निशमन विभाग ना हरकत प्रमाणपत्र देत असून हे सर्व काम गत वर्षी निलंबित झालेल्या अधिकाऱ्याच्या हस्ते सुरु असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "वसई (जि.ठाणे) तालुक्यातील मौजे मुळगाव येथील स.नं.17 पै.जमिनीच्या ले-आऊटची बिनशेती परवानगी मंजूर करण्यास जिल्हाधिकारी, ठाणे यांची पूर्वपरवानगी न घेता संबंधित जमीन धारकांनी बेकायदेशीरपणे ले-आऊटची विक्री केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी "गणोरी (ता.भातकुली, जि.अमरावती) या गावातील सुमारे 3000 एकर जमिनीवरील कपासीच्या पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे तहसीलदार यांनी सदर पिकाचा पंचनामा करुन नुकसानभरपाई बाबतचा अहवाल शासनाला दीड महिन्यापूर्वी पाठवूनही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.......

सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "देश विघातक कारवायांमुळे बंदी घातलेल्या सिमी संघटनेच्या राज्यस्तरीय पदाधिका-याला दि.14 जून, 2006 रोजी अकोला महानगरपालिकेने वृत्तपत्रात जाहिरात न देता उर्दू शाळा क्र.2 मध्ये दहा हजार रुपये मासिक मानधनावर नियुक्ती केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी "दक्षिण मध्य मुंबईतील अनेक जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्बांधणी योजनेत विकासक व जुन्या चाळीतील चाळ कमिट्या यांच्यात अनेक ठिकाणी संघर्ष सुरु असून विकासक चाळीतील लोकांना वकिलांमार्फत धमक्या देत असण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख यांनी "वर्धा जिल्हयातील जनता विद्यालय, नि.मु.घटवाई विद्यालय, विकास विद्यालय इ. 6 ते 7 माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गेल्या 8 ते 10 महिन्यांची वेतनदेयके नामंजूर केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मकबूल फिदा हुसेन यांनी हिंदू देवदेवतांची तसेच भारतमातेची आक्षेपार्ह चित्रे काढल्याबद्दल आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिली होती. या प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिले, पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांच्या आक्षेपार्ह कृत्याबद्दल चौकशी करण्याचे मान्य केले. परंतु शासनाने या प्रकरणी विधी व न्याय विभागाकडे परवानगी मागितली आहे. या प्रकरणी शासनास निवेदन करण्यास सांगावे. बऱ्याच दिवसापासून हे प्रकरण प्रलंबित आहे. माननीय हायकोर्टाने निर्देश दिल्यानंतर मकबूल फिदा हुसेन यांच्यावर कारवाई करण्याबाबतची फाईल प्रलंबित ठेवण्यात आली आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ही बाब मी आज प्रलंबित ठेवीत आहे. उद्या मी यासंबंधी निर्णय देईन. सन्माननीय विरोधी पक्षनेते ज्याप्रमाणे विनंती करीत आहेत त्याप्रमाणे निवेदन करण्याच्या दृष्टीनेही सूचना दिल्या जातील.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "राज्यात वनउपज औषधांकरीता स्वतंत्र महामंडळ तयार करण्यासाठी शासन स्तरावर प्रस्ताव प्रलंबित असणे, औषधी वनस्पती लागवड, संकलन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, विपणन यावर आधारित उपक्रम राबविण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

**-----**

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 1 बाबत**

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये वाशिम कृषि उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी व शेतकरी यांच्यामध्ये तणाव निर्माण होऊन गोळीबार होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती.

**सभापती** : या निवेदनाचे उत्तर कोण देणार आहे? या निवेदनाचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांकडे न आल्यामुळे संबंधित निवेदन उद्या घेण्यात येईल.

--------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: बुलढाणा जिल्हयातील, चिंचोळी जहाँगिर या गावात पंतप्रधान पॅकेज योजनेत झालेला भ्रष्टाचार.

**मु.शी.**: बुलढाणा जिल्हयातील, चिंचोळी जहाँगिर या गावात पंतप्रधान पॅकेज योजनेत झालेला भ्रष्टाचार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी दिलेली नियम 93 अन्वयेची सूचना .

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "बुलढाणा जिल्हयातील, चिंचोळी जहाँगिर या गावात पंतप्रधान पॅकेज योजनेत झालेला भ्रष्टाचार". या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 93 अन्वये जी सूचना देण्यात आलेली आहे ती गंभीर सूचना आहे. बुलढाणा जिल्हयातील सिंदखेडराजा तालुक्यातील चिंचोळी जहाँगिर या गावामध्ये पंतप्रधान पॅकेज योजनेअंतर्गत किसान क्रेडिट कार्डचे बोगस वाटप करण्यात आलेले असून वाटप करण्यात आलेल्या किसान क्रेडिट कार्ड धारकांना पैसे मिळालेले नाहीत. कार्ड धारकांच्या बोगस सह्या करुन त्यांच्या नावाने पैसे उचलले गेले अशा प्रकारे 75 शेतक-यांची फसवणूक करण्यात आलेली आहे. निवेदनाच्या शेवटच्या ओळीत असे म्हटले आहे की, "कर्ज वाटपाबाबत कोणतीही तक्रार नसून कर्जवाटपास काहीही तक्रार नाही." परंतु, सभापती महोदय, अशी परिस्थिती नसून ऐकून 75 शेतक-यांना फसवण्यात आलेले आहे. ज्या 75 शेतक-यांची फसवणूक करण्यात आलेली आहे त्यांची नावे तसेच त्यांना किती रुपयांना फसवण्यात आलेले आहे याची सर्व माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ही सर्व माहिती मी आपल्याला सादर करतो. यासंदर्भात उदाहरण द्यावयाचे झाले तर श्रीमती चंदाबाई विठोबा कुटे, किसान क्रेडिट कार्ड नंबर 4013 असून 18.7.2006 मध्ये या महिलेची फसवणूक करुन तिच्या नावे परस्पर पैसे काढण्यात आलेले आहे. अशा प्रकारे इतरही 75 शेतक-यांच्या नावावर अशा प्रकारे रक्कमा काढण्यात आलेल्या असून प्रत्यक्षात या शेतक-यांच्या हातामध्ये काही सुध्दा रक्कम मिळालेली नाही. बँकांचे अधिकारी, दलाल यांनी या शेतक-यांच्या नावाने परस्पर सहया करुन रक्कमा काढलेल्या आहेत. काही शेतक-यांच्या नावावर 4 हजार, 3 हजार, 16 हजार, 38 हजार , 7 हजार अशा रक्कमा शेतक-यांच्या नावावर चढवण्यात आलेल्या आहेत. या रक्कमा शेतक-यांच्या अंगावर चढवतांना त्यांचे आंगठे किंवा सहया न घेता बोगस सहया करुन शेतक-यांच्या अंगावर रक्कमा चढवण्यात आलेल्या आहेत. पंतप्रधान पॅकेजला बदनाम करण्याचे काम अधिका-यांनी आणि दलालांनी केलेले आहे त्यामुळे या गंभीर प्रकरणाची चौकशी व्हावी अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........
अधिकारी आणि दलाल यांच्यावर कारवाई व्हावयास पाहिजे. तेव्हा चिंचोळी जहाँगीर प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी झाली पाहिजे. तरच या लुबाडलेल्या 75 शेतकऱ्यांना न्याय मिळेल. अन्यथा पंतप्रधान पॅकेज देऊनही काही होणार नाही. तेव्हा ज्या सभासदाला पैसे मिळाले नाहीत ती रक्कम त्याच्या खात्यावरुन काढून जेवढी रक्कम मिळाली असेल तेवढी रक्कम कर्ज म्हणून ग्राह्य धरणार काय ?

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ज्या गावांची माहिती दिलेली आहे त्याबाबत उच्च स्तरावर चौकशी करण्याच्या दृष्टीने मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या संदर्भात शासनाने जास्तीची चौकशी केलेली आहे. 25 हजार रुपयांवर सह्या घेऊन त्यांना 4-5 हजार रुपये मिळाले काय याची चौकशी केली. पण बँकेच्या ऑडीटरकडून फक्त कर्जामध्ये अनियमितता आहे असे सांगण्यात आले. 25 हजार रुपयांवर सह्या घेऊन शेतकऱ्यांना 4-5 हजार रुपयांच वाटप झालेले नाही. जर असे प्रकार झाले असतील तर......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीवर उत्तर देणार असतील तर ते बरोबर नाही. मी हे सर्व जबाबदारीने बोलत आहे. मी प्रत्यक्ष त्या गावात जाऊन 75 शेतकऱ्यांना भेटलो होतो. त्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्यक्ष ज्या रकमेवर सह्या घेतल्या ती रक्कम त्यांना देण्यात आलेली नाही. तेव्हा या प्रकरणी शासन उच्च स्तरीय चौकशी करणार काय ? तसेच जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, शासनास उच्च स्तरीय चौकशी करण्यास काहीही अडचण नाही. या प्रकरणाची चौकशी डी.डी.आर.मार्फत करण्यात येईल व जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, जिल्हा बँकेचे मुख्य प्रशासक डी.डी.आर.असतात. त्यांच्याच माध्यमातून चौकशी होणार असेल तर शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल. तेव्ही मी अगोदर मागणी केल्याप्रमाणे या प्रकरणी उच्च स्तरीय चौकशी करण्यात यावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्याच्या डी.डी.आर.मार्फत चौकशी न करता अन्य जिल्ह्याच्या डी.डी.आर.मार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी कमिशनर लेव्हलच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल काय ?

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रकरणाची चौकशी अतिरिक्त सहकार आयुक्त यांचे मार्फत करावी.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : ठीक आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी परिस्थिती सांगितली ती गुन्हेगारी स्वरुपाची आहे. या प्रकरणी अनेक शेतकऱ्यांना फसविण्यात आलेले आहे. तेव्हा याप्रकरणाची चौकशी पोलिसांमार्फत करण्यात येईल काय ?

**सभापती** : या प्रकरणाची चौकशी अतिरिक्त सहकार आयुक्तांकडे सोपविण्यात आलेली आहे. त्या चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल त्याप्रमाणे पुढील कारवाई होईल.

---------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

**पृ. शी.** : शेतकऱ्यांना सुपर फॉस्फेट खताऐवजी जिप्समचा पुरवठा करुन त्यांची फसवणूक केल्याबाबत

**मु. शी.** : शेतकऱ्यांना सुपर फॉस्फेट खताऐवजी जिप्समचा पुरवठा करुल त्यांची फसवणूक केल्याबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व सागर मेघे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्य मंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व सागर मेघे यांनी "शेतकऱ्यांना सुपर फॉस्फेट खताऐवजी जिप्समचा पुरवठा करुन त्यांची फसवणूक केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदया, ज्या दुकानदारांनी बोगस खते देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली त्यांच्यावर कारवाई केली हे योग्य आहे. परंतु दुकानदारांच्या चुकीमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यास कोण जबाबदार आहे ? पंतप्रधान पॅकेजमधील हा जिल्हा आहे. तेव्हा शासन विशेष बाब म्हणून त्या शेतकऱ्यांना मदत देईल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, दुकानदारांनी शेतकऱ्यांना जिप्सम मिश्रित खत दिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील....

त्यामुळे पिकाला नुकसान झाले असेल तर निश्चितपणे consumer redressal कडे शेतकऱ्यांनी जावे, त्याबाबतचा पाठपुरावा शासनामार्फत केला जाईल व मदत मिळवून देण्याच्या प्रयत्न करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांकडून चुकीचे उत्तर येत आहे. शेतकऱ्यांनी जावे, म्हणजे काय ? सभापती महोदय, सुपर फॉस्फेट खताऐवजी जिप्सन विकल्यामुळेच शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असून ही गोष्टी आपल्या लक्षात आणून दिल्या नंतर आपणही तशी तक्रार घेतलेली आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, शेतकऱ्यांना तिकडे पाठवण्यापेक्षा शासनातर्फे सदर फोरमकडे जाऊन शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यात येईल, असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, कार्यवाही करता येऊ शकेल.

---------

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदन क्रमांक 4 बाबत.**

**तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे)** : निवेदन क्रमांक 4 हे राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांच्या विभागाशी संबंधित असून ते विधानसभा सभागृहामध्ये असल्यामुळे आपण नंतर घेऊया.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, शासनाचे लेखी उत्तर आमच्याकडे आलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी तसे अगोदर सांगितले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : माननीय टोपे साहेब जरी याठिकाणी उपस्थित नसले तरी सभागृहामध्ये सध्या कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत, संयुक्त जबाबदारी म्हणून त्यांनी उत्तर द्यावे.

श्री.अजित पवार : सन्माननीय श्री.राजेश टोपे हे ज्या खात्याचे राज्यमंत्री आहेत, ते खाते माननीय मुख्यमंत्री साहेबांकडे असून देशाच्या राष्ट्रपती महोदया नाशिक येथे आल्यामुळे माननीय मुख्यमंत्री महोदय तिकडे गेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे, संयुक्त जबाबदारी म्हणून आम्ही उत्तर दिले पाहिजे. परंतु सन्माननीय श्री.राजेश टोपे हे विधानसभा सभागृहातील कामकाजात भाग घेत असल्यामुळे आपण त्यांची अडचण लक्षात घेतली पाहिजे. तोपर्यंत माझ्या खात्याशी संबंधित असलेले नियम 93 चे निवेदन चर्चेस घेतले तर बरे होईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, चार दिवसांनंतर आमच्या सूचनांसंबंधी निवेदने आलेली आहेत. असेच होत राहिले तर शेवटी शेवटी निवेदनांचे गठ्ठेच्या गठ्ठे सभागृहात येतात. त्यामुळे ही अडचण आपण लक्षात घेतली पाहिजे.

**तालिका सभापती** : आपले निवेदन चर्चेस घ्यावयाचे नाही असे मी म्हणत नाही. आपले निवेदन आपण थोडयावेळानंतर घेऊया अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : राज्यमंत्री, श्री.टोपेंची अडचण मान्य आहे. परंतु...

श्री.विनोद तावडे : मला एवढेच म्हणावयाचे आहे की, नियम 93 चे आयुध आम्हाला मिळालेले आहे, ते अशाप्रकारे बोथट केले जात आहे. अधिकाऱ्यांकडून वेळेत उत्तरे येत नाहीत. शेवटच्या दिवशी मात्र निवेदनांचे गठ्ठेच्या गठ्ठे सभागृहात येतात, त्यावेळी आम्हाला प्रश्न विचारता येत नाहीत. ही नेहमीचीच अडचण असून नागपूर अधिवेशनामध्ये विशेष करुन अशाप्रकारची परिस्थिती उद्‌भवत असते.

( माननीय राज्यमंत्री महोदय, श्री.राजेश टोपे सभागृहात येतात. )

**तालिका सभापती** : सन्माननीय श्री.राजेश टोपे साहेब, सभागृहात आलेले आहेत, आपण निवेदन क्रमांक 4 चर्चेला घेऊया. (...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : एमएमआरडीएने निधी अन्यत्र वळविल्यामुळे मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना

**मु. शी.** : एमएमआरडीएने निधी अन्यत्र वळविल्यामुळे मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर यांनी "एमएमआरडीएने निधी अन्यत्र वळविल्यामुळे मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदया, एमएमआरडीएच्या उत्पन्नातून निर्माण होणारा निधी हा मुंबई, ठाणे, रायगड जिल्हयांसाठी खर्च होत नाही. त्या पैशाचा वापर एमएसआरडीसी, कृष्णा खोऱ्यास होतो. बांद्रा-कुर्ला येथील भूखंड सगळयात महागडया रेटने विकले गेले. परंतु आपण मुंबई, ठाणे, रायगड परिसरातील जनतेवर अन्याय करीत आहात.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे........

हा अन्याय आमच्यावर कशासाठी आहे ? त्यामुळे आमचे म्हणणे आहे की, मुंबई, ठाणे आणि रायगडमधील विकास कामे संपली, आता पैसा बाहेर जाऊ द्या, असे धोरण सरकारने स्वीकारले आहे काय ? एमएसएसआरडी 900 कोटी रुपये दिले त्यातून कामे होणार आहेत. मुंबई, ठाणे आणि रायगडमध्ये होणार आहेत की, बाहेर होणार आहेत ? कृष्णा खो-यामध्ये अशा प्रकारचे कर्ज देण्याचा आग्रह आहे, प्रयत्न आहे, हा आपला आहे का?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याबाबत मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, कुठल्याही परिस्थितीत एमएमआरडीएला कर्ज रुपाने एमएसएसआरडीसीने पैसे दिले त्यातील एमएमआर रिजनमध्ये खर्च करण्यासाठी वापरलेले आहेत आणि ही वस्तुस्थिती निवेदनातही मान्य करण्यात आली आहे. करारपत्रात अशी कंडिशन आहे की, कुठल्याही परिस्थितीत रिजनमध्येच पैसे वापरले पाहिजेत, कृष्णा खोरे असो किंवा तत्सम कुठलीही कामे असो, एमएमआरडीएला कर्ज रुपाने दिलेले पैसे बाहेर वापरु दिले जाणार नाहीत आणि तसा शासनाचा विचारही नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, एमएमआरडीएचा विषय नेहमीच सभागृहात उपस्थित होत असतो. ठाणे आणि रायगड जिल्हयातील लोकप्रतिनिधी या विषयावर असंतोष व्यक्त करीत असतात. सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदय आश्वासने देतात. डी.पी.डी.सी.मध्ये देखील पालकमंत्री आश्वासन देतात. माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत अजूनही तेथील लोकप्रतिनिधीची बैठक घेतली गेली नाही, तसे आश्वासन देण्यात आले होते, ती का घेतली गेली नाही ? हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, मला आणखी असे विचारावयाचे आहे की, मागच्या अधिवेशनामध्ये देखील ठाणे जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी हा विषय अतिशय उत्कटपणे मांडला होता. ठाणे जिल्हा वाढत्या लोकसंख्येचा जिल्हा आहे. त्या ठिकाणी अनेक पकल्प एमएमआरडीएच्या माध्यमातून घेणे आवश्यक आहे. प्रचंड लोकसंख्या वाढत आहे आणि दुसरीकडे विकासाला खिळ बसलेली आहे. एमएमआरडीएकडून सापत्नभावाची वागणून या जिल्हयाला मिळत असल्यामुळे सातत्याने अन्याय होत आहे. तशाच प्रकारचा अन्याय रायगड जिल्हयावरही होत आहे. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे

.....2............



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...........

की, नेमके एमएमआरडीएचे धोरण काय ? ठाणे जिल्हयासाठी टीआरडीएची स्थापना करावी, अशाप्रकारचा ठराव डी.पी.डी.सी.मध्ये झाला होता, अशी मागणी पुढे आली होती. त्यामुळे एमएमआरडीएचे नेमके धोरण व नेमकी भूमिका मंत्रीमहोदयांनी विशद करावी.

सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत लोकप्रतिनिधींची बैठक केव्हा होणार आहे ? कारण तशा प्रकारचे पत्र आमच्याकडे आले आहे. तसेच, किती रक्कम एमएमआरडीएच्या माध्यमातून रिजनबाहेर दिली गेली, किती रकमेची थकबाकी आहे ? हे देखील मंत्रीमहोदयांनी सांगावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, पहिल्याच प्रश्नाच्या उत्तरात हे स्पष्ट केले आहे की, एमएमआरडीएकडून रक्कम बाहेर खर्च केलेली नाही वा बाहेर देण्याचा विचार नाही. ठाणे व रायगड या जिल्हयांना सापत्नभावाची वागणूक अजिबात दिली जात नाही. साधारणपणे आतापर्यन्त फंडस् वाटप करण्यात आले आहे ते असे आहेत. मुंबई 961 कोटी रुपये, ठाणे 656 कोटी रुपये आणि रायगड 634 कोटी रुपये. याची टक्केवारी मुंबई 43 टक्के, ठाणे 29 टक्के व रायगड 28 टक्के अशी आहे. 900 कोटी रुपये वाटपाबाबत प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यामध्ये जी कामे हाती घेण्यात येणार आहेत त्यात ठाणे-घोडबंदर रोड 74 कोटी रुपये, कल्याण-शीळ फाटा रस्ता 15.12 कोटी रुपये नालासोपारा रेल्वे ओव्हरब्रिज 50 कोटी रुपये आणि सायन-पनवेल महामार्ग 650 कोटी रुपये खर्च होणार आहेत. या कामांसाठी 900 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जास्त पैसे हे महामार्गांसाठी खर्च करण्यात येत आहेत. त्याचा काय उपयोग आहे ?

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, कृपया एका वेळी एकाच सदस्याने प्रश्न विचारावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मागील 5 वर्षात किती रक्कम खर्च करण्यात आली त्याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मी जी आकडेवारी दिली "MMR fund for regional Development" याबाबतची दिली. गेल्या पाच वर्षात जो खर्च झालेला आहे त्याची यादी मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन. एम.एम.आर.डी.ए.मध्ये ज्या जिल्हापरिषदेचा भाग येतो, नगरपालिकेचा भाग येतो त्या सदस्यांना देखील आपण एम.एम.आर.डी.ए.च्या बोर्डावर घेतलेले आहे. मुंबई शहरापुरतेच नाही तर ठाणे, रायगड जिल्हयामध्ये समतोल विकास करण्याचा एम.एम.आर.डी.ए. चा विचार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आमदारांना एम.एम.आर.डी.ए.च्या बैठकीला बोलाविणार काय, असा प्रश्न मागच्या अधिवेशनामध्ये विचारण्यात आला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले होते की, आमदारांची बैठक घेऊन आम्ही निर्णय घेऊ. एम.एम.आर.डी.ए. च्या निधीचे जे वाटप झाले ते कसे झाले, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. जर ठाणे, रायगड जिल्हयांचा विकास होणार नसेल तर एम.एम.आर.डी.ए. रद्द करुन टाका. आम्हाला कोणतेही डेव्हलपमेंट करता येत नाही. त्यामुळे या परिसरातील आमदारांची बैठक विशेषत: या वरिष्ठ सभागृहातील सदस्यांची बैठक आपण तातडीने घेणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची बैठक आपण म्हणत असाल तर अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा सविस्तरपणे घ्यावयाची असेल तर अधिवेशन संपल्यानंतर माझ्या दालनात सर्व अधिका-यांना बोलावून बैठक घेण्यात येईल. निधी वाटपाच्या दृष्टीकोनातून प्रश्न असतील, कायद्याच्या दृष्टीकोनातून प्रश्न असतील किंवा नियमाच्या दृष्टीकोनातून प्रश्न असतील त्यावर निश्चितपणे चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, बैठक घेतली जाईल, वेगळे प्राधिकरण केले जाईल. आम्ही त्यावेळी मुद्दा पटवून दिला होता की, श्री.चंद्रशेखर नावाच्या अधिका-याने निश्चितपणे ठाणे, विरार, वसई, मिरा-भाईंदर येथील दौरा केला नसेल. आम्ही त्यावेळी पटवून दिले होते की, ठाण्याची लोकसंख्या ज्या गतीने वाढत आहे त्यादृष्टीने भारतातील कोणत्याही जिल्हयाची लोकसंख्या वाढत नाही. सन 2035 मध्ये ठाण्याची लोकसंख्या मुंबईच्या लोकसंख्येइतकी झालेली असेल. म्हणून ठाण्याच्या इन्फ्रास्ट्रक्चरकडे लक्ष दिले पाहिजे. मुंबईचे इन्फ्रास्ट्रक्चर कोलमडेल म्हणून मुंबईच्या आजुबाजूचे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करणे गरजेचे आहे. माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन देऊन सुध्दा आमदारांची बैठक बोलाविली नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आपण आमदारांची बैठक केव्हा घेणार आणि निधी वाटपाचा असमतोल कसा दूर करणार आहात ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना निश्चित तारीखच हवी असेल तर 10 डिसेंबरच्या अगोदर निश्चितपणे बैठक घेण्यात येईल. मला या ठिकाणी हे सांगावयाचे आहे की, एम.एम.आर.डी.ए. कडे प्रस्ताव यावा लगतो आणि एम.एम.आर.डी.ए.च्या बैठकीमध्ये त्या प्रस्तावावर निर्णय घेतला जातो. मी जबाबदारीने सांगतो की, ठाणे, रायगडचा एकही प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए.कडे प्रलंबित नाही.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्रीमती उषाताई दराडे )** : सन्माननीय सदस्यांना माझी अशी विनंती आहे की, त्यांनी आधी माननीय मंत्रिमहोदयांना खुलासा करु द्यावा आणि त्यानंतर आपले प्रश्न विचारावेत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदया, यासंबंधी कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव एम.एम.आर.डी.ए.कडे प्रलंबित नाही, असेल तर बैठकीत जरुर त्यासंबंधी आपण त्याचा विचार करु. एम.एम.आर.डी.ए.चा विषय नेहमी समतोल विकास हाच राहील.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे आपण शेवटचा प्रश्न विचारावा कारण या प्रश्नाला आतापर्यंत आपण खूप वेळ दिलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जर आम्हाला योग्य उत्तर मिळाले असते तर हा प्रश्न कधीच आटोपला असता.

**तालिका सभापती** : ठीक आहे, आपण आपला प्रश्न थोडक्यात मांडावा.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे, सभापती महोदया, माननीय मंत्री श्री.राजेश टोपे यांनी उत्तर देतांना सांगितले की, असा प्रस्ताव आला होता. एम.एम.आर.डी.ए.ला मुंबई वेगळी करा, असा प्रस्ताव देण्यात आला होता का ? तुमचा सर्व्हे रिपोर्ट आणला की नाही त्यामध्ये काही उणीवा आहेत त्यामध्ये काही गोष्टी आहेत त्यासंबधीचा प्रस्ताव न येता त्या मॅनेज केल्या जातात. एम.एम.आर.डी.ए.म्हणते की, आमच्याकडे निर्णयाचे अधिकार द्या, प्लॅनिंगचे अधिकार द्या, मुंबई वेगळी करा. तुम्हाला म्हणावयाचे आहे की, एम.एम.आर.डी.ए.ची जबाबदारी आहे त्यांनी या विभागांचा सर्वंकष विकास कसा होईल याचे अध्ययन करावे मग त्यांनी त्यानुसार इम्प्लिमेन्टेशन करावे मग सरकार म्हणून आपण सभागृहामध्ये ,एम.एम.आर.डी.ए.ची बाजू घ्यावी. या ठिकाणी आपण असे सभागृहामध्ये आश्वासन द्यावे की, एम.एम.आर.डी.ए.चे पैसे बाहेर जाणार नाहीत.

श्री.राजेश टोपे : यासंदर्भात घेण्यात येणा-या बैठकीमध्ये हे सर्व प्रश्न सुटतील. एम.एम.आर.डी.ए.चे पैसे कोणत्याही परिस्थितीत बाहेर जाणार नाहीत, असे मी आश्वासन देतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, यासंबंधी ही जी नियम 93 अन्वये सूचना आली आहे आणि त्याच्या निवेदनावर ही चर्चा या ठिकाणी चालू आहे. यानिमित्ताने तरी आम्हा सदस्यांना एम.एम.आर.डी.ए.ची काय भानगड आहे ती कळत आहे. विभागीय विकासाबाबत इतर ठिकाणी त्या त्या जिल्हयाच्या डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून चर्चा होते परंतु गेली दोन वर्षे मुंबई शहरामध्ये

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ KTG/ प्रथम श्री.बोरले..... 14:40

श्री. दिवाकर रावते ....

पालक मंत्र्यांच्या उपस्थितीत डी.पी.डी.सी.ची एकही बैठक झालेली नाही. मुंबईला पालकमंत्री आहेत की नाहीत, हेही आम्हाला माहीत नाही. मुंबईमध्ये पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून कोणत्याही प्रकरणावर, प्रश्नावर, मुंबईच्या विकासावर चर्चा झालेली नाही त्यामुळे या शहरामध्ये विकासासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे, हे आम्हाला कळायला मार्ग नाही. दोन वर्षे झाली मुंबईमध्ये पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणारी डी.पी.डी.सी.ची बैठक का झाली नाही ? याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी करावा. एम.एम.आर.डी.ए.कडे विकासाकरिता 900 कोटी रुपये येतात. मुंबईतील 60 उड्डाण पुल, मुंबई -पुणे, वांद्रे-वरळी जोड मार्ग अशा प्रकारचे महत्वाचे टप्पे आहेत यासंदर्भातील माहिती डी.पी.डी.सी.च्या बैठकीशिवाय समजण्यास मार्ग नाही. डी.पी.डी.सी.अस्तित्वात आहे की नाही हा प्रश्न येथे निर्माण होत आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला असे सांगू इच्छितो की, यासंबंधी जे मुंबईचे पालकमंत्री असतील त्यांनी पुढे यावे आणि यासंदर्भात चर्चा करुन योग्य ती भूमिका शासनातर्फे लवकरात लवकर घेतली पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आता शेवटचा प्रश्न विचारावा कारण या विषयाला आतापर्यंत आपण खूप वेळ दिलेला आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया, मुंबई शहर हे एकूण 1 कोटी लोकसंख्या असलेले शहर आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे एन.सी.पी.चे पक्ष प्रमुख आहेत व ते आज या ठिकाणी या प्रश्नावरील चर्चेला सभागृहामध्ये उपस्थित आहेत. माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी गेली 14 महिने डी.पी.डी.सी.ची बैठक बोलाविलेली नाही. मग येथे नाही तर आम्ही कोठे यासंबंधीची व्यथा मांडावयाची ? मुंबई महानगरपालिकेची निवडणूक होती त्याच्या अगोदर नोव्हेंबरमध्ये बैठक घेण्यात आली होती, त्यानंतर एकही बैठक झालेली नाही. मुंबईमध्ये डी.पी.डी.सी.आहे का? अशी शंका आता निर्माण होऊ लागली आहे. असेल तर तेथे आपले लोक काय करतात ? लोकांची कामे का करीत नाहीत ? हे विचारले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना बोलू द्यावे, हा विषय गंभीर आहे.

श्री.अजित पवार : दिनांक 31 डिसेंबर,2007 च्या आत डी.पी.डी.सी.ची बैठक पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत घेतली जाईल.

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : या आधी डी.पी.डी.सी.ची बैठक का घेतली नाही,याचा खुलासा द्यावा. राज्य चालविता की काय करता ?

( उत्तर नाही )

-------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासन निर्णयाअन्वये राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 51 माध्यमिक शाळा अनुदानास पात्र असूनही अद्याप त्यांना अनुदान न मिळणे

**मु.शी.**: शासन निर्णयाअन्वये राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 51 माध्यमिक शाळा अनुदानास पात्र असूनही अद्याप त्यांना अनुदान न मिळणे याबाबत श्री.व्हि.यु.डायगव्हाणे,प्रा.बी.टी.देशमुख,श्री.वसंतराव खोटरे यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री.व्हि.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे यांनी "शासन निर्णयाअन्वये राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 51 माध्यमिक शाळा अनुदानास पात्र असूनही अद्याप त्यांना अनुदान न मिळणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महादेय, आदिवासी शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण 51 शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात दिनांक 30 जून, 2006 ला शासन निर्णय निर्गमित केला. शाळांच्या याद्या जाहीर केल्या आणि त्यांना 100 टक्के अनुदान देण्याचे मान्य केले. याद्या जाहीर केल्यानंतर आता विभागीय प्रतिनिधी म्हणतात की, प्रत्येक शाळातील तुकडयांमध्ये 50 टक्के आदिवासी विद्यार्थी असले पाहिजेत.

यानंतर श्री.गागरे.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ KTG/ पूर्वी कु.खर्चे 14:45

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे .....

अगोदर हा नियम नव्हता. माननीय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत उत्तर दिलेले आहे, त्यांनी मेहनत केली आहे म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो. मात्र मी सांगू इच्छितो की, आपण पुढे जात आहोत तसे त्यांनाही पुढे घेऊन गेले पाहिजे. कारण आपण आदिवासी विभागातील मंत्री आहात. आपण उत्तर दिले आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे प्रस्ताव सादर करुन निर्णय घेणार आहात. याबाबत फार विलंब लावू नका. आपण दिनांक 30 जून, 2006 पर्यतची यादी जाहीर केली आहे. हा आदिवासी विभागाचा प्रश्न आहे. माझा स्पेशिफिक प्रश्न आहे की, एक महिन्यात आत हया प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल का ? दुसरा प्रश्न आहे की, 174 शाळांची यादी आपण दिनांक 1 नोव्हेंबर 2007 रोजी जाहीर केली आहे. परंतु त्याच्या अनुदानासंदर्भात काहीच वाच्यता केली नाही. या दोन्ही प्रश्नाच्या संदर्भात एक महिन्याच्या आत पॉझीटीव्ह निर्णय घ्यावा.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सदरील प्रश्न मागील अनेक दिवसांपासून सभागृहात चर्चेला येत आहे. शिक्षण विभागाने दिनांक 30 जून, 2006 पर्यतच्या यादीबाबतचा निर्णय घेतला आहे की, या शाळा अनुदानास पात्र आहेत. त्यांना अनुदान दिले गेले पाहिजे, ही शिक्षण विभागाचे भूमिका आहे. याबाबत ट्रायबल कमिटीने निर्णय घेतल्यामुळे थोडा विलंब झाला आहे. यातील 22 शाळा निश्चित अनुदानावर आलेल्या आहेत. उर्वरित शाळांच्या संदर्भात एक प्रस्ताव आदिवासी विकास विभागाकडे सादर केलेला आहे. ते लवकर मान्य झाला नाही तर माननीय मुख्यमंत्री महोदयांशी मी बोलणार आहे. कारण दिनांक 30 जून, 2006 निर्णयाच्या अन्वये ज्या शाळा पात्र ठरतात त्यांना अनुदान दिले गेले पाहिजे, ही शासनाची सकारात्मक भूमिका आहे.

सभापती महोदय, उर्वरित तुकडयांना अनुदान मिळाले पाहिजे ही शिक्षण विभागाची सकारात्मक भूमिका आहे, त्यामुळे दिनांक 30 जून रोजी निर्णय निर्गमीत केलेला आहे. माननीय

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके .....

मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा करण्यात येईल व किमान संबंधित शाळांकडून अंडरटेकींग घेऊन भविष्यात अनुदान उपलब्ध करुन देण्याची भूमिका घेण्यात येईल. त्यांना अनुदान देण्याबाबतची भूमिका मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना कळविणार आहे. 174 शाळापैकी 101 शाळा व 1885 तुकडया या अनुदानाच्या टप्प्यात आलेल्या आहेत. टोकन प्रोव्हीजन म्हणून 4 हजार रुपयांची तरतूद पुरवणी अंदाजपत्रकात करीत आहोत. पुरवणी मागणी मान्य झाल्यानंतर तो प्रश्न निकालात निघेल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3.



**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शि.** : गोदावरी नदीवर बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्याच्या कामातील त्रुटी.

**मृ.शि.** : गोदावरी नदीवर बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्याच्या कामातील त्रुटीबाबत सर्वश्री.मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, श्री.मधुकर चव्हाण यांनी "गोदावरी नदीवर बांधण्यात येणाऱ्या बंधाऱ्यांच्या कामातील त्रुटी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी फक्त तीन प्रश्न आहेत. 5 किंवा 7 मीटर खडक आढळून आला असताना 15 ते 18 मीटर खडक लागल्याचे दर्शवून सदर एजन्सीला

बीले देण्यात आलेली आहेत, हे खरे आहे का ? दुसरा प्रश्न आहे की, या ठिकाणी निविदाची रक्कम सुरुवातीस कमी दाखवून नंतर ती रक्कम बदलली आहे हे खरे आहे का ? तिसरा प्रश्न आहे की, 11 बंधाऱ्यामध्ये 7.13 टीएमसी पाणी साठविण्यासाठी 140 रुपये खर्च होत असेल व 12 टीएमसी पाणी साठविण्यासाठी 140 रुपये खर्च होत असेल तर 7.3 टीएमसी पाणी साठविण्यासाठी हा जो वाढीव खर्च दाखविला आहे, त्याची कारणे कोणती आहेत. ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आपणास माहिती आहे की, पाणी अडविण्याच्या संदर्भातील प्रत्येक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगळी असते. माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, तुम्ही 12 टीएमसी पाणी दुधना प्रकल्पात अडविता व त्यावर 140 कोटी रुपये खर्च करता. याबाबत मी सांगू इच्छितो की, दुधना प्रकल्पावर आपण केवळ 140 कोटी रुपये खर्च करीत नाही तर तेथे 12 टीएमसी पाणी अडविण्याकरिता 1025 कोटी रुपये खर्च करीत आहोत. 2006-07 प्रमाणे ही रक्कम बरोबर 1025 कोटी 78 लाख रुपये येत आहे. त्यातून साधारणत: 35 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येत आहे. सभापती महोदय, या राज्यात काही विभागात अशा साईट शिल्लक राहिल्या आहेत की, तेथे पाणी अडविण्याकरिता पूर्वीच्या तुलनेत जास्त खर्च येतो किंवा नॉर्मसमध्ये बसत नाहीत. गोदावरी पाणी वाटप लवादाच्या निर्णयानुसार साधारणत: 60 टीएमसी पाणी आपणास मंजूर झालेले आहे. मागील 15 वर्षामध्ये आपण बघितले तर विष्णुपुरी प्रकल्पाचे काम झाल्यानंतर तेथे आपण फक्त 4.10 टीएमसी पाणी अडवू शकलो. नंतर उर्वरित हे सर्व पाणी आंध्रप्रदेशमध्ये वाहून जाते म्हणून जलसंपदा विभागाने याबाबत निर्णय घेतला आहे.

नंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मांजरा नदीवर सन 2007 मधील पावसाळयामध्ये सुरुवातीलाच पूर येत असे परंतु कोल्हापूरमध्ये बॅरेजेस तयार केल्यामुळे आता तेथे 25 टक्के पाणी आहे. तापी नदीवर बॅरेजेस केले ते यशस्वी झाले. 565 कोटी रुपये खर्च केल्यानंतर साडेसात टीएमसी पाणी अडवू शकतो. यासाठी हे काम सुरु करण्यात येत आहे. हे काम सुरु करीत असताना सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी येथे मुद्दा मांडला की, बॅरेजेस तयार करताना कडीण खडक आहे त्यापेक्षा जास्त खोल काम करण्यात आले. मी आपणास सांगू इच्छितो की, कोठल्याही ठिकाणी साईट निवडताना सुरुवातीला बोअरवेल केले जाते व त्यानंतर खडक कोठल्या पातळीवर आहे हे पाहिले जाते. परंतु एका बाजूने बोअरवेल केल्यानंतर दुसऱ्या बाजूचा खडक जास्त खोल आहे असे देखील होऊ शकते. काही वेळेला सुरुवातीला बोअरवेल करताना खडक जास्त खोलीवर आढळून येतो . मात्र प्रत्यक्ष ज्या वेळी काम सुरु केले जाते त्यावेळी तो त्यापेक्षा कमी खोलीवर आहे असे देखील होऊ शकते. याबाबत आम्ही मध्यवर्ती संकल्पचित्र, नाशिक सीडीओ यांनी बंधाऱ्याचे संकल्पन केले असून सर्वसाधारण आराखडयात त्यांची पाया पातळी निश्चित केली आहे. त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु केले जाते. याठिकाणी मी एक गोष्ट मान्य करतो की,11 बॅरेजसचे काम करीत असताना ज्या वेळी वर्क ऑर्डर दिली त्यावेळी तेथील खडक हा 5.95 मीटरवर असल्याचे आढळून आहे. परंतु ज्यावेळी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली त्यावेळी मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने हा खडक साडेआठ मीटरवर असल्याचे सांगितले. राजाकाकडी येथे सुरुवातीला कठीण खडक जास्त आहे असे सांगितले परंतु त्यानंतर तो कमी खोलीवर असल्याचे आढळून आले.

सभापती महोदय, याठिकाणी असे वातावरण तयार केले जात आहे की, एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार बंधाऱ्याची कामे सुरु करताना झालेला आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, यापैकी काही साईटसची पाहणी माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी देखील केलेली आहे. ही गोष्ट सन्माननीय सदस्य श्री. दिलीप देशमुख व सुरेश... यांना देखील माहीत आहे. बंधाऱ्याच्या कामाची क्वालीटी अतिशय चांगली आहे. जायकवाडी येथे फारमोठया प्रमाणात पाणी वाहून जाते. हे पाणी अडविता यावे यासाठी हे बंधारे निर्माण करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. आतापर्यंत 381 कोटी रुपयाचे काम झालेले आहे. व उर्वरित बंधाऱ्याच्या कामासाठी

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

कोणत्याही कारणास्तव निधी कमी पडू दिला जाणार नाही. हे काम ठराविक कालावधीमध्ये पूर्ण करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. या बंधाऱ्यांमुळे साधारण 60 हजार एकरचे क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. त्यामुळे नदीच्या दोन्ही तीरावर असलेल्या शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजनेला देखील यामुळे लाभ होणार आहे.

सभापती महोदय, आपल्याला माहीत असेलच की, मागील काळामध्ये आंध्र सरकारने पाणी वाटपाच्या प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले होते. बाभळी बंधारा बांधू नये अशी त्यांची भूमिका होती. त्यावेळी शासनाने माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली माननीय पंतप्रधान महोदयांकडे आमदारांचे एक शिष्टमंडळ गेले होते. या धरणाचे काम कसे चालू राहील यासंदर्भात शासनाने प्रयत्न केले होते. यासर्व तांत्रिक बाबी लक्षात घेऊन शासन बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करणार आहे. येथे कोणत्याही प्रकारचे चुकीचे काम केले जाणार नाही अशी जलसंपदा विभागाची भूमिका आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मला येथे असा प्रश्न विचारावयाचा आहे की, बंधाऱ्याची कामे सुरु करण्यापूर्वी याठिकाणी ट्रायल बोअर घेण्यात आली असता, पाच ते सात मीटर खोलीवर कठीण खडक लागल्याचे ट्रायल बोअर करणाऱ्या एजन्सीने आपल्याअहवालात नमूद केलेले असतानासुध्दा बॅरेजेसच्या खोदकामाच्या वेळी 15 ते 18 मीटरवर कठीण खडक लागल्याचे दर्शवून त्याप्रमाणे सदर एजन्सीजना बिले अदा केल्याचे आढळून आले आहे काय?

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.......
आम्ही मुंबई महापालिकेमध्ये होतो आणि त्यामुळे प्रशासन स्कोप कसा बदलते हे मला माहिती आहे. तेव्हा हे खरे आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आम्ही तेथे जे दरवाजे केलेले आहेत ते साधारणत : धरणावर असतात त्याप्रमाणे केलेले आहेत. यांत्रिकी दरसूचीप्रमाणे दरवाजांचे अंदाजपत्रक केलेले होते अणि यांत्रिकी विभागाकडून सर्व दरवाजांचे काम करता येत नाही कारण बाकीचे काम देखील चालू आहेत. त्यामूळे कंत्राटदाराकडूनही हे काम केले जाते. त्यामुळे या कामाचे निरीक्षण यांत्रिकी विभागाला आपण करायला सांगितले. मधल्या काळामध्ये पाऊस मोठया प्रमाणात झाल्यानंतर यांत्रिकी विभागातील काही तज्ज्ञ लोकांना यामध्ये थोडासा बदल करावासा वाटला आणि तो बदल करणे उद्याच्या दृष्टीने फायदयाचे आहे असे त्यांनी आपल्या लक्षात आणून दिले. त्यामुळे त्याप्रमाणे काही बदल केले आहेत आणि त्यामुळे किंमत वाढली ही वस्तुस्थिती आहे, ती नाकारता येणार नाही. सभापती महोदय, यांत्रिकी विभागाच्या दरसूचिप्रमाणे गेट्सची अंदाजपत्रके तयार केली आहेत आणि त्यामध्ये त्याची स्टीलची जाडी किती असली पाहिजे वगैरेही त्यात गृहीत धरलेले आहे. तसेच कठीण खडकाच्या बाबतीत खोली काही ठिकाणी ठरविल्यापेक्षा जास्त करावी लागली आहे तर काही ठिकाणी ती कमी देखील केली गेलेली आहे. त्या ठिकाणी एकंदर 10 बॅरेजेस आहेत त्याची सर्व माहिती आता माझ्याकडे उपलब्ध आहे. वाटल्यास ती मी सारी येथे देऊ शकतो. तेथे काही खोली संबंधातील काम राहिलेले आहे तर काही ठिकाणी काम झालेले आहे. परंतु काही वेळेस अशी परिस्थिती येते की, काही ठिकाणी काही वेळेस जास्त पाऊस येतो आणि त्यामुळे पाणी दुसऱ्या राज्यात वाहून जाते. तशा प्रकारच्या त्रुटी राहू नयेत आणि आपल्याकडे वेगवगळया भागामध्ये जे के. टी. बंधारे आहेत त्यात देखील काही अडचणी येतात. काही वेळेस फळ्या टाकता येत नाहीत. काही वेळेस तेथे घाण साचते त्यामुळे पाणी साठत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या अडचणी गोदावरीच्या बंधाऱ्यांमध्ये येता कामा नयेत असे नियोजन तेथे आम्ही केलेले आहे. त्यामुळे सदस्यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला त्याप्रमाणे काही बाबतीत खोली ही जास्त घेण्यात आलेली आहे. आणि अशा प्रकारे कोठे खोली जास्त घ्यावी लागली तर त्या कामाचे बिल हे कंत्राटदाराला द्यावे लागते. परंतु त्यात कोठयाही प्रकारे चुकीचे झाले आहे वा बोगस प्रकार आहे आसे नाही. याबाबतीत वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून सर्वांचे त्यात लक्ष आहे.

---------

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सावरखेड मायनरचे (मौजे बोरी - अडगाव, ता.खामगाव, जि. बुलढाणा ) काम गेल्या 8-10 वर्षापासून अपूर्णावस्थेत असणे.

**मु. शी.** : सावरखेडा मायनरचे (मौजे बोरी -अडगाव, ता. खामगाव,जि. बुलढाणा) काम गेल्या 8-10 वर्षापासून अपूर्णवस्थेत असणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि. प. स. यांनी दिलेली दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

---

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, यांनी "सावरखेड मायनरचे (मौजे बोरी - अडगाव, जि. बुलढाणा ) काम गेल्या 8-10 वर्षापासुन अपुर्णावस्थेत असणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या आसल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे. )

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मा.जलसंपदा मंत्र्यांच्या नियम 93 अन्वयेच्या निवेदनानंतर.... )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महादय, बुलढाणा जिल्हयातील खामगाव तालुक्यातील हा मन प्रकल्प आहे आणि त्याच्या डाव्या कालव्याचे काम गेली 8-10 वर्ष रखडलेले आहे. खरे तर या कालव्याचे थोडेसेच काम राहिले असल्याने तेथील जवळपास 700 एकर जमिनीचे सिंचन होऊ शकत नाही. भुसंपादनांच्या कारवाईमुळे ते काम अडले होते असे यावर उत्तर देताना माननीय मंत्री महोदय सांगतील आणि ते खरेही आहे. पण आता ती अडचण राहिलेली नाही. आपण या निवेदनामध्ये वस्तुस्थिती मान्य केली आहे. तेव्हा आता हे काम लवकरात लवकर होण्यासाठी निधीची आवश्यकता आहे तो निधी आपण उपलब्ध करुन दिला पाहिजे. याची साईटही बदलली आहे. ते लक्षात घेऊन तेथील शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणी मिळेल यासाठी किती दिवसात हे काम पूर्ण होईल इतकेच माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, जो प्रश्न येथे विचारला आहे त्याला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की डिसेंबर 2007 मध्ये हे काम सुरु होईल आणि 31 जानेवारी 2008 ला हे काम पुर्ण केले जाईल आणि त्याला कोठल्याही प्रकारे निधी कमी पडू दिला जाणार नाही.

-------

........2एफ 4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर जिल्हयात कुपोषणामुळे 7 महिन्यात 550 बालकांचे झालेले मृत्यू.

**मु. शी.** : चंद्रपूर जिल्हयात कुपोषणामुळे 7 महिन्यात 550 बालाकांचे झालेले मृत्यू याबाबत श्री. अरविंद सांवत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

-----

श्री. धर्मरावबाबा आत्राम ( आदिवासी, महिला व बाल विकास राज्यमंत्री ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. अरविंद सावंत यांनी " चंद्रपूर जिल्हयात कुपोषणामुळे 7 महिन्यात 550 बालकांचे झालेले मृत्यू " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

..........2एफ 5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



( मा. महिला व बालविकास राज्यमंत्र्यांच्या नियम 93 खालील निवेदनानंतर....)

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, हे निवेदन वाचल्यानंतर या शासनाला कोणाच्याही मृत्यूबद्यल काहीच वाटत नाही असे दिसून येते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊन मृत्यू होवोत वा कुपोषणाने बालकांचे, त्यांच्या मातांचे मृत्यू होवोत, या शासनाच्या डोळयात अश्रू तर द ुरच पण डोळयाच्या कडा तरी ओलावतात की नाही हा प्रश्नच पडतो. याचे हे चांगले उदाहरण आहे. चंद्रपूर जिल्हयातील कुपोषणासंबंधात मी नेमका प्रश्न विचारला आहे. गेल्या एप्रिल 2007 ते आता पर्यंत म्हणजे गेल्या 6-7 महिन्यामध्ये 33 मातांचे मृत्यू झालेले आहेत......

(यानंतर श्री. बरवड ........2जी 1..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

तसेच 550 पेक्षा जास्त बालकांचा मृत्यू झाला. आम्ही काय करीत आहोत याबाबत शासनाने निर्ढावलेल्या पध्दतीने सर्व उत्तर दिलेले आहे. कालपरवा उच्च न्यायालयाने सुध्दा शासनावर ताशेरे झाडले आणि सांगितले की, या सर्व बाबतीत शासन योग्यरित्या कार्यवाही करीत नाही. यामध्ये हे जे सर्व लिहिले आहे त्यासंदर्भात शासन उच्चस्तरीय चौकशी नेमून या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी होते की नाही याचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करणार काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, निव्वळ अहवाल सादर करणे नव्हे तर त्यासंदर्भात कार्यवाही झाली पाहिजे. मी आपल्या माहितीसाठी सांगतो. शासनाने चौकशी करावी. बालवाडीमध्ये आजही खिचडी देण्याची पध्दत आहे. ही खिचडी वेळेवर दिली जात नाही. खिचडी सकाळी 11.00 च्या आत द्यावयाची असते ती दुपारी 2.00 वाजता दिली जाते. खिचडी लाकडे जाळून तयार केली जाते. शासन या सगळ्या बालवाड्यांना गॅस कनेक्शन देईल काय ? मी स्वत: मोखाडा तालुक्यातील 110 अंगणवाड्यांना वैयक्तिकरित्या सिलेंडर आणि शेगड्या दिलेल्या आहेत. शासनाने प्रत्येक बालकामागे दररोज 65 पैसे असा दर ठरविलेला आहे. तेवढे पैसे त्या लाकडांसाठी जातात. त्यातून जे प्रदूषण निर्माण होते, जी लाकूडतोड होते ती थांबेल तसेच शासनाचे पैसे वाचतील. आपण हायप्रेशर शेगड्या दिल्या तर पैसे वाचतील. आपण मोखाडा तालुक्यातील तहसिलदारांना विचारा. मी त्या ठिकाणी शेगड्या दिलेल्या आहेत. शासन लाकूडतोड थांबवून खिचडी वेळेवर देण्यासाठी प्रयत्न करील काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत सजेशन फॉर ॲक्शन. सन्माननीय सदस्यांनी मोखाड्यामध्ये जे केलेले आहे ते कसे काय आहे ते पाहू आणि खर्च कमी येत असेल तर जरुर त्यामध्ये काय सुधारणा करता येईल याबाबत विचार करु.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मेळघाट आणि चंद्रपूर भागामध्ये कुपोषणाचा विषय खूप वर्षापासून सुरु आहे. या भागामध्ये वनसंपदा मोठ्या प्रमाणावर आहे. माझी शासनाला एक सूचना आहे. पुणे विद्यापीठाने मधमाशी पालनाचा कोर्स आपल्या विद्यापीठामध्ये

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. जगदीश गुप्ता ......

मान्य केलेला आहे. त्याच धर्तीवर विदर्भातील अमरावती येथील मेळघाट आणि चंद्रपूर जिल्हा या आदिवासी भागामध्ये तेथील आदिवासी लोकांना मधमाशी पालनाचे प्रशिक्षण दिले तर त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढेल त्याचप्रमाणे त्यांना मधाच्या स्वरुपामध्ये सकस आहार सुध्दा उपलब्ध होईल. याबाबत शासन विचार करील काय ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यामध्ये अशा प्रकारची कार्यवाही सुरु आहे. त्या ठिकाणी वन खात्याच्या वतीने कार्यवाही सुरु आहे. वन खात्याच्या लोकांनी भामरागड या ठिकाणी चांगल्या प्रकारचे काम सुरु केले आहे. तशा प्रकारे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये होत असेल तर प्रयत्न करण्यास हरकत नाही.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरवड

**पृ. शी.** : ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठक भत्त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठक भत्त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सर्वश्री गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी यांनी "ग्रामपंचायत सदस्यांच्या बैठक भत्त्यामध्ये वाढ करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, राज्यात ग्रामपंचायत सरपंच आणि सदस्यांना केवळ 10 रुपये बैठक भत्ता देण्यात येतो. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, ग्रामपंचायतींनी सदर बैठक भत्ता नाकारल्याची तक्रार जिल्हा परिषदेकडून शासनास अद्याप प्राप्त झालेली नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, प्रत्येक बैठकीमध्ये तेथील सदस्य 5 रुपये, 10 रुपये, भत्ता घेत नाहीत. त्याच ठिकाणी ते पैसे चौकीदाराला देण्यात येतात. शासन सन्मानाने त्यांचा हा भत्ता वाढविणार काय ? 10 रुपयांऐवजी किमान 50 रुपये भत्ता करणार काय ? 5 रुपये, 10 रुपये ते त्याच ठिकाणी फेकून देतात.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शासन हे जे पैसे देते ते सन 2000 पासून देणे चालू आहे. टोकन ग्रँट म्हणून शासन ते देते. खरे पाहिले तर त्याच्या अगोदर सदस्यांना 10 रुपये बैठक भत्ता देत नव्हतो. सरपंचाला 100 रुपये किंवा त्यांचे जे उत्पन्न असेल त्याप्रमाणे 100 रुपये, 200 रुपये देतो. पूर्वी ते देत नव्हतो.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रणजित कांबळे...)

ते 2002 पासून आपण देत आहोत. शेवटी हे मानधन त्या त्या संस्थांनी त्यांच्या उत्पन्नातून द्यावयास पाहिजे. जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सदस्यांचे मानधन हे जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या उत्पन्नातून दिले जाते. एकूण 27882 ग्रामपंचायती आहेत. त्यांचे एकूण उत्पन्न 270 कोटी आहे. भत्ता 11.53 कोटी रुपये दिला जातो. आता 50 रुपये वाढवून द्यावयाचे म्हटले तरी हा खर्च 55 कोटी रुपयापर्यन्त जाणर आहे. नियमाप्रमाणे आपणास प्रशासकीय खर्च 25 टक्क्यापेक्षा जास्त करता येत नाही. कर्मचा-यांचा 50 टक्के पगार हा शासनामार्फत दिला जातो. मिनिमम वेजेसनुसार कर्मचा-यांचे पगार वाढलेले आहेत. ग्रामपंचायतीचे विजेचे बिल हे शासन भरते. ग्रामसेवकाचा पगार शासन देते. सन्माननीय सदस्यांनी ग्रामपंचायत सदस्याची तुलना जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या सदस्यांशी करु नये. जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचे कार्यक्षेत्र मोठे असते. त्यांना मिटींगसाठी हेडक्वार्टरला जावे लागते. ग्रामपंचायतींचे उत्पनन 270 कोटी रु. आहे. आपण 55 कोटी रुपये मानधनावर खर्च केले तर विकास कामे कशी करणार ?

श्री. गोपीकिसन बाजोरिया : एकूण 27882 ग्रामपंचायती आणि 2 लाख 23 हजार 857 सदस्य आहेत. त्यांच्या मानधनामध्ये 50 रुपये वाढ केली तर त्यामुळे 10 ते 12 कोटी रु. जादा खर्च होईल. तो खर्च 55 किंवा 70 कोटी इतका होणार नाही.

श्री. रणजित कांबळे : शेवटी हे पैसे शासन देत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांची इच्छा अशी आहे की, आपण ग्रामपंचायत सदस्याला 10 रुपये मानधन म्हणून दिलेले आहे. हा चांगला निर्णय आहे. त्या मानधनामध्ये वाढ करण्याची शक्यता आहे काय ? ग्रामसेवकाचा पगार, विजेचे बिल, मिनिमम वेजेस प्रमाणे पगार इत्यादी गोष्टी शासनामार्फत दिल्या जातात त्याप्रमाणे काही बोजा सरकारने उचलणे शक्य आहे काय ते सांगावे.

श्री. रणजित कांबळे : सद्य:परिस्थितीमध्ये ते शक्य नाही.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी माझ्या दालनामध्ये येऊन एका विषयाकडे माझे लक्ष वेधले होते आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी देखील मला सांगितले होते की, ते एक औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितात. आपण शुक्रवारी औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देतो. परंतु अपवाद म्हणून मी आज सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांना औचित्याचे मुद्दे मांडण्यास परवानगी देत आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहाचे उपसभापती यांचा अपमान पोलीस निरीक्षक आंधळकर यांनी केलेला असल्याचे मी काल वृत्तपत्रामध्ये वाचले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ श्री.जयंत प्र.पाटील......... 15:10

सभापती महोदय, या वरिष्ठ सभागृहाच्या माननीय उपसभापतींबद्दलची चर्चा खालच्या सभागृहात होते, आम्हाला याठिकाणी कळून येत नाही. एक मोरे नावाची महिला, तिला न्याय देण्याचा प्रयत्न माननीय उपसभापतींनी केला. हे करीत असताना श्री.भाऊसाहेब आंधळकर नावाच्या पोलीस निरीक्षकांनी माननीय उपसभापतींचा अवमान केला. हे योग्य नाही. या राज्यातील अधिकारी लोकप्रतिनिधींना नीट वागणूक देत नाहीत अशी आमची वेळोवेळी तक्रार असते. तिला खतपाणी घालण्याचे काम झालेले आहे. वरिष्ठ सभागृहाच्या माननीय उपसभापतींना अधिकारी अशी वागणूक देत असतील तर ते योग्य नाही. सन्माननीय गृहमंत्री याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत निवेदन करावे आणि श्री.आंधळकर यांच्यावर तातडीने कारवाई करुन त्यांना निलंबीत करावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माननीय सभापती महोदय, अत्यंत गंभीर अशा विषयाला माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी वाचा फोडली आहे. आम्ही वृत्तपत्रातून आज ही बातमी वाचली. खरे म्हणजे ज्यांच्याबद्दल चर्चा सुरु झाली आहे त्या माननीय उपसभापतींना या सभागृहात बोलावणे आवश्यक होते. एल.सी.बी. शाखेचे आंधळकर नावाचे अधिकारी आहेत त्यांनी माननीय उपसभापतींचा अवमान केलेला आहे. या सभागृहात बसणाऱ्या लोकप्रतिनिधींकडे अनेक प्रकारचे लोक त्यांच्यावर झालेल्या किंवा होत असलेल्या अन्यायाची दाद मागण्यासाठी येत असतात. आम्हाला त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे फोन करावा लागतो, संपर्क साधावा लागतो. अशाच प्रकारे एक अन्यायग्रस्त महिला माननीय उपसभापती महोदयांकडे आली होती. तिला न्याय मिळवून देण्यासाठी माननीय उपसभापतींनी श्री.आंधळकर या पोलीस अधिकाऱ्यांना फोन केला होता. फोन ठेवताक्षणी त्या अधिकाऱ्याने अर्वाच्च्य भाषेत माननीय उपसभापतींच्या नावाने शिव्या दिल्या. हे लोक आम्हाला काम करु देत नाहीत असेही त्यांनी वक्तव्य केले आणि अवमानित असे उद्‌गार काढले. यासंबंधी वेगळा पुरावा देण्याची गरज नाही. त्याच कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी यासंबंधी ॲफिडेव्हीट लिहून दिले आहे.

माननीय सभापती महोदय, आम्ही काम कसे करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. मी उदाहरण म्हणून माझ्याबाबतीत घडलेली घटना सांगणार आहे. माननीय उपसभापतींबाबत जे होऊ शकते ते विरोधी पक्षनेत्यांबाबत सुध्दा होऊ शकते. महिन्याभरापूर्वी एका पोलीस स्टेशनमध्ये 2-4 बेरोजगार युवक गेले होते आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबद्दल दाद मागितली होती. तेथील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

फौजदाराने त्यांच्याकडे 30 हजार रुपयांची मागणी केली. ती रक्कम दिली नाही तर त्यांच्याविरुध्द डकैतीचा गुन्हा दाखल केला जाईल असे सांगितले. या बेरोजगारांनी कर्ज काढून त्या फौजदाराला पैसे दिले. तरीही त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांना दोन महिने तुरुंगात रहावे लागले. या अन्यायाबद्दल मी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये फोन केला असता माझ्या नावे स्टेशन डायरीमध्ये नोंद घेण्यात आली.

सभापती महोदय, वरिष्ठ सभागृहाच्या माननीय उपसभापतींना अशाप्रकारच्या अर्वाच्य भाषेत एखादा अधिकारी वागणूक देत असेल तर मला असे वाटते की, कोणत्याही लोकप्रतिनिधींला काम करणे अशक्य होईल. सन्माननीय उपमुख्यमंत्री यांच्याबाबत घडलेली घटना आहे. दोन पोलीस हेड कॉन्स्टेबल एका ढाब्यावर दारुच्या नशेत माननीय उपमुख्यमंत्र्यांबद्दल जे बोलत होते ते माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी ऐकले आणि त्यांनी फोन करुन ते माननीय उपमुख्यमंत्र्यांना कळविले. त्यानंतर त्या दोन हेड कॉन्स्टेबलना निलंबीत करण्यात आले. जुलै महिन्यात घडलेली ही घटना आहे. वारंवार केलेल्या पत्रव्यवहाराची फाईल माझ्याकडे उपलब्ध आहे. राज्याच्या पोलीस महासंचालकांपासून गृह सचिवांपर्यंत, उपमुख्यमंत्र्यांपर्यंत पत्रव्यवहार केला. परंतु संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. खालच्या सभागृहात काल हा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अशा प्रकारे उर्मटपणे वागणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली नाही तर या सभागृहात किंवा खालच्या सभागृहात काम करणे अशक्य होईल. हा आपल्या सभागृहाचा अवमान आहे. संबंधित अधिकाऱ्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दाखल केली पाहिजे आणि त्या अधिकाऱ्याला सभागृहासमोर बोलावून शिक्षा सुनावली पाहिजे, त्यांना सस्पेंड केले पाहिजे अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी आपल्या दालनात भेटून आपली खास परवानगी मागितलेली होती. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील तसेच सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सन्माननीय उपसभापतींवर कसा अन्याय होतो आहे, पोलीस अधिकारी त्यांना उत्तरे कसे देत नाहीत यासंदर्भातील माहिती येथे दिलेली आहे. माझ्याकडे यासंदर्भात श्री. रत्नाकर मल्हारजी मखरे, माजी नगराध्यक्ष इंदापूर यांचे एक पत्र प्राप्त झालेले आहे. हे पत्र 24.9.2007 रोजीचे आहे. श्री. मखरे यांनी आपल्या पत्रात या सदनाचे उपसभापतींवर काही आरोप केलेले आहेत. या आरोपाच्या संदर्भात दुसरी बाजू काय आहे याची मला माहिती नाही. प्रश्न फक्त एकच आहे की, कोणीही व्यक्ती आपल्या पीठासीन अधिका-यावर जाहीरपणे आरोप करीत असेल तर यासंदर्भात चौकशी होण्याची आवश्यकता आहे. पीठासीन अधिकारी हे या सार्वभौम सभागृहाचे संचालन करीत असतात. त्यांच्यावर जर अशा प्रकारचे आरोप होत असतील तर ही गोष्ट गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. हे होत असतांना नाण्याला दुसरीही बाजू असते त्यामुळे नाण्याची दुसरीही बाजू तपासण्याची आवश्यकता आहे. माझ्याकडे जे पत्र आहे त्या पत्राच्या जास्त तपशिलात मी जाणार नाही. या पत्रातील विषय असा आहे की, "विधान परिषदेचे उपाध्यक्ष, नामदार वसंतरावजी डावखरे यांनी पुणे ग्रामीण पोलीस अधिका-यांना अत्यंत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन, गोळया घालून जीवे मारण्याची धमकी दिलेली आहे व स्वत: पोसलेले गुंड व हप्ते गोळा करणा-यांना संरक्षण द्या, त्यांच्यावरील खटले काढून घ्या अशा धमक्या दिल्या, त्याबाबत नामदार वसतंरावजी डावखरे यांचा विधानपरिषद उपसभापती पदाचा राजीनामा घेऊन त्यांच्यावर फौजदारी खटले दाखल करुन त्यांना त्वरित अटक करण्यात यावी" अशा प्रकारचा विषय पत्रात दिलेला आहे. या संदर्भात पत्र आल्यानंतर मी याबाबत गांभीर्याने विचार करीत होतो. हे पत्र प्राप्त होऊन पुष्कळ दिवस झालेले आहेत. मागे सुध्दा एका युनियनच्या पुढा-याने प्रश्न उपस्थित करुन माननीय उपसभापतींवर आरोप केले होते व यासंदर्भातील विषय मी सदनात मांडला होता.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा विषय या सदनाचे उपसभापती श्री. वसंतजी डावखरे यांच्या बाबतचा आहे, हा विषय पीठासीन अधिका-यांच्या संदर्भातील आहे. खरे तर या प्रकरणी अशी जाहीर चर्चा न करता यासंदर्भात आपले काय म्हणणे आहे याबाबत जर सन्माननीय

..2..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

सदस्यांनी माननीय सभापती महोदयाच्या बंद दालनात चर्चा केली असती व याबाबत माननीय सभापती महोदयांची प्रतिक्रिया मिळाली असती तर ते अधिक रीतसर झाले असते असे मला वाटते. बाहेर कोणी तरी, काही तरी म्हणते म्हणून ते रेकॉर्डवर आलेच पाहिजे हे अत्यावश्यक आहे काय? याबाबत माननीय सभापती महोदयांनी निर्णय द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी प्रथमच सांगितले होते की, या पत्राच्या तपशिलात मी जाणार नाही. या पत्राचा विषय मी थोडक्यात सांगितलेला आहे. माझी अशी मागणी आहे की, या ठिकाणी जर पीठासीन अधिका-यावर अशा प्रकारचे आरोप केले जात असतील, आरोप करणा-या व्यक्तींना कोणत्याही प्रकारच्या माध्यमातून सदनासमोर आणून त्यांच्याकडून माहिती घ्यावयाची व त्यांना काय सजा करावयाची यासंदर्भातील फैसला या सदनात होण्याची आवश्यकता आहे. जर यामध्ये पोलीस अधिकारी असतील तर त्यांच्याही संदर्भातील माहिती घेण्याची आवश्यकता आहे. अजून कोणाच्या तक्रारी असतील तर त्या सुध्दा विचारात घेतल्या पाहिजेत असे माझे मत आहे. मूळत: पीठासीन अधिका-यांना या संदर्भात न्याय मिळावा हा माझा मुख्य मुद्दा आहे. त्यामुळे यादृष्टिकोनातून या विषयाकडेआपण बघावे हे मला मुद्दाम आबांना सांगावयाचे आहे. कोणाचेही कपडे उतरवण्याची माझी भूमिका नसते, तसेच अशा प्रकारची भूमिका कधी राहणार देखील नाही. या सगळया पत्राच्या प्रती मुख्यमंत्र्यांना, पीठासीन अधिका-यांना, माननीय गृहमंत्र्यांना दिलेल्या आहेत तसेच हे पत्र कोणाकोणाला पाठविण्यात आलेले आहे त्याची यादी मी येथे वाचून दाखऊ शकतो परंतु मी तसे करणार नाही. आपल्या सर्वांना जर हे पत्र मिळालेले असेल आणि हे पत्र आपल्या रेकॉर्डमध्ये तसेच पडून राहिले तर हा विषय धुमसत राहील व कधी तरी या विषयाचा स्फोट होईल. त्यामुळे या विषयाकडे वेगळया दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे हा विषय थांबवण्याच्या दृष्टीने योग्य पावले उचलावीत एवढेच मला औचित्याच्या मुद्यातून सूचवावयाचे होते.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या सदनाचे सन्माननीय उपसभापती माननीय श्री. वसंतरावजी डावखरे यांच्या संदर्भात अवमान करणारी वर्तणूक एका पोलीस अधिका-याने करावी यासारखी दुसरी कोणतीही निंदनीय बाब असू शकणार नाही.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.............

श्री.आंधळकर यांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे इंदापूरचे माजी नगराध्यक्ष यांची देखील चौकशी करण्याची आवश्यकता आहे. आरोप कोण करते याला सुध्दा महत्व आहे. त्याची क्रेडिटीबिलीटी काय आहे हे पण पाहिले पाहिजे. ही माणसे ब्लॅकमेकर म्हणून फेमस आहेत. अशा व्यक्ती समाजातील एका प्रतिष्ठित व्यक्तीवर बोट उगारतात तेव्हा त्या व्यक्तीचा अवमान होत नाही, तर ती व्यक्ती ज्या आसनावर बसते त्या आसनाचा सुध्दा अवमान होतो. जे आसन जेथे ग्रहण केले जाते त्या सदनाचा देखील अवमान होतो. हे अतिशय गंभीर प्रकरण आहे. श्री.आंधळकर यांची पूर्वपीठिका काय आहे, त्यांनी कुठे कुठे कशाप्रकारचे पराक्रम केले, ते कसे श्रीमंत झाले याची माहिती घेणे गरजेचे आहे. "प स रि चा" तसे त्यांचा सुध्दा "प स रि चा" भरपूर मोठा आहे. एका फौजदाराकडे एवढी संपत्ती असणे. यातून निर्माण झालेली अरेरावी व मग्रुरपणा, दादागिरी यातून त्यांची सातत्याने सुटका होते, त्या सुटकेच्या मागे आणखी कोणीतरी अधिकारी असतील तर त्यांची सुध्दा चौकशी करण्याची आवश्यकता आहे. श्री.आंधळकरांकडे एवढी ताकद येते कोठून ? कुणाचा तरी पाठिंबा असल्याशिवाय त्याला ही ताकद येणार नाही. तेव्हा त्यांच्या या काळ्या धंद्यावर कोणी पांघरुण घातले त्यांचीही चौकशी करावी अशी मी मागणी करतो. सन्माननीय उपसभापती यांचा ज्या अधिकाऱ्यांनी अवमान केलेला आहे त्यांना ताबडतोब निलंबित करून त्या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी मी मागणी करतो.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, श्रीमती मोरे या दलित वर्गातील महिला आहेत. माननीय उपसभापती यांनी मदत करावी म्हणून त्या त्यांच्याकडे गेल्या. माननीय उपसभापती यांनी पोलीस स्टेशनला फोन केला असताना त्यांना शिविगाळ केली. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी माननीय उपसभापतींबाबत असभ्य भाषा वापरली त्यांना ताबडतोब निलंबित केले पाहिजे. We can raise our voice before collector or commissioner, but commissioner and collector must be polite with us. एका दलित महिलेला मदत करणाऱ्या माननीय श्री.वसंत डावखरे यांच्या सारख्या एका प्रतिष्ठीत व्यक्तीला पोलीस अधिकाऱ्यांनी असभ्य भाषा वापरुन त्यांचा अवमान केलेला आहे, या सभागृहाचा अवमान केलेला आहे. तेव्हा त्या अधिकाऱ्याला ताबडतोब निलंबित करुन नंतर त्याची चौकशी केली पाहिजे.





असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, श्री.मखरे यांना मी बरेच वर्षे राजकारणात पाहते आहे. दोन वर्षापूर्वी इंदापूर मध्ये एका दलित आश्रमशाळेवर दरोडा पडला. ही आश्रमशाळा त्यांचीच होती. त्यांना भेटण्यासाठी मी गेले होते. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे निवेदनाच्या प्रती दिल्या त्यात त्यांनी म्हटले होत की, पुणे ग्रामीण पोलीस स्टेशन अधीक्षकांविरुध्द ॲट्रॉसिटी लावला पाहिजे कारण ते दलितांच्या विरोधात आहेत. मी त्याचा पाठपुरावा केला नाही. मी त्यांना सांगितले की, "ग्रामीण पोलीस अधीक्षकांविरुध्द अनेक तक्रारी असतील, तरी सुध्दा ते दलित विरोधी आहेत असे म्हणण्यासारखे वाटत नाही, आपण खूप टोकाच्या भूमिका घेऊ नका" आता श्री.मखरे यांनी माननीय उपसभापती यांच्यावर आरोप केलेले आहेत. आपण एखाद्या पोलीस अधिकाऱ्यावर दोषारोप करतो, सभागृहात आरोप करतो, तेव्हा असे अधिकारी दुसऱ्या एखाद्या अधिकाऱ्याला हाताशी धरून आरोप करीत असतो. तेव्हा माझे म्हणणे आहे की, माननीय उपसभापती श्री.डावखरे यांच्यावर जो अन्याय झालेला आहे आणि श्री.आंधळकर यांच्यावर आरोप झाल्यावर हे पत्र पुढे आलेल आहे. तेव्हा त्यामधील कार्यकारणभाव आपण पाहिला पाहिजे. अन्यथा मूळ तक्रार बाजूला राहून संपूर्ण विषयाला वेगळे वळण मिळण्याची शक्यता आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांविरुध्द आरोप गेले केले याबाबत काल विधानसभेत चर्चा झाली. त्यावेळी माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, आम्ही चौकशी न करता निलंबित केले तर मॅटमध्ये आमच्यावर ताशेरे ओढले जातात. तेव्हा आम्हाला चौकशी करण्यासाठी एक दिवस द्यावा. या संदर्भात आम्ही उद्या सभागृहात निवेदन करु.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

आज सुदैवाने याठिकाणी माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत. मला असे वाटते की, चौकशी पूर्ण झाली असेल, त्यासंदर्भात काय कारवाई करणार आहेत, ते त्यांनी सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुळात श्रीमती शिला रवी मोरे या भगिनी ठाण्यामध्ये राहतात. याठिकाणी मी पाहत होतो की, त्या डावखरे यांच्याकडे का गेल्या ? त्या ठाणे मतदारसंघातील असल्यामुळे तेथील आमदारांकडे आपण मदतीच्या दृष्टीने जातो. त्याप्रमाणे त्या त्यांच्याकडे गेल्या असतील. श्री.डावखरे यांचाही मतदारसंघ तोच आहे. डावखरे हे या प्रकरणात स्वत: तेथे गेले नाहीत, त्यांनी फोन केला, अशी नोंद आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जे पत्र दाखविले ते अत्यंत महत्वाचे आहे. ते पत्र सर्वांकडे गेलेले आहे. त्यासंदर्भात स्वत: डावखरे यांनी चार पानी पत्र लिहिलेले आहे. त्यांच्यावर जे आरोप करण्यात आलेले आहेत, त्याचा खुलासा त्यांनी त्यामध्ये केलेला असून त्यांच्या पत्रातील शेवटचा परिच्छेद हा फार महत्वाचा आहे. त्यामध्ये त्यांनी आरोपांचा खुलासा व यामागील पार्श्वभूमी सांगितलेली आहे. यात शेवटी त्यांनी असे म्हटले आहे की, "...मी माझी बाजू पूर्णपणे आपल्यासमोर मांडलेली आहे. मात्र आपण बेजबाबदार व असत्य आरोप करुन माझी जनमानसातील प्रतिमा मलीन करण्याचे कुभांड रचले आहे, यावरुन आपला अंत:स्थ कुटील हेतू स्पष्ट होतो. माझ्याविरुध्द् तक्रार करायची होती तर ती राज्याचे प्रमुख म्हणून माननीय राज्यपाल यांच्याकडे करुन आपण न्यायाची अपेक्षा केली असती. मात्र आपले पत्र वृत्तपत्राकडे पाठवून त्यास प्रसिध्दी देणे, तसेच हितसंबंधीत अशा असंख्य लोकांना सदर पत्राची प्रत पाठवून देऊन आपण माझा व मी धारण करीत असलेल्या पदाचा उपमर्द केलेला आहे." अशाप्रकारची खंत त्यांनी या पत्रात व्यक्त केलेली आहे. पुढे असेही म्हटले आहे की, "..त्याचवेळी आपला अंत:स्थ कुटील हेतू स्पष्ट होत आहे. तरी मी माझे खुलाशाचे पत्र आपणांस प्राप्त होताच आपण माझ्याकडे तसेच स्थानिक वृत्तपत्राकडे पहिल्या पानावर ठळकपणे यासंदर्भात बिनशर्त माफी-दिलगिरी प्रदर्शित करावी, अन्यथा मी करीत असलेल्या कायदेशीर न्यायालयीन कारवाईला व त्याचे परिणामास समोरे जाण्यास तयार रहावे." अशाप्रकारे त्यांनी पत्र देऊन आपल्यावरील आरोपांचे खंडन केलेले आहे. हे जे सगळे निर्माण झालेले आहे, त्यामध्ये ॲफेडेव्हीट आहे. शेवटी, सत्य-असत्य यापेक्षाही

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

पीठासीन अधिकाऱ्यांच्या संदर्भात एका पोलीस अधिकाऱ्याने अशाप्रकारे उद्‌गार काढणे...ते आपण रेकॉर्डवर आणत नाहीत, परंतु हे कितपत योग्य आहे ? बाकीची चौकशी होईलच. यामध्ये खरे काय, खोटे काय ? परंतु अशाप्रकारे पीठासीन अधिकाऱ्यांच्या संदर्भात जाहीररित्या बोलून असे अवमानित करण्याचा प्रयत्न करणे, हे निंदनीय आहे. आपण कसला मॅट आणि फॅट घेऊन बसलात ? आम्ही नुसती पोलिसाची कॉलर धरली तर लागलीच गुन्हा दाखल होतो, न केलेलेही गुन्हे दाखल होतात. मग, त्यांना माफी कशासाठी ? याठिकाणी माननीय श्री.डावखरे साहेब उपस्थित आहेत. त्यांनी स्वत: यासंदर्भात पत्र लिहिलेले आहे.

श्री. वसंतराव डावखरे (**उपसभापती**) : सभापती महोदय, आपण मला सर्वप्रथम....

**सभापती** : कमीत कमी वेळात बाजू मांडा.

श्री. वसंतराव डावखरे (**उपसभापती**): माननीय सभापती महोदय, आपण मला माझी बाजू मांडण्यासाठी जर पूर्ण वेळ दिला तरच मी माझी बाजू मांडू शकेन. अन्यथा मी माझी बाजू जर वेळेअभावी संपूर्णत: मांडू शकलो नाही तर... सदनामध्ये मलाही माझी बाजू मांडण्याचा जो काही अधिकार.....

**सभापती** : आपल्याला आपली बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे.

श्री. वसंतराव डावखरे (**उपसभापती**): मी याठिकाणी फापटपसारा काही मांडणार नाही. हे जे प्रकरण घडलेले आहे, ते माझ्याच संदर्भातील नाही. शेवटी मी गोरगरिबांना मदत करीत असताना जर मला उद्या अशाप्रकारे फासावर जावे लागत असेल तर मी 10 वेळा फासावर जाईन. अशाप्रकारचा अन्याय माझ्यावर झाल्यानंतर अन्य लोकप्रतिनिधींवरही तो होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेवटी या प्रकरणाची तड नेमकी काय आहे ? याकडे साऱ्या महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींचे लक्ष लागलेले आहे.

नंतर श्री. रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ प्रथम श्री.पुरी........ 15:30

श्री.वसंतराव डावखरे ( उपसभापती ) ...............

यासंदर्भात जी घटना घडली ती मुळात अशी घडली की, ठाण्यातील एक भगिनी श्रीमती शिला मोरे, ज्यांना मी ओळखतही नव्हतो, त्यांचा मला एकदा फोन आला. त्यांनी मला असे सांगितले की, "मी आपल्या एका दिवंगत मित्राची पत्नी आहे, त्यांचे नांव रवी मोरे. आमचे जमिनीच्या संदर्भातील एक प्रकरण पुणे ग्रामीण पोलिसांकडे प्रलंबित आहे." माझ्याकडे जी कागदपत्रे आहेत, त्यात त्यांनी दिलेले पत्रही आहे आणि तारीखही नमूद आहे. त्या पुढे म्हणाल्या की, "त्याकरीता मला पुणे ग्रामीण पोलिसांनी बोलाविले होते. माझी चौकशी करण्यासाठी त्यांनी मला सकाळी 11 ते रात्री 11 वाजेपर्यन्त पोलीस स्टेशनमध्ये थांबविले." हा सर्व प्रकार कसा घडला याचा उल्लेख त्यांनी स्वत:च्या पत्रामध्ये केला आहे, वेळ कमी आहे, अन्यथा मी तो वाचून दाखविला असता. 26 जुलै रोजी त्यांनी ही व्यथा माझ्याकडे व्यक्त केली आहे. त्यांचा फोन आल्यानंतर मी स्वत: ग्रामीण पोलीस अधीक्षक श्री.विश्वास नांगरे-पाटील यांच्याशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला आणि त्यांना सांगितले की, "एका विधवा महिलेला सकाळी 11 वाजेपासून रात्री 11 वाजेपर्यन्त पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवणे दु:खदायक आहे, शोभनीय नाही. ही एक विधवा स्त्री आहे, एका ठराविक कालमर्यादेत त्यांची जी काही चौकशी करायची असेल ती करण्यात यावी." मला पोलीस अधीक्षकांनी हा विश्वास दिला की, "मी स्वत: लक्ष घालतो, त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो, त्या महिलेला तीन-चार दिवसानंतर माझ्याकडे पाठवावे." त्या भगिनीचा फोन मला माझ्या मोबाईलवर आलेला असल्याने माझ्याकडे त्यांचा दूरध्वनी क्रमांक होता. त्यावर संपर्क साधून मी त्याप्रमाणे त्यांना कळविले. दुस-या दिवशी सकाळीच इन्स्पेक्टर आंधळकर यांचा एक कॉन्स्टेबल, श्री.नाले यांनी सदर भगिनीला फोन केला आणि असे विचारले की, "फोन करुन तुम्हाला येण्याविषयी कळविले होते, तुम्ही का आला नाही ?" त्यावर या भगिनीने त्यांना सांगितले की, "माझी मुलगी आजारी आहे म्हणून मी येऊ शकत नाही. याबाबत मी माननीय डावखरे साहेबांना सांगितले होते त्यांनी पोलीस अधीक्षकांशी चर्चा केली आहे व त्यांनी तीन-चार दिवसांनी पुण्याला येण्याबाबत मला सांगितले आहे, त्याप्रमाणे मी त्यांना भेटणार आहे." त्या कॉन्स्टेबलने त्यावर त्यांना सांगितले की, "ठाणे-मुंबईच्या लोकांना ही सवयच जडली आहे." त्यानंतर त्यांच्याबरोबर जे भागीदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2........

श्री.वसंतराव डावखरे ( उपसभापती ) ...............

श्री.देवरे आहेत ते गृहस्थ स्वत: पोलीस स्टेशनमध्ये जबानीसाठी गेले. त्यावेळी इन्स्पेक्टर आंधळकर त्या ठिकाणी उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कर्मचा-यांना असे आदेश दिले की, "ताबडतोब कागदपत्र तयार करा आणि यांना अटक करा." अटक करण्याची धमकी दिल्यानंतर त्या देवरेंनी श्रीमती मोरेंना फोन केला की, "तुम्ही असा मध्यस्थ टाकल्यामुळे माझे नांव घेतले जात आहे आणि त्यामुळे माझ्यावर अटक होण्याची पाळी आली आहे." त्यानंतर मला ताबडतोब त्या भगिनीने फोन केला व हे सर्व कळविले. मी पुन्हा पोलीस अधीक्षकांना फोन केल्यावर त्यांनी मला सांगितले की, "मी स्वत: लक्ष घालतो आहे." तो इन्स्पेक्टर देवरेंच्या उपस्थित काय बोलला, त्यांनी काय शिव्या दिल्या याबाबत त्यांनी ॲफेडेव्हिट केले आहे. या शिव्या दिल्याचे मला कळल्यानंतर मी स्वत: श्री.नांगरे-पाटील यांच्याशी बोललो. त्यांना घडलेला प्रकार सांगितला. एवढे करुन थांबल्यानंतर या प्रकरणाशी संबंधित असलेले दुसरे बिल्डर आणि आंधळकरांनी पाठविलेले गुंड माझ्या ठाण्याच्या घरी 27 जुलै रोजी रात्री आले. पावसात पुण्याहून आल्यामुळे मी त्यांना घरात घेतले, चहा दिला. त्यांनी मला सांगितले की, "हे प्रकरण मिटावे म्हणून आम्हाला आंधळकर यांनी पाठविले आहे." मी त्यांना सांगितले की, "प्रकरण मिटवण्याचा प्रश्न येत नाही, मी तुम्हाला ओळखत नाही, कृपा करुन मला गळ घालू नका." त्यानंतर मी राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना फोन केला. त्यांनी सांगितले की, "जास्त काळजी करु नका, मी स्वत: लक्ष घालतो." हे झाल्यानंतर मी देवरेंना सांगितले की, "तुम्ही ॲफेडेव्हिट करुन द्या." हा सर्व पत्रव्यवहार मी माननीय उपमुख्यमंत्री आणि डी.जी.यांना दिला आहे. माझी तक्रार माननीय उपमुख्यमंत्री किंवा डी.जी. यांच्याबद्दल नाही. पण लोकप्रतिनिधीबद्दल अशा प्रकारे उपमर्द करणारी भाषा वापरणा-या पोलीस अधिका-याशी संबंधित हे प्रकरण आहे. हे प्रकरण येथे थांबत नाही. ग्रामीण पोलीसांनी एकत्रितपणे जो भयानक कारभार त्या ठिकाणी केला आहे त्यावर विदारक प्रकाश टाकला तर या पोलिसांना 'पोलीस' म्हणण्यास आमच्यासारख्या लोकप्रतिनिधीला आणि जनतेला लाज वाटावी, अशी कृत्ये घडलेली आहेत.

यानंतर श्री.बोरले..........

अमुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे ..........

परंतु सभापती महोदय माझ्यावर अशी पाळी आल्यानंतर आज त्यांनी मला जे शब्द वापरले ते जगाच्या पाठीवर कोणालाही आईवरुन शिवी दिली तर तो कदापि सहन करु शकणार नाही. मी आपल्याला सन्मानपूर्वक सांगतो की, मला माझ्या स्वर्गीय बाळासाहेब देसाईंची आठवण झाली. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मी प्रामाणिकपणे सांगतो की, ते जर आज असते तर ज्या पोलीस निरिक्षकाने मला माझ्या आईवरुन शिवी दिली त्याला त्यांनी त्याच दिवशी माझ्या आईच्या दर्शनासाठी स्वर्गात पाठविले असते. मी एवढे सांगून, एवढे बोलून मला न्याय मिळू शकला नाही, हरकत नाही. मी न्याय मिळवून घेईन, तेवढी धम्मक माझ्यात आहे. परंतु शेवटी या लोकांना तुम्ही किती काळ माफ करणार आहात ? त्यांनी जे आरोप केले, ते सर्व आरोप त्यांनी पद्धतशीररित्या पोलिसी खाक्यात माझ्यावर ढकलण्याचा प्रयत्न केला. त्याला मी न्यायालयात उत्तरे दिलेली आहेत. इतकेच नव्हे तर ज्या मखरेंचा आपण आता येथे उल्लेख केला त्या मखरेंवर आतापर्यंत इंदापूर पोलीस ठाण्यामध्ये जवळपास शंभराच्यावर गुन्हे दाखल आहेत. एक लफडेबाज पत्रलेखक म्हणून त्यांची ख्याती आहे. विशाल नांगरे-पाटलांवर त्यांनी दोन महिन्यांपूर्वी 55 पानी गंभीर आरोप करणारे पत्र लिहिले होते. मग एक-दोन महिन्यांच्या कालावधीमध्ये या मखरेंना असा कोणता साक्षात्कार झाला की, त्यांनी नांगरे-पाटलांची किंवा पुण्याच्या पोलिसांची एवढी भलामण केली. शेवटी त्या मखरेंना देखील किती दोष द्यावयाचा, हे मला ठरवावे लागेल. कारण त्यांचा बोलविता धनी हे आहेत. प्रकरणे कधी घडली, कधी नोंदली गेली याची मला माहिती नव्हती. परंतु मखरेंच्या पत्रामध्ये मात्र पारेवाडी वगैरे इतक्या सर्व गोष्टींचा समावेश आहे की, हे सर्व प्रकरण चौकशीसाठी ख-या अर्थाने आय.बी. कडे किंवा सी.बी.आय.कडे द्यावे इतके गंभीर आहे. कारण त्याची तड येथे लागेल असे मला वाटत नाही. मला जर आपण म्हणत असाल तर मी या ठिकाणी प्रत्येक प्रकरणाची शहानिशा करायला तयार आहे. हा प्रश्न काल विधानसभेमध्ये आला. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये सांगितले की, आम्ही उद्या पर्यंत चौकशी करुन कारवाई करतो. साहेब कारवाई होईल, मला त्याची पूर्ण खात्री आहे आणि नाही झाली तर पुढच्या न्यायालयीन लढाईला मी देखील तयार आहे. परंतु माझ्या सारख्या माणसाबद्दल जर एखादा पोलीस अधिकारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ....... 15:35

श्री.वसंत डावखरे ..........

असे चित्र तयार करीत असेल तर ते बरोबर नाही. श्री.आर.आर.पाटील साहेब मी तुम्हाला येथे अशी खात्री देतो की, आपण जर न्यायकारक कारवाई केली तर तुम्हाला येत्या 15 दिवसात याच पोलिसांच्या विरुध्द हजारोंच्यावर जर तक्रारी आल्या नाहीत तर मी माझ्या या पदाचाच नव्हे तर मी माझ्या आमदारकीचा देखील राजीनामा देईन. इतके लोक त्या ठिकाणी दबावाखाली दबलेले आहेत आणि इतकी गुंडशाही त्या ठिकाणी चाललेली आहे. शिरुर तालुक्यातील पारेवाडी, यांनी जे वर्णन केले त्यामुळे मला आता त्या गावाचे नावही माहीत झाले. सभापती महोदय, एका डेअरीवर छापा टाकण्यात आला. ही डेअरी ग्रामीण भागातील 15-16 तरुनांनी इकडून-तिकडून कर्ज काढून उभी केलेली डेअरी आहे. त्या ठिकाणी पोलिसांनी अचानक छापा टाकला. डेअरीतील लोकांना बेदम मारहाण केली. आपल्याबरोबर नेलेली रसायन त्यांच्या हातात दिली आणि त्यांना सांगितले की, तुम्ही ही रसायनं दुधात मिसळा. त्यांनी त्याचे व्हिडीओ चित्रण केले आणि त्यांना पोलीस कस्टडीमध्ये नेले. इतकेच नव्हे तर त्यांच्यातील मोहन शितोडे नावाचा जो गृहस्थ होता त्याला त्यांनी आपल्या बरोबर आणले आणि त्याला सांगितले की, 25 लाख रुपये घेऊन ये, तर पुढचे बोल. त्याचा लेखी जबाब माझ्याकडे आता या ठिकाणी आहे. त्याला त्यांनी नावापुरती अटक दाखविली. पण दुस-या दिवशीच्या सकाळ वर्तमानपत्रामध्ये मोहन शितोडे याला अटक अशी बातमी आलेली आहे. जेव्हा या मोहन शितोळेने 5 लाख रुपये ग्रामीण पोलिसांच्या कार्यालयात आंधळकरांना आणून दिले, त्यानंतर बाकीच्या 10 लोकांना कस्टडी दाखविली आणि त्या शितोडेला सोडून दिले. आपण म्हणत असाल तर मी उद्या त्या शितोडेला आपल्यासमोर हजर करतो. शेवटी कोठेही न्याय मिळत नाही म्हणून, त्या शितोडेंनी अप्पर मुख्य सचिवांची भेट घेऊन आपले ॲप्लीकेशन दिले. त्या शितोडेंचे ॲप्लीकेशन मी माननीय श्री.आर.आर.पाटील साहेबांकडे घेऊन गेलो. त्यांनी मागच्या आठवडयामध्ये सी.आय.डी. चौकशी लावली. ही अशी मंडळी जर तेथे कार्यरत राहिली तर कोणाचे धाडस होईल. मावळ तालुक्यामध्ये वडगावला बप्पी ढाबा आहे. त्या ठिकाणी यांनी रेड टाकून लोकांकडून 22 लाख रुपये घेतले.

यानंतर कु.जयश्री........

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे.....

रेव्ह पार्टीबद्दल आपण एवढे बोलतो. रेव्ह पार्टीबद्दल पेपरमध्येही वाचले,ते सर्व खरे आहे. जेथे रेव्ह पार्टी होती,त्या पार्टीमधली शायली नावाची बाई होती ज्या ठिकाणी मुंगीलाही शिरायला जागा नव्हती त्या ठिकाणी शायली नावाची बाई कशी गेली, खात्रीलायकरित्या आम्हाला असे कळले की हवालाच्या द्वारे तिच्याकडून 3 कोटी रुपये घेतले गेले. जे जे आरोप मी यामध्ये यासंदर्भात ज्यांच्यावर केले ती सर्व उच्चभू घरातील होती त्या सर्वांच्या घरी मी फोन केले आणि प्रत्येकाकडून पैसे वसूल करण्यात आले. या सगळया गोष्टी आज मी या ठिकाणी बोलून दाखवित आहे.

श्री.जयंत पाटील : किती पैसे आहेत ?

श्री.वसंत डावखरे : त्या रेव्ह पार्टीमध्ये असणा-या मुलांपैकी प्रत्येकाकडून एका गुन्हयासाठी 75- 80 लाख रुपये घेतले,असे त्या रेव्ह पार्टीच्या ठिकाणी करण्यात आलेल्या पंचनाम्यामध्ये दाखविण्यात आलेले आहे, ही जी प्रचंड प्रमाणात चोरबाजी चालू आहे. गोरगरीबांवर अन्याय चाललेला आहे. यांच्या भितीपोटी आणि दहशतीपोटी त्याठिकाणी लोक काही बोलत नाहीत. अशा परिस्थितीमध्ये सर्वसामान्य माणसाचे काय होणार मला या ठिकाणी एक गोष्ट आणखी अशी सांगावयाची आहे की, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांच्याशी मी काल बोललो असता मला असे कळले की, ते एकदा कुरकुरच्या एका ढाब्यावर रात्री जेवत होते त्यावेळी दोन कॉन्स्टेबल्स याच ग्रामीण पोलीस विभागातील तेथे होते. त्या दोघांच्या बोलण्यातून माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांना त्यांच्या आपआपसातील बोलण्यातून शिवीगाळ करीत होते, त्याचवेळी त्यांच्यासमोर काही महिलाही जेवत होत्या,काही मंडळी बसली होती. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना त्यावेळी राहवले नाही आणि ते सर्व असहय झाले म्हणून त्यांनी त्या पोलिसांचे बक्कल नंबर आणि गाडीचा नंबर घेतला आणि त्या नंतर तेथील यवत पोलीस स्टेशनला फोन केला आणि त्या दोघांवर निलंबनाची कारवाई झाली. माझे फक्त एकच रास्त म्हणणे आहे. माझ्याबद्दल अर्वाच्य भाषेत शिवी दिल्यानंतर त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या माणसांनी जर ॲफिडेव्हिट करुन दिले असेल आणि ते देखील त्याच दिवशी त्याशिवाय माझी जर तक्रार असेल तर मग मला वेगळा न्याय का ? यामध्ये मी एक शब्द जरी खोटे बोलत असेन तर तुम्ही कधीही चौकशी करा मी तर म्हणतो की, आपल्याला जशी योग्य वाटेल तशी कारवाई करा परंतु अशा

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे......

प्रकारचा अन्याय आणि अशा प्रकारचा अवमान मी सहन करणार नाही. त्याचे कारण स्पष्ट आहे. या ठिकाणी मी माझ्याकरिता बोलत नाही. पुणे जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये या संदर्भातील ज्या ज्या गोष्टी घडल्या त्याबद्दल माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आपण तपशिलवार माहिती मागविल्यावर आपल्या असे लक्षात येईल की, किती भयानक गोष्टी तेथे घडत आहे. त्यानंतर असे सांगण्यात आले की, या प्रकरणातील इन्सपेक्टरची कंट्रोल रुमला बदली केली. बदली केली म्हणजे काय केले कंट्रोल रुमला त्याला ॲटॅच केला की काय ? बाकी सगळे व्यवहार तोच बघत होता. त्यानंतर मीही त्याचा सातत्याने पाठपुरावा केला त्याला सोलापूरला ॲटॅच केला व मला असे कळले की तो मॅटमध्ये गेला तो मॅटमध्ये गेला त्याच्याबद्दल मी काही बोलत नाही कारण मॅटमध्ये जाण्याचे अधिकार प्रत्येकाला आहे. शेवटी माझ्यासारख्या माणसाच्या डोळयात धूळ फेकली मग न्यायाची अपेक्षा करतांना करायचे काय? सभापती महोदय, आपण जर परवानगी दिली तर याबाबत मी आणखी सविस्तर बोलू शकेन.

**सभापती** : श्री.वसंत डावखरे या विषयावर जर आवश्यक असेल तर आपण बोलावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा एक औचित्याचा मुद्दा आहे आणि तो येथे सांगितला पाहिजे या वरिष्ठ सभागृहामध्ये आज उप सभापती महोदय,आपल्याकडे न्याय मागत आहेत, आणि हा इतिहास झाला कारण असे पहिल्यांदाच घडत आहे. आज या ठिकाणी आम्हाला लज्जास्पद वाटत आहे.

श्री.वसंत डावखरे : सभापती महोदय, याप्रकरणाची संपूर्ण फाईल मी या ठिकाणी आपल्या स्वाधीन करतो. या संदर्भात माझी आपण जाहीरपणे चौकशी केली तरी माझी हरकत नाही. आपण या केसचा तपशीलवार अभ्यास करुन मला न्याय द्यावा,अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.अरविंद सावंत : राज्यकर्त्यांना किती लांच्छनास्पद आहे ते बघा!

श्री.वसंत डावखरे : सभापती महोदय, याठिकाणी मी एकच भावना व्यक्त करु इच्छितो की, या प्रकरणाच्या चौकशीकरिता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगावे की किती वेळ लागेल ? तोपर्यंत

....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.वसंत डावखरे......

मी न्यायाची वाट बघेन  कारण जोपर्यंत या प्रकरणाचा शेवट होत नाही तोपर्यंत मी या आसनावर बसणार नाही.

**सभापती** : सन्माननीय उप सभापती,सन्माननीय गृहमंत्री.....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,माननीय उप सभापतींनी माननीय गृहमंत्र्यांना विचारले की, किती दिवसांमध्ये आपण याप्रकरणाची चौकशी पूर्ण होईल ?

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय उपसभापती यांनी आताच सांगितले आहे की, या प्रकरणाचा शेवट होईपर्यंत मी पीठासीन अधिकाऱ्याच्या आसनावर बसणार नाही. याबाबत मी सांगतो की, या सदनावर अन्याय करु नये. माननीय उपसभापती यांनी त्यांचे कार्य करावे. सदरील घटना बाहेर घडलेली असून त्यांनी सभागृहात न्याय मागितला आहे. त्यांना न्याय देण्याची जबाबदारी आपली व गृहखात्याची आहे. त्यामुळे आपण न्याय दिल्यानंतर त्यांनी निर्णय घ्यावा.

**सभापती** : याबाबत उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे बोलतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 18 वर्षाच्या इतिहासात मी प्रथम पाहात आहे की, पीठासीन अधिकारी म्हणून माननीय उपसभापती यांच्या बाबतीत ही लाजिरवाणी घटना घडली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तडकाफडकी कारवाई झाली पाहिजे. सभागृहात सदस्य जे बोलतात ते सत्य बोलतात असे गृहीत धरले जाते. या सार्वभौम सभागृहाचे उपसभापती येथे बोलत आहे. सरकार त्यांच्या बोलण्याची काही दखल घेणार आहे की नाही ? त्याचे उत्तर देण्यास देखील आपण तयार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.जयंत प्र.पाटील, अनेक सदस्य व माननीय उपसभापती यांनी एक महत्वाच्या घटनेकडे आपले आणि या सभागृहाचे लक्ष वेधले आहे. मी सुरुवातीला शासनाची भूमिका स्पष्ट करु इच्छितो की, कोणत्याही पीठासीन अधिकाऱ्याचा किंवा कोणत्याही लोकप्रतिनिधींचा प्रशासनाकडून अवमान व्हावा अशी शासनाची धारणा नाही. शासनाचे असे मत असू शकत नाही. सभापती महोदय, जी घटना घडली आहे, त्याबाबत माननीय उपसभापती मला भेटले होते व या सदनात हा विषय येण्यापूर्वी सर्व बाबींची त्यांनी मला माहिती दिलेली आहे. त्या माहितीच्या आधारे संबंधित इन्स्पेक्टरच्या प्रॉपर्टीची अँटी करप्शन ब्युरोने तातडीने चौकशी करावी अशा प्रकारचे आदेश माझ्याकडून पारित झालेले आहेत. आता प्रश्न असा आहे की, माननीय उपसभापतीबद्दल वाईट बोलले गेले व ते काही कर्मचाऱ्यांनी ऐकले. तेथे उपस्थित असणाऱ्या माणसाला त्या कर्मचाऱ्यांकडून समजल्यावरुन त्यांनी ॲफेडेव्हीट केले. ज्यावेळी ही तक्रार माझ्याकडे आली तेव्हा मी आय.जी. मार्फत इन्क्वॉयरी सुरु करण्याच्या सूचना दिल्या. या घटनेचा संपूर्ण अहवाल माझ्यापर्यंत यायचा बाकी होता, त्यामुळे शासनाला कारवाई करता आली नव्हती.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरील घटना जुलै महिन्यातील आहे. तुमचे सरकार किती कार्यक्षम आहे ? माननीय उपसभापती या पिठासीन अधिकाऱ्याविषयी बोलले जाते व शासनाकडून काही कारवाई होत नाही. संबंधित अधिकाऱ्याला निलंबित का केले नाही ?.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, काल हा प्रश्न विधानसभेत चर्चेला होता व मी कालच विधानसभेत उत्तर दिले की, एक दिवसाच्या आत डी.जी. यांनी चौकशी करावी. संबंधित कर्मचाऱ्याने तेथील चौकशीच्या कामात कोणताही व्यत्यय आणू नये म्हणून टयेन्युअर संपलेला नसताना त्यांची सोलापूरला बदली करण्यात आलेली आहे. त्यामुळे चौकशीच्या कामात कोणताही व्यत्यय करण्याची शक्यता नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.आर.आर.पाटील : सर्व सदस्यांनी माझे म्हणणे शांतपणाने ऐकावे. कारण तुमचे आम्ही सर्व ऐकतो. लोकांचा आपण सन्मान केला पाहिजे. काल विधानसभेत मी आश्वासन दिल्यानंतर डी.जी. यांनी याबाबतचे सर्व रेकॉर्ड तपासल्यानंतर त्यांनी "त्या अधिकाऱ्यास सस्पेंड करण्याचे आदेश काढीत आहे", असे आज सकाळी मला कळविले आहे. काल मी विधानसभेत चौकशी करु असे आश्वासन दिले होते. आज सदस्यांची जी अपेक्षा आहे ती सकाळीच पूर्ण करण्यात आलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सभागृहात विषय मांडला त्यावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.मधुकर सरपोतदार, शिवसेनेचे गटनेते व अन्य माननीय सदस्यांनी आपल्या तीव्र भावना मांडल्या, त्यांच्या भावनेशी मी सहमत आहे.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 15:50

**सभापती** .......

या सार्वभौम सभागृहाचे पीठासीन अधिकारी म्हणून काम करीत असताना त्यांना मोकळेपणाने काम करता यावे यादृष्टीने याठिकाणी सखोल व सविस्तर चर्चा झालेली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भातील त्यांच्या तीव्र भावना येथे मांडल्या आहेत. तशाच प्रकारच्या भावना माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांनी स्वत: देखील मांडल्या आहेत. या विषयासंदर्भात यापूर्वी देखील त्यांनी माझ्याबरोबर चर्चा केलेली आहे. यापूर्वी सन्माननीय गृह मंत्री व या सदनाचे नेते सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांच्या निदर्शनास ही बाब आणण्यात आली आहे. त्यांनी देखील यासंदर्भात योग्य चौकशी व्हावी व कडक कारवाई करण्यात यावी यादृष्टीने सूचना दिलेल्या आहेत. संबंधित पोलिस इन्सपेक्टरला निलंबित करण्याचे आदेश डायरेक्टर ऑफ जनरल यांना आज सकाळी दिलेले आहेत असे आताच माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले आहे. या सार्वभौम सभागृहाचे पीठासीन अधिकारी हे एक प्रमुख पद आहे. त्यांच्या मार्फत आपण सभागृहाचे कामकाज करीत असतो. त्यांना अशा प्रकारे यातना होणे ही गोष्ट दुर्दैवी आणि दु:खी करणारी आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय पीठासीन अधिकारी, विधानपरिषदेचे व विधानसभेचे सन्माननीय आमदार तसेच लोकप्रतिनिधी ज्यावेळी त्यांचे कर्तव्य बजावण्यासाठी किंवा सार्वजनिक काम करीत असतात त्यावेळी त्यांचा कोणत्याही प्रकारे अवमान होता कामा नये. या पुढील काळामध्ये असे होऊ नये, यासाठी शासकीय यंत्रणेला पुन्हा एकदा आपल्या मार्फत सूचना देणे आवश्यक आहे. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा राखणे हे शासनाचे कर्तव्य आहे. माझी अशी खात्री आहे की, राज्याचे माननीय गृह मंत्री, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांची प्रतिष्ठा राखण्याच्या दृष्टीने निश्चित प्रयत्न करतील. आपण सर्व सन्माननीय सदस्यांनी, माननीय उपसभापती श्री. वसंत डावखरे यांच्या बाबतीत घडलेल्या घटनेच्या संदर्भात ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्याबद्दल मी आपणा सर्वांना धन्यवाद देतो. माझी एवढीच विनंती आहे की, सदनाचे सन्माननीय पीठासीन अधिकारी किंवा सन्माननीय सदस्य सार्वजनिक ठिकाणी काम करीत असताना त्यांची प्रतिष्ठा राखणे आवश्यक आहे. या प्रसंगी कठोर निर्णय घ्यावा लागला तरी चालेल. या ठिकाणी मी सदनाला सांगू इच्छितो की, पोलीस इन्सपेक्टरच्या निलंबनाबाबतची भूमिका आताच माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी विषद केलेली आहे. या सदनाचा माननीय

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

पीठासीन अधिकारी व सभापती या नात्याने, गैरवर्तन करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याबाबत मी स्वत: कठोर निर्णय घेणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी हा विषय येथे मांडला. मला खात्री आहे की, माननीय गृहमंत्री यांसंबंधात संबंधितांकडून
माहिती घेतील.

सभागृहाचे कामकाज 25 मिनिटांकरिता तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 3.54 पासून 4.20 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

...........

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 16:20

**सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.उल्हास पवार**

तालिका सभापती : आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

**पृ.शी.** : राज्यात मोटार खरेदीच्या नावाखाली बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या फायनान्स कंपन्या व त्यांनी नागरिकांची केलेली कोट्यवधी रूपयांची फसवणूक.

**मु.शी.** : राज्यात मोटार खरेदीच्या नावाखाली बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या फायनान्स कंपन्या व त्यांनी नागरिकांची केलेली कोट्यवधी रूपयांची फसवणूक याबाबत सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, वसंतराव चव्हाण, सदाशिवराव पोळ, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जधव, वसंत पवार, राजेंद्र जैन, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.रणजितसिह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

--

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो.

" राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे परिसरात मोटारी खरेदीच्या नावाखाली बेकायदेशीररित्या सुरू असलेल्या फायनान्स कंपन्या, मुंबईतील कार रनवे ऑफ इंडिया, श्री ओम साईनाथ, आय लिंक, कलॉथ फ्लॅश, सिटी लिमोझीन तसेच ठाणे येथील जेएम फ्राईट, युनिक फायनान्स, जय भवानी इन्व्हेस्टमेंट, इन्फिनिटी, रजपूत ट्रेडलिंक, सिग्मा, ऑटोलिंक, सिग्मा फायनान्स, एम्स फायनान्स इत्यादी सारख्या कंपन्यांनी परिसरातील हजारो नागरिकांची कोट्यवधी रूपयांची केलेली फसवणूक, शासनाने वेळीच हस्तक्षेप करून अशा प्रकारच्या वित्त कंपन्या सुरू होऊ नयेत यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, या संदर्भात होत असलेली दिरंगाई तसेच टाळाटाळ, परिणामी राज्यातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाय योजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्य मंत्री) : महोदय, लक्षवेधी सुचनेसंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : कृपया सोबतचे निवेदन येथे छापावे. )

...... आरआर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील (क्र.1) मा.उपमुख्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेद्वारे महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील अर्थकारणाला प्रचंड ताकद देणाऱ्या काही व्यक्तींची ओळख मी येथे करून देणार आहे. आपण 'जीडीपी, महाराष्ट्राचा विकास, महारष्ट्र कर्जबाजारी झाला' या सगळ्या गोष्टी दररोज ऐकतो अणि पाहतो. परंतु अशा निवडक लोकांना हाताशी धरले तर ही परिस्थिती बदलण्यास फार काळ लागणार नाही. कारण इतक्या सुंदर रीतीने ते पैशाचे प्रोजेक्शन देतात की हा देश गरीब का राहिला हेच कळत नाही. सभापती महोदय, मी प्रश्न विचारण्यापूर्वी आपली दोन मिनिटे या संबंधात माहिती देण्यासाठी घेऊ इच्छितो. सभापती महोदय, मी आपल्याकडे या संबंधात या लोकांनी ज्या जाहिराती केलेल्या आहेत त्याच्या प्रती आपल्याकडे माहितीसाठी पाठवू इच्छितो. यामध्ये आय लिंक ऑफ इंडिया या कंपनीने दिलेल्या जाहिरातीत म्हटले आहे की, तुम्ही 26 महिने आमच्याकडे 50 हजार रूपये दिले तर तुम्हाला 26 महिन्यांनंतर 1 लाख 4 हजार रूपये परत देणार आणि 26 महिन्यासाठी 1 लाख रूपये दिले तर 36 महिन्यांनंतर 2 लाख 88 हजार रूपये आम्ही देणार. सभापती महोदय, ही जाहिरात मी आपल्याकडे पाठवितो. खरे म्हणजे हे प्रकरण वाटते तितके सोपे नाही तसेच मुंबई ठाणे पुरते मर्यादितही नाही. सभापती महोदय, 10 वर्षापूर्वी ठाण्यामध्ये कल्पवृक्ष नावाची कंपनी बुडाली आणि सामान्य माणसांचे जमा केलेले 350, 400 कोटी रूपये या कल्पवृक्षाखाली पूर्णपणे गेले आणि अनेक गरीबांचे संसार त्या कल्पवृक्षाखाली निपचित पडले. अशा प्रकारे या कंपन्या जाहिरातबाजी करतात आणि त्याला भुलून पैसे गुंतविणाऱ्यांना सुरूवातीस काही महिने वेळच्या वेळी परतीचे चेक्स दिले जातात आणि हळूच एके दिवशी ती कंपनी आपला गाशा गुंडाळून तेथून पळ काढले. तोपर्यंत त्या कंपनीने 200-250 कोटी रूपये जमा केलेले असतात. त्यात अनेक गरीब लोक धक्का खातात, मरतात. माझा मुलगा इंजिनिअरींगला आहे आणि माझ्या पगारात त्याचे शिक्षण पूर्ण करणे परवडत नाही म्हणून मग बायको म्हणाली की, या कंपनीमध्ये पैसे गुंतविल्यास आपल्याला चांगले पैसे मिळतील, अमुक अमुक माणसाला यातून चांगले पैसे मिळत आहेत. म्हणून मी या कंपनीत 50 हजार रूपये गुंतविले आणि त्यानंतर 6-7 महिने मला वेळेवर व्याजाचे पैसे येत रालि पण आता ते येत नाहीत, यापुढे माझे मूळ मुदलाचे 50 हजार रूपये तरी मला मिळतील का ? अशा तक्रारी घेऊन माझ्याकडे अनेक जण येतात. यामध्ये संबंधित कंपन्यांवर, कंपनी काढणाऱ्यांवर कारवाई काय करायची तेच आता आपण ठरवायचे आहे. सभापती महोदय,

..... आरआर 3 ..

श्री. आव्हाड ....

अशा बाबतीत रिझर्व बँकेचे निकष आहेत, म्हणजे किती दराने व्याज द्यावे वगैरे. परंतु या कंपन्या ज्या जाहिराती करतात त्यावर अशा कोणाचीही नजर नसते. त्यामुळे त्यात किती पैसे गुंतविले हे पहावयाचे तर एका दिवसामध्ये आयसीआयसीआय बँकेमध्ये त्यातील एकाच कंपनीच्या खात्यातील ट्रान्झॅक्शन्स आणि बॅलन्स आपण पहावे. त्यासंबंधातील काही कागदपत्रे देख्रील मी आपल्या माहितीसाठी आपल्याकडे पाठवितो. हे सारे पाहिल्यानंतर सर्वसामान्य माणूस त्यात कशा प्रकारे कळत नकळत गुंतला जातो हे आपल्या लक्षात येते. आपल्याला आश्चर्य वाटेल पण त्यांच्या गुंतवणूकदारांमध्ये कमीत कमी आपले 2 हजार पोलीस हवालदार आणि पीएसआय आहेत आणि मंत्रालयातील अनेक क्लर्क्सदेखील आहेत. एवढ्या प्रचंड प्रमाणावर हा कारभार आज राजरोस चालला आहे. मी माझ्या लक्षवेधी सूचनेमध्ये 10 कंपन्यांचीच नावे दिलेली आहेत आणि आपण आपल्या उत्तरादाखल केलेल्या निवेदनात पाच कंपन्यांवर आणि मुंबईच्या सिटी लिमोझिनवर कारवाई केल्याचे म्हटलेले आहे. ...

( यानंतर श्री. बरवड ... एसएस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

या मुंबईमध्ये सिटी लिमोझीन कंपनीचे भयानक काम आहे. अशा 10 कंपन्या अस्तित्वात आहेत. लोक तक्रार करण्यास घाबरतात. आपण तक्रार केली तर आपले पैसे बुडतील म्हणून ते तक्रार करावयास जात नाही. 2500 लोकांकडून प्रत्येकी 1 लाख रुपये घेतलेले आहेत. सिटी लिमोझीन कंपनीचे किमान 40 हजार सदस्य आहेत. याची व्याप्ती फार मोठी आहे. याची व्याप्ती म्हणावी तेवढी छोटी नाही. गरिबांचे 3 हजार कोटी रुपये मुंबई आणि ठाण्यामध्ये अडकलेले आहेत. त्यांच्या शाखा औरंगाबाद, नाशिक, पुणे सगळीकडे आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, या कंपन्या उघडताक्षणीच बंद व्हावयास पाहिजेत, किंबहुना त्या उघडूच देऊ नयेत अशा प्रकारची कारवाई शासनाकडून होईल काय ? त्यांच्या शाखा पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर अशा शहरांमध्ये आहेत. त्यामुळे केसेसच्या बाबतीत वेगवेगळे अधिकारी वेगवेगळ्या पध्दतीने कारवाई करतात. ज्यांची क्षमता नसते त्यांच्याकडून कारवाई होत नाही. ठाण्याच्या युनिटमध्ये पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. पुणे पोलिसांनी कारवाई केली. पुण्याच्या पोलिसांनी ठाण्यात येऊन आरोपींना उचलले तेव्हा ठाणेकरांना जाग आली आणि मग मुख्य आरोपी पकडला गेला. यामध्ये संभ्रमावस्था असते. म्हणून सर्व केसेस एकत्रित करुन शासन कारवाई करणार काय ? रिझर्व्ह बँकेचे स्पष्ट नॉर्म्स असताना या कंपन्या कशा उघडल्या जातात ? त्या कंपन्या कशा चालतात ? त्यामध्ये गुंतवणूक कशी होते ? ते ॲग्रिमेंट कसे करतात ? मी ॲग्रिमेंटची कॉपी सुध्दा आणलेली आहे. काहीही नसताना स्टॅम्प पेपरवर ॲग्रिमेंट करतात. हे सगळे पुरावे मी या ठिकाणी देत आहे. शासन महाराष्ट्रातील सर्व प्रकरणे एकत्रित करणार काय आणि चांगला अधिकारी नेमून याबाबतीत जरब बसविणार काय ? दरवर्षी कंपन्या येतात आणि हजारो माणसे धुतली जातात. ही जी गरीब माणसे उद्ध्वस्त होतात त्यांना उद्ध्वस्त होण्यापासून शासन थांबविणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात तथ्य आहे. अशा पध्दतीच्या कंपन्या काढल्या जातात. लोकांना आमिषे दाखवली जातात. मोठी रक्कम परत मिळेल अशा अपेक्षेने भोळेभाबडे लोक रकमा गुंतवितात. ही योजना अशी होती की, लोकांनी काही ठराविक पैसे

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ...

गुंतविल्यावर उदा. जर 1 लाख 55 हजार रुपये गुंतवले तर त्याला 36 महिन्यानंतर 5 लाख 30 हजार रुपये परत मिळणार. म्हणजे गुंतवणूकदाराकडून 1 लाख 55 हजार रुपयांची एक कार खरेदी केली जाणार. ती रक्कम बँकेकडून कर्ज म्हणून घेणार. ती कार भाड्याने लावणार आणि आलेल्या भाड्यातून प्रत्येक महिन्याला 1 लाख 55 हजार रुपयाची गुंतवणूक करणाऱ्याला मिळणार आणि 36 महिन्यानंतर 1 लाख 55 हजार रुपये भरणाऱ्या माणसाला ती कार दिली जाणार. हे सगळे बोगस आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर लोक फसविले जातात. या डिपॉझीटर्सच्या संदर्भात एमपीआयडी म्हणजे ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारा कायदा 1999 साली पारित केला होता. त्या कायद्यान्वये राज्यातील पोलीस दलाला काही अधिकार मिळाले होते. परंतु हा कायदा सुप्रीम कोर्टामध्ये चॅलेंज झाला. त्या कायद्याला आता स्थगिती मिळालेली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेने आणि विधान परिषदेने ठेवीदारांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारा जो कायदा केलेला आहे त्याबाबत आम्ही पाठपुरावा करुन स्थगिती उठली तर पोलिसांना अधिकार प्राप्त होतील. आज रिझर्व्ह बँकेची कारवाई याबाबतीत पुरेसी नाही. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची पूर्ण जबाबदारी रिझर्व्ह बँकेची आहे. एका बाजूने अशा कंपन्यांना कंपनी ॲक्टखाली कंपनी रजिस्ट्रार यांच्याकडून नोंदणी मिळते त्यामुळे या कंपन्या धंदा करीत आहेत. जोपर्यंत कोणाची फसवणूक होत नाही तोपर्यंत पोलिसांना हस्तक्षेप करणे अडचणीचे होते. तरी सुध्दा वर्तमानपत्रातील जाहिरात बघून सू-मोटो पोलिसांनी कोणाचीही तक्रार नसताना कंपन्यांवर धाडी टाकलेल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, याची व्याप्ती फार मोठी आहे. इ.ओ.डब्ल्यू. मध्ये असणारे अधिकारी आणि कर्मचारी कमी आहेत. जे आहेत त्यांना फायनान्शियल ट्रान्झेक्शनची पूर्ण माहिती असणे शक्य नाही. याची व्याप्ती पाहिली तर जी कंपनी मुंबईमध्ये आहे त्यांच्या शाखा ठाणे, पुणे, नाशिक अशा मोठ्या शहरामध्ये आहेत आणि कोट्यवधी रुपयांच्या बाबतीत गुन्हा करणारे व्हाईट कॉलर लोक खुलेआम हा गुन्हा करीत आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...

हे गुन्हे आटोक्यात आणण्याच्या दृष्टीने सुप्रीम कोर्टामध्ये असलेल्या केसचा चांगला फॉलोअप करण्यात येईल. या बाबतीत तामिळनाडूच्या धर्तीवर कायदा करता येईल का याचाही अभ्यास सुरु आहे. आज राज्यामध्ये उघडकीस आलेल्या केसेसचे एकत्रितपणे मॉनिटरिंग करण्यात येईल आणि या सगळया केसेसमधील आरोपी पकडून त्यांना शिक्षा होईल आणि अशा कंपन्या लोकांना फसविण्याचे धाडस करणार नाहीत, त्यांची तशी हिंमत होणार नाही अशा पध्दतीची भूमिका घेतली जाईल. या बाबतीत मी या सदनाच्या माध्यमातून लोकांना आवाहन करीन की, 100 रुपयाला महिना 20 रुपये व्याज कोणत्या धंद्यामध्ये मिळू शकते ? भोळीभाबडी अपेक्षा ठेवून लोकांनीसुध्दा अशा कंपन्यामध्ये ठेवी ठेवताना विचार करायला पाहिजे. पैसे गुंतविण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. केवळ जाहिराती पाहून अशा पध्दतीने मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे हे चुकीचे आहे. या बाबतीत जनजागृती करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी फार चांगला विषय सदनामध्ये मांडलेला आहे. सिटी लिमोझीनच्या संदर्भात काही लोकांनी इओडब्ल्यूकडे तक्रारी केल्या होत्या. आता राजीव गांधीच्या नावाने या सिटी लिमोझीन कंपनीने पुरस्कार दिला. मला त्या पक्षाला दोष द्यावयाचा नाही. परंतु अशा प्रकारे या कंपन्या राजकीय प्रभावाखाली लोकांचा विश्वास संपादन करुन नंतर त्यांची फसवणूक करतात. पूर्वी परसरामपुरी ही झाडे लावण्याच्या संदर्भातील कंपनी आली होती. ती कंपनी गेली. त्यानंतर शेरेकर आला, तो गेला. आता कार आली. सर्वसामान्य माणूस आपली रोजीरोटी कमवित असताना जास्त फायदा कुठे मिळेल हे पहात असतो आणि अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक करुन तो फसतो. सिटी लिमोझीन बाबत इओडब्ल्यूकडे तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. इओडब्ल्यूकडे खूप केसेस आहेत. तसेच कर्मचारी वर्ग अपुरा आहे. त्यामुळे हे प्रकरण क्रमाने येईपर्यंत फार वेळ लागेल. आर्थिक गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता इओडब्ल्यू ताकदवान केली तरच अशा प्रकारचे गुन्हे थांबतील. तेव्हा तसे शासन करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : ही गोष्ट खरी आहे की, सिटी लिमोझीन बाबत श्री. पानसरे यांनी तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी त्याबाबतीत चौकशी केली होती. साधारणत: अडीच हजार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील...)

लोकांनी 1 लाख रुपयाप्रमाणे गुंतवणूक केलेली असण्याची शक्यता आहे. कोर्टाची स्थगिती असल्यामुळे पुढची कारवाई करता आली नाही. ती स्थगिती उठविण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. जेएम फ्राईट ही कंपनी 2006 साली स्थापन झाली. आतापर्यन्त 10 कोटी 29 लाख रु.ची फसवणुकीची नोंद झालेली असून 6 कोटी 14 लाख रुपये कंपनीचालकांकडून जप्त करण्यात आलेले आहेत. भवानी कंपनीमध्ये 10 हजार लोकांनी गुंतवणूक केलेली असण्याची शक्यत आहे. या कंपनीच्या संचालकांना अटक करण्यात आलेली आहे. राजेश चावला, उमेश नायर यांच्याकडून 4 कोटी 15 लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश मिळालेले आहे. सिग्मा फायनान्स कंपनीमधून मोठ्या प्रमाणात पैसे जप्त करण्यात आलेले आहेत. इन्फिनिटी मोटर्सकडून 4 कोटी 53 लाख रुपये जप्त करण्यामध्ये पोलिसांना यश मिळालेले आहे. युनिक फायनान्समधून 4 कोटी 66 लाख रुपये पोलिसांनी जप्त केलेले आहेत. केवळ वर्तमानपत्रातील जाहिराती वाचून पोलिसांनी धाडी टाकलेल्या आहेत. गुंतवणूकदारांच्या हितासाठी पोलिसांनी चांगले काम केले आहे.

...नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

त्यामुळे इ.ओ.डब्ल्यू. अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. गेल्या वर्षभरात ज्या दरोडयांचा खूप गाजावाजा झाला होता त्या दरोडयामध्ये गेलेली मालमत्ता एकूण 21 कोटी रुपयांची होती. मालमत्ता जाऊ नये म्हणून राज्यशासनाने एक मोठी यंत्रणा उभी केली होती. 21 कोटी रुपयाची मालमत्ता दरोडयात लुटली गेली परंतु समाजात प्रतिष्ठेचा टेंभा मिरविणारे जे व्हाईट कॉलर गुन्हेगार आहेत ते करोडो रुपयांची लूट करीत आहेत. त्यामुळे पुढील काळात इ.ओ.डब्ल्यू. अत्यंत शक्तीशाली केली जाईल, त्या ठिकाणी मनुष्यबळ वाढवून दिले जाईल, तांत्रिक हँड उपलब्ध करुन दिले जातील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचनेमध्ये बोगस कंपन्यांची 10 नावे दिली होती जे अशा प्रकारचे बोगस धंदे करीत आहेत, परंतु या लक्षवेधी सूचनेमध्ये आपण सहा बोगस कंपन्याची नावे दिलेली आहेत. युनिक कंपनीची शाखा नागपूर, औरंगाबाद, पुणे, मुंबई खरे म्हटले तर जवळ जवळ सगळीकडेच आहेत. यातील एक केस ठाण्याला रजिस्टर्ड झाली आहे त्यामुळे औरंगाबादचे लोक ठाण्याला येतात. पुण्यामध्ये एक केस रजिस्टर्ड झालेली आहे. डेसेंट्रलाईज सिस्टीम असल्यामुळे न्याय मिळण्याच्या प्रक्रियेला उशिर लागतो, तसेच या कोर्टाने जामीन दिला म्हणून त्याला ॲरेस्ट करता येत नाही,त्या कोर्टाने जामीन दिला आहे म्हणून त्याला ॲरेस्ट करता येत नाही असा खेळ सुरु होतो. त्यामुळे यासंदर्भात माझी आपणास विनंती आहे की, या गुन्हयांची व्याप्ती फार मोठी आहे. हा प्रकार वेळीच थांबविला नाही तर हा प्रकार वाढतच जाईल. त्यामुळे लोकांना न्याय मिळावा यासाठी जर पोलिसांनी कारवाई केली तर या प्रकाराला आळा बसू शकेल किंवा या कंपन्या बंद पडतील. त्यामुळे पूर्ण महाराष्ट्रातील अशा प्रकारच्या गुन्हयांच्या संदर्भात एकाच ठिकाणी कारवाई झाली तर तक्रार करणा-याला सुध्दा सोपे जाईल. त्यामुळे अशा प्रकारचे गुन्हे नोंदविण्यासाठी एक वरिष्ठ दर्जाचा अधिका-याची नेमणूक करुन त्याच्या मदतीला इतर स्टाफ उपलब्ध करुन या प्रश्नाला न्याय दिला जाईल काय?

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, असे केल्याने मनुष्यबळ मर्यादित होईल. या लोकांनीच त्या ठिकाणी धाड टाकावी अशी मानसिकता तयार होईल. नाशिकमध्ये आपण युनिट

....2

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

तयार केले व दुसरीकडे गुन्हा झाला असेल तर त्यांनीच येऊन धाड टाकावी अशी मानसिकता तयार होईल. इतक्या मोठया प्रामाणातील गुन्हयांची व्याप्ती बघितल्यानंतर आपण केलेल्या सूचना मान्य केल्याने अडचणी निर्माण होऊ शकतील. परंतु यामध्ये सुसुत्रता असणे आवश्यक आहे. यासंदर्भात तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन आणि मदत पोलिस दलाला मिळणे आवश्यक आहे त्यामुळे यासंदर्भात डीआयजी दर्जाचा एक वरिष्ठ अधिकारी, इ.ओ.डब्ल्यू. मुंबई हे संपूर्ण महाराष्ट्राच्या केसेस मॉनिटर करतील अशा पध्दतीच्या सूचना दिल्या जातील व इनव्हेस्टीगेशन्स ऑफिसर्स हे त्या त्या पोलीस स्टेशनचे अधिकारी असतील

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, यामध्ये ठराविक रक्कमेच्या वर अपहार झाला तर तो इकॉनॉमिक ब्रॅंचकडे वर्ग केला जात असतो. परंतु ब-याचशा केसेस अशा आहे की, छोटया छोटया लेव्हललवर होतात त्यामुळे त्या केसेस इकॉनॉमिकल ऑफेन्स ब्रॅंचकडे जात नाहीत. लिमिटच्य थोडेवर असेल तर इकॉनॉमिकल ऑफेन्स ब्रॅंचकडे वर्ग केल्या पाहिजेत. ब-याचशा लोकांना इकॉनॉमिक ऑफेन्स ब्रॅच बद्दल माहिती नाही. दुसरी सूचना अशी आहे की, आकर्षक जाहिराती, व्याजाचे दर यासंदर्भात जाहिराती देऊन लोकांना सांगितले जाते, यासाठी वेगवेगळया ॲथोरिटीकडून जे लायसन्सेस लागतात तसेच इकॉनॉमिक ऑफेन्स ब्रॅंचचे एनओसी घेणे हे लोकांना कम्पलसरी केले तर अशा प्रकारच्या आकर्षक जाहिरातींना आळा बसू शकेल.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कंपनी ॲक्टखाली नोंदणी करीत असतांना पोलीस विभागाची एनओसी घेण्यात यावी अशा पध्दतीची विनंती केंद्रशासनाला करण्यात येईल व केंद्र शासनाने यास मान्यता दिली तर अशा प्रकारे एनओसी देण्याची पध्दतही सुरु करण्यात येईल.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई पोलिसांनी किडनी विकण्याचे उघडकीस आणलेले रॅकेट.
**मु. शी.** : मुंबई पोलिसांनी किडनी विकण्याचे उघडकीस आणलेले रॅकेट यासंबंधी सर्वश्री सागर मेघे, नितीन गडकरी , पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सागर मेघे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यात्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबईतील गोरगरीब व गरजुंना फसवणूक करुन किडनी विकणाऱ्यांचे रॅकेट मुंबई पोलिसांनी 20 ऑक्टोबर, 2007 रोजी उघडकीस आणून 18 जणांना अटक करणे, अटक झ ाालेल्यात अनेक नामवंत डॉक्टर व वकील असणे, किडनी विकण्याच्या धंद्यात करोडो रुपये कमविणे, गरजुंची मात्र फसवणूक होणे, जवळपास 500 किडनी विकण्याचे उघडकीस येणे, मोठया प्रमाणावर हा व्यवहार सुरु असणे, या अवैध धंद्याच्या सखोल चौकशीची गरज तसेच सर्व हॉस्पिटलवर कडक देखरेख ठेवण्याची आवश्यकता, याकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. आर.आर.पाटील ( गृह मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, अत्यंत गंभीर असा विषय या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. 26 वर्षाचा तरुण श्री.जितू बोरकर  याने मुंबई पोलिसामध्ये तक्रार केली आहे की, त्याला किडनी विकली तर 4 लक्ष रुपये मिळतील परंतु त्याची किडनी काढल्यानंतर त्याला केवळ 25 हजार रुपये देण्यात आले त्यामुळे हा प्रकार उघडकीस आलेला आहे. चेन्नई येथील डॉक्टरांनी तेथील तसेच इतर राज्यातील 750 तरुणांना अमिष दाखवून किडनी ट्रान्सप्लँट केलेले आहे.  माननीय मंत्रीमहोदयांनी पत्रात म्हटले आहे की, "सदर गुन्हयामधील मुख्य सुत्रधार डॉक्टर आरोपीसह 5 जणांना अटक करण्यात आली असून सर्व आरोपीं न्यायालयीन कोठडीत आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे.............

हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. राज्यातील तरुणांना आमिष दाखवून त्यांचे अवयव काढून घेतले जात आहेत. या केसमध्ये दोन राज्यांतील पोलीस गुंतलेले आहेत तेव्हा या प्रकरणाचा तपास सी.बी.आय.कडे देण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.जितू विठ्ठल बोरकर या तरुणाने केलेल्या तक्रारीवरुन आपल्या पोलीस विभागाने अतिशय चांगल्याप्रकारे तपास केलेला आहे. श्री.जितू बोरकर यास 4 लाख रुपये देतो असे सांगून त्याची किडनी काढण्यात आली आणि प्रत्यक्षात त्यास फक्त 25 हजार रुपये देण्यात आले. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार डॉ.पी.रविचंद्रन यास अटक करण्यात आली असून त्याच्यासोबत असलेल्या मुंबईतील दलालांनासुध्दा अटक करण्यात आलेली आहे. पोलिसांना जी माहिती मिळाली त्यामध्ये आतापर्यंत 750 किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील किती लोक होते ? ट्रान्सप्लान्ट करणारे लोक कोणत्या भागातील आहेत ? हा तपासाचा भाग आहे. या घटनेचा तपास पोलीस बारकाईने करीत आहेत. संचालक वैद्यकीय शिक्षण, चेन्नई यांनी बी.आर.हॉस्पीटल, चेन्नई यांचा किडनी ट्रान्सप्लॅन्ट शस्त्रक्रिया करण्याबाबतचा परवाना निलंबित केला आहे.

श्री.सागर मेघे : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, या प्रकरणात दोन राज्यातील पोलीस गुंतलेले असल्यामुळे हा तपास सी.बी.आय.कडे देण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाचा तपास सी.बी.आय.ने करावा यासाठी त्यांना विनंती करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी एका महत्वाच्या प्रश्नाला वाचा फोडलेली आहे. मांढरदेवी यात्रेच्या निमित्ताने जी दुर्घटना झाली त्यामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचे पोस्टमोर्टेम न करण्याचा निर्णय घेतला ही अतिशय चांगली गोष्ट झाली असे मला सांगण्यात आले. कारण त्याठिकाणी मृत व्यक्तीच्या किडनी काढून घेण्यासाठी अनेक लोक जमा झाले होते. ही एक संघटीत गुन्हेगारांची टोळी आहे. तेव्हा याविषयी शासन विशेष लक्ष देणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, अपघातामध्ये मृत झालेल्या व्यक्तिची किडनी काढली जाणार नाही यावर प्रामुख्याने लक्ष दिले जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रकरणात पोलिसांनी अतिशय चांगल्याप्रकारे काम केलेले आहे. यापूर्वी मुंबईत डॉ.सुरेश त्रिवेदी यांच्यासह सात जणांना अटक करण्यात आली होती. त्यावेळी अशाप्रकारचे रॅकेट उघडकीस आले होते. जी माणसे आपला अवयव विकतात यामागील कारण म्हणजे त्याला उदरनिर्वाहाचे साधन मिळत नाही, त्यामुळे तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी स्वत:चे अवयव विकतो, स्वत:च्या ऐशोरामासाठी विकत नाही. चेन्नईत आतापर्यंत एकूण 750 किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्याची नोंद तिथे असेलच. त्यामुळे वेगळा तपास करण्याची गरज नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, एकूण 750 पैकी महाराष्ट्रातील किती लोकांचा त्यात समावेश आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये 7 जणांची फसवणूक झाल्याचा पुरावा हाती आलेला आहे. बाकीची सर्व चौकशी सुरू आहे. पोलिसांच्या हाती कोणताही कागदोपत्री पुरावा लागू नये म्हणून तो नष्ट करण्यात आलेला आहे. तरी देखील पोलीस मोठ्या शिताफीने तपास करीत आहे.

-----------

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन लवासा व सहारा कंपनीने अल्पदराने खरेदी करणे

**मु. शी.** : मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांची हजारो एकर जमीन लवासा व सहारा कंपनीने अल्पदराने खरेदी करणे यासंबंधी डॉ.नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत, ॲड.अनिल परब, सर्वश्री सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे ( महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील वरसगाव धरणाच्या निसर्गरम्य परिसरात सुमारे 9 हजार एकर क्षेत्रावर लवासा व ॲम्बी व्हॅली प्रकल्पांसाठी सहारा इंडीया कार्पोरेशनने तेथील शेकडो शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनी अत्यंत अल्पदराने खरेदी करणे, सदर जागेवर लवासा सिटी उभारुन तेथे लक्झरी हॉटेल, आलिशान निवासस्थाने, बंगले, स्टुडीओ, रोप वे, हेलिपॅड असा आलिशान व सर्वसुखसोई युक्त असा प्रकल्प उभारण्यात येणे, सदर आलिशान प्रकल्पासाठी 18 गावांच्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात येणे, सदर गावातील गावकऱ्यांना नागरी सुविधा देण्याबाबत कंपनीने दिलेले आश्वासन पूर्ण न करणे, आता सहारा इंडिया कार्पोरेशनने गावाकडे व गावातून येणाऱ्या नागरिकांना व शेतकऱ्यांना रस्ता बंदी केली असून तेथील सार्वजनिक रस्त्यावरुनही खाजगी सुरक्षा रक्षक गावकरी व एस.टी गाडयांनाही अटकाव करीत असणे, सहारा इंडियाने वहिवाटीच्या रस्त्यावर लोखंडी कठडे उभारुन बेकायदा रस्ते बंदी केल्याच्या तक्रारीवरून प्रांत अधिकारी व तहसिलदार यांनी ग्रामस्थांसाठी रस्ते खुले करण्याबाबत तेथील पोलिसांना दिलेले लेखी आदेश, परंतु त्याकडेही सहाराने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी 18 गावच्या नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या प्रकरणी शासनाने तातडीने केलेली व करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.नारायण राणे ( महसूल मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) (..2....



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुळशी तालुक्यातील शेती सुपीक पिकते अशातला भाग नाही. या पार्श्वभूमीवर पर्यटनाला चालना देण्याच्या दृष्टीने त्याठिकाणी काही प्रकल्प उभे करण्यात आले, अशाप्रकारची भूमिका आपली आहे. परंतु या लक्षवेधी सूचनेतील विषयाचा रोख आपण समजून घ्यावा. यामध्ये दोन तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. दासवे ग्रामपंचायतीच्या अखत्यारित असलेली बरीचशी जमीन कंपनीने विकत घेतलेली असून त्याठिकाणी योग्य पध्दतीने बांधकाम झालेले आहे, परंतु या त्याठिकाणी इमारती बांधल्यानंतर जो कर सदर ग्रामपंचायतीस द्यावयास पाहिजे होता, तो कर ती कंपनी त्या ग्रामपंचायतीस देत नाही. त्या जमिनीची मालकी जरी कंपनीकडे असली तरी मुळात त्या जमिनीची हद्द ही ग्रामपंचायतीची आहे. त्यामुळे सदर ग्रामपंचायतीकडे कंपनीने 15 लाख रुपयांचा कर भरला नाही, ही रक्कम त्या कंपनीच्या दृष्टीने लहान आहे. अशाप्रकारे यामध्ये दंड पकडून ती रक्कम दीड कोटीपर्यंत जाते. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की, एवढा मोठा प्रकल्प ती कंपनी उभारत असताना दंडाची रक्कम ग्रामपंचायतीला देत नाही. त्यामुळे याबाबतीतील रक्कम भरण्याच्या सूचना आपण सदर कंपनीस दिल्या पाहिजेत. दुसरे म्हणजे, शेतकऱ्यांना राहण्याच्या दृष्टीने काही वसाहती बांधून दिलेल्या आहेत. जमिनी खरेदी करीत असताना शेतकऱ्यांना राहण्यासाठी घर बांधून देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले होते. त्याठिकाणी घरे बांधून दिलेली आहेत. परंतु त्या घराच्या बाजूची जी उरलेली जमीन आहे, त्या जमिनीच्या मालकीची नोंद त्यांच्यानांवे 7/12 वर झाली पाहिजे. तिसरे म्हणजे, शेतकरी ज्या ठिकाणी राहतात, त्याठिकाणी कंपनीने गेट बांधून त्यांना रस्ताबंदी केलेली असून तो रस्ता त्यांना खुला करुन द्यावा, अशी माझी मागणी आहे. दासवे ग्रामपंचायतीने जे निवेदन दिलेले आहे, त्याप्रमाणे आपण कंपनीला सांगून दंडाची रक्कम भरण्यास सांगणार का ? तसेच त्याठिकाणी अनधिकृत जे बांधकाम होत आहे, ते परवानगीशिवाय बांधणे योग्य नाही. तसेच शेतकऱ्यांना बांधून दिलेली घरे नावावर करण्याचे जे कंपनीने आश्वासन दिले होते, त्याची पूर्तता झाली पाहिजे व रस्ताबंदी उठवून तो रस्ता त्यांच्यासाठी खुला झाला पाहिजे.

..3....


SSP पूर्वी श्री.अजित... 16.45
असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यातील लवासा आणि सहारा या प्रकल्पासंबंधीची ही लक्षवेधी सूचना आहे. या दोन्ही प्रकल्पांना राज्य सरकारने परवानगी दिलेली आहे. मुळशी येथील 3,397 हेक्टर जमिनीस लवासा कंपनीला परवानगी दिली असून त्यामध्ये 17 गावे आहेत व सहारा प्रकल्पासाठी 2,677 हेक्टरला परवानगी दिली असून त्यामध्ये 8 गावांचा समावेश आहे. सहाराला सन 1996-98 च्या दरम्यान परवानगी दिलेली असून लवासाला सन 2001-2007 पर्यंत परवानगी दिलेली आहे. पर्यटनाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सरकारने कायदा केला. सन 1995 आणि सन 2001-2007 या परवानग्यानुसार या दोनही प्रकल्पांचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी तीन प्रश्नांचा उल्लेख केला. ज्या गावातील जमीन या प्रकल्पासाठी घेण्यात आली असेल व ज्याठिकाणी बांधकाम झाले असेल त्या क्षेत्रफळाचे उत्पन्न किंवा कर हा त्या ग्रामपंचायतीला मिळाला पाहिजे, यासंबंधी कायद्यामध्ये तरतूद आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे..........

थकबाकी असेल तर त्वरित भरण्यास सांगण्यात येईल व गावाला उत्पन्न मिळेल. प्रश्न असा आहे व लक्षवेधीचा रोख असा होता की, शेतक-यांच्या जमिनी अतिशय अल्प किमतीत घेतल्या आहेत, त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. मी सांगू इच्छितो की, या खाजगी जागा विकत घेतलेल्या आहेत, शासनाने संपादित करुन दिलेल्या नाहीत. शेतकरी आणि कंपनी यांच्यामध्ये करार झाला आहे. सरकारला कोठेही विश्वासात घेतले नव्हते. त्यांना कोणत्या प्रकारच्या सुविधा देणार आहेत, रस्ता, वीज, पुनर्वसन याबाबतीत शासनाला विश्वासात घेतलेले नाही. जरी शेतकरी आणि कंपनी यांच्यामध्ये करार झाला असला तरी सरकार म्हणून जबाबदारी आहे. या कराराप्रमाणे जी आश्वासने दिले आहेत त्यांची पुर्तता कंपनीने केली पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, पुनर्वसन करणार असाल तर घराची मालकी शेतक-याकडे असली पाहिजे. यासंबंधीचा सर्व तपशिल घेण्यात येईल आता तशाप्रकारची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु, गावातील जमीन असेल ज्यावर त्याचे घर आहे ते त्याच्या नावावरच राहिले पाहिजे. यासंदर्भातील आश्वासनाची पूर्तता केली जाईल.

सभापती महोदय, दासवे येथील गेटच्या संदर्भात मी माहिती देऊ इच्छितो की, गावातील जाण्या-येण्याचा रस्ता आहे, वाट आहे, तो रस्ता अद्याप जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झालेला नाही. सन 1978 पासून ही वाट आहे, शेतक-यांच्या येण्या-जाण्याचा मार्ग आहे. सहारा कंपनीने गेट बंद केले होते. त्यासंबंधी तहसिलदार यांनी नोटीस देऊन कारवाई सुरु केली. तहसिलदारांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द कंपनी प्रांतांकडे अपिलामध्ये गेली व त्यानंतर उच्च न्यायालयात गेली. उच्च न्यायालयाने हे प्रकरण परत सरकारकडे पाठविल्यामुळे प्रांतांकडे अपील सुरु आहे. तरीही सांगतो की, तो रस्ता, ती वाट शेतक-यांना कायमस्वरुपी मिळावी हेच सरकारचे धोरण असेल. सध्या येण्याजाण्यास कोणीही अडवत नाही, वाट खुली करुन देण्यात आली आहे, भविष्यातही तशीच राहिल याची काळजी घेऊ.

...2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.........

सभापती महोदय, लावासा गेटचा दुसरा भाग आहे. हा खाजगी रस्ता आहे. कंपनीने गेटच्या बाजुकडील काही किलोमीटरवर खाजगी जमीन घेतली आणि जिल्हा परिषदेचा रस्ता संपतो तेथून प्रोजेक्टपर्यन्त डोंगराळ भाग होता तो डेव्हलप केला व खास रस्ता तयार केला आहे. त्या ठिकाणी काही वाहने येतात. कंपनीचे असे धोरण आहे की, प्रोजेक्टचे फोटो काढले जाऊ नयेत, कोणाला माहिती मिळू नये. बाहेरुन येणा-या गाडया अडविण्यात येतात. पानशेत धरणाच्या पलिकडच्या भागात जे गाव आहे त्याकडे जाण्यासाठी कुठल्याही प्रकारे अडचण आणली जात नाही व यापुढेही आणली जाणार नाही. लक्षवेधी देण्याचा उद्देश होता त्यानुसार सरकार पूर्णपणे कार्यवाही करेल, एवढे सांगतो.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे स्वागत करतो की त्यांनी निदान सकारात्मक भूमिका घेतली. मंत्री महोदयांनी 'वाट' हा शब्द वापरला, परंतु ती वाट नाही, रस्ता आहे. त्या ठिकाणी प्रचंड मोठे गेट आहे व ते बंद असते. त्या ठिकाणी दोन-तीन गेट आहेत. येणा-या-जाणा-या प्रत्येकाला त्या ठिकाणी अडविले जाते. आपण आता सांगितले की, अंमलबजावणी होईल, मी अपेक्षा करतो की त्याप्रमाणे ती होईलही. माननीय यशवंतराव चव्हाणांनी स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या. त्यांना बळकटी आणाण्याचेही प्रयत्न झाले. दासवे ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत हा भाग आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ....... 16:55

श्री.अरविंद सावंत .........

ग्रामपंचायतीला बांधकाम केल्याबद्दलची माहिती दिली जात नाही. ग्रामपंचायतीने त्यांना पत्र दिले की, तुम्ही अशा प्रकारे जे अनधिकृत बांधकाम करीत आहात ते योग्य नाही. परंतु ग्रामपंचायतीला कोणतेही उत्तर दिले जात नाही. इतक्या वर्षामध्ये तेथे जे बांधकाम झाले त्यातून ग्रामपंचायतीला जे उत्पन्न मिळाले असते ते मिळत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्याचे जे काम आहे त्या निमित्ताने ग्रामपंचायतीच्या पत्राला त्यांनी उत्तर दिले पाहिजे. त्यांची जी दादागिरी आहे ती बरोबर नाही, याबाबतीत आपण लक्ष घालावे. दुसरे म्हणजे ज्यांची घरे घेतली, त्यांना घरे बांधून दिली. परंतु त्यांची घरे त्यांच्या नावावर नाहीत. म्हणून ते भयग्रस्त झालेले आहेत की, कोणत्याही क्षणी हे लवासावाले आम्हाला येथून हाकलून देतील, याबाबतील सुध्दा आपण लक्ष घालावे. आपण म्हणतात ते बरोबर आहे की, ते खाजगी आहे. परंतु खाजगी असले तरी या प्रकल्पासाठी प्रचंड मोठे सरकारी रस्ते करुन दिले, हेही आपल्याला विसरता येणार नाही, यासंदर्भात आपण काय करणार आहात ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, लवासा प्रकल्पासाठी जी 3,377 हेक्टर जागा घेण्यात आली ती जागा पूर्णपणे डोंगराळ भागात आहे. पूर्वी तेथे जाण्यासाठी अजिबात रस्ता नव्हता. हा रस्ता लवार्डे गावापर्यंत आहे. हा पुणे ते लवार्डे रस्ता आहे. तेथून पुढे जाण्यासाठी लवासा प्रकल्पाच्या मालकाने खाजगी रस्ता तयार केला आणि तो खाजगी रस्ता प्रकल्पाजवळच संपतो. तेथे त्यांनी गेट घातले. त्या पलिकडे 18 गाव आहेत. त्या गावांमध्ये जाण्यासाठी पानशेत धरणाजवळून जिल्हापरिषदेचा रस्ता आहे. ही शॉर्टकट पायवाट होती. त्यांनी जे गेट घातले होते, ते गेट आता त्यांनी काढलेले आहे. तेथून ज्या गाडया जायच्या त्यांना ते अडवायचे. लोकांना ते अडवत नव्हते. लोकांना जाण्यासाठी दुसरा रस्ता आहे. परंतु तो रस्ता थोडा लांबचा होतो. त्यांनी जी जागा खरेदी केली त्या जागेतील ही पायवाट आहे. कोणत्याही प्रकारची नोंद नाही, तरीही लोकांना पलिकडे जाण्यासाठी कोणी थांबविलेले नाही. ती पायवाट आहे. आपण समजून घ्यावे. मी याबाबतची सर्व माहिती घेतलेली आहे. माझ्याकडे नकाशा आहे. सहारा इंडिया कॉर्पोरेशनने जे गेट घातलेले आहे त्याची सरकार दफतरी रस्ता म्हणून नोंद आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे ........

ती कोणालाही बंद करता येणार नाही. म्हणून अधिका-यांनी गावक-यांच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. प्रांत अधिका-यांनी जी सुनावणी घेतली, त्याचे जज्मेंट आता येईल आणि तोही निर्णय लागेल. मी उत्तर देतांना सांगितले की, तेथील जनतेला रस्ता मिळावा किंवा असलेला रस्ता बंद होणार नाही, याची काळजी सरकार घेईल. मी आपल्याला सांगू इच्छितो की, शासनाने दिनांक 26.11.1996 रोजी गिरीस्थान विकास प्रणालीबाबत नोटिफिकेशन काढले. विकास प्रणालीमध्ये टाऊनशिपला काही अधिकार दिलेले आहेत. आपल्याला ते तपासून पहावे लागतील. पुनर्वसन करतांना ज्यांची जागा घेतली असेल, त्यांच्यामध्ये जो करार झालेला आहे त्या ॲग्रीमेंटमध्ये ही जागा शेतक-यांच्या नावावर करावी असे नमूद केलेले असेल तर आपण त्या मालकाला रिक्वेस्ट करुन तेही करायला लावू. मी आपल्याला सांगू इच्छितो की, पर्यटनाला उत्तेजन द्यावे म्हणून 1996 मध्ये ही गिरीस्थान विकास प्रणाली निर्माण झाली आणि त्याच माध्यमातून लवासा आलेला आहे.

श्रीमती फौजीया खान : सभापती महोदय, वर्तमानपत्र में मैने ऐसा पढा था कि, स्पेशल इकॉनॉमिक झोन के संबंध में मुख्यमंत्री महोदय ने ऐसा डिक्लेअर किया है कि जिस गरीब शेतकरी की जमीन हस्तांतरित की जाएगी वह कंपनी का शेयर होल्डर बन जाएगा. मैं यह जानना चाहती हूं कि क्या पब्लिक अंडरटेकिंग सेक्टर में भी यह लागू होगा ?

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, एस.ई.झेड. बाबत केंद्र सरकारने नवीन धोरण जाहीर केलेले आहे. महाराष्ट्र सरकार हे धोरण स्वीकारुन एस.ई.झेड. साठी जागा संपादित करील. केंद्र सरकारने जो घोषित किया है, उनका रिहॅबिलीटेशनका जो ॲक्ट है, वही पुरी तरहसे हमारी सरकार ॲक्सेप्ट करेगी. यह एस.ई.झेड. का मामला नही है, यह टाऊनशिप का मामला है. केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र शासन सर्व बाबी 100 टक्के पाळणार आहे. या मुळ प्रश्नाच्या बाबतीत संबंधित ग्रामपंचायतीला उत्पन्न मिळवून देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, महसूल खात्याने एन.ए. ची परवानगी दिली आहे, त्यावेळेला तेथे असणारे रस्ते व वहिवाटीचे रस्ते याबाबत सांगतो. आता मंत्री महोदय सांगत आहे की, तेथे पायवाट होती. परंतु मी सांगतो की, वहिवाट ही कायदेशीर धरली जाते. एन.ए. करताना तेथील तहसिलदाराने किंवा कलेक्टरने पाहणी करुन व खात्री करुन एन.ए. ची परवानगी दिली होती का ? कारण या ठिकाणी एन.ए. करताना वहिवाट आहे व रस्तेही आहेत. आपल्या खात्याने वहिवाटीचे रस्ते गृहीत धरुन त्याची खात्री करुन एन.ए.ची परवानगी दिली का ?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, रस्ता म्हणून जी नोंद झालेली आहे, तोच रस्ता ठेवला जाईल. याचा अर्थ एन.ए. देताना ज्या अधिकाऱ्याने ही वाट कायम ठेवली आहे, त्याची नोंद तेथे केलेली आहे, त्याप्रमाणे कायम ठेवण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडून आम्हाला समाधानकारक उत्तरे दिलेली आहेत. परंतु अधिवेशनातील समाधानकारक उत्तरे जनतेपर्यंत जात असताना कंपनीचे राज्य चालते. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, या प्रकरणी विधिमंडळात झालेली चर्चा जिल्हाधिकाऱ्यांनी या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा घेऊन ग्रामस्थांना दिली तर लोकांकडून शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी होणे सोपे होईल.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, 1996 साली कायदा करुन सहाराला परवानगी दिली. सरकारच्या धोरणाप्रमाणे सहारा कंपनी तेथे सुरु झाली. 1996 मध्ये युतीचे राज्य असताना तेव्हाही सरकारने कंपनीचे धोरण म्हणून पाहिलेले नाही, त्यांचे ऐकले नाही. लवासा व सहाराबद्दल जे आश्वासन दिले आहेत त्याची पूर्तता होईल. याबाबत कोणतीही शंका घेण्याचे कारण राहणार नाही.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पोलादपूर तालुक्यात नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे हजारो ब्रास रेती काढणे

**मु.शी.** : पोलादपूर तालुक्यात नदीच्या पात्रातून बेकायदेशीरपणे हजारो ब्रास रेती काढण्यासंबंधी श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात विशेषत: सावित्री व घोडवनी या नद्यांच्या पात्रातून दररोज हजारो ब्रास रेती काढली जाणे तसेच वाकण पोलादपूर शहरा नजिकच्या लेप्रसी मिशन हॉस्पिटल समोर असलेल्या नदीच्या पात्रातून मोठया प्रमाणावर रेती काढण्यात आलेली असून रस्त्यालगतच या रेतीचा साठा करण्यात येणे, याच ठिकाणाहून दररोज शेकडो ट्रक रेती विकली जाणे, पोलादपूर तालुक्यात एकाही व्यक्तीला रेती उत्खननाचा परवाना नसणे, अशा प्रकारे बेकायदेशीरपणे रेती उत्खनन करुन आणि विकून राज्य शासनाचे लाखो रुपयांची रॉयल्टी बुडविली जाणे, याकडे महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 2006-07 मध्ये रेतीच्या उत्खननाच्या बाबतीत लिलावाची नोटीस केव्हा प्रसिध्द झाली. नोटीसीद्वारे किती जणांना तुम्ही लिलाव दिला आहे. मंजूर ठेकेदारांनी किती ब्रास रेती काढली, यातून महसूल खात्याला किती उत्पन्न मिळाले ?.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, पोलादपूर तालुक्यातील नदीच्या पात्रातील रेती काढण्यासाठी 7 ते 9 ठिकाणी परवानगी देण्यात आली आहे. दिनांक 1.8.2007 ते 31.7.2008 या कालावधीत या एक वर्षाच्या कालावधीसाठी वाळू काढण्याची ही परवानगी दिली होती. सर्व कंपनीची नावे माझ्याकडे असून मी ती सांगू शकतो. काशिनाथ महादेव कुंभार यांना 1 लाख 70 हजार रुपयांना लिलाव देण्यात आला आहे. तर घोडवनी मधील रेतीचा लिलाव 65 हजार रुपयास देण्यात आला.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लिलावाची नोटीस किती तारखेला प्रसिध्द झाली आहे. वर्तमानपत्रात नोटीस प्रसिध्द न करता त्यांना लिलाव दिले गेले आहेत.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, येथील रेती ड्रेझरने काढली जात नाही. ही रेती डुबकी मारुन काढली जाते. स्थानिक लोकांना रोजगार मिळावा म्हणून याचा लिलाव न करता काही लोकांना परवानगी दिली जाते. तेथे पारंपारिक रेती काढणारी मंडळी आहेत. त्यांची रोजीरोटी याच्यावर आहे. त्यामुळे तेथे ड्रेझर न वापरता आपण अशा प्रकारची परवानगी देतो. ठाणे व रायगड जिल्हयात काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत तेथील स्थानिक लोकांना रोजगार मिळावा म्हणून ही परवानगी दिली जाते.

यानंतर कु.धनश्री.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 17:05

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, याठिकाणी मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, पोलादपूर हा डोंगरी भाग आहे. तेथे रेतीचे उत्खनन केल्यामुळे पावसाळयामध्ये डोंगर खचले जातात त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. रेतीचे उत्खनन केल्यामुळे, तर खेड ते पोलादपूर हा रस्ता डोंगर खचल्यामुळे आठ महिने बंद झाला होता. त्यामुळे पोलादपूरसारख्या डोंगरी भागामध्ये रेतीचे उत्खनन करीत असताना डोंगर खचणार नाही याची काळजी शासनाकडून घेतली जाणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, रेती उत्खनन करीत असताना डोंगर खचणार नाही याची शंभर टक्के काळजी घेतली जाईल. ज्या ठिकाणाहून वाळू काढली आहे तेथे कोणताही धोका निर्माण होऊ नये याकरिता आवश्यक ती काळजी शासनाकडून घेतली जाईल.

श्री. नितीन गडकरी : महाराष्ट्रामध्ये रेती उत्खनना हे भ्रष्टाचाराचे आणि गैरकारभाराचे एक फार मोठे केंद्र झाले आहे. रेती उत्खनन करण्याचा ठेका अनेक नेत्यांनी , अनेक आमदारांनी घेतलेला आहे. या व्यवसायामध्ये त्यांची भागीदारी असते. माझी आपणास विनंती आहे की, या रेती उत्खननामुळे रस्ते खराब होतात. रेती वाहून नेताना त्यावर आपण टोल लावला तर शासनाचे उत्पादन पाच पटीने वाढू शकते. अशाप्रकारे राज्यामध्ये होणारे गैरप्रकार देखील थांबतील. तसेच यामुळे रेतीचे भाव देखील कमी होतील. याबाबत विचार करुन धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. अशाप्रकारे शासनाचे उत्पन्न वाढविण्याबाबत धोरण ठरविण्याचा शासन विचार करणार काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जी सूचना येथे केलेली आहे ती सूचना राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी अतिशय योग्य आहे. त्यामुळे या सूचनांचा विचार करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सागरश्रमी हातपाटी वाळू उत्पादक संस्थांनी माननीय मुख्यमंत्र्यांना ड्रेझरने वाळू काढली जाते ती हटविण्यासंबंधी मागणी केली होती. तेथे काही नैसर्गिक आपत्ती होत आहे ते यामुळे होत आहे असे निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांना दिले होते. याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी संबंधित खात्याकडे निवेदन वर्ग करुन कारवाई करण्याच्या संदर्भात काही सूचना दिलेल्या आहेत काय ?

..2...



DVG/ प्रथम श्री. गागरे... 17:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या प्रश्नाशी माननीय मुख्यमंत्र्यांचा काहीही संबंध नाही. तरीदेखील माननीय मुख्यमंत्र्यांना अशाप्रकारचे पत्र देण्यात आलेले आहे काय याची माहिती करुन यासंबंधी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय.....

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, या प्रश्नाशी माननीय मुख्यमंत्र्याचा संबंध नाही असे मी म्हटले.

**तालिका सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 5 पुढे ढकलण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी त्यासंदर्भात माननीय सभापती महोदयांना पत्र दिलेले आहे व त्यास मान्यता देण्यात आल्यामुळे आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

.............

..3...



**विशेष उल्लेख**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राजगुरु यांचे स्वातंत्र्य लढयातील प्रेरणादायक योगदान नव्या पिढीसमोर यावे या हेतून काढण्यात येणाऱ्या मराठी चित्रपटाबाबत

**मु. शी.** : राजगुरु यांचे स्वातंत्र्य लढयातील प्रेरणादायक योगदान नव्या पिढीसमोर यावे या हेतून काढण्यात येणाऱ्या मराठी चित्रपटाबाबत श्री. अरविंद सावंत वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती**: माननीयय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी ए□ विशेष उल्ले□ाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, स्वातंत्र्य लढयातील राजगुरु यांचे स्वातंत्र्य लढयातील प्रेरणादायक योगदान नव्या पिढीसमोर यावे या करिता श्री. मिलिंद मोहाडीकर यांनी सॅल्यूट 7.33 असा चित्रपट मराठीमध्ये काढला. मराठी चित्रपटांना, मराठी कलावंतांना, मराठी नाटके, या सर्वांना प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने राज्य शासनाने मधील काळात चित्रपट निर्मिती करणाऱ्या मराठी चित्रपट निर्मात्यांसाठी अनुदान देण्याचे मान्य केले आहे. राज्यगुरु यांच्या संदर्भात चित्रपट निर्मिती करताना अनुदान मिळावे अशी मागणी श्री. मोहाडीकर यांनी केली असता अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली. राजगुरु यांच्या नावे चित्रपट काढण्यासाठी दुसऱ्याच एका माणसाने अनुदान मिळविले होते. यासंदर्भात संपूर्ण माहिती मिळविण्यासाठी राजगुरु यांचे एक भक्त श्री. गावडे यांनी शासनाकडे माहितीच्या आधारावर पत्र दिले. त्याद्वारे या चित्रपटासाठी कोणाला व किती अनुदान देण्यात आले याची माहिती त्यांनी घेतली. तेव्हा असे उघडकीस आले की, एका व्यक्तीला तीस लाख रुपये देण्यात आले .

यानंतर श्री. सुंबरे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

आणि त्यांनी एक फूटाचादेखील चित्रपट निर्माण केलेला नाही. हे दुर्दैव आहे की, हुतात्मा राजगुरूच्या नावाने चित्रपट काढण्यासाठी दिल्या गेलेल्या शासकीय अनुदानाची माहिती देखील माहिती अधिकाऱ्याकडून घ्यावी लागते आहे. आणि शासनाचा एक अधिकारी हे पैसे कोणाला दिले याचीही माहिती सरळ देत नाही. मात्र हुतात्मा राजगुरूच्या कार्यामुळे झपाटला गेलेला एक माणूस श्री.मिलिंद मोहाडीकर यांनी यवतमाळ येथे जाऊन राजगुरूवरील आपल्या चित्रपटाचे शुटींग 2-3 महिन्यात स्वत:चे पैसे घालून पूर्ण केला आहे. म्हणून या विशेष उल्लेखाच्या निमित्ताने मी या ठिकाणी दोन मागण्या शासनाकडे करणार आहे. एक म्हणजे ज्या कोणी हे 30 लाख रूपये पळविले आहेत त्यांच्यावर आपण काय कायदेशीर कारवाई करणार आहात आणि दुसरा प्रश्न म्हणजे ज्या अधिकाऱ्यांनी हे 30 लाख रूपयांचे अनुदान दिले आणि ते देताना तो चित्रपट कोठवर पोहोचला आहे हेही पाहिले नाही त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? तसेच ज्या श्री.मिलिंद मोहाडीकर यांनी हुतात्मा राजगुरूंवरील 'सॅल्यूट टू 7.33' हा मराठी चित्रपट काढला आहे त्याला शासनाने अनुदान द्यावे अशी विनंती करतो.

***

..... 3बी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : रत्नागिरी शहराजवळ आयटी पार्क सुरू करणे.

**मु.शी.** : रत्नागिरी शहराजवळ आयटी पार्क सुरू करणे याबाबत श्री.संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

--

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

" राज्य शासनाने रत्नागिरी शहराजवळ औद्योगिक वसाहतीसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत निवळी परिसरात जमीन संपादित केलेली आहे. सध्याच्या युगात सूचना औद्योगिकीचे म्हणजे 'आयटी'चे महत्त्व लक्षात घेता या परिसरात आय.टी. पार्क होणे गरजेचे आहे. आयटी पार्कसाठी रत्नागिरी परिसरातील अुद्योजकांची मागणीही आहे. रत्नागिरी परिसराचे महत्त्व लक्षात घेता निवळी औद्योगिक वसाहतीत 100 एकर पर्यंतचा भूखंड राखीव ठेवावा यासाठी विशेष उल्लेखाद्यारे मागणी करीत आहे. कृपया शासनाने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा ही विनंती. "

***

.... 3बी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : अलिबाग (जि.रायगड) येथील वन खात्याच्या सरखेल कान्होजी आंग्रे वन उद्यानाची होत असलेली दुरावस्था.

**मु.शी.** : अलिबाग (जि.रायगड) येथील वन खात्याच्या सरखेल कान्होजी आंग्रे वन उद्यानाची होत असलेली दुरावस्था याबाबत श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना.

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. -

" रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे आठ वर्षापूर्वी मोठ्या थाटामाटात उद्‌घाटन केलेल्या अलिबाग (जिल्हा रायगड) येथील वन खात्याच्या सरखेल कान्होजी आंग्रे वन उद्यानाला निधीच मिळत नसल्याने हे उद्यान आता नष्ट होण्याच्या मार्गावर असणे.,

उद्यानाच्या डागडुजीला लागणारा खर्चच शासनाकडून 8 वर्षापासून मिळालेला नसणे.,

जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, वन अधिकारी राहत असलेल्या आणि जिल्हाधिकारी व वन खात्याच्या शेजारीच चांगले वन उद्यान असावे याकरिता अलिबाग समुद्रकिनारी तत्कालीन विभागीय वन अधीक्षक यांनी वन उद्यानांचा सुंदर आराखडा केला. शासनाकडून त्याची मंजुरी घेतली आणि सुरूंच्या झाडांसह बगीचे तयार केले, बसण्यासाठी खुर्च्या, षटकोनी आकाराची निवारा शेड, उद्यानात फिरण्यासाठी छोटे छोटे रस्ते असे आकर्षक उद्यान तयार केले व त्या उद्यानाला 'सरखेल कान्होजी आंग्रे वन उद्यान' असे नाव दिले.,

उद्‌घाटनानंतर वन उद्यानाच्या डागडुजीसाठी जो खर्च मंजूर होणे आवश्यक होते तो मंजूर झालाच नाही. गेली 8 वर्षे शासनाने या वन उद्यानाच्या डागडुजीसाठी आवश्यक लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीकडे दुर्लक्ष केले आहे. परिणामी वन खात्याच्या अधिकाऱ्यांचेदेखील त्या उद्यानाकडे दुर्लक्ष होऊन या उद्यानला असलेले तारांचे कुंपण पूर्णपणे मोडले आहे. उद्यानात गवतही मोठ्या प्रमाणात वाढले असून फुलझाडे, शोभेची झाडेही नष्ट झाली आहेत. त्यामुळे हे वन उद्यान भकास होण्याच्या मार्गावर आहे.

तरी शासनाचे या महत्त्वपूर्ण प्रकरणी लक्ष वेधून यथोचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने मी हा विशेष उल्लेखाद्वारे हा विषय येथे मांडत आहे. तरी शासनाने याकडे लक्ष द्यावे ही विनंती. "

***

..... 3बी 4 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नवी मुंबई परिसरात सीएनजी गॅस भरणा केंद्र नसल्याने रिक्षा, टॅक्सी चालक तसेच अन्य वाहनांची होणारी कुचंबणा.

**मु.शी.** : नवी मुंबई परिसरात सीएनजी गॅस भरणा केंद्र नसल्याने रिक्षा, टॅक्सी चालक तसेच अन्य वाहनांची होणारी कुचंबणा याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखासंबंधीची सूचना.

--

**तालिका सभापती (श्री.जगदीश गुप्ता)** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. -

" नवी मुंबई परिसरमध्ये सीएनजी गॅस भरणा केंद्रे नसल्यामुळे रिक्षा, टॅक्सी चालक तसेच इतर वाहनांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागणे., चेंबूर येथील सीएनजी केंद्रावर लांबच लांब रांगा लागत असून सीएनजी भरण्यासाठी नवी मुंबई परिसरातील रिक्षा चालकांना तासन् तास ताटकळत रहावे लागणे, नवी मुंबईमध्ये कायम स्वरूपी सीएनजी भरणा केंद्रच नसल्याने येथील रिक्षा-टॅक्सी चालकांना मुंबईतील केंद्रांकडे धाव घ्यावी लागत असणे, त्यावेळी येथील रिक्षा चालकांना ट्राफिक पोलिसांकडून मानसिक त्रास दिला जात असणे, रिक्षा चालकाचे होत असलेले प्रचंड आर्थिक नुकसान, नवी मुंबईतील रिक्षा चालकांना सीएनजी गॅस भरण्यासाठी मुंबईतील रिक्षा संघटनांकडूनही अटकाव केला जात असून दमदाटी केली जाणे, या सर्व परिस्थितीचा विचार करता नवी मुंबईमध्ये सीएनजी भरणा केंद्र सुरू करण्यासाठी रिक्षा महासंधाने ठाणे आरटीओ, नवी मुंबई डेप्युटी आरटीओ यांचेकडे दिनांक 12 नोव्हेंबर 2007 रोजी तसेच यापूर्वीही अनेकदा निवेदनाद्वारे केलेली मागणी, सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील हजारो रिक्षा चालकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप, तसेच चिडीची भावना. सीएनजी केंद्र नसल्याने त्रस्त झालेल्या रिक्षा तसेच टॅक्सी व वाहन चालकांनी तीव्र आंदोलनाचा दिलेला इशारा, चेंबूर येथील वारंवार होत असलेल्या वाद-विवादामुळे गंभीर परिस्थिती होण्याची शक्यता लक्षात घेता, नवी मुंबई परिसरात सीएनजी भरणा केंद्र सुरू करणे, या संदर्भात त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

( यानंतर श्री.बरवड.... 3सी 1 ....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ....

सभापती महोदय, सी.एन.जी.भरले तर प्रवाशांना सुध्दा कमी दरामध्ये प्रवास करता येतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन सी.एन.जी. केंद्रे त्वरित उभारण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आम्ही या ठिकाणी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून आमच्या विभागातील प्रश्न मांडत असतो परंतु तीन तीन महिने त्या प्रश्नाचे उत्तर सुध्दा आम्हाला मिळत नाही. आम्हाला उत्तर देण्यात यावे. माननीय मंत्रिमहोदयांनी या विशेष उल्लेखाच्या संदर्भात उत्तर दिले तर बरे होईल. रिक्षा चालक गरीब वर्गातील असल्यामुळे त्यांना न्याय मिळावा म्हणून मी हा विषय या विशेष उल्लेखाव्दारे मांडलेला आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही.

बरवड

**पृ. शी.** : खाजगी शिक्षण संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळा महाविद्यालयाच्या विकास कामांसाठी आमदार विकास निधी वापरण्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : खाजगी शिक्षण संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळा महाविद्यालयाच्या विकास कामांसाठी आमदार विकास निधी वापरण्याबाबत तरतूद करण्याची आवश्यकता याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती ( श्री. जगदीश गुप्ता )** : माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. विक्रम काळे ( औरंगाबाद विभाग शिक्षक ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यामध्ये विविध विकास कामे करत असताना लोकप्रतिनिधींना सुध्दा त्यांच्या मतदार संघात त्यांनी सुचविलेली विकासाची कामे करण्यासाठी रुपये 1 कोटीचा आमदार निधी दिला जातो. त्या निधीचा वापर कोणत्या कामासाठी करायचा यासाठी काही मार्गदर्शक तत्वे आखलेली आहेत व फक्त रस्ते, पाणी, बांधकामे इत्यादीसाठी निधी खर्च केला जातो. परंतु राज्यात शिक्षण सुविधेसाठी मोठ्या प्रमाणात खाजगी शिक्षण संस्थामार्फत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वरिष्ठ महाविद्यालये चालविली जातात. तेव्हा या शाळा/महाविद्यालयांच्या विकासासाठी त्यावर कार्यरत शिक्षण/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीच फक्त शासन अनुदान देते. तेव्हा या सर्व शाळा/महाविद्यालयांच्या विकासासाठी इमारत बांधकाम, शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा साहित्य, ग्रंथालय विकास यासाठी सुध्दा यापुढे आमदारांचा विकास निधी वापरण्याची तरतूद असावी यासाठी या बाबींचा समावेश आमदारांच्या विकास निधीमध्ये करावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे."

----

...3...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

**पृ. शी.** : एमएच-सीईटी 12 वी परीक्षा पूर्व तयारीसाठी पुस्तकांची संख्या वाढविल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती

**मु. शी.** : एमएच-सीईटी 12 वी परीक्षा पूर्व तयारीसाठी पुस्तकांची संख्या वाढविल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती याबाबत श्रीमती उषाताई दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषाताई दराडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" एमएच-सीईटी 12 वी परीक्षा पूर्व तयारीसाठी गेल्या वर्षापर्यंत प्रत्येक वर्षासाठी तीन पुस्तके असणे, नवीन अभ्यासक्रमाच्या नावाखाली मान्यताप्राप्त पुस्तकांची संख्या अकराच्या वर वाढविण्यात आली व त्यांना मान्यता क्रमांक देण्यात येणे, पूर्वी पुस्तकांची किंमत 700 रुपये असणे व तो आता वाढवून 5000 रुपये पर्यंत वाढविणे, या पुस्तकांवर "या पुस्तकातील मते लेखकाची आहेत व बोर्ड त्याच्याशी सहमत असेलच असे नाही" असा मजकूर छापलेला असणे, त्या पुस्तकांमध्ये भिन्न उत्तरे असणे, बोर्डाला मान्य असलेले उत्तर बोर्डाकडून उपलब्ध न करुन देणे, यामुळे निर्माण झालेली अशांततेची परिस्थिती, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालले भीतीचे वातावरण, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, एमच-सीईटी 12 वी परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मागच्या वर्षीपर्यंत फक्त 3 पुस्तके असावयाची आणि त्यासाठी 700 रुपयांपर्यंत खर्च यावयाचा. शासनाने आता नवीन अभ्यासक्रमाच्या नावाखाली 11 पुस्तकांना परवानगी दिलेली आहे आणि त्यासाठी विद्यार्थ्यांना 5 हजार रुपये खर्च यावयास लागलेला आहे. विशेष बाब म्हणजे या नवीन पुस्तकांमध्ये असे लिहिले आहे की, या पुस्तकातील उत्तरे लेखकांची असून बोर्ड या उत्तरांशी सहमत असेलच असे

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .....

नाही. परीक्षा पूर्व तयारी करीत असताना, सीईटी परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांच्या मनामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. या 11 पुस्तकांपैकी कोणते पुस्तक रेफर करावयाचे, कोणते पुस्तक रेफर करावयाचे नाही अशी संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. अशीच परिस्थिती कायम राहिली तर महाराष्ट्रातील जे विद्यार्थी सीईटी परीक्षा देणार आहेत त्यांची उत्तरे चुकली तर गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार आहे. त्यांचे शैक्षणिक वर्षाचे नुकसान होणार आहे. यासंदर्भात आपण संबंधित खात्याच्या माननीय मंत्रिमहोदयांना तातडीने हे अधिवेशन संपण्याच्या आधी यासंदर्भात काय उपाययोजना केली जाणार आहे याविषयाची माहिती या सभागृहात द्यावी असे निदेश द्यावेत अशी मी विनंती करते.

**तालिका सभापती** : माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी विशेष उल्लेखांच्या बाबतीत लक्ष द्यावे. विशेष उल्लेखाव्दारे एखाद्या प्रश्नाची मांडणी झाल्यानंतर वारंवार सभापती, उपसभापती तसेच तालिका सभापतींकडून निदेश दिल्यानंतर सुध्दा सन्माननीय सदस्यांना त्याबाबतची उत्तरे जात नाहीत. कृपया आपण या बाबीमध्ये लक्ष घालावे आणि सन्माननीय सदस्यांना तातडीने योग्य तो न्याय द्यावा.

श्री. नारायण राणे : याची नोंद घेतलेली आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मी जो विशेष उल्लेख मांडलेला आहे त्यासंदर्भात मार्ग निघण्याच्या बाबतीत आपण निदेश द्यावेत.

**तालिका सभापती** : ते सांगितलेले आहे.

----

...5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

**तालिका सभापती** : पूरक मागण्यांवरील चर्चा आज व 28 नोव्हेंबर, 2007 रोजी घ्यावयाची आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबीपुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**तालिका सभापती** : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

(1) मुख्यमंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक ए-2, ए-3, ए-4, ए-5, ए-6, बी-1 बी-3, सी-6, एफ-2, एफ-3, जे-1, जे-2, जे-4, एन-2, क्यू-2

(2) महसूल मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-1, सी-2, सी-4, सी-10

(3) सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक सी-7 सी-10, व्ही-2, व्ही-3, व्ही-5

(4) वस्त्रोद्योग, माजी सैनिकांचे कल्याण आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक व्ही-5, झेड-ए-1

(5) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक जी-1, जी-3, जी-9 ए, ओ-5 ओ-7, ओ-8, ओ-9

(6) उद्योग व खनीकर्म, सास्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक ए-4, के-3, के-7, के-10, झेड-डी

...6...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

**तालिका सभापती** ......

(7) पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य, महिला व बालविकास मंत्र्यांच्या मागण्या क्रमांक पी-1, एक्स-1,

(8) राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक के-4

(9) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक ई-2, ई-3

(10) कृषी, जलसंधारण व खार जमीन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक डी-4, एल-3, एल-7

(11) सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक आर-1

(12) सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक एन-2

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्या विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी आहेत त्या विभागाचे माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे साहेब उपस्थित आहेत.

यानंतर श्री. शिगम..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण पुढे सुरु...

पण नगरविकास खात्याच्या पूरक मागण्या आहेत. परंतु सभागृहामध्ये नगरविकास खात्याचे मंत्री महोदय किंवा राज्यमंत्री महोदय हजर नाहीत. मंत्री महोदय, सभागृहामध्ये येईपर्यन्त आपण 10 मिनिटासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी. आम्ही पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेतली जात नाही, परंतु आमच्या मानसिक समाधानासाठी तरी मंत्री महोदयांना सभागृहामध्ये यावयास सांगावे.

श्री. नारायण राणे : मी नोंद घेतो.

श्री. मधुकर सरपोतदार : पुरवणी मागण्यांच्या वेळी संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहिले पाहिजे. त्यासाठी सदनाची बैठक 10 मिनिटे तहकूब करावी लागली तरी चालेल. मंत्री महोदयांना त्यांची जबाबदारी समजली पाहिजे. कोणीतरी मुद्दे लिहून घ्यायचे, कोणीतरी उत्तर द्यायचे ही प्रथा योग्य नाही.

श्री. दिवाकर रावते : ज्या खात्याच्या पुरवणी मागण्या असतात त्या सभागृहामध्ये मंजूर करुन घेण्याची त्या विभागाच्या मंत्र्यांची जबाबदारी असते. परंतु कोणीतरी मुद्दे लिहून घेतो आणि मंत्री महोदय उत्तर देतात, अशा प्रकारे कामकाज चालविणे इष्ट नाही.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. उल्हास पवार)**

**तालिका सभापती** : आपल्या सभागृहामध्ये लक्षवेधी आणि विशेष उल्लेख होते. ते आपणा सर्वांच्या सामंजस्याने लवकर संपले. मंत्री महोदय येत आहेत. तोपर्यन्त आपण चर्चेला सुरुवात करु या.

श्री. मधुकर चव्हाण : माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे यांनी नोंद घेतो असे सांगितले. आज पूरक मागण्यांमध्ये महसूल खाते नाही. जर खालच्या सभागृहात त्यांना बोलावण्यात आले तर ते निघून जातील.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची नोंद घेतली जाईल. मंत्री महोदय सभागृहामध्ये येतील. तोपर्यनत आपण चर्चेला सुरुवात करावी अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

...नंतर श्री जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ....

पुरवणी मागण्यांवरील चर्चा आज आणि उद्या घेण्यात येणार आहे. पुरवणी मागण्याच्यां संदर्भातील पत्रक भाग दोन सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रत्येक सदस्यांने भाषण करतांना....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संबंधित खात्याचे मंत्री सदनात उपस्थित नसल्यामुळे आम्ही जर बाब सोडून मुद्दा उपस्थित केला तर संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे या ठिकाणी उपस्थित असलेले मंत्रीमहोदय त्यासंदर्भात उत्तर देऊ शकणार नाहीत. त्यामुळे संबंधित खात्याच्या मंत्रीमहोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आपल्या प्रत्येक प्रश्नाची नोंद घेतली जाईल व आपण उपस्थित केलेल्या प्रत्येक प्रश्नाला मंत्रीमहोदयांकडून उत्तरे दिली जातील असे मी शासनास निर्देश देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ऑर्डर ऑफ द डे आणि पुरवणी मागण्यांच्या संदर्भातील माहिती आमच्याकडे उपलब्ध आहे. आज पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने जे विषय या ठिकाणी दिलेले आहेत त्यासंदर्भात आम्ही अभ्यास करुन आलेलो आहोत. आम्ही पुरवणी मागण्याच्या संदर्भात जे मुद्दे उपस्थित करणार आहोत अशा परिस्थितीत संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसतील तर आमच्या प्रश्नांना उत्तर कसे काय मिळणार आहे? आमच्या प्रश्नांला न्याय कसा काय मिळणार ? खालच्या सदनात पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु नसून दुस-याच मुद्यावर चर्चा सुरु आहे त्यामुळे संबंधित खात्याच्या माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : आपण जे प्रश्न उपस्थित कराल त्या सर्व प्रश्नांना माननीय मंत्री उत्तर देणार आहेत. त्याच खात्याचे मंत्री उपस्थित असले पाहिजेत असे काही नाही. सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा आहेत त्या प्रमाणे आपण कामकाजास सुरुवात करु या. आपल्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर दिले जाईल त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांच्या चर्चेस सुरुवात करावी.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संबंधित खात्याचे मंत्री पुरवणी मागण्यांच्या चर्चेस उपस्थित असणे आवश्यक आहे त्याचे कारण असे आहे की, पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरु

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

असतांना सार्वजनिक बांधकामाच्या संदर्भात चर्चा सुरु असेल तर तो सदस्य आपल्या गावातील रस्त्याच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करु शकतो अशा वेळेस संबंधित मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित असले तर पुरक प्रश्नाला उत्तर देतात ही सभागृहाची प्रथा आणि पंरपरा आहे. त्यामुळे आपण या संदर्भात रुलिंग द्यावे अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आपल्या प्रत्येक प्रश्नाचे समाधान केले जाईल. या ठिकाणी ज्या बाबींचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्याच पुरवणी मागण्यांवर सदस्यांनी आपले विचार व्यक्त करावेत. संबंधित मंत्री सभागृहात आता जरी उपस्थित नसले तरी आपल्या प्रत्येक प्रश्नाचे समाधान केले जाईल, आपल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिले जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, संबंधीत खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नसतांना सुध्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांना उत्तर कस दिले जाईल यासंदर्भात रुलींग द्यावे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना पुन्हा एकदा सांगतो आपण जे प्रश्न उपस्थित कराल त्या सर्व प्रश्नांना उत्तरे दिली जातील. आता सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी चर्चेस सुरुवात करावी.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या खर्चाचे पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

मी सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्यांवर काही बोलणार नाही.

बाब क्रमांक 30, पृष्ठ क्रमांक 24 - महसूल व वन विभाग - भूसंपादनाच्या कार्यासाठी कार्यरत पदांसाठी 65 लाख 15, हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रा.लि. ( मुंबई स्पेशल इकॉनॉमिक झोन प्रा.लि.) यांच्या भूसंपादनासाठी कार्यरत पदांच्या वेतन व भत्ते याबाबतच्या खर्चाचे प्रदान करण्यासाठी मागणी करण्यात आलेली आहे. कोणत्याही भूसंपादनाचा सर्व्हे करण्याचे काम शासनाचे असते. तेव्हा हे काम प्रायव्हेट कंपनीला कसे देण्यात आले याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 25 - महसूल व वन विभाग - प्रलंबित बिलांच्या प्रदानासाठी 73 कोटी 15 लाख 24 हजार इतकी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मुद्रांक, मुद्रकांचे मुद्रण, भाडेपट्टी व कर, इतर खर्च इत्यादी संबंधातील बिले अदा करण्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. इतक्या मोठ्या रकमेची मागणी का करण्यात आलेली हे मला समजलेले नाही. अर्थसंकल्प सादर केला जातो त्यामध्ये या सर्व खर्चाचा अंतर्भाव केला जातो. तेव्हा मंत्रिमहोदयांनी त्याबाबत खुलासा करावा. किती प्रमाणात आकस्मिकता निधी आहे, किती मंजूर झालेला आहे, यातून किती पुरवणी मागण्या मान्य कराव्यात यावर बंधन आहे. इतक्या मोठ्या रकमेची देयके देण्याची परिस्थिती का निर्माण झाली याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

बाब क्रमांक 37, पृष्ठ क्रमांक 28 -महसूल व वन विभाग - औद्योगिक न्यायालय अमरावती यांच्या निर्णयानुसार थकबाकीची रक्कम देण्याकरिता 69 हजार रुपयांची मागणी केलेली आहे. एका कर्मचाऱ्याने तीन वर्षे काम केले, पण त्यास नोकरीत कायम स्वरुपी केले नाही म्हणून तो कर्मचारी औद्योगिक न्यायालयात गेला.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

परंतु न्याय दिल्यानंतर 69 हजार रुपयांची थकबाकी शासनाला भरावी लागली, हे शासनाला भूषणावह वाटते का ?

बाब क्रमांक 38, पृष्ठ क्रमांक 28 -- पर्यायी वनरोपणासाठी तरतूद करणे. यासाठी रुपये 10 कोटी 68 लक्ष 76 हजार रुपयांची तरतूद वन विभागाने मागितलेली आहे. सभापती महोदय, वन खात्याचे राज्यमंत्री किंवा मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. वन खात्यासंबंधीच्या प्रश्नांची नोंद कोण घेत आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी नोंद घेत आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, यासंदर्भात प्रश्न असा आहे की, बिगर शेतजमिनी वनीकरणाच्या वापरासाठी वापरुन मोठया प्रमाणात प्रर्यायी वनरोपणाची कामे हाती घेण्याचे ठरविण्यात आलेले आहे. यासाठी एवढी मोठी तरतूद केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात त्याठिकाणी वनरोपण होते का ? व यासंबंधी काळजी घेऊन वनाची वृध्दी होते का ?

बाब क्रमांक 39, पृष्ठ क्रमांक 29 -- विद्यमान बिनतारी संदेश यंत्रणेचे परिरक्षण व मजबुतीकरण करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यासाठी रुपये 1 कोटी 22 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मग, आपली पहिली जी यंत्रणा होती ती सद्य:स्थितीत आहे का ? आपण आणखी यामध्ये कोणते मजबुतीकरण किंवा दुरुस्ती करणार आहात, ते मला माहीत नाही. यासंदर्भात माहिती मिळणे आवश्यक आहे.

श्री.राणाजगजित सिंह (बसून) : आज वन विभागावरील मागण्यांवर चर्चा नाही.

श्री.विनोद तावडे : महसूल आणि वन विभाग सोबतच आहे.

**तालिका सभापती** : आजच्या कामकाजत्रिकेमध्ये वन विभागाच्या मागण्यांवर चर्चा नाही. यामध्ये वन विभागाचा उल्लेख नाही.

श्री.गणेश नाईक : पूर्वी महसूल आणि वन विभाग सोबत होते. परंतु आता तसे नाही. पूर्वी उद्योग, ऊर्जा, कामगार असा उल्लेख होत होता, परंतु आता उद्योग, ऊर्जा आणि कामगार वेगवेगळे आहेत. याठिकाणी शासकीय भाषेमध्ये ते एकत्रितपणे दिलेले आहेत. परंतु आज वन खात्यासंबंधीच्या पुरवणी मागण्या नाहीत.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला कळत नाही की, हे सगळे संच अस्तित्वात असताना त्यांची दुरुस्ती किंवा मजबुतीकरण आणखी काय करणार आहेत ? मजबुतीकरण या शब्दाचा अर्थ स्पष्ट व्हावा.

बाब क्रमांक 40, पृष्ठ क्रमांक 29 -- वन क्षेत्रातील पर्यटन व कोयना वन्यजीवन अभयारण्याच्या विकासासाठी रुपये 1 कोटी 37 लाख 47 हजार रुपयांची तरतूद केलेली असून बाब क्रमांक 41 मध्ये असे म्हटले आहे की, "सागरेश्वर अभयारण्य विकसित करण्याचे ठरविण्यात आले आहे. वन पर्यटनाच्या विकासासाठी सांगली जिल्हयासाठी रुपये 160 लाख इतका नियत खर्च मंजूर करण्यात आला आहे. सागरेश्वर अभयारण्याच्या बाहेरच्या सीमेवर साखळी कुंपण घालण्यासाठी तरतूद मंजूर करण्यात आली." परंतु मला "साखळी कुंपण" या शब्दाचा अर्थ कळत नाही. या शब्दाचा नेमका अर्थ सांगण्यात यावा.

बाब क्रमांक 42, पृष्ठ क्रमांक 29 -- राज्यातील व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यातील विकास कामांकरिता रुपये 8 कोटी 12 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंगळवार, दिनांक 27 नोव्हेंबर 2007 रोजीच्या कार्यक्रमपत्रिकेत जी खाती दिली आहेत त्यामध्ये 'महसूल व वन विभाग' असे म्हटले आहे. वन विभागाचा यात समावेश आहे किंवा नाही, हे आपण क्लिअर करावे.

**तालिका सभापती (श्री.उल्हास पवार)** : कार्यक्रम पत्रिकेत असे म्हटले असले तरी 'महसूल मंत्री' असे स्पेसिफिक म्हटले आहे. सभागृहात मंत्रीनिहाय चर्चा होत असते. 'महसूल मंत्री' असे म्हटले आहे. महसूल खात्याचे मंत्री वेगळे आहेत, वन खात्याचे मंत्री वेगळे आहेत. या ठिकाणी 'महसूल' अशा शब्द वापरलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वन विभाग दाखविलेला नाही. त्यामुळे आम्ही काय करावयाचे, याचे मार्गदर्शन आपणच करावे.

श्री.नारायण राणे : कार्यक्रम पत्रिकेत पुढीलप्रमाणे उल्लेख आहे. सन 2007-2008 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा. खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल. त्यात महसूल मंत्री असे स्पष्टपणे म्हटलेले आहे, वनमंत्री असा उल्लेख नाही.

**तालिका सभापती** : सभागृहामध्ये मंत्रीनिहाय चर्चा होते, हे आपल्या सर्वांना माहित आहे. कार्यक्रम पत्रिकेत मंत्र्यांची यादी दिलेली आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेत वन विभाग आहे. मग आपण आम्हाला सांगा की त्या खात्याच्या मागण्या आम्ही मांडावयाच्या की नाही ?

**तालिका सभापती** : मी आपल्याला विनंती करतो की, सभागृहात मंत्रीनिहाय चर्चा घेण्याची पद्धत आहे. महसूल मंत्र्यांचा उल्लेख आहे. आज मुख्यमंत्री, महसूल मंत्री, सहकार, पुनर्वसन व मदत कार्य मंत्री वगैरे ज्या मंत्र्यांच्या खात्यांच्या मागण्यांवर चर्चा आहे त्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. सभागृहात खातेनिहाय चर्चा होत नसते.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेत जे विभाग दिलेले आहेत त्यामध्ये 'महसूल व वन विभाग' असे स्पष्टपणे म्हटलेले आहे.

...2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : त्या ठिकाणी 'महसूल व वन विभाग' म्हटले असले तरी कार्यक्रम पत्रिकेतील क्रमांक सहा येथे 'महसूल मंत्री' असे स्पष्टपणे लिहिले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मग आम्ही वन खात्यावर कधी बोलायचे हे आपण स्पष्ट करावे.

**तालिका सभापती** : पुरवणी मागण्यांवरील चर्चेला दोन दिवस दिलेले असतात. आज वन विभाग नसेल तर उद्या वन विभागाचा समावेश असेल त्यावेळी आपण चर्चा करावी. आपल्याला जे पुरवणी मागण्यांचे पुस्तक दिलेले आहे त्यामध्ये 'महसूल व वन विभाग' असे शीर्षक दिलेले आहे. मात्र कार्यक्रम पत्रिकेत आज कोणत्या मंत्र्यांच्या खात्यासंबंधी चर्चा होणार आहे त्याचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे.

यानंतर श्री.बोरले.........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाच्या कामकाजाचा दर्जा किती घसरत चालला आहे त्याचे हे उदाहरण आहे.

**तालिका सभापती** : असे नाही. आपण शब्दच्छल करीत आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, वन विभागाच्या मागण्यांवर आम्हाला आज बोलता येणार नाही. वन विभागाच्या मागण्या उद्या चर्चेला आल्या तर आम्ही उद्या बोलू, नाही तर अजिबात बोलणार नाही. जसा कार्यक्रम दिला जाईल त्याप्रमाणे आम्ही बोलू.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग, बाब क्र.68, पृष्ठ क्र.49 शासकीय व अशासकीय शाळा, कनिष्ठ महाविद्यालये व संस्था यांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचारीवर्गासाठी महागाई भत्त्याचे प्रदान करणे. 2,07,72,60,000 रुपयांची ही मागणी आहे. शिक्षण विभागाच्या मंत्री महोदयांना मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, महागाई भत्ता वर्षाच्या शेवटी दिला जातो की, प्रत्येक महिन्याला दिला जातो. कारण शिक्षण विभागाची ही 260 कोटी रुपयांची मागणी आहे. ही मागील थकबाकी आहे, असा त्याचा अर्थ होतो. आपण कोणती पद्धत स्वीकारलेली आहे, याबाबत माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग, बाब क्र.69 जिल्हापरिषद प्राथमिक शाळांशी संलग्न असलेल्या बालवाडीत काम करणा-या बालवाडी सेविकांना भाऊबीज भेट याचा दोन ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. मी पृष्ठ क्र.49 वरील बाब क्र.68 संदर्भात प्रथम माहिती घेतो. बालवाडी सेविकांना प्रत्येकी 500 रुपये भाऊबीज भेट देण्यासाठी 34 लाख 34 हजारांची पुरवणी मागणी सादर केलेली आहे. बालवाडी सेविकांना ही 500 रुपयांची भेट आपण प्रत्येक वर्षी देतो. जसे वर्ष बदलते त्याप्रमाणे महागाई भत्त्यात बदल होतो. रहाणीमान उंचावते. शासन त्यांना जे वेतन देते ते कमी आहे. म्हणून भाऊबीज भेटीची रक्कम वाढवून द्यावी, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग, बाब क्र.70, पृष्ठ क्र.50 दुपारचा शालेय पोषण आहार योजनेकरिता तरतूद. 83 कोटी 18 लाख 51 हजारांची ही पुरवणी मागणी आहे. दुपारचा शालेय पोषण आहार योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेसाठी केंद्र शासनाकडून किती निधी प्राप्त झाला, का संपूर्ण निधी केंद्र शासन देते, यामध्ये राज्य शासनाचा किती हिस्सा

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ........

आहे ? याबाबत माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. सभापती महोदय, शालेय पोषण आहाराच्या रकमा वेळेवर अदा केल्या जात नाहीत. पुष्कळ वेळा त्या ठिकाणी काम करणारे कर्मचारी किंवा शिक्षक वर्ग स्वत:च्या खिशातून पैसे काढतात आणि ज्यावेळी शासन पैसे देते त्यावेळी त्या कर्मचा-यांना किंवा शिक्षकांना ते पैसे मिळतात, हे कितपत योग्य आहे याचा शासनाने विचार करावा. तेथे काम करणा-या कर्मचा-यांना किंवा शिक्षक वर्गाला त्रास होऊ नये ही माझी यामागची भावना आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभाग पृष्ठ क्र.52-53, बाब क्र.76 शिक्षण मंडळ, महानगरपालिका, मालेगाव यांच्या शिक्षकांना वेतन, निवृत्तीवेतन इत्यादींची थकबाकी देण्यासाठी तरतूद. 13 कोटी 27 लाखाची ही पुरवणी मागणी आहे. ही थकबाकी का राहिली, याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

यानंतर कु.जयश्री......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

सभापती महोदय,बाब क्रमांक 77,पृष्ठ क्रमांक 53, मुंबई येथील ए.टी.पी.किंगफिशर एअरलाईन्स खुल्या टेनिस क्रीडा महोत्सावाकरिता तरतूद रुपये 2 कोटी रुपये आता या किंगफिशर एअरलाईन्स खुल्या टेनिस स्पर्धा कोणी आयोजित केल्या आणि त्याची महाराष्ट्र शासनाने शासनाची जबाबदारी घेतली होती का? स्पॉन्सरर केल्या होत्या का, याची माहिती द्यावी कारण दोन कोटी रुपये आपण त्यांच्यावर बक्षीसासाठी खर्च केलेले आहेत. किंगफिशर हे नाव जर त्या क्रीडा स्पर्धांचे असेल तर मग त्यासाठी होणारा खर्च त्यांनी का करु नये ? नाही तर मग महाराष्ट्र शासनाचा त्यामध्ये कोणता सहभाग आहे ? याविषयी माहिती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 89,पृष्ठ क्रमांक 64,मॅफ्को कर्मचारी वर्गाच्या सेवानिवृत्तीसाठी वित्त विभागाला.... वित्त विभाग, वित्त विभागाचे माननीय मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत का ?

श्री.मधुकर चव्हाण : नाही, सभापती महोदय,वित्त विभागाचे दोन्हीही मंत्री या ठिकाणी उपस्थित नाहीत.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय,खालच्या सभागृहात देखील पुरवणी मागण्यांवर चर्चा चालू आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, वित्त विभागाचे दोन्हीही मंत्री खालच्या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उपस्थित आहेत का ? वित्त विभागाच्या मंत्र्यांना बोलविण्याकरिता निरोप पाठविण्यात यावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बाब क्रमांक 89,मॅफ्को कर्मचारी वर्गाच्या सेवानिवृत्तीसाठी आणि सक्तीच्या सेवानिवृत्तीसाठी खर्च,वेतन व इतर खर्च भागविण्यासाठी तरतूद रुपये 2,76,60,000 आहे. यावर माझा असा प्रश्न आहे की, हे मॅफ्को बंद केलेले आहे,असा शब्द शासनाने वापरला आहे. सक्तीची सेवानिवृत्ती म्हणजे काय ? एक वेळ मी

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**





असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

स्वेच्छानिवृत्ती समजू शकतो परंतु सक्तीची सेवानिवृत्ती म्हणजे काय,हा काय प्रकार आहे?आज या ठिकाणी कामगार खात्याचे मंत्री देखील उपस्थित आहेत. आपण काय त्यांच्यावर रिव्हॉल्वर रोखून त्यांच्याकडून निवृत्ती मागणार का,आणि असे म्हणणार आहात का की,तुम्ही काहीही करा आणि येथून निघून जा. हा एक भाग आणि दुसरा भाग म्हणजे खंडणी गोळा करण्यासाठी ज्याप्रमाणे गुंडांची टोळी पाळण्यात येते,तसा हा प्रकार आहे का ? मॅफ्कोमधील सक्तीची सेवानिवृत्ती घ्यायला लावलेल्या कर्मचा-यांची तेथून जाण्याची इच्छा नव्हती. तेथे त्यावेळी जे शासनाचे सचिव एम.डी.म्हणून नेमले गेले होते, त्यांच्या डोक्यातील अनेक कल्पनांमधून साकारलेला हा एक प्रकार आहे. मॅफ्को तोटयात चालत असून,मॅफ्को बंद करुन तेथे काम करणा-या सर्व कर्मचा-यांना जबरदस्ती करुन निवृत्ती घ्यावयाला लावणे, हा काय प्रकार आहे ? प्रत्यक्षात मॅफ्को तोटयात चालत नव्हती. याची माहिती आम्हाला मिळाली तर बरे होईल.

विधी व न्याय विभागाचे माननीय मंत्री येथे उपस्थित आहेत का ?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, असे जर होत असेल तर सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्या मांडू नये. पुरवणी मागण्यांसंदर्भात सरकार गंभीर नाही, असे दिसून येत आहे. संबंधित खात्याच्या माननीय मंत्र्यांना बोलाविण्याकरिता निरोप पाठविण्यात यावा व सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता तहकूब करण्यात यावे.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेण्यात येतील व उत्तर देताना हे मुद्दे कव्हर करण्यात येतील.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मंत्री महोदय श्री.हसन मुश्रीफ थोडयाच वेळात येणार आहेत, तोपर्यत त्यांच्या विधी व न्याय खात्याचे मुद्दे मी लिहून घेतो व त्यांना देतो. ते आल्यानंतर उत्तर देणार आहेत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 130, बाब क्रमांक 157 याबाबत मी बोलू इच्छितो. जिल्हा, तालुका व इतर न्यायालयांना मराठी सॉफ्टवेअर पुरविण्यासाठी 25 लाख रुपयांची तरतूद केली आहे, हा चांगला निर्णय आहे. महाराष्ट्रात प्रथमच अशा प्रकारचा निर्णय घेऊन त्यासाठी पुरवणी मागणी येथे मांडली जात आहे. अर्थसंकल्पात काय तरतूद केली आहे हे मला माहिती नाही. किमान पुरवणी मागण्यामध्ये हा विषय घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र राज्यात मराठी भाषा असावी हा प्रस्ताव संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर या सभागृहात मंजूर झालेला आहे. परंतु मराठी भाषेला दुय्यम स्थान दिले जाते. सर्व न्यायालयात मराठी भाषेतून कारभार चालला पाहिजे. मराठी भाषेत सर्व केसेस चालल्या पाहिजेत असा सर्व मराठी लोकांचा आग्रह आहे. पण त्याकडे दुर्लक्ष केले जाते. परंतु आता सुदैवाने मराठीच्या सॉफ्टवेअरसाठी 25 लाख रुपये तरतूद केलेली आहे. It's well beginning याबाबत पुढे काय होते ते बघूया. परंतु मी शासनाचे कौतुक करतो.

बाब क्रमांक 189 - ठाणे येथे जलदगती न्यायालयासाठी सहा न्यायालयीन कक्षाचे बांधकाम करण्याकरिता 64 लाख 93 हजारची तरतूद केलेली आहे. मला एका बाबीची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे की, न्यायालये सर्व ठिकाणी आहेत. आता जलद न्यायालयासाठी एक तरतूद आलेली आहे. जलद न्यायालय म्हणजे निश्चित काय आहे, तेथे तारखा मिळणार नाही का, एकदा केसला सुरुवात झाली तर निकाल मिळणार का, जलद न्यायालयात काय अंतर्भूत आहे ? येथे कोणत्या प्रकारचा न्याय मिळणार आहे. याबाबतची माहिती आम्हाला न्याय विभागाने दिली तर बरे होईल. त्यासाठी आपण पैसे खर्च करीत आहात म्हणून लोकांना लवकर न्याय मिळाला पाहिजे, ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे. गतिमान शासन असा आपण बाहेर सर्वत्र उल्लेख करता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

PNG/

श्री.मधुकर सरपोतदार .....
गतिमान शासनाकडून गतिमान न्याय मिळणार असेल तर त्याचे आम्ही निश्चितच स्वागत करु. त्यासाठी 64-65 लाख रुपये तरतूद करुन काम होणार नाही. कारण ज्या गतीने तुम्ही ही कामे पूर्ण कराल. त्या गतीने काम भविष्य काळात केले जाईल. त्यासाठी जास्त निधी आपण उपलब्ध करुन दिला पाहिजे. जास्त गतीने काम केले तर जास्त गतीने न्याय मिळू शकेल. अन्यथा तशी शक्यता कमी आहे. म्हणून मुद्दाम मी ही माहिती विचारली आहे.

सभापती महोदय, बाब क्र.165 पृष्ठ क्र.137 उद्योग, उर्जा व कामगार खात्याच्या मागण्याबाबत मी बोलू इच्छितो. ठाणे येथील कार्यालय संकुल, औद्योगिक व कामगार न्यायालय यांच्याकरिता खरेदी केलेली वरदान इमारत यांचे परिरक्षण व दुरुस्ती यासाठी 7 लाख 35 हजार रुपये तरतूद केलेली आहे. आपण ठाण्याच्या औद्योगिक परिसरात कधी गेला असाल की नाही हे मला माहिती नाही. कामगार मंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर आपण त्या न्यायालयाला भेट दिली आहे की नाही हे मला माहिती नाही. पण खरोखर जेव्हा न्यायालय ही संज्ञा पाठीशी लावतो, तेव्हा ते न्यायालय असले पाहिजे.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

न्यायाधीश व त्यांच्या सर्व स्टाफ साठी कशा प्रकारच्या खोल्यांची आवश्यकता आहे त्यांची निवड करुन कामगारांच्या प्रश्नाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कामगार क्षेत्रामध्ये कामगारांचा पुढारी म्हणून आपण काम केलेले आहे. आपल्याला या कामाचा चांगला अनुभव आहे. कामगारांच्या प्रश्नांची आपल्याला जाण आहे. अनेक ठिकाणी करखाने बंद पडत आहे. अनेक ठिकाणी कामगारांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागत आहे. अशा अनेक समस्यांना कामगारांना तोंड द्यावे लागत आहे. आपण ठाण्यामध्यीील न्यायालयाला भेट दिल्यास आपणास परिस्थितीची कल्पना येईल. यासाठी सात लाख रुपयांचा निधी खर्च करुन परीक्षण व दुरुस्ती यासाठी खर्च करुन त्यांच्या ज्या गरजा आहेत त्या भागविण्याचा शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासंदर्भात रास्त खर्च करुन न्यायालयाच्या प्रश्नांना न्याय द्यावा एवढी माझी आपणास विनंती आहे.

यानंतर सभापती महोदय, बाब क्रमांक 166,पृष्ठ क्रमांक 137 भाडयासाठी अतिरिक्त तरतूद करणे ( रुपये 34 लाख 56 हजार दत्तमत्त ) यासंबंधी मी बोलणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, बाष्पके संचालनालयाचे कार्यालय " कॉमर्स सेंटर " , ताडदेव येथून " मे. रिचर्डसन्स ॲण्ड क्रुडास लि. " यांच्या भायखळा , मुंबई येथील जागेत स्थलांतरित करण्यात आले आहे.

सभापती महोदय, मे. रिचर्डसन्स ॲण्ड क्रुडास लि. ही मुंबईतील एक ख्यातनाम कंपनी होती. ती कंपनी नंतर बंद पडली. या कंपनीच्या जागेमध्ये बाष्पके संचालनालयाचे कार्यालय होत आहे. तेथे स्थलांतरित झाल्यानंतर या कार्यालयाची दुरावस्था होऊ नये. त्यासाठी लागणारी सर्व यंत्रणा, साधनसामुग्री शासनाने द्यावी माननीय मंत्री महोदय, आपल्याला कामगार क्षेत्राचा चांगला अनुभव आहे, म्हणून आपल्याला माझी विनंती आहे की, यासंदर्भात शासनाकडून लक्ष देण्यात यावे.

ग्राम विकास व जलसंधारण या विभागाच्या पुरवणी मागण्यांची नोंद कोणते मंत्री घेत आहेत ? सभापती महोदय, ही काय शोकांतिका आहे, या महत्वाच्या विषयासंदर्भात शासनाला काहीच गांभीर्य नाही.

.....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .......

यानंतर सभापती महोदय, बाब क्रमांक 174पृष्ठ क्रमांक 145, या संबंधी मी बोलणार आहे. ग्राम सेवकांचे वेतन व भत्ते यांवरील खर्च भागविण्याकरिता त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेच्या कर्मचारी वर्गाची प्रवास खर्चाची प्रलंबित देयके चुकती करण्यासाठी अतिरिक्त तरतूद करणे( रुपये 6,11,16,000 दत्तमत )

सभापती महोदय, एवढया मोठया प्रमाणात, कर्मचारी वर्गाची देयके प्रलंबित राहिलेली आहे. .......

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या पुरवणी मागण्या आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दिलेल्या नाहीत. जलसंधारण विभागाच्या पुरवणी मागण्या कामकाज पत्रिकेमध्ये दिलेल्या आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : ठीक आहे. आजचे जे विषय दाखविलेले आहेत तो कागद माझ्या हातात आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी जलसंधारण विभागाच्या पुरवणी मागण्यांवर आपली मते मांडावीत.

श्री. रमेश निकोसे : ज्या विभागाच्या मागण्या मांडल्या जात आहेत त्या विभागाचे मंत्रीच सभागृहामध्ये हजर नसतील तर त्याबाबत बोलून काय उपयोग आहे ? यासाठी आपण सभागृह काही काळासाठी स्थगित करावे व सर्व संबंधित खात्याच्या मंत्र्यांना सभागृहात बोलवावे.

यानंतर श्री. सुंबरे...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 18:05

श्री. सरपोतदार ....

सभापती महोदय, जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 180 - लहान पाटबंधारे योजनांच्या देखभाल व दुरूस्तीची कामे करणे यासाठी अतिरिक्त तरतूद म्हणून 8 कोटी रूपयांची पुरवणी मागणी येथे करण्यात आलेली आहे. ही मागणी करताना या ठिकाणी आपण असे म्हटले आहे की, कोल्हापूर टाईप बंधारे, उपसा सिंचना योजना, बदली बंधारा गावातील तलाव, पाझर तलाव इत्यादी यासारख्या निरनिराळ्या लहान पाटबंधारे योजनांच्या देखभाल व दुरूस्ती करण्यासाठी रूपये 8 कोटी एवढा अतिरिक्त रिनधी उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आले आहे. आता या निधीची अर्थसंकल्पात तरतूद करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, पावसाळा संपून आता दोन महिने होत आले आहेत. खरे तर ही तरतूद देखभालीसाठी असेल तर ती पावसाळा सुरू होण्यापूर्वीच आपण करायला पाहिजे. कारण पावसाळ्यानंतर हे करावे लागते. पण आपण आता डिसेंबर महिन्यात हे येथे मांडत आहात. आता यानंतर तुमचे पैसे मंजूर होणार आणि मग कामाला सुरूवात होणार म्हणजे तोपर्यंत त्या तलावातील पाणी वाहून जाणार, गळती असेल तर ती गळती होतच राहणार आहे. तेव्हा ही पुरवणी मागणी केव्हा करायची याबाबतीतील आपले निश्चित असे धोरण आपण ठरवून घ्यावे असे मला या निमित्ताने विनंतीपूर्वक आपल्याला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, त्यानंतर सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 190 वर मी बोलू इच्छितो. आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळा यांना अतिरिक्त अनुदान म्हणून 45 कोटी 69 लाख 8 हजार रूपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्यासाठी येथे आपण म्हटले आहे की, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांकरिता स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळांच्या कर्मचारी वर्गाच्या वेतनापोटी 2007-08 वर्षाच्या अर्थ-संकल्पात केलेली तरतूद अपुरी असल्याचे दिसून आले म्हणून, अर्थसंकल्पात रूपये 45 कोटी 69 लाख 8 हजार आवर्ती इतकी अतिरिक्त तरतूद करणे आवश्यक आहे. पुढे असेही म्हटले आहे की, हा खर्च विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी म्हणून ही पूरक मागणी सादर केली आहे. आता मला हे सांगा की, आपण हा उपक्रम दाखविला आहे तो आपण वर्षाच्या सुरूवातीपासून करीत आहात. पण मग ही मागणी येथे डिसेंबरमध्ये येत आहे. जेव्हा एप्रिलमध्ये नवीन वर्ष सुरू होते तेव्हाच ही तरतूद करून घेणे आवश्यक आहे, कारण शेवटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाचाही यात प्रश्न आहे. असेच इतरही प्रश्न यात गुंतले आहेत. का आपण अगोदरच हे पैसे खर्च करून नंतर

...... 3एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार ...

ही मागणी करून ते पैसे काढून घेत आहात ?

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्रमांक 191 कडे मी वळतो. आश्रमशाळा व मूलोद्योगोत्तर आश्रमशाळा यांना अतिरिक्त अनुदान देणे यासाठी आपण 3 कोटी 6 लाख 5 हजाराची पुरवणी मागणी केलेली आहे. त्यासाठी यात आपण म्हटले आहे की, 2004-05 या वर्षापासून विमुक्त व भटक्या जमातींच्या बालकांकरिता स्वयंसेवी संस्थांकडून चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये नव्याने मंजुरी दिलेल्या अतिरिक्त तुकड्यांचा खर्च भागविण्यासाठी रदूपये 3 कोटी 6 लाख 5 हजार इतके अतिरिक्त अनुदान उपलब्ध करून घेण्याचे ठरविण्यात आले आहे. या प्रस्तावात अंतर्भूत असलेला वार्षिक सरासरी खर्च, अंदाजे रूपये 2 कोटी 16 लाख 17 हजार इतका असून चालू वित्तीय वर्षातील खर्च रूपये 3 कोटी 6 लाख 5 हजार इतका आहे. सभापती महोदय, या संबंधात मी इतकेच विचारू इच्छितो की, अशा किती नव्या आश्रमशाळा, तुकड्या आपण उभ्या केल्या आहेत आणि त्यांचा खर्च कसा मान्य केला आहे तसेच आपण त्याची मागणी करताना कोणत्या निकषावर केलेली आहे याची माहिती आपण कृपा करून द्यावी.

( यानंतर श्री. सरफरे .... 3एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 18:10

श्री. मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या पृष्ठ क्रमांक 158 वरील बाब क्रमांक 199 कडे आपले लक्ष वेधतो. यामध्ये म्हटले आहे की, "नशाबंदी मंडळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी रुपये 5 लाखाची तरतूद करण्यात आली. नशाबंदी मंडळ राज्यात व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात मागील 50 वर्षापासून कार्यरत आहे. म्हणून नशाबंदी मंडळाला सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी रुपये 5,00,000 एवढा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले आहे". सभापती महोदय, मी सकाळी नशाबंदी मंडळाबद्दल बोललो. आपण मला सांगावे की, या सदनामध्ये येणारे किती माननीय सदस्य नशापान करीत नाहीत?

(गोंधळ)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हा आमच्या सारख्या सदस्यांवर हेत्वारोप आहे मी चहा सुध्दा पित नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : अनेक प्रकारच्या नशा असतात, मी दारुविषयी बोललो नाही.

श्री. मधुकर चव्हाण : पान खाणे, सिगारेट ओढणे इत्यादी प्रकारच्या नशा असतात.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला यानिमित्ताने एका गोष्टीची आठवण होते. मी विधानसभेमध्ये असतांना जळगावच्या वासनाकांडाचा विषय निघाला होता. त्यावेळी मी सदनामध्ये प्रश्न उपस्थित केला होता की, वासनाकांडामध्ये न गुंतलेले असे किती लोक प्रतिनिधी या सदनामध्ये बसले आहेत? त्यावेळचे माननीय अध्यक्ष श्री. मधुकरराव चौधरी यांना मी हा प्रश्न विचारला होता. एका पत्नीपेक्षा बहुपत्नींना घेऊन वासनाकांड करणारे सदस्य कोण आहेत त्यांच्याकडे मी माझे बोट दाखवू कां? त्यावेळी ते म्हणाले की, तुम्हाला असे करता येणार नाही. त्यापूर्वी संबंधित सदस्यांना आपण नोटिस दिली पाहिजे. आताही मी नोटिस दिलेली नाही. मला कुणालाही दुखवावयाचे नाही, मला कुणाचेही कपडे उतरवायचे नाहीत. मी आज फक्त गुगली टाकून बघितली. मी मंत्रिमहोदयांना विचारतो की, हे नशाबंदी खाते आवश्यक आहे काय? आपण दारुबंदीचा प्रसार केला. किती लोक दारु पित नाहीत याचा आपण शोध घेतला पाहिजे. या खात्याची आपल्याला गरज काय? या अनुषंगाने आपण या खात्याचा पुनर्विचार करावा. आणि नशाबंदी खाते, दारुबंदी खाते बंद करुन या उलट दारु विक्री खुली करावी. त्यामुळे लोक कमी दारु पितील. त्यामुळे दारुचे धंदे आणि पोलिसांचे उत्पन्न कमी होईल. खेडापाडयामध्ये लोक दारु पित नसतील त्याठिकाणी पोलीस त्यांना दारु प्यायला लावतात असा माझा अनुभव आहे. किती



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. मधुकर सरपोतदार...

पोलीस स्टेशनची नावे आपणास सांगू? मी त्यांचा उल्लेख याठिकाणी करीत नाही. गेल्या 50 वर्षापासून चालू असलेल्या या खात्याच्या बाबतीत आपण या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये निर्णय घेतला तर महाराष्ट्राच्या दृष्टीने ही बाब भूषणावह ठरेल. असे मला मुद्दाम आग्रहपूर्वक सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 177 व बाब क्रमांक 210 मध्ये "राज्यातील राज्य कामगार विमा योजनेंतर्गत रुग्णालयांसाठी सामग्री व पुरवठा याबाबत करण्यात आलेली तरतूद अपुरी असल्याचे आढळून आले आहे, या प्रयोजनासाठी चालू वित्तीय वर्षामध्ये या रुग्णालयांसाठी रुपये 4,73,00,000 इतकी अतिरिक्त रकमेची तरतूद करण्याची आवश्यकता आहे" असे म्हटले आहे. यानिमित्ताने मला एकच गोष्ट सांगावयाची आहे की, महाराष्ट्र सरकारचे कामगार विभागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. अनेक उद्योग देशोधडीला लागले, कामगार बेकार झाले. त्यामुळे ई.एस.आय.एस. चे उत्पन्न कमी झाले. नवीन कारखाने आणि तात्पुरत्या कामगारांच्या माध्यमातून किंवा अन्य माध्यमातून ई.एस.आय.एस. ला पैसे मिळत असतील. परंतु आपण आज महाराष्ट्रातील ई.एस.आय.एस. ची चौकशी करावी, त्यांची परिस्थिती कशी आहे? उदा. लालबागच्या महात्मा गांधी रुग्णालयाचे काय हाल झाले आहेत? एका जमान्यात हे रुग्णालय रुबाबात होते. मी लोकसभेत खासदार असतांना सर्व हॉस्पिटल्सना भेटी दिल्या होत्या.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

आणि त्यांची परिस्थिती प्रत्यक्ष पाहिली होती. आपण आरोग्य खाते पाहात आहात. या सगळ्या विभागाचे आरोग्य तपासून बघावे आणि त्यांच्यासाठी काय चांगले करता येईल ते करावे. केवळ कामगार म्हणून त्यांच्याकडे दुर्लक्ष करु नये अशी मला विनंती करावयाची आहे. यासाठी 4 कोटी 73 लक्ष रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. त्यामध्ये कोणत्या रुग्णालयांमध्ये कोणकोणत्या सुविधा देणार आहोत त्याची माहिती सदनाला द्यावी.

यानंतर मी पणन विभागाच्या बाब क्रमांक 257, पृष्ठ क्रमांक 215 च्या संदर्भात बोलणार आहे. यामध्ये सन 2006-07 या वर्षासाठी गाळप न केलेल्या ऊसाला वित्तीय सहाय्य यासाठी रुपये 83,89,76,000/- ची पुरवणी मागणी केलेली आहे. जो ऊस गाळप झाला नाही त्याची कारणे शोधावीत. केवळ ऊसाचे गाळप झाले नाही एवढेच लक्षात ठेऊ नका. अनेक साखर कारखान्याची माहिती आमच्याकडे उपलब्ध झालेली आहे. त्या त्या मतदारसंघात काम करणारे जे शेतकरी आहेत त्यांचा ऊस घेतला गेला. ज्यांनी त्यांना मते दिली नाहीत त्यांनी कारखान्यावर ऊस आणून सुध्दा त्यांचा ऊस परत पाठविलेला आहे. त्यामुळे अशा ऊसाचे गाळप झालेले नाही. राज्यकर्ते म्हणून काम करीत असताना तो काँग्रेस पक्षाचा आहे, तो राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे, तो शिवसेनेचा आहे, तो भारतीय जनता पक्षाचा आहे अशा दृष्टीने न बघता ती जनता आहे आणि जनता म्हणूनच त्यांच्याकडे पहावयास पाहिजे. मत कोणाला द्यावयाचे हा जनतेचा हक्क आहे. त्याबाबतीत सुडाच्या भावनेने कोणाला वागवले जाऊ नये याबाबतीत लक्ष द्यावे.

यानंतर बाब क्रमांक 254, पृष्ठ क्रमांक 214 च्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. यामध्ये शेतकऱ्यांना वित्तीय सहाय्य याकरिता रुपये 75,78,51,000/- ची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. हे शेतकऱ्यांसाठी वित्तीय सहाय्य आहे की, साखर कारखानदारांसाठी आहे याचा खुलासा केला तर बरे होईल. माझा प्रश्न असा आहे की, त्यांना व्याजाचा दर काय लावलेला आहे ? त्यांना कोणत्या व्याज दराने पैसे दिलेले आहेत ?

यानंतर बाब क्रमांक 255, पृष्ठ क्रमांक 214 च्या संदर्भात मला बोलावयाचे आहे. पंतप्रधान विदर्भ पॅकेज अंतर्गत व्याज अर्थसहाय्यासाठी तरतूद याकरिता यामध्ये रुपये 56,49,00,000/- ची

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ग्रामीण बँका, राष्ट्रीयकृत बँका, भूविकास बँका व नागरी सहकारी बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजासाठी, विदर्भ प्रदेशासाठी, पंतप्रधान विदर्भ पॅकेज अंतर्गत अर्थसहाय्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. माझा असा प्रश्न आहे की, शेतकऱ्यांचे मूळ कर्ज किती होते ? आपण बँकेच्या व्याजाची थकबाकी भरली आणि शेतकऱ्यांना सहाय्य केल्यामुळे किती शेतकऱ्यांना आत्महत्येपासून मुक्ती मिळाली याची माहिती द्यावी. बँक गब्बर झाल्या आणि शेतकरी बेकार झाले असे चित्र यातून उभे राहू नये अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. शिगम...

`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 18:20

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2007-2008च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृ.क्र.4 वरील बाब क्रमांक 1कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधित आहे. मतदारांना ओळखपत्रे देण्याचा कार्यक्रम चालू आहे. ओळखपत्रासाठी मतदारांचे फोटो काढण्यासाठी जेव्हा फोटोग्राफर येतात त्यावेळी लोडशेडिंगमुळे लाईट नसते. परिणामी मतदारांचे ओळखपत्रासाठीचे फोटो काढले जात नाहीत. तसेच हे फोटो चुकीच्या पध्दतीने काढले जात आहेत. नाव एक आणि व्यक्ती दुसरी अशा प्रकारे हे फोटो काढले जात आहेत. म्हणजे नाव जयंत प्रभाकर पाटील याचे आणि फोटो सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा, अशा पध्दतीने जवळपास 500 मतदारांचे चुकीचे फोटो काढण्यात आलेले आहेत. याबाबतीत चौकशी करुन जे चुकीचे फोटो काढलेले आहेत ते रद्द करावेत अशी या निमित्ताने मी मागणी करीत आहे.

महसूल विभागाच्या पृ.क्र.29 वरील बाब क्रमांक 42कडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधीत आहे. पनवेल, उरण तालुक्यामध्ये शेतक-यांच्या घेतलेल्या जमिनींचे साडेबारा टक्क्याने पैसे मिळायला लागले आहेत. हे शेतकरी बाजूच्या तालुक्यामध्ये जाऊन जमिनी घेऊन शेती करु इच्छित आहेत. परंतु त्या शेतक-यांना शेतकरी म्हणून दाखला दिला जात नाही. ज्या शेतक-यांच्या जमिनी सिडकोने ताब्यात घेतल्या त्या शेतक-यांना शेतकरी म्हणून दाखला मिळण्याची गरज आहे. त्यांना शेतकरी राहून दुसरीकडे शेती करावयाची आहे. तेव्हा त्यांना शेतकरी म्हणून दाखला देण्याचे काम महसूल विभागाने केले पाहिजे. हा मुद्दा कॅबिनेटमध्ये उपस्थित करुन तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, उरण, पनवेल आणि नवी मुंबई या सिडकोच्या परिसरामध्ये गावठाणाचा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. 10 वर्षानी गावठाणाचा विस्तार होत असतो. या विस्तारित गावठाणाला नवीन गावठाण देण्याची तरतूद राज्य शासनाच्या कायद्यानुसार आहे. नवी मुंबईच्या गावठाण विस्तारासाठी सिडकोने जागा ठेवलेली नाही. त्या परिसरामध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये गावठाण विस्तारासाठी जागा मिळाली पाहिजे.

नगरविकास खात्याच्या पान क्रमांक 58 वरील बाब क्रमांक 81कडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. खोब्रागडे आणि कामगार संघटनेचे नेते श्री. शरद राव यांची टी.व्ही.वर झालेली मुलाखत मी ऐकली. आपल्या मुलाखतीमध्ये ते म्हणाले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 18:20

(श्री. जयंत प्र. पाटील...)

की, "मातोश्रीवरुन मला आदेश आले, दिल्लीवरुन  आदेश आले किंवा मुख्यमंत्र्यांनी सांगितले तरी मी कामगारांना बोनस देणार नाही". सभापती महोदय, आय.ऐ.एस. अधिका-यांची ही मुजोरी आणि दादागिरी कोणाच्या जिवावर चाललेली आहे. हे शासन अधिकारी चालवित नाहीत तर आम्ही चालवितो. टी.व्ही.वर जेव्हा मी त्यांचे हे वक्तव्य ऐकले त्यावेळी माझ्या मनात चीड निर्माण झाली. सभापती महोदय, बेस्ट कोण चालविते. तर नगरसेवक जेथे निवडून जातात ती महापालिका बेस्ट चालविते. त्यांनी मुजोरीने सांगितले की, मी देणार नाही. ज्यावेळी आय.ए.एस. अधिकारी शासनाच्या वतीने प्रसारमाध्यमांना मुलाखती देतात त्यावेळी त्यांनी काय बोलावे, कसे बोलावे याबाबतचा शिष्टाचार घालून देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदय आहेत त्याचप्रमाणे आम्ही देखील आमदार आहोत. या विधिमंडळामध्ये सभागृहाच्या संमतीने कायदे होतात. लोकप्रतिनिधींना कशी वागणूक दिली पाहिजे यासंबंधी मी या सदनामध्ये अनेक वेळा मागणी केलेली आहे. त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे.

...नंतर श्री. जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, या ठिकाणी कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत त्यामुळे पुढील कॅबिनेट मिटिंगमध्ये यासंदर्भात चर्चा होण्याची आवश्यकता आहे. आय.ए.एस. अधिका-यांनी कसे वागावयास पाहिजे? परंतु या ठिकाणी वेगळेच चालले आहे. असे प्रकार आता का वाढावयास लागले आहेत याचा आपण कधी विचार केलेला आहे काय ? या सभागृहात जे कायदे तयार करण्यात आलेले आहे ते कोणासाठी तयार करण्यात आलेले आहेत ? आपण रेल्वेने प्रवास करतो त्यावेळेस दिसून येते की, सेक्रेटरी ए.सी. मधून प्रवास करतो व आमदार आणि राज्यमंत्री हे जनरलमधून प्रवास करीत असतात. या ठिकाणी आपण जे कायदे करतो ते कोणासाठी तयार करतो ? सन्माननीय सदस्यांनी आणि मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे असे मला वाटते. सभापती महोदय, आपण सुध्दा कधी तरी माजी आमदार किंवा माजी मंत्री होणार आहात हे विसरु नका. आपण काही कायमचा 7/12 घेऊन या ठिकाणी आलेलो नाही त्यामुळे या प्रश्नाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अधिका-यांनी आमदारांना कशी ट्रिटमेंट द्यावयाची यासंदर्भात निर्णय होण्याची नितांत आवश्यकता आहे. जे अधिकारी सन्माननीय सदस्यांना चांगली ट्रिटमेंट देत नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. त्यामुळे "म्हतारी मेल्याचे दुःख नाही परंतु काळ सोकावता कामा नये" हे आपण सर्वांनी लक्षात ठेवावे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 203, पृष्ठ क्रमांक 163 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. राज्य शासन सर्व विभागात संगणीकरण करीत आहे. त्यामुळे प्रत्येक खात्याने स्टाफ पॅटर्न तयार करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी राज्य शासनाचा पगारावर किती खर्च होतो याची माहिती या ठिकाणी दिलेली आहे. प्रत्येक विभागात संगणीकरण झाल्यावर त्या ठिकाणी स्टाफ पॅटर्न आणला तर शासनाचा खर्च निम्म्याने कमी होऊ शकतो. सभापती महोदय, मी मंत्रालयामध्ये कमीतकमी वेळा जात असतो. आमदार जर मंत्रालयात गेला तर शिपाई सुध्दा खुर्चीवरून उठत नाही अशी परिस्थिती आहे. मला अशा वागणुकीची लाज वाटते त्यामुळे मी मंत्रालयात कमीतकमी वेळा जात असतो. दिल्लीमध्ये गेलो आणि तेथील सेक्रेटरीला सांगितले की, मी आमदार आहे त्यावेळेस दिल्लीतील सेक्रेटरी रिस्पेक्टने उठून उभा राहतो. अशा प्रकारे दिल्ली आणि महाराष्ट्रातील मंत्रालयांमध्ये फरक आहे. आमदारांना मंत्रालयात

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

शिपाई धक्के मारतात, बायका धक्के मारतात अशी परिस्थिती असल्यामुळे मंत्रालयात कमीतकमी वेळा असतो.

सभापती महोदय, मी माझ्या बँकेच्या संदर्भात या ठिकाणी थोडक्यात माहिती देणार आहे. माझ्या बँकेत सुरुवातीला एकूण 1400 कर्मचारी होते परंतु संगणकीकरण झाल्यानंतर आणि स्टाफ पॅटर्न लागू केल्यानंतर आता माझ्या बँकेत केवळ 250 स्टाफ आहे. माझ्या बँकेच्या 50 शाखा असून 900 कोटी रुपयांचा व्यवहार चालतो. जे अतिरिक्त कर्मचारी होते त्यांना व्हीआरएस देऊन घरी बसवलेले आहे. त्यामुळे राज्यशासनाने सुध्दा स्टाफींग पॅटर्न आणून कर्मचा-यांची संख्या निम्म्यावर आणणे आवश्यक आहे. स्टाफींग पॅटर्नसंदर्भात नियोजन खात्याचे सचिव, अधिकारी काय करतात? कर्मचा-यांची संख्या कमी करण्याच्या संदर्भात सचिवांनी, अधिका-यांनी आतापर्यंत काय नियोजन केलेले आहे? शासनाने कर्मचा-यांची संख्या कमी करुन कर्मचा-यांचे पगार वाढविले तर माझा त्याला कसलाही विरोध राहणार नाही.

सभापती महोदय, मी व्हेज जेवत नाही परंतु कधी कधी माननीय गडकरी साहेबांसारख्या नेत्यांबरोबर मला व्हेज घ्यावे लागते. ज्यावेळी अशी परिस्थिती येते तेव्हा मी मुंबईतील सम्राट हॉटेलवर व्हेज खाण्यासाठी जात असतो. ज्यावेळेस मी सम्राट हॉटेलमध्ये जातो त्यावेळेस त्या ठिकाणी मंत्रालयातील कमीतकमी 50 टक्के स्टाफ जेवण घेण्यासाठी आलेले असतात. सम्राट हॉटेलमधील थाळीचा भाव 500 रुपये आहे. मला 500 रुपयाची थाळी परवडत नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे बँकेचे अध्यक्ष आहेत. ते जरी समाजवादी विचारसरणीचे असले तरी ते पुंजीपती आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, स्टाफ पॅटर्नमध्ये बदल होण्याची आवश्यकता आहे. आम्ही मंत्रालयात गेलो आणि बाजूने सचिव जात असतील तर सचिवांचा शिपाई आम्हाला बाजूला करून तो सचिवांना वाट करून देतो. आम्हाला लिफ्टसाठी रांगेत उभे रहावे लागते. मंत्रालयात आमदारांसाठी वेगळी लिफ्ट का ठेवण्यात आलेली नाही ? मी आपल्या माध्यमातून सर्व मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, ते कायम स्वरुपी मंत्री नाहीत. तेव्हा त्यांनी प्रशासनात नियोजन करण्याची गरज आहे.

बाब क्रमांक 258, पृष्ठ क्रमांक 215- सहकारावरील भांडवली खर्च - ज्या मध्यवर्ती बँकांची सभासदांना वीस टक्के लाभांश देण्याची कुवत आहे, परंतु सहकार विभागाने काढलेल्या जी.आर.मुळे बँकांना इच्छा असूनही त्यांच्या सभासदांना दोन टक्केपेक्षा जास्त लाभांश देता येत नाही. या संदर्भात नाबार्ड एक बोलते आणि राज्य शासन एक बोलते. ज्या मध्यवर्ती बँकांची आर्थिक स्थिती चांगली असतानाही ते सभासदांना जास्त लाभांश देऊ शकत नाही. तेव्हा यात बदल केला पाहिजे. ज्या बँका लिक्विडेशनमध्ये गेलेल्या आहेत, सभासदांच्या ठेवी देऊ शकत नाही अशा बँकांना दुसऱ्या बँकेत ॲडजेस्ट करण्याची परवानगी दिली पाहिजे. नाशिक येथील नाशिक श्रीराम बँकेत 40 कोटी रुपयांचे डिपॉझिटस् आहेत आणि बँकेवर 60 कोटींचे कर्ज आहे. तेव्हा खातेदारांचे डिपॉझीट वळते करून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

बाब क्रमांक 209, पृष्ठ क्रमांक 177- सार्वजनिक आरोग्य विभाग- कोकणातील रस्ते वेडेवाकडे असले तरी कोकणातील माणसे गोड आहेत, चांगल्या स्वभावाची आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाने गाड्यांसाठी 10 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु कोकणासाठी खास बाब म्हणून ही रक्कम 15 हजार रुपयांपर्यंत वाढवावी अशी मी मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.जयंत प्र.पाटील...........

बाब क्रमांक 61,पृष्ठ क्रमांक 39- सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात रोहयो अंतर्गत लावण्यात आलेल्या डाळींबाच्या फळबागांवर तेल्या रोग पडलेला आहे. त्याचे अजून निदान होत नाही. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील त्या जिल्ह्यातील असल्यामुळे ते चांगली माहिती देऊ शकतील. सभापती महोदय, मागील आठवड्यात सोलापूर जिल्ह्यात गेलो होतो. त्याठिकाणी डाळींबावर तेल्या रोग पडल्याचे अनेक शेतकऱ्यांनी सांगितले. या तेल्या रोगाचे निदान होईपर्यंत या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे. तसेच तेल्या रोगाचे निदान युध्दपातळीवर करून शेतकऱ्यांना दिलासा दिला पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2007-2008 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 255, पृष्ठ क्रमांक 214--पंतप्रधान विदर्भ पॅकेज अंतर्गत व्याज अर्थसहाय्यासाठी रुपये 56 कोटी 49 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. याठिकाणी अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांनी ग्रामीण बँका, राष्ट्रीयकृत बँका, भूविकास बँका व नागरी सहकारी बँका यांच्याकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजासाठी, विदर्भ प्रदेशासाठी, पंतप्रधान विदर्भ पॅकेज अंतर्गत अर्थसहाय्य देण्याचे ठरविण्यात आले आहे. या प्रस्तावास रुपये 56 कोटी 49 लाख एवढी रक्कम अंदाजित करण्यात आलेल्या एकूण खर्चाचा समावेश आहे. हा खर्च पंतप्रधान विदर्भ पॅकेजमधील 50 टक्के राज्याच्या हिश्याशी अनुरुप आहे. आता अर्थसंकल्पात याची तरतूद करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, पंतप्रधान योजनेंतर्गत केंद्र सरकारने जिल्हा सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, नागरी सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज माफ करण्यासाठी 50 टक्के भार उचलला असून राज्य सकरारने उर्वरित 50 टक्के भार उचलावा, असे या पॅकेजमध्ये आहे. केंद्र सरकारचा हिस्सा बँकापर्यंत पोहचून 6 महिन्यांचा कालावधी लोटलेला आहे, परंतु राज्य सरकारचा वाटा मात्र अजूनपर्यंत पोहचलेला नाही. आज आमच्याकडील नागरी सहकारी बँका एनपीएमुळे अडचणीत आलेल्या आहेत. त्या बँकांना केंद्र सरकारकडून वाटा मिळालेला आहे, परंतु राज्य सरकारचा वाटा अजूनपर्यंत मिळालेला नाही. त्यामुळे राज्यातील नागरी सहकारी बँकाकडून एकूण किती रुपयांचे प्रस्ताव आपल्याकडे आले आहेत ? आपण याठिकाणी 56 कोटी रुपयांची मागणी केलेली असून ही मागणी जर आपण विदर्भातील बँकाना देण्यासाठी केली असेल तर ती कदाचित अपूरी पडू शकेल. त्यातून काही बँकांना पैसा मिळेल व काही बँकाना पैसा मिळणार नाही. त्यामुळे याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे की, एकंदरित किती बँकांनी किती रुपयांचे प्रस्ताव पाठवले व सदरचे पैसे आपण कधी देणार ?

बाब क्रमांक 256, पृष्ठ क्रमांक 214--ग्रामीण सहकारी पत संस्थांना वित्तीय सहाय्य-वैद्यनाथन समितीला अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने रुपये 21 कोटी 93 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. यामध्ये राज्य शासन, भारत सरकार व नाबार्ड यांच्यात झालेल्या

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सामंजस्य कराराप्रमाणे प्रा.वैद्यनाथ समितीच्या शिफारशीनुसार प्राथमिक कृषी पत संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्या एकत्रित हानीच्या रकमेची बहुसंखेने केंद्र सरकारकडून भरपाई करण्यात यावयाची आहे. त्यानुसार राज्याचा हिस्सा म्हणून रुपये 21 कोटी 93 लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी ही पुरक मागणी करण्यात आलेली आहे. राज्यातील भ्रष्टाचाराने बुडित निघालेल्या बँकाही या मागणीमुळे तरणार आहेत. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील 150 कोटी रुपयांच्या रोखे घोटाळयाची चौकशी एक वर्षापासून ठप्प झाली आहे. बँकेतील तत्कालीन अध्यक्ष या घोटाळयातील मुख्य आरोपी आहेत. त्यांच्या कार्यकाळात विविध दलालामार्फत रोख्यामध्ये प्रचंड रकमा गुंतविण्यात आल्या आणि त्या आजवर परत मिळालेल्या नाहीत. या घोटाळयाची चौकशी करण्यासाठी सहकार आयुक्त, पुणे यांनी श्री.यशवंत बागडे यांची चौकशी समिती नियुक्त केली होती. सहकार कायद्याच्या कलम 88 अन्वये बँकेच्या संचालक मंडळाची सदर घोटाळयातील जबाबदारी निश्चित करण्यासाठी चौकशी सुरु करण्यात आली होती. ही जबाबदारी श्री.बागडे यांच्यावर सोपविण्यात आली होती. त्यांनी सुरुवातीला चौकशी वेगाने केली. फिर्यादीच्या बहुतेक साक्षी पूर्ण केल्या परंतु आरोपींपैकी कोणालाही साक्षीस बोलावले नाही. नियमाप्रमाणे आर्थिक घोटाळयाची चौकशी निश्चित करुन तेवढी रक्कम संचालकांकडून वसूल केली जाते. परंतु या बँकेबाबत सर्व कारवाई गेल्या दोन वर्षापासून थंड बस्त्यात पडून आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ प्रथम श्री.पुरी..... 18:40

श्री.पांडुरंग फुंडकर........

सध्या सहकार आयुक्तांनी नागपूर व वर्धा या दोन जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँकांच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. निवडणुका होणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने या बँकांकडून मतदारांची यादी मागविली आहे. सहकार मंत्र्यांकडे कलम 88 च्या कार्यवाहीला स्थगिती मिळविण्यासाठी प्रकरण प्रलंबित असण्याचे कारण दाखवून तत्कालीन भ्रष्ट अध्यक्षांना ही निवडणूक लढविण्यासाठी मुभा दिली जाईल, असा प्रयत्न करण्यात येत आहे. मात्र हे होता कामा नये. संचालकांनी व अध्यक्षांनी बँक ाढली असतांना अशा बँकांच्या लुटली. संचालक कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार करतात, अशी हानी कशासाठी हानी काढायची ? एका बाजुला शेतक-याला पैसे देण्यास राज्य सरकार मागेपुढे पहाते आणि बँकांमधील भ्रष्टाचार भरुन काढण्यासाठी आपण पैसे देतो. हा एकत्रित भार उचलण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, उद्योग विभागाची बाब क्रमांक 172 संबंधी मी बोलणार आहे. सामाजिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मोठया व मध्यम उद्योगांना अर्थसहाय्य या शीर्षाखाली ही मागणी दाखविण्यात आली आहे. मे.रिलायबल इंडस्ट्रिजला खामगाव एम.आय.डी.सी.मध्ये डी-28 भूखंड मंजूर करण्यात आला होता. त्या ठिकाणी उद्योग उभा करण्यासाठी महाव्यवस्थापकांनी सिकॉम यांच्याकडून अर्थसहाय्य घेतले, बँकांकडून घेतले. बँकेकडून अर्थसहाय्य घेऊन ते पैसे सिकॉमला दिले. बँकेचे कर्ज थकले म्हणून बँकेने इंडस्ट्रि ताब्यात घेतली. पैसे वसूल करण्यासाठी रेणुका ऑईल इंडस्ट्रिजने ती लिलावात विकत घेतली. लिलावाव्दारे ताब्यात घेतलेल्या रिलायबल इंडस्ट्रिजचा भूखंड हस्तांतरीत करण्यात आलेला नाही. यासंबंधी लेखी पत्र दिले गेले. ते पत्र उद्योग विभागाकडे पडून आहे. शासनाने अशी माहिती दिली की, एखादा उद्योग घटक बंद पडला तर सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळविण्यासाठी विक्रीकर रक्कमेची प्रतिपूर्ती, कामगारांची देणे दिल्याचे प्रमाणपत्र

....2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

सादर करणे आवश्यक आहे, हे सादर केल्यानंतर भूखंड हस्तांतरीत होईल. ही अट टाकल्यामुळे एखाद्याने एमआयडीसीचा प्लॉट विकला तर हे प्रमाणपत्र आणल्याशिवाय प्लॉट हस्तांतरीत होत नाही. त्यामुळे बँकेचे कर्जही मिळत नाही. आजारी उद्योगाना वर काढावयाचे असेल तर मला वाटते प्लॉट त्यांच्या नावे करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले पाहिजे. रिलायबल इंडस्ट्रिजचा प्रस्ताव ब-याच वर्षांपासून प्रलंबित आहे. तो मंजूर केला नाही तर एक मोठे युनिट बंद होणार आहे, एवढेच या निमित्ताने सांगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

.....3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 28 बाबत बोलतांना मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शिवाजीनगर येथे नवीन पोलीस स्टेशन झाले आहे, मात्र अद्याप इमारत नाही. इमारत होण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य कार्यवाही करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गृह विभागाच्या बाब क्रमांक 28 बाबत एक बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, बीड येथे कारागृह आहे. त्यामध्ये महिला राजबंदींसाठी कक्ष नसल्यामुळे क्रिमिनल बंद्यांबरोबर राजबंदी महिलांना रहावे लागते. त्या ठिकाणी एकच बॅरक आहे. राजबंदी महिलांसाठी स्वतंत्र बॅरक निर्माण करण्याची विनंती मी या निमित्ताने करते.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 33 संबंधी बोलतांना एक बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, बीड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर भूसंपादनाचे काम सुरु असून भूसंपादनाची कार्यवाही कलम 28 अ या टप्प्यावर प्रलंबित आहे. याचे कारण असे आहे की, त्या ठिकाणी पुरेसा कर्मचारीवर्ग नाही. या बाबीची शासनाने ताबडतोब दखल घ्यावी आणि भूसंपादनासाठी कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा.

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ........

सभापती महोदय, बाब क्र.127 रेव्हरीचा जो एम.आय. टँक आहे त्यामध्ये अनेक वर्षापासून एक थेंबही पाणी साठत नाही. तेव्हा सिंदेवाडीचा एम.आय. टँक, रेव्हरीचा एम.आय. टँक, करेवाडी तालुका परळी येथील साठवण तलाव आणि मनकरनिकेचे दोन्ही कॅनॉल दुरुस्त करण्यात यावेत. मागील वर्षी मनकरनिकेच्या डाव्या आणि उजव्या कॅनॉलचे काम करण्यात आले आहे. त्याची चौकशी करावी. कारण त्या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.

सभापती महोदय, बाब क्र.159 परळी येथे न्यायालयाची इमारत बांधणे गरजेचे आहे. न्यायालयाचे कामकाज नगरपालिकेच्या रेस्ट हाऊसमध्ये चालते. न्यायालयासाठी इमारत नाही. नगरपालिकेचे रेस्ट हाऊस जुने असल्यामुळे ते गळते, फार वाईट अवस्था आहे. त्या ठिकाणच्या विधीज्ञांनी औरंगाबादला माननीय मुख्यमंत्री महोदयांची भेट घेऊन न्यायालयाची इमारत बांधण्यासंदर्भात मागणी केलेली आहे. न्यायालयाची इमारत नाही याची दखल घेण्यात यावी.

सभापती महोदय, बाब क्र.212 महिला रुग्णालय नेकनूर या रुग्णालयावर हा खर्च केला जाणार आहे. खरे म्हणजे ही अभिनंदनीय बाब आहे. पण त्याच बरोबर बीडमध्ये जी सिव्हील हॉस्पिटल्स आहेत तेथे एक्सप्रेस फिडर नाहीत. अनेक वेळा वीज जाते. बीड जिल्हयातील दवाखान्यांमध्ये हा प्रश्न नेहमी उद्भवत असतो. सिव्हील सर्जन यांनी एक्सप्रेस फिडरची मागणी शासनाकडे अनेक महिन्यांपूर्वी केलेली आहे त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पवनेर हे गोदाकाठचे गाव आहे. अतिवृष्टीमुळे पूर आला तर पवनेर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तेथील क्वॉटर्ससह पूर्णपणे पाण्याखाली जाते. तेथील प्राथमिक आरोग्य केंद्र क्वॉटर्ससह दुस-या ठिकाणी बांधणे गरजेचे आहे, ही अनेक वर्षापासूनची मागणी आहे. शिरसा प्राथमिक आरोग्य केंद्राचे क्वॉटर्स पडलेल्या अवस्थेत आहेत. तेथे डॉक्टर्स राहतात आणि प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारती पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम ताबडतोब करण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.253 रेशीम किडयांचे कोश खरेदी करण्यासंदर्भात आहे, याला माझा पाठिंबा आहे. बीडमध्ये रेशीन संकुल उभे करण्यासाठी संबंधीत अधिका-यांनी शासनाकडे अडीच कोटी रुपयांची मागणी केली होती. परंतु 57 का 76 लाख रुपयेच देण्यात आले. आमच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ........

शेजारी जे मंत्री महोदय बसलेले आहेत त्यांच्या जिल्हयामध्ये रेशील संकुलाचा फार मोठा प्रकल्प आपण उभा करीत आहात. आमचा जिल्हा आपल्या बाजूचा जिल्हा आहे. रेशील संकुलासाठी पैसे कमी दिलेले आहेत. रेशीम संकुलासाठी पूर्णपणे अडीच कोटी रुपये द्यावेत. बीड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर रेशीम लागवड झालेली आहे. त्याचे उद्योगामध्ये जर परिवर्तन करावयाचे असे तर प्रशिक्षणासाठी आम्हाला मदत करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्र.260 या ठिकाणी उल्लेख करण्यात आला की, बँकांकडून कर्ज मिळण्यासाठी आपण मदत करतो. यासंदर्भात मला एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, महाराष्ट्रामध्ये महिला बचत गटाच्या 33 जिल्हा को-ऑपरेटीव्ह पतसंस्था आहेत. त्या मागच्या सहा वर्षापासून काम करीत आहेत. सहकारी पतसंस्था असल्यामुळे नाबार्ड त्या या बचत गटांना कर्ज देण्यास तयार नाही. एन.एस.सी. बँकेने फक्त दोन जिल्हा पतसंस्थांना कर्ज दिलेले आहे. सांगलीमध्ये ब-या प्रमाणात कर्ज मिळालेले आहे आणि बीडमध्ये अत्यल्प प्रमाणात कर्ज मिळालेले आहे. या 33 जिल्हा पतसंस्थांच्या कर्ज पुरवठयाचा प्रश्न कसा मार्गी लावावयाचा यासंदर्भात सहकार विभागाने ताबडतोब बैठक घ्यावी आणि बचत गटासाठी धडपड करणा-या माझ्या ग्रामीण भागातील महिलांना मदत मिळवून द्यावी. रोजगार हमी योजना राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी 22 तारखेला तारांकित प्रश्न दिला होता. परंतु तो लागला नाही. बीड जिल्हयामध्ये आम्ही 37 वर्षापासून रेल्वेची मागणी करीत आहोत. केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला विनंती केलेली आहे की, तुम्ही 50 टक्के कर्जाचा वाटा उचलावा. बीड जिल्हा मागासलेला जिल्हा आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामातून महाराष्ट्रात आलेला हा जिल्हा आहे. केवळ रेल्वे नसल्यामुळे या जिल्हयाचा विकास होत नाही. महाराष्ट्र शासनाने 50 टक्के कर्जाचा वाटा उचलण्यासंदर्भात केंद्र सरकारचे दीड वर्षापूर्वी महाराष्ट्र शासनाला पत्र आलेले आहे. परंतु महाराष्ट्र शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अनेक वेळा आम्ही मागणी केलेली आहे की, माती काम, खडी काम रोजगार हमी योजनेतून करा आणि अशी हमी केंद्र शासनाला द्या. अडिचशे कोटींच्या तांत्रिक मंजुरीचे पत्र केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे. संपादित झालेल्या गावांच्या सेक्शन 4 च्या फाईल्स लॅप्स झालेल्या आहेत. हा बीड जिल्हयाच्या विकासाच्या

..3...



GRB/ प्रथम श्री.रोझेकर ......... 18:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ........

अस्तित्वाचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना माझी विनंती आहे की, आपण फक्त मुंबईच्या प्रश्नावर सेंसेटीव्ह होऊ नका. बीड जिल्हयामध्ये सुध्दा आपले नेते आहेत. बीड जिल्हयाच्या रेल्वेच्या प्रश्नावर ते नेहमी बोलतात. याला आपण पाठिंबा द्यावा आणि सभापतींचे लक्ष आपण वेधून घेऊ नये, अशी माझी आपल्याला विनंती आहे. मी रोजगार हमी योजना राज्यमंत्र्यांना विनंती करते की, आज कॅबिनेट मंत्र्यांनी बैठक लावली होती. परंतु तेथेही आमचे दुर्दैव आडवे आले. आज कॅबिनेट मंत्र्यांनी लावलेली बैठक देखील पुढे ढकलण्यात आली. रोजगार हमी योजना राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. ते उत्साहाने काम करतात.

यानंतर कु.जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ प्रथम श्री.बोरले..... 18:50

श्रीमती उषाताई दराडे........

लातूर जिल्हयात रेल्वे उत्साहाने धावत आहे. बीड जिल्हयाच्या रेल्वेसाठी माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांनी पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून सभागृहामध्ये 41 कोटींची तरतूद मातीकामासाठी करीत असल्याची दिसले याचे मला आश्चर्य वाटले. पण आम्हाला ई.जी.एस.साठी 100 कोटी रुपये द्यावेत,अशीही यानिमित्ताने मी मागणी करीत आहे. कारण आमचे लोक कशासाठी ऊसतोड कामगार म्हणून जातात 14 वर्षाच्या मुली ऊसतोडीसाठी जाता यावे म्हणून गर्भपात करुन घेतात ऑगस्टमध्ये गर्भपाताची संख्या मोजा, ती किती आहे,यावरुन लक्षात येईल. बीड जिल्हयामध्ये ऊसतोड कामगार नवऱ्याबरोबर जोडीदार म्हणून जाण्यासाठी 18 वर्ष पूर्ण होण्याच्या आधी स्त्रिया बेकायदेशीर विवाह करतात. कारण 18 वर्ष पूर्ण होईपर्यंत त्यांना वेळ नसतो. काही विवाहित गरोदर महिला नव-याबरोबर ऊसतोडीचे काम करण्यासाठी फडामध्ये जातात आणि तेथे त्या अशा अवस्थेत काम करु शकणार नाहीत म्हणून गर्भपात करुन घेतात. ही परिस्थिती जर बदलावयाची असेल तर बीड जिल्हयात सिंचनाबरोबर रेल्वेही आवश्यक आहे. यानिमित्ताने माझी माननीय राज्यमंत्र्यांना विनंती आहे की, आम्हाला यासंदर्भात तरतूद करण्याबाबतची होकारार्थी ठोस असे आश्वासन द्यावे.

महोदय, बांधकाम खात्याच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर आम्ही निजामाच्या राज्यातून, हैद्राबादमधून या महाराष्ट्र राज्यात विलीन झालेलो आहोत, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर आजपर्यंत देखील कुंजेवाडी आणि पेठेवाडी येथे अजून पायी जाता येत नाही, अशी रस्त्यांची दुरवस्था आहे.

श्री.विनोद तावडे : बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या आज नाहीत.

श्रीमती उषाताई दराडे : ठीक आहे, ज्यावेळी बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहामध्ये चर्चेला येतील त्यावेळी मला पुन्हा बोलण्याची संधी मिळेलच असे नाही, परंतु आज येथे आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद. आज या ठिकाणी मी ज्या पुरवणी मागण्यांवर चर्चा केली, त्या चर्चेला माननीय रोजगार हमी योजना मंत्री उत्तर देतील, बीड जिल्हा आपल्याकडे मोठया अपेक्षेने पाहत आहे, अशी अपेक्षा करते आणि माझे दोन शब्द संपविते.

------

.....2

27-11-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3V - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवृत्त होणा-या सदस्यांना देण्याबाबत.......**

**उप सभापती** : निवृत्त होणा-या सदस्यांना निरोप देण्याचा कार्यक्रम उद्या घेण्यात येईल. यानंतर आणखी एक घोषणा अशी करण्यात येत आहे की, उद्या दिनांक 28 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.45 ते 12.45 पर्यंत घेण्यात येईल. या सभागृहाच्या विशेष बैठकीमध्ये सर्व अर्धा-तास चर्चेच्या सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता भरेल.

श्री.दिवाकर रावते : सभागृहाचे आजचे कामकाज कधी थांबेल ?

**उप सभापती** : या पुरवणी मागण्यांवरील चर्चा संपल्यानंतर सभागृहाचे आजचे कामकाज थांबेल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.......3

**पृ.शी./मु.शी.**: सन 2007-08 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

( चर्चा पुढे सुरु......

श्री.रमेश निकोसे ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 05, बाब क्रमांक 06, सामान्य प्रशासन विभाग, सभापती महोदय, ज्यावेळी खैरलांजीमध्ये दलितावर अन्याय होऊन दलितांची हत्या झाली, त्यांचे रक्त सांडले, त्यावेळी संपूर्ण महाराष्ट्रभर किंबहुना देशभर त्याचा गवगवा झाला. आज मात्र ठिकाणी शासकीय सेवेमध्ये काम करणा-या दलित महिलेवरती अन्याय झालेला आहे. "तलवार चलायी जाती है, बडी आहिस्ता आहिस्ता "बहोत आहिस्ता आहिस्ता तलवार चलायी जाती है. सामान्य प्रशासन विभागाच्या मंत्र्यांचे मी मुद्दाम या ठिकाणी लक्ष वेधू इच्छितो की, शासकीय सेवेमध्ये 30 वर्षापासून लघुलेखिकेचे काम करणारी श्रीमती अनुजा मोरे या दलित महिलेला तेथील एका अधिका-याबरोबर बिनसल्यामुळे काढून टाकण्यात आले. त्यानंतर ती मॅटमध्ये गेली असता मॅटने असा निर्णय दिला की, सदर महिलेने एकूण 30 वर्ष सेवा केली असल्याकारणाने अशा प्रकारे तिला सेवेतून काढता येणार नाही, परंतु त्या महिलेला सदर पदासाठी आवश्यक त्या परीक्षा पास करण्याची अट घातली. सदर महिला मॅटच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक त्या परीक्षा उत्तीर्ण झाली तरी देखील दोन वर्षापासून तिला तिच्या मूळ पदावर रुजू करुन घेण्यात आलेले नाही. सामान्य प्रशासन हा विभाग माननीय मुख्यमंत्र्याकडे असून सदर महिलेची फाईल आता त्यांच्याकडे येणार आहे. सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी श्री. बक्षी यांनी या प्रकरणाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन सदर फाईल पुढे नेण्यासाठी खालच्या अधिका-यांना दाटले. सदर फाईलचा माननीय मुख्यमंत्र्यांनी सहानुभूतीपूर्वक विचार करावा.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

Article 14, 16, 16(3), 46 and 335 of the Constitution, Article 46 states that 'The State shall promote with special care the educational and economic interests of the weaker sections of the people, and, in particular, of the Scheduled Castes and the Scheduled Tribes, and shall protect them from social injustice and all forms of exploitation'. घटनेने 'all forms of exploitation' हा शब्द वापरला आहे. परंतु माननीय मुख्यमंत्री किंवा संबंधित मंत्र्यांकडे ज्यांचे काम करावयाचे आहे, त्यांच्या अर्जावर लिहिले जाते की, "विशेष बाब म्हणून बदली करण्यात यावी". "विशेष बाब म्हणून असे करण्यात यावे" आणि शेडयुल कास्ट व ट्राईबसाठी "तलवार चलाई जाती है बहुत अहिस्ता-अहिस्ता, बहुत अहिस्ता-अहिस्ता तलवार चलाई जाती है" हे थांबले पाहिजे. माननीय महिला व बालविकास राज्यमंत्री सभागृहात आले आहेत. परंतु ते बिचारे निर्णय घेऊ शकत नाही. महिला बालकल्याण व पोषण आहारावर मी बोलत आहे. याबाबत मुंबई, नांदेड, पुणे, नागपूर येथील लोकांचे डेलिगेशन माननीय श्री.हर्षवर्धन पाटील व बालकल्याण मंत्री यांच्याकडे भेटले. परंतु त्यांनी सांगितले की, अधिवेशनानंतर पाहू.

सभापती महोदय, एकात्मिक बालकल्याण विभागामध्ये कशा प्रकारचा गोंधळ चाललेला आहे. सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे की, 6 हजार पेक्षा जास्त अंगणवाडया शासनाला उघडावयाच्या आहेत. खेडयापाडयापासून स्लॅम एरियापर्यंत या अंगणवाडया उघडावयाच्या आहेत. परंतु त्याची कोणत्याही प्रकारची वाटचाल सुरु झालेली नाही. सप्टेंबर महिन्यात शालेय पोषण आहाराचे शहरी विभागासाठी टेंडर मागविण्यात आले. मी माननीय मंत्री महोदयांना म्हटले आहे की, याबाबत 2-3 जी.आर. आहेत ते वाचा. सुप्रीम कोर्टाने सांगितले आहे की, दोन वर्षापर्यंत या उत्पादकांना व लोकांना डिस्टर्ब करु नका. पण तरीसुध्दा टेंडर मागविण्यात आले. महाराष्ट्रात हे काय चालले आहे ? महाराष्ट्रातील 34 जिल्हयांना वगळून टाकले आणि फक्त नागपूर व मुंबईमध्ये टेंडर मागविण्यात आले. सुप्रीम कोर्टाने फक्त नागपूर व मुंबईसाठी आदेश दिला होता का ?. नाही, पण तसे झाले नाही. एकदा टेंडर मागविले व नंतर त्यानंतर पुन्हा टेंडर मागविले. ज्यांनी

पैसे पाठविले, डी.डी. ने पैसे पाठविले ते तसेच पडून आहेत. या महिन्यात 23 तारखेला पुन्हा

.....2

श्री.रमेश निकोसे .....

टेंडर मागविण्यात आले व तेथे लोकांनी टेंडर भरले आहे. मुंबई व सर्व महाराष्ट्रातून याबाबत लोक आलेले आहे. मंत्री महोदयांना मी सांगितले आहे परंतु माननीय राज्यमंत्री हा निर्णय घेऊ शकत नाही, ही दुर्दैवाची बाब असून अत्यंत खंत वाटतो. सर्व निर्णय कॅबिनेट मंत्र्यांना घ्यावयाचा आहे. येथे जे राज्यमंत्री बसले आहे, ते लिहून घेतील परंतु निर्णय कॅबीनेट मंत्र्यांना घ्यावयाचा आहे. सभापती महोदय, काय चालले आहे ते वाचून दाखवितो. "एकात्मिक सेवा योजनेअंतर्गत मुंबई व नागपूर जिल्हयात आंगणवाडयाच्या सकस आहार कामाच्या वाटपाबाबत जिल्हास्तरीय समितीमध्ये 2007 मध्ये निविदा काढलेल्या असणे, सदर निविदेविरुध्द उच्च न्यायालय मुंबई, नागपूर, औरंगाबाद खंडपीठात सादर केलेल्या रिट याचिका, सदर याचिकेवर औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या स्थगनादेश" याबाबत श्री.जयंत प्र.पाटील बोलले आहे, ते बरोबर बोलले आहेत. त्यांनी सांगितले आहे की, औरंगाबाद खंडपीठाने जो निर्णय दिला आहे, तो फक्त औरंगाबाद शहरासाठीच आहे का ? काय ते कमीशनर, काय ते सेक्रेटरी, ते काय करतात, मंत्र्यांची देखील दिशाभूल का करतात, हे काय चालले आहे ?. याबाबत पुढे वाचून दाखवितो. "शासनाने न्यायालयाच्या आदेशाची अवहेलना करणे, सदर निविदेच्या आधारे दिलेला आदेश"

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)**

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे.....

सदर सकस आहार योजनेमधील अटी व शर्थीचे पालन न करता न्यायालयाची अवहेलना केलेली आहे. महिला बचत गट व महिला मंडळ यांना सदर निविदा भरण्याचे आदेश न्यायालयाने स्पष्टपणे दिलेले असले असतानाही शासनाने पुरुष सभासद असणाऱ्या संस्थांना सकस आहार योजनेच्या वाटपाचे कामाचे वाटप केले.सन्मान सेवा सहकारी संस्था, श्रीसंकल्प सेवा सहकारी संस्था कृपा सेवा सहकारी संस्था अशा अनेक पुरुष सभासद असणाऱ्या संस्थांना कामाच्या वाटपाचे आदेश देण्यात आलेले आहे. निविदेची मुदत संपलेली असून देखील गोरेगाव पूर्व येथे नव्याने बचत गट स्थापन करण्यात आला होता त्या बचत गटास कामाची ऑर्डर देण्यात आली. अशाप्रकारे अनेक जुन्या बचत गटांना डावलून अशा प्रकारे आदेश देण्यात आली. तीन बचत गटांकडे आवश्यक असणारे कागदपत्र नसताना देखील त्यांना कामाची ऑर्डर देण्यात आली. नवीन महिला बचत गटांना 1 ऑक्टोबर 2007 पासून सकस आहार योजनेमधून कोणत्याही कामाचे वाटप न केल्याने मुंबईमधील 3 लाख 50 हजार मुले सकस आहारापासून वंचित राहिलेली आहेत.

सभापती महोदया, या खात्यामध्ये आता एक जी आर. काढला जातो त्यानंतर लगेच दुसरा जी. आर. काढला जातो त्यानंतर तिसरा जी. आर. काढला जातो. या खात्यामध्ये हे काय चालू आहे ?

**तालिका सभापती** ( श्रीमती उषाताई दराडे ): सन्माननीय सदस्यांनी मागण्यांविषयी बोलावे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी महिला व बाल कल्याण विभागाच्या मागण्या संदर्भातच बोलत आहे. मुलांना सकस आहार न पुरविल्यामुळे मुंबईमधील 3 लाख 50 हजार मुले सकस आहारापासून वंचित राहिले. आम्ही त्यांना सांगितले की, बचत गट आणि महिला मंडळ यांना आपण 50-50 असे कामाचे वाटप करावे. ज्यांच्याजवळ महानगरपालिकेचा परवाना आहे, ज्यांच्याकडे फूड ॲड ड्रग्ज डिपार्टमेंटचा परवाना आहे अशा बचत गटाला आपण काम दिले पाहिजे. परंतु शासनाने ज्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नाही त्यांना काम देऊन टाकले. यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे. मी सन्माननीय मंत्री महोदय, श्री. हर्षवर्धन पाटील यांना विनंती करतो की, त्यांनी माझ्या भावना संबंधित मंत्र्यांकडे पोहचवाव्यात.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश  निकोसे.....

तसेच यासंदर्भात स्टे आणून अटी आणि शर्थी निर्माण करुन टेंडर शासनाने मागवावे ज्यामुळे हा प्रश्न सुटू शकेल.

सभापती महोदया, मी आता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या  बाब क्रमांक 210,211 यावर बोलणार आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी आदेश काढला होती की बॅकलॉग भरण्यात यावा. मी आपणास याबाबत एक उदाहरण देऊ इच्छितो. डॉ. विजया मोडक, हिवताप अधिकारी, नागपूर, ही एकच मागासवर्गीय दलित  महिला  संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नोकरीवर होती. या एका दलित महिलेने  11 लोकांना नोकरी मिळवून दिली. या लोकांना नोकरी मिळवून दिल्यानंतर कोणी तरी तक्रार केल्यामुळे, या प्रकरणी भ्रष्टाचार झालेला आहे म्हणून त्या 11 लोकांना निलंबित केले गेले व त्यानंतर या महिलेला देखील निलंबित करण्यात आले. या प्रकरणास एक वर्ष झाले दीड वर्ष झाले. मी माननीय मंत्री श्री. रणजित कांबळे यांना विचारले. परंतु ते काहीही करु शकत नाही. निर्णय घेणाऱ्या  कॅबिनेट मंत्री महोदया, श्रीमती विमलताई मुंदडा यांच्याकडे मी गेलो.  हा दलितांवर अन्याय आहे असे मी त्यांना सांगितले. त्यासंदर्भात माहीतीच्या अधिकाराचा वापर करुन मी माहिती घेतली. या संदर्भात आरोग्य खात्याने मला एका पानाची माहिती पाठविली. अशाच प्रकारे वाशी, लातूर येथे देखील भ्रष्टाचार झाला होता. परंतु भ्रष्टाचार करणाऱ्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले नाही. मी या संदर्भात विचारले त्यावेळी मला सांगण्यात आले की, बाकीच्या जिल्हयामध्ये ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत त्यासंबंधी शासन विचार करीत आहे.  असे बिनासहीचे पत्र पाठविले. हे आरोग्य खाते आहे काय ? मी त्यांना कळविले की, अशाप्रकारे बिनासहीचे पत्र पाठविणाऱ्या आरोग्य संचालकांना बडतर्फ करा.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यंना विनंती आहे की, आपण कृपया मागण्यांच्या संदर्भात बोलावे.

श्री. रमेश निकोसे :  सभापती महोदय, मी आता शालेय शिक्षण, बाब क्रमांक 69,70,71 याविषयी  आता बोलणार आहे. भंडारा जिल्हयामध्ये एका महिलेने लघुलेखिका म्हणून 16 वर्ष काम केले होते. ते उपोषणाला बसले होते म्हणून 18 लोकांची नावे उप संचालक, शिक्षण विभागाकडे पाठविली. फक्त या महिलेचे नाव पाठविण्यात आले नाही. या संदर्भात ती महिला

..3..



श्री. रमेश निकोसे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

लेबर कोर्टामध्ये गेली. लेबर कोर्टाने सांगितले की, या महिलेला पुन्हा नोकरीवर घेण्यात यावे. रमेश निकोसे गरीब है अपने इमान को बेचता नही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

**तालिका सभापती** : इतर सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांना बोलताना व्यत्यय आणू नये. आपल्याकडे अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे व आपल्याला वेळेची मर्यादा आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदया, आकडे सांगण्याचे काम सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते करीत असतान. मी आकडेवारी सांगत नाही. आपण फक्त माझ्या भावना ऐकून घ्याव्यात.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ कु. गायकवाड नंतर --- 19:05

श्री. निकोसे ....

त्या महिलांच्याबाबतीत लेबर कोर्टाने, हायकोर्टाने सांगितले आहे की, त्यांची केस मंजूर करा. परंतु अजूनही काहीही केलेले नाी. मी जीएडीला देखील याबाबत विचारणा केली पण काहीही उपयोग झ ाला नाही. सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री श्री.पुरके साहेबांनीदेखील सांगितले. परंतु त्यांनी त्याची फाईल परत पाठविली.

सभापती महोदया, महसूल विभागाची बाब क्रमांक 30, 31, 32, 33 यावर मी आता बोलणार आहे. कामगारांच्या हौसिंग सोसायट्यांच्या संदर्भात मला येथे सांगावयाचे आहे. मी देखील एका कामगाराचाच मुलगा आहे. कामगार काही आपले घर बांधू शकत नाही तसा मी देखील आमचे घर बांधू शकलो नाही. एम्प्रेस मिल बंद झाल्यानंतर आम्ही एक सोसायटी करून तेथील जागा लीजने विकत घेतली. 30 वर्षांची लीज आता संपली आहे. ती लीज वाढवून मिळावी म्हणून आमची हौसिंग सोसायटी सारखी मागणी करीत आहे. परंतु अजूनही त्यांना लीज वाढवून देण्यात आलेली नाही. सोसायटी पैसे भरण्यास तयार आहे. सारे कामगार असल्याने ते आपले घर बांधू शकत नाहीत. त्यांना बँकेचे कर्ज मिळत नाही. सगळ्या सोसायटी कोलमडून पडलेल्या आहेत.

सभापती महोदया, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 88, 89 या संबंधात मी बोलू इच्छितो. ना.रा.शेंडे हे विदर्भ साहित्यसंघाचे अध्यक्ष होते. अध्यक्ष असताना त्यांनी बरीच पुस्तके लिहिली. परंतु ते दलित होते, त्यांच्यासाठी केवळ 10 लाख रूपयांची मागणी केली, त्यांचे घर पार पडून गेले. मी मध्यंतरी एका कार्यक्रमाला गेलो असता त्यांच्या घराला भेट दिली. तर तेथे केवळ दगड-विटा पडल्याचे दिसून आले. तेथे त्यांचे नागाचे मंदिर होते तेही पडले होते मात्र तेथील नागाची मूर्ती तशीच राहिली आहे. या श्री.ना.रा.शेंडे यांनी स्वत: जीवंत असताना आपली समाधी बांधली, त्या नदीच्या काठावर जवळच चिंचेचे झाड आहे त्या खाली त्यांच्या नंतर अस्थी ठेवल्या आहेत. मृत्यूपूर्वी त्यांनी आपली समाधी बांधून घेतली होती. मी शासनाला विनंती केली होती की, त्या समाधीचा परिसर सुशोभित करा. पण अद्याप पर्यंत त्याकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. या पुढे तरी शासनाने त्याकडे लक्ष द्यावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदया, पृष्ठ 247, बाब क्रमांक 210, 291 या संबंधात मी बोलणार आहे. सभापती महोदय, आमच्याकडे विदर्भामध्ये, नागपूरमध्ये सुरूवातीला धनवटे रंगमंदिर हे एकच नाट्यगृह होते ते आता तुटले आहे. त्यामुळे आता नागपूरमध्ये केवळ देशपांडे सभागृह उरले आहे.

...... 3वाय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निकोसे ....

पण या सभागृहाचे भाडे अगोदर 3500 रूपये होते, पण आता ते वाढवून 12-14 हजार रूपये केलेले आहे. त्यामुळे लहान नाटककार, लहान नाट्यसंस्था तेथे आपली नाटके वा अन्य कार्यक्रम लावू शकत नाहीत. म्हणून मी या निमित्ताने मागणी करतो की, ज्याप्रमाणे मुंबईमध्ये आपण नाट्यगृहांचे भाडे कमी केले आहे त्याप्रमाणे या सभागृहाचे देखील भाडे कमी करावे. किमान पक्षी ज्या रजिस्टर संस्था आहे त्यांच्यासाठी तरी या नाट्यसभागृहाचे भाडे शासनाने कमी करावे आणि अशा लहान संस्थांना संधी द्यावी.

सभापती महोदया, सामाजिक न्याय विभागाची बाब क्रमांक 189, 190 या संबंधात मी आता बोलणार आहे. मी आताच सांगितले की, विदर्भातील एक साहित्यिक श्री.ना.रा.शेंडे हे दलित समाजाचे होते आणि ते विदर्भ साहित्यसंघाचे अध्यक्ष होते. माननीय कस्तुरे साहेब समाजकल्याण खात्याचे मंत्री असताना त्यांनी संत चोखामेळा यांचे स्मारक करण्याची मागणी केली. त्यासाठी मग एक समिती नेमली गेली. त्या समितीने आळंदी-देहू पासून अगदी बुलढाण्यापर्यंत दौरे केले आणि आपला अहवाल सादर केला. पण अद्याप पावेतो त्यांचे स्मारक झाले नाही. ना.रा.शेंडे यांनी त्यासाठी खूप कष्ट घेतले पण अजूनही काही झाले नाही. तरी शासनाकडे याकडे लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदया, नगरविकास विभागाची बाब क्रमांक 80, 81, 82 या संबंधात मी बोलणार आहे. महाराष्ट्र शासनाकडे आमचे एक शिष्टमंडळ गेले होते तेव्हा त्यांनी सांगितले की, पाश्चिमात्य देशातील लोकांना उद्योगासाठी जागा, वीज, आम्ही देतो, त्यांनी आमच्याकडे येऊन उद्योग उभारावेत. म्हणजे आमच्याकडे एक म्हण आहे, घरची म्हणते देवा देवा, घरचा धनी म्हणतो बाहेरचीला साडी-चोळी शिवा. या म्हणीप्रमाणे हा कारभार होतो आहे. आता या ठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्री उपस्थित आहेत. ...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( यानंतर श्री. सरफरे .... 3झेड 1 ..

श्री. रमेश निकोसे...

सभापती महोदया, मुंबईमध्ये कॉंक्रिटचे जंगल वाढले आहे. लोकांना मुंबईमध्ये घर घेणे परवडत नाही. त्यामुळे मुंबईतील लोक आता विरार-वसईकडे वळत आहेत. त्या भागातील लोक शासनाकडे रितसर मागणी करीत आहेत की, आम्ही आमच्या जागेचा विकास करण्यास तयार आहोत, शेतामधून रस्ता बांधण्यास तयार आहोत, त्यासाठी खर्च करण्यास तयार आहोत. त्याकरिता शासनाने आम्हाला परवानगी द्यावी. परंतु त्यांना शासनाकडून अजून परवानगी दिली जात नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : माननीय सदस्यांनी भाषण करतांना महिलांविषयी जे उद्‌गार काढले आहेत ते रेकॉर्डवर राहणे योग्य नसल्यामुळे ते आपण कामकाजातून काढून टाकावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी एक म्हण याठिकाणी अत्यंत तळमळीने सांगणार आहे. मैं अपने शेर खुद लिखता है और खुद बोलता हूं.

जब हम तड़प जाते हैं तो दुनिया कहती है, किसी ने दर्द पाया नहीं है.
वे कहते हैं यह तो भिखारी तड़प रहा है.
मुंबई के समुन्दर को देखकर उसकी गहराई जानना मुमकिन नहीं
हमारे दिल पर क्या बीती है,
किसी के दिल की हकीकत, हमारे मुकद्दर में क्या लिखा है
किसी को क्या मालूम.

सभापति महोदय, मेरा यह अनुरोध है कि पूरक मांगों के सिलसिले में मैंने यहां पर जो मुद्दे रखे हैं, सरकार उस पर विचार करें. यह मेरा आखरी अधिवेशन है. मेरी सदस्यता की मुद्दत समाप्त होने में सिर्फ 2 महीने बाकी है. इसलिए मेरी विनती है कि मेरे रखे हुए मुद्दों पर गौर किया जाए. इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 2 कडे मी आपले लक्ष वेधणार आहे. महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र लोक सेवा आयोगामार्फत परीक्षा घेणे बंद करण्यात आले होते. एकदा वैद्यकीय शिक्षण खात्याला हॉस्पिटलमध्ये कर्मचारी वर्ग कमी असल्याबाबत प्रश्न विचारीत असतांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवारांच्या परीक्षा घेतल्या जात नसल्यामुळे कर्मचारी मिळत नाहीत असे सांगण्यात येत होते. तेव्हा याठिकाणी परीक्षांवर होणारा आवश्यक खर्च भागविण्याकरिता आपण 4 कोटींची तरतूद केली आहे. त्यानिमित्ताने मला सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत लवकरात लवकर उमेदवारांच्या परीक्षा घेऊन वैद्यकीय शिक्षण खात्याला कर्मचारी मिळण्यास सुरुवात होईल. जेणेकरुन कर्मचाऱ्यांअभावी रुग्णालये बंद पडत आहेत ती बंद पडणार नाहीत यासाठी मदत होईल. यादृष्टीने आपण विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र 3 मध्ये कंटेम्प्ट ऑफ कोर्ट झ ााल्यामुळे 1 कोटी 75 लक्ष 58 हजार रुपयांची आपल्याला तरतूद करावी लागत आहे. मला हे जाणून घ्यावयाचे आहे की, हा कंटेम्प्ट कुणी केला? त्यासंबंधी आपण काय कारवाई केली आहे? मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एका शासकीय अधिकाऱ्याच्या चुकीमुळे पावणे दोन कोटी रुपयांचा भुर्दंड शासनाला सोसावा लागत आहे. ज्या अधिकाऱ्याच्या चुकीमुळे ही मागणी करावी लागत आहे त्याबाबत आपण काय कारवाई केली आहे हे स्पष्ट करावे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 5 मध्ये निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन यांचा कार्यालयीन खर्च भागविण्याकरिता 25 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदया, दिल्लीच्या महाराष्ट्र सदनच्या आयुक्तांबाबत सांगावयाचे झाले तर मागे एकदा मी गुजरात भवन, राजस्थान भवनमध्ये होतो. त्या भवनचे आयुक्त हे केंद्र सरकारच्या सचिवांशी संपर्क ठेवून असतात. आणि आपल्या राज्यातील फाईलींचा फॉलोअप ठेवत असतात. अशाप्रकारचे काम महाराष्ट्र सदनच्या आयुक्तांना दिले आहे काय? महाराष्ट्रातील फाईलींचा केंद्रामध्ये फॉलोअप होत नाही अशाप्रकारची चर्चा नेहमी होत असते. आपले अधिकारी केंद्रामध्ये गेल्यानंतर ते बी.पी.टी. किंवा एअरपोर्ट ॲथॉरिटीमध्ये वेळ काढतात आणि पुन्हा राज्यात येतात. महाराष्ट्रातील आय.ए.एस. अधिकारी केंद्रामध्ये नसल्यामुळे महाराष्ट्राच्या अनेक फाईली दीर्घकाळ प्रलंबित रहातात. याबाबत मला

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. विनोद तावडे....

विचारावयाचे आहे की, दिल्लीच्या महाराष्ट्र सदनातील आयुक्तांचा रोल काय आहे ? त्यांच्या कामासंबंधी शासनाने कधी विचार केला आहे काय? इतर सर्व राज्यांचे आयुक्त कामे करुन घेण्यामध्ये पुढे असतात. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री माननीय श्री. दिग्विजयसिंह असतांना त्यांच्या राज्याचे आयुक्त हे मध्य प्रदेशमध्ये बसून मध्यप्रदेश राज्याने पाठविलेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करीत होते. त्याप्रकारची अपेक्षा आपल्या राज्याच्या आयुक्तांकडून आपण करु शकत नाही काय?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ......

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 9 मध्ये नागपूर येथील हज हाऊस बांधण्यासाठी पुरवणी मागणी सादर केलेली आहे. परंतु जे हिंदू कैलास मान सरोवरला जातात त्यांना काही देण्याचा कधी तरी शासन विचार करणार आहे काय ? जे हिंदू काश्मीरमधील अमरनाथ यात्रेला जातात त्यांना काही सुविधा देणार आहे काय ? मायनॉरिटीकरिता वेगळे मंत्रालय तसेच सच्चर सारखी महाराष्ट्राची वेगळी कमिटी वगैरे गोष्टी शासन मायनॉरिटी किंवा मुस्लिमांसाठी करणार आहे. त्यांच्यासाठी केले पाहिजे त्याबद्दल दुमत नाही परंतु ते करीत असताना तितकेच पावित्र्य, तितकीच श्रध्दा असणारे हिंदू तीर्थयात्रेला जाऊ इच्छितात त्यांच्या बाबतीत सरकार काय विचार करणार आहे याबाबत सांगावे.

सभापती महोदय, यानंतर मी महसूल विभागाच्या बाब क्रमांक 30 बाबत बोलणार आहे. यामध्ये भूसंपादनाच्या संदर्भात पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मुंबईमध्ये स्पेशल इकॉनॉमिक झोनमध्ये सरकार भूसंपादन करणार नाही अशी घोषणा माननीय पंतप्रधानांनी केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी आणि राज्य सरकारनेही तशी घोषणा केली. मग यासाठी या ठिकाणी जी 65 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे ती कशासाठी केलेली आहे ? रिलायन्सच्या भूसंपादनासाठी शासनाने मदत करण्याचे ठरविले आहे काय ? मागच्या अधिवेशनामध्ये जी घोषणा केली होती ती खरी आहे की, या पुरवणी मागणीव्दारे जे करीत आहात ते खरे आहे ? माननीय पंतप्रधान म्हणतात ते खरे आहे की, आपण भूसंपादनाची व्यवस्था करीत आहात ते खरे आहे ? याबाबतीत संभ्रम पडतो. काही ठिकाणी तहसीलदार कार्यालय रिलायन्स चालवितात. रायगडचे जिल्हाधिकारी कार्यालय रिलायन्स चालवितात. अशी राज्य सरकारची अवस्था असेल तर तसे सांगावे. वक्तव्य एक करतात आणि प्रत्यक्षात दुसरेच घडते. त्यामुळे मनामध्ये शंका उत्पन्न होत असते.

सभापती महोदय, यानंतर शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 72 च्या संदर्भात मी बोलणार आहे. माननीय मंत्रिमहोदय प्रा. पुरके साहेबांना आठवत असेल. मागच्या वेळी चुकीचा पेपर सेट केला गेल्यामुळे प्रचंड गदारोळ झाला आणि त्यावेळी आपण मार्क वाढवून दिले. त्यावेळी आम्ही आग्रह केला होता की, जे पेपर सेटर असतात त्यांना मानधन नाही. त्यामुळे त्या कामासाठी

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. विनोद तावडे ......

कोणीही आपल्याकडे येत नाहीत. जर चांगले पेपर सेटर्स आपल्याकडे यावयास पाहिजे असतील तर त्यांच्या मानधनाची आणि बाकीची व्यवस्था केली पाहिजे. कोणताही चांगला माणूस फुकटात सेवा देण्यास तयार नसतो. लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य या परीक्षांवर अवलंबून असते. या परीक्षा इतक्या सहजतेने घेणे बरोबर नाही. त्यामुळे तशा पध्दतीची व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. एस.एस.सी. बोर्डाच्या संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. काळपांडे यांच्याकडे आहे. हे राज्याचे बोर्ड आहे. त्या ठिकाणी डायरेक्टरचा ॲडिशनल चार्ज ठेवल्यामुळे अशा चुका होतात. ते काय काय बघणार ? यामध्ये बढती वगैरे राहिली असेल तर ती लवकर केली पाहिजे. त्याबाबत व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 75 बाबत बोलणार आहे. यामध्ये स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरसाठी सहाय्यक अनुदान देण्यासाठी ही पुरवणी मागणी केलेली आहे. सन्माननीय आर. आर. पाटील त्या ठिकाणी अध्यक्ष आहेत. त्यांचे काम चांगले आहे. या गोष्टीचे स्वागत आहे. त्याचप्रमाणे कर्वे शिक्षण संस्थेला माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी एक महिन्याचे मानधन दिले आहे. मंत्रिमहोदयांना मानधन किती असते हे मला माहीत नाही. स्वामी विवेकानंद संस्थेला 75 लाख रुपये देणार आहात. महर्षी कर्वे यांनी स्थापन केलेल्या संस्थेला 95 वर्षे पूर्ण होत आहेत, त्यांनाही अनुदान दिले पाहिजे अशी त्याची मागणी आहे. त्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, यानंतर मी नगरविकास विभागाच्या बाब क्रमांक 79 व 80 बाबत बोलणार आहे. मिठी नदीच्या संदर्भात झुत्सी कमिटीचा अहवाल आलेला आहे. गाळ काढलेला नसताना पेमेंट केले गेले असे श्रीमती झुत्सी यांनी आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे. त्याबाबतीत कारवाई का करीत नाही ? मिठी नदीच्या बाबतीत कोर्ट सातत्याने सरकारला आदेश देते. त्यावर काही कार्यवाही होत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 19:20

(श्री. विनोद तावडे...

मग पुन्हा 26 जुलैसारखी घटना घडली की नंतर ती का घडली म्हणून अहवाल मागविण्याचे प्रकार सुरु होतात. तेव्हा मिठी नदीच्या सफाईचे, गाळ काढण्याचे काम हे जलदगतीने होण्याची गरज आहे. या मिठी नदीच्या सफाईचे काम पाहून "संथ चालते मिठी सफाई" असे म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, आज एमएमआरडीएने सर्व अधिकार स्वत:कडे घेतले आहेत. सुरुवातीला एमएमआरडीए ही दुभती गाय वाटत होती. परंतु आता या प्राधिकरणाने मुंबई महापालिकेला असलेले सर्व अधिकार हळूहळू स्वत:कडे घेतलेले आहेत. स्वर्गीय राजीव गांधी यांनी स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात येण्यासाठी घटनादुरुस्ती केली. सत्तेचे विकेन्द्रीकरण करण्याच्या उद्देशाने स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती करण्यात आली. स्वर्गीय राजीव गांधी यांच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून सत्तेचे केन्द्रीकरण करण्याचा प्रयत्न आपण करु नका.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या पृ.क्र. 64 वरील बाब क्रमांक 89कडे मी आपले लक्ष वेधित आहे. मॅफकोचे स्टॉल बंद करण्यात येणार आहेत. हे स्टॉल भरवस्तीमध्ये आणि मोक्याच्या ठिकाणी आहेत हे स्टॉल सकाळ-संध्याकाळ चालवायला दिले तर त्यातून स्वयंरोजगार निर्माण होऊ शकेल. तेव्हा बेरोजगारांना हे स्टॉल चालविण्यास देण्याचा विचार व्हावा.

विधी व न्याय विभागाच्या पान क्रमांक 130 वरील बाब क्रमांक 157कडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. मराठी सॉफ्टवेअरसाठी तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. याबाबतीत कोर्टात पिटिशन दाखल झाले, आंदोलन झाले. कोर्टाने हे सॉफ्टवेअर करवून घेण्यासंबंधी राज्य शासनाला आदेश दिले. कोर्टाच्या आदेशानंतर शासनाने 25 लाखाची व्यवस्था केली. शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये मराठी सॉफ्टवेअरसाठी आकस्मिकता निधीतून तरतूद करावी लागते यासारखी शरमेची दुसरी कोणती गोष्ट नसेल.

बाब क्रमांक 154 संबंधी मी बोलू इच्छितो. मी नागपूर डिस्ट्रिक्ट कोर्टामध्ये गेलो होतो. मी पाहिलेली गोष्ट आपणास सांगतो. त्या कोर्टातील जज आणि वकील लिफ्टमध्ये शिरायचे, लिफ्टमनने दरवाजा बंद करुन बटण दाबल्यानंतर आतमध्ये जज आणि वकील उड्या मारायचे. मला आश्चर्य वाटले. हे असे एकदा नव्हे तर दोन-तीन वेळा घडले. त्यानंतर ती लिफ्ट वर गेली. त्यानंतर 5-6 वकील आले. ते लिफ्टमध्ये शिरले. त्यांनी देखील उड्ड्या मारल्या. हा काय प्रकार

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे...)

आहे म्हणून मी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, ही लिफ्ट इतकी जुनी झालेली आहे की, उड्या मारल्या शिवाय ती वर जात नाही. मी मागच्या शुक्रवारी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिलेली ही घटना आहे. तेव्हा कोर्टाच्या इमारतींतील सुविधांची ही अवस्था दूर करण्यासाठी अधिक निधीची तरतूद करावी.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांकडे मी आपले लक्ष वेधित असताना हे सांगू इच्छितो की, दोन वर्षापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार घोषित केले. परंतु हे पुरस्कार देण्यासाठी त्यांना अजून संस्था सापडत नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

महाराष्ट्रात एकही संस्था नाही? शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव इतक्या वेळा बजेट प्रक्रियेमध्ये घेतले गेले, त्यापैकी 10 टक्के वेळ जरी संस्था शोधण्याच्या प्रक्रियेसाठी लावला असता तर पुरस्काराचे वाटप करता आले असते. पुरस्कार दिला पाहिजे असे सरकारवर बंधन नाही. घोषणांचे बंधन आहे. कारण घोषणांच्या आधारे मते मिळवायची आहेत. हे सरकार सत्तेवर असल्यानंतर त्या महात्म्यांच्या शोभेची संस्था कशी सापडणार? यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. आपण शाहू, फुले, आंबेडकरांच्या नावाने पुरस्कार जाहीर करता परंतु ते वाटप करता येत नाहीत यापेक्षा दुसरी शरमेची गोष्ट नाही.

सभापती महोदया, समाजकल्याण खात्याच्या वसतीगृहांबाबत आंदोलने सुरु आहेत. लाल गव्हाच्या चपात्या कितीतरी चांगल्या, यापेक्षा वाईट अवस्था या वसतीगृहांमध्ये आहे. सन्माननीय मंत्री श्री.हंडोरे युवक चळवळीमध्ये असताना वसतीगृहांच्या विरोधात केलेल्या आंदोलनामध्ये अनेकदा माझ्यासोबत होते. आज त्याठिकाणी ज्या सुविधा दिल्या जात आहेत त्या पुरेशा नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदया, सार्वजनिक आरोग्य विभागाबाबत बोलत असताना निधी असूनही राज्यात आरोग्यावर अत्यल्प खर्च हे वक्तव्य सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.मधुकर सरपोतदार यांचे नसून राज्याच्या नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष डॉ.रत्नाकर महाजन यांचे आहेत. सप्टेंबरपर्यंत तरतुदीच्या 75 टक्के खर्च अपेक्षित आहे. परंतु काहीच खर्च होत नाही. आरोग्य सेवेसाठी दिलेला निधी खर्च होत नाही म्हणून आरोग्य सेवा कोलमडलेली असते हे डॉ.रत्नाकर महाजन यांचे वक्तव्य आहे. नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष हे आपल्या पक्षाचेच आहेत. समाजवादी चळवळीतून ते पुढे आलेले असले तरी ते खोटे बोलत नाहीत हे सत्य आहे.

सभापती महोदया, बाब क्र.213 अन्वये मालेगाव येथे बॉम्बस्फोट झाल्यामुळे सन्माननीय उपमुख्यमंत्री तेथे गेले आणि त्यांनी ताबडतोब येथे हॉस्पिटल बांधू असे घोषित केले. बजेटमध्ये तरतूद नव्हती आणि पुरवणी मागण्यांमध्येही तरतूद नव्हती. मग हे हॉस्पिटल हवेत बांधणार आहात काय? मग आम्ही म्हटले की, तुम्ही फक्त घोषणा करता तर त्यात आमची काही चूक आहे का? घोषणा तरी करु नका किंवा करणार असाल तर त्या पूर्णत्वास नेल्या पाहिजेत. बजेटमध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

तरतूद नाही, पुरवणी मागण्यांमध्येही तरतूद नाही म्हणून मी बोलत आहे. तुम्हाला करायची इच्छा असेल, करणार असाल तर आम्ही स्वागत करतो.

श्री.आर.आर.पाटील : त्या रुग्णालयाच्या कामाला मी स्वत: भेट दिली आहे. बांधकाम फार गतीने सुरु होते. मी भेट दिली त्यावेळी निम्म्याइतके बांधकाम झाले होते. निधी कुठून उपलब्ध करुन दिला हे उत्तराच्या वेळी सांगण्यात येईल. परंतु ते काम सुरु आहे.

श्री.विनोद तावडे : सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निधीमध्ये तरतूद दिसत नाही. मग नेमका निधी कुठून दिला गेला? ठराविक समाजासाठी ही विशेष तरतूद केली आहे. सभापती महोदया, ठाणे जिल्हयातील ग्रामीण भागातील आरोग्याची व्यवस्था सुधारावी म्हणून 17 महिन्यापूर्वी आदेश देऊनही नवीन ग्रामीण रुग्णालये अद्याप कार्यान्वित झालेली नाहीत. वाडा तालुक्यात कुपोषणाचे बळी ठरत असलेल्या आदिवासी समाजाला चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून 17 महिन्यापूर्वी आदेश देऊन 6 ग्रामीण रुग्णालयांची निर्मिती करण्याचे शासनाने ठरविले. स्वाभाविक हे काम पूर्ण केले पाहिजे. तेथील आदिवासी समाज याची आतुरतेने वाट बघतो आहे.

सभापती महोदया, शिक्षण विभागाबाबत बोलत असताना किंगफिशर खुल्या टेनिस स्पर्धेचा उल्लेख करण्यात आला आहे. अनुदान द्यायचे असेल तर जरुर द्यावे परंतु कारण जे दिले आहे ते देऊ नका. लॉन टेनिस क्रिडा स्पर्धेमुळे मुंबईचे नाव मोठे होईल, म्हणजे मुंबई इतकी लहान आहे का?

(श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, लॉन टेनीस बांधून किंगफिशर नावाने स्पर्धा घेतल्या जाणार आहे व यासाठी जो काही खर्च होणार आहे तो सर्व खर्च शासन करणार आहे. खर्च सरकारचा आणि नाव किंग फिशरचे असे होणार आहे. लॉन टेनीसमुळे मुंबईचे नाव मोठे होईल म्हणून या ठिकाणी शासन खर्च करणार आहे त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करावा व योग्य तो निर्णय घ्यावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी महसूल विभागाच्या संदर्भातील बाब क्रमांक 31, पृष्ठ क्रमांक 24 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. गेल्या 60 वर्षात किंबहूना राज्यसरकारने किंवा केंद्र सरकारने माझ्या माहिती प्रमाणे जमिनींची मोजणी करण्याचे धोरण हाती घेतलेले नाही. जमीन मोजली न गेल्यामुळेच अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत वा होत आहेत असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. राज्य तंटामुक्त करण्याची घोषणा राज्य शासनाने केलेली आहे त्यामुळे मी याबाबत सरकारचे अभिनंदन करतो. गायरान, गावठाण तसेच फॉरेस्ट विभागाची जमीन मोजण्याची नितांत आवश्यकता आता निर्माण झालेली आहे. आज गावागावामध्ये शेत जमिनीमुळे तसेच बांदामुळे वाद निर्माण होत आहेत. या भांडणाचा ताण प्रशासनावर, पोलीस विभागावर तसेच कोर्ट-कचे-यावर पडत आहे. एका गावातील जमिनीच्या वादाच्या संदर्भातील किंवा बांदाच्या संदर्भातील वाद कोर्टात गेले तर त्यामध्ये शासनाचा व शेतक-याचाही लॉस होणार आहे. शासनाचा व शेतक-याचाही वेळ वाया जाणार आहे तसेच पोलीस स्टेशन्स आणि कोर्ट कचे-यांचाही वेळ वाया जाणार आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, राज्य सरकारने किंवा केंद्र सरकारने जमीन मोजणी करुन शेतकरी वर्गाला न्याय मिळवून द्यावा. इंग्रजांनी आपल्या देशात जमिनींची दोनदा मोजणी केली होती परंतु राज्य किंवा केंद्र सरकारने अद्यापी आपल्या देशातील जमिनीची मोजणी केलेली नाही. जमिनीची मोजणी करण्यासाठी आपल्याकडे मॅनपॉवर नसली तरी एका वरिष्ठ अधिका-याच्या हाताखाली टेंपररी मुलांना घेऊन जमिनीची मोजणी करावी किंवा आता जग फार पुढे गेलेले आहे. सॅटेलाईट रिमोट सेन्सिंग पध्दतीमार्फत सुध्दा जमिनीची मोजणी होऊ शकते. त्यामुळे अशा प्रकारे मोजणी करावी एवढी माझी विनंती आहे. अजून सुध्दा जमिनीची मोजणी करावयाची असेल तर इंग्रजानी जे दगड लावलेले आहेत त्या दगडापासून अजून सुध्दा आपल्याला मोजणी करावी लागत आहे. आपण जर जमिनीची मोजणी केली तर गावागावातील तंटयाचे प्रमाण कमी होईल. त्यामुळे जमीन मोजली गेली तर हा जो मुख्य प्रश्न आहे तो सुटून शेतक-यांना न्याय मिळेल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, पुरक मागण्यांवर माझे मत मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. मी बाब क्रमांक 32, पृष्ठ क्रमांक 25 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मुद्रांक , मंद्रांकाचे मुद्रण, भाडे पट्टी व कर, इतर खर्च इत्यादी संदर्भातील यामध्ये बिले आहेत. आज सुध्दा तेलगी संपलेला नाही. आज सुध्दा मोठया प्रमाणात बोगस स्टँप मार्केटमध्ये विकले जात आहे. यासंदर्भातील बरीचशी माहिती मी गोळा केलेली आहे. आज सुध्दा 5.60 कोटी रुपये किंमतीच्या गैरन्यायिक मुद्रांकाची एआर 000001 ते एआर 560000 ही मालिका गेल्या 4 मे, 2007 रोजी नाशिक येथील शासकीय मुद्रणालयातून मुंबईच्या प्रधान मुद्रांक कार्यालयासाठी जारी झाली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 19:35

श्री.अरविंद सावंत...........

तसेच सदर मालिका 16 मे 2007 रोजी पोहोचल्याची नोंद मुंबई प्रधान कार्यालयात आहे. त्यानंतर या मालिकेतील काही मुद्रांक " दि महाराष्ट्र मंत्रालय ॲन्ड अलाईड ऑफीसर्स को-ऑपरेटिव्ह बँकेकडे ( मंत्रालय बँक ) पाठविण्यात आले. तसेच मुंबई सहकारी बोर्डाने सादर केलेल्या AR 250386 ते AR 250433 या क्रमांकाचे 48 मुद्रांक हे 1 ऑगस्ट 2007 रोजी विकल्याची नोंद मंत्रालय बँकेच्या वहीखात्यात आहे. त्यामुळे सदर मुद्रांक अधिकृतपणे 16 मे 2007 नंतर मुंबईत चलनात आले. परंतु मुंबई सहकारी बोर्डाने सदर मुद्रांक शासकीय मुद्रणालयातून जारी होण्याच्या सहा महिनेआधी म्हणजे 25 नोव्हेंबर 2006 रोजी सहकार विभागात भरलेले आहेत. या सर्व 48 मुद्रांकांवर प्रधान कार्यालयाचा 14 नोव्हेंबर 2006 रोजीचा शिक्का व प्राधिकृत अधिकाऱ्याची सही देखील आहे. प्रधान कार्यालयानुसार जर हे मुद्रांक गेल्या 16 मे 2007 नंतर चलनात आले तर मग सहा महिन्यांपूर्वी मुंबई सहकारी बोर्डाने भरलेल्या मुद्रांकांवर प्रधान कार्यालयाचा शिक्का व अधिकाऱ्याची सही कशी, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता आहे. दुसरीकडे सहकारी संस्थांच्या नवनिर्वाचित संचालक मंडळांना पदग्रहण केल्यावर 15 दिवसांच्या आत एम-20 बंधपत्र ( बॉन्डस्) सहकार विभागात भरणे बंधनकारक आहे. मात्र सहकारी कायद्यातील या सुधारणेकडे दुर्लक्ष करीत अनेक संस्थांनी सदर बंधनपत्र भरलेले नाहीत. त्यामुळे गेल्या वर्षभरापासून अनेक सहकारी संस्थांची संचालक मंडळे बरखास्त होत आहेत. परिणामी अनेक संस्था मागील तारखांचे बंधपत्र सादर करीत असून, त्यासाठी बनावट नोंदींचे गैरन्यायिक मुद्रांक वापरीत आहेत. माझ्याकडे पुरावे आहेत. हा विषय महसूल विभागाशी संबंधित असला तरी माननीय गृहमत्र्यांनी यात लक्ष घालावे अशी माझी मागणी आहे. यात शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत आहे. ते कोणती पध्दत अवलंबितात ते सांगतो. मुद्रांक आल्यानंतर त्याचे स्कॅनिंग केले जाते. जर 2720 नंबरचा मुद्रांक असेल तर त्याच नंबरच्या दुसऱ्या मुद्रांकाची कॉपी काढून ती विकली जाते. यामध्ये अनेक लोकांचे लागेबांधे आहेत. तेव्हा मी माननीय मंत्रिमहोयांना विनंती करतो की, त्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालावे. एका सहकारी सोसायटीचे संचालक मंडळ बरखास्त होईल असे पुरावे माझ्याकडे आहेत. आता ते माझ्याजवळ उपलब्ध नाहीत. पण गृह विभागावर चर्चा उपस्थित होईल त्यावेळी मी ती गृहमंत्र्यांकडे सादर करीन.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

बाब क्रमांक 35,पृष्ठ क्रमांक 27- महसूल व वन विभाग - 1993 मध्ये लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे झालेल्या भूकंपात भारतीय वायूसेनेद्वारे मदतकार्य करण्यासाठी हवाई सेवा पुरविण्यात आली होती. त्याचे देयक देण्याकरिता 37 लाख 40 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. 14 वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही वायूसेनेचे देयक देण्यात आलेले नाही यामध्ये काय गौडबंगाल आहे हे मला समजत नाही. याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्रमांक 47, पृष्ठ क्रमांक 31- जंगली हत्तीपासून संरक्षण करण्यासाठी 40 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. मागील नागपूर अधिवेशनात डिसेंबर 2006 मध्ये 1 कोटी 71 लाख रुपये व पावसाळी अधिवेशनात जुलै 2007 मध्ये 25 लाख रुपयांची मागणी करण्यात आली असताना आता पुन्हा 40 लाख रुपयांची मागणी कशासाठी करण्यात आलेली आहे याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ पूर्वी श्री.अजित.... 19:40

श्री.अरविंद सावंत...

बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 49--जिल्हा परिषद प्राथमिक शाळांशी संलग्न असलेल्या बालवाडीत काम करणाऱ्या बालवाडीसेविकांना भाऊबीज भेटीसाठी रुपये 34 लाख 34 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. मी आपल्याला विनंती करतो की, यासंदर्भात आपण एकदाचा निर्णय घेऊन टाका. प्रत्येक पुरवणी मागण्यांमध्ये आपण हा विषय घेता. दरवर्षी आपण भाऊभीज भेट देतोच, मग एकदाचा याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन टाका. यासाठी कायमस्वरुपी योजना करुन टाकावी.

बाब क्रमांक 70, पृष्ठ क्रमांक 50--दुपारच्या शालेय पोषण आहार योजनेकरिता आपण जुलै,2007 च्या अधिवेशनामध्ये ऑक्टोबर,2007 ते मार्च,2008 पर्यंत रुपये 89 कोटी 73 लाख 68 हजारींची तरतूद पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून केली होती. ती तरतूद मार्च,2008 पर्यंत होती. मग, पुन्हा आता नव्याने आपण मागणी कशी करीत आहात ? हे आपल्या लक्षात आले नाही का ? याबाबतीत आपल्याला कोणता अधिकारी सल्ला देतो ? सभापती महोदया, मी अंगणवाडयांना भेटी देतो. अंगणवाडीसेविकांना ग्रामीण मेळावे घेऊन संस्कार देण्याची आवश्यकता आहे. अंगणवाडीमध्ये नोकरी केल्यामुळे आपल्याला सरकारी नोकरी मिळेल, हा त्यांचा उद्देश असतो. अंगणवाडीच्या माध्यमातून आपल्याला सेवा करण्याची संधी ईश्वराने आपल्याला दिलेली आहे, असे त्यांना वाटले पाहिजे. बालवाडीतील प्रत्येक मुलगा माझाच आहे, अशा पध्दतीने त्यांनी त्यांच्याकडे पाहून काम केले पाहिजे. अंगणवाडीतील मुलांना दररोज एकाच कडधान्याची ऊसळ व खिचडी दिली जाते. मुले ती खात नाहीत. त्यामुळे शासनाचा पैसा वाया जातो. आपल्यालाही तेचतेच अन्न दिले तर ते अन्न आपणही खाऊ शकणार नाहीत. त्यामुळे कोणते अन्न द्यावे, यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. आज बालवाडयामध्ये तेचतेच अन्न दिले जाते, त्यामुळे याबाबतीत निर्णय घ्यावा.

बाब क्रमांक 75, पृष्ठ क्रमांक 52--स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरसाठी आपण तरतूद केलेली आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु अशाप्रकारच्या अनेक शिक्षण संस्था 100 वर्षे पूर्ण करणार असून त्यांच्याबाबतीतही आपण अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय घेणार का ? व अशाप्रकारे ज्या शिक्षण संस्था 100 वर्षे पूर्ण करतील त्यांच्यासाठी आपण उदात्तअंत:करणातून मदत करणार का ?

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

बाब क्रमांक 89, पृष्ठ क्रमांक 64--मॅफको कर्मचाऱ्यांच्या संदर्भातही आपण 13 जुलै,2007 पासून 7 नोव्हेंबर,2007 पर्यंत केवळ 4 महिन्यात आकस्मिकता निधीतून 4 वेळा रुपये 2 कोटी 73 लाख 60 हजारांची अग्रीमे काढलेली आहेत. परत आपण यासाठी पुरवणी मागणी का करीत आहात ? चारवेळा आपण पैसा काढलेला आहे. हे शासनकर्त्या पक्षाचे नियोजनाबाबतीतील लक्षण नाही.

बाब क्रमांक 84, पृष्ठ क्रमांक 62--विक्रीकर विभागाच्या आस्थापनेवर आपण नव्याने 2516 पदे निर्माण करीत आहात व त्यासाठी आपण ही बाब आणली आहे. नव्याने पदे निर्माण करीत आहात त्याबद्दल मी आपले स्वागत करतो. परंतु आपण शासनाच्या बजेटची पाहणी केली तर त्यामध्ये विक्रीकराची वसुलीचा विषय हा फारच गंभीर आहे. जवळपास 14-15 हजार कोटी रुपयांची वसुली बाकी आहे. यामध्ये विक्रीकर विभागाची अनेक प्रकरणे प्रलंबित असून कोर्टामध्ये आज ती प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवली जात आहेत. यामध्येही अधिकाऱ्यांचा हात आहे. कोणते प्रकरण लटकवत ठेवायचे, हे त्यांना चांगले माहीत असते. त्यामुळे यासंदर्भातही आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.........

सभापती महोदय, बाब क्रमांक 171 इंडिका कार प्रकल्पाला 100.62 कोटी रुपयांचे अनुदान देण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. अशाप्रकारचे अनुदान देण्याची प्रथा आहे. पण ब-वर्ग, क-वर्ग शहरांमध्ये असा एखादा मोठा प्रकल्प उभा राहणार असेल तर त्याचा जरुर विचार व्हावा. मला हे कळत नाही की, टाटाचा इंडिका प्रकल्प हा अ-वर्ग शहरात म्हणजे पुणे शहरात येतो आहे, त्यांना 100 कोटी रुपयांचे अनुदान देण्यासाठी आपण तरतूद करीत आहोत. अनुदान द्या, मग मात्र जेव्हा केव्हा मनात येईल आणि एका दिवसात सगळा उद्योग गुंडाळून कारखाना बंद केला जाईल आणि गुपचूप आय.टी.चे काम सुरु होईल, त्यावेळी आपले डोळे उघडतील. बजाजचे उदाहरण आपल्या डोळयासमोर आहे. तेथील कामगारांवर कु-हाड कोसळली. बिनकामाचा पगार घेणे ही नितीमत्ता नाही. टाटा काय गरीब आहे काय ? हल्ली एक नवीन पद्धती निघाली आहे, मर्सिडिज काडीत बसून भीक मागितली जाते. अ-वर्ग शहरामध्ये प्रकल्प उभा केला जात आहे, छोटया शहरात काढला गेला असता तर आम्ही समजू शकलो असतो. मराठवाडयामध्ये, कोकणात काढला असता तर समजू शकलो असतो. पण पुण्यामध्ये काढला जात असतांना आपण त्यांना अनुदान देतो ? मी या बाबीचा निषेध करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 173 कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. किती वर्ष ही मागणी सुरु आहे माहित नाही. वेतनावरील खर्च भागविण्यासाठी चितळे डिस्टलरी मर्यादित यांना कर्ज देण्यासाठी ही मागणी आहे. यामध्ये असे नमूद केले आहे की, कंपनी बंद केल्यामुळे निधीचे कोणतेही साधन नसल्यामुळे वेतनावरील खर्च भागविण्यासाठी कर्ज मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे. कंपनी बंद असल्याने शासन कर्ज देत आहे ? 'कर्ज' असा शब्द वापरलेला आहे. बंद पडलेल्या कंपनीला आपण कर्ज देत आहोत. उद्योगाचे पुनरुज्जीवन असा शब्द वापरलेला नाही. बंद पडलेल्या कंपन्यांच्या कामगारांना वेतन देण्यासाठी आपण

....2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...........

किती दिवस अनुदान देणार आहोत ? याच कारणासाठी चवथ्यांदा पुरवणी मागणी करण्यात आली आहे. यासंबंधी काही तरी निर्णय घ्या. निर्णय घ्यावयाचा आहे की नाही ? हा उद्योग पुन्हा सुरु करण्याचा विचार असेल, काही वेगळी योजना असेल आणि त्यासाठी जर अनुदानाची मागणी होत असेल तर आम्ही समजू शकतो. माझी विनंती आहे की, शासनाने यासंदर्भात काही तरी ठोस निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मी बाब क्रमांक 288 च्या माध्यमातून मांडणार आहे. दर्जेदार चित्रपट निर्मितीसाठी अतिरिक्त अनुदान देण्यासाठी ही मागणी आहे. मी सकाळीच विशेष उल्लेखाच्या निमित्ताने यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता. जुलै 7 व मार्च 6 मध्ये याच कारणासाठी अनुक्रमे 2 कोटी व 7 कोटी 95 लक्ष रुपयांची मागणी करण्यात आली होती. पुन्हा आता पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. हा धोरणात्मक विषय आहे की नाही ? मग सारखी सारखी पुरवणी मागणी का करण्यात येत आहे ? हे अनुदान देतांना 30 लक्ष रुपयांची फसवणूक केली गेली. हुतात्मा राजगुरुंवर चित्रपट बनविण्याचे सांगून शासनाची 30 लाख रुपयांची फसवणूक झाली. चित्रपट तयार झाला नाही, काही झाले नाही. मात्र श्री.मिलिंद मोहाडीकरांसारख्या माणसाला गावोगावी फिरावे लागले, निधी उभा करावा लागला आणि चित्रपट तयार करावा लागला. त्यांना मात्र आपण मदत करीत नाही, हे निषेधार्ह आहे. आणि यासाठी कितीवेळा पुरवणी मागणी येणार आहे, याचा देखील शासनाने विचार करावा, अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------------

यानंतर श्री.बोरले........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर ........ 19:50

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाब क्र.81, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई यांच्याद्वारे नागरिकांना सुविधा पुरविण्याबाबत विविध कामांकरिता या बाबीद्वारे तरतूद करण्यात आलेली आहे. अत्यंत आवश्यक अशी ही गोष्ट आहे. मुंबईमध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. परंतु त्या इमारतींबरोबर ज्या सुविधा लागतात त्यांचा लोकसंख्या वाढीमुळे विचार केला जात नाही. यासंदर्भात मला काही गोष्टी शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाच्या आहेत. मुंबईतील ड्रेनेज लाईन्स जुन्या झालेल्या आहेत, त्या नवीन टाकण्याची आवश्यकता आहे. पिण्याच्या पाण्याच्या लाईन्स जुन्या झालेल्या आहेत, त्या लाईन्स सुध्दा नवीन टाकण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये मोठ-मोठया इमारती बांधल्या जातात. त्यातील काही इमारती पत्त्यासारख्या कोसळतात. त्यामुळे इमारतीचा दर्जा तपासून बघण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये ठिकठिकाणी मोठ-मोठे मॉल्स उभे राहतात. परंतु त्या मॉल्स जवळ वाहनांच्या पार्किंगची सोय नाही. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. फक्त मॉल्स जवळच नाही तर मुंबईत कोठेही वाहने उभी केलेली असतात, अस्ताव्यस्त उभी केलेली असतात. त्यामुळे वाहनांची कोंडी होते. मॉल्स जवळच नाही तर ठिकठिकाणी पार्किंगची व्यवस्था असली पाहिजे. जुहू भागामध्ये मेन रोडवर ट्रक्स उभे केलेले असतात. त्या ट्रक्सना कोणीही हटविण्याचे धाडस करीत नाही. ट्रक्स, टॅक्सी यांच्याकरिता पार्किंगची व्यवस्था असली पाहिजे. शासनाने पे ॲण्ड पार्कची व्यवस्था करावी आणि याचा माननीय मंत्री महोदयांनी प्राधान्याने विचार करावा, अशी माझी मागणी आहे.

अजूनही उपनगरांमध्ये भाजीपाल्याचे स्वतंत्र मार्केट नाही. त्यामुळे फेरीवाल्यांचा सुळसुळाट वाढलेला आहे. जेथे मार्केट नाही तेथे मार्केट बांधण्याची व्यवस्था करणे गरजेचे आहे. मुंबईच्या रस्त्यावरुन चालतांना पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. रत्यावरुन चालने कठीण झ ाालेले आहे. फुटपाथवर आणि रस्त्यावर सुध्दा झोपडपट्टया आलेल्या आहेत. या झोपडया उठवून फुटपाथ मोकळे करण्याची गरज आहे आणि जेथे फुटपाथ नसतील तेथे फुटपाथ बांधण्याची गरज आहे. फुटपाथवर झालेले अतिक्रमण हटविण्याची आणि फुटपाथ बांधण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु ती पुरेशी नाही. ही व्यवस्था युद्धपातळीवर राबविण्याची आवश्यकता आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी ..........

सभापती महोदय, नगर विकास विभाग, बाब क्र.82, सौंदर्याविषयक सुधारणा योजनेअंतर्गत अमरावती व अचलपूर शहरांची सौंदर्याविषयक सुधारणा करण्याबाबत ही बाब आहे. या निमित्ताने मला असे सांगावेसे वाटते की, मुंबईमध्ये अनेक देशभक्त, हुतात्मे, महनीय व्यक्तींचे पुतळे आहेत. या पुतळयांची अतिशय दुरावस्था आहे. या पुतळयांच्या दुरावस्थेकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मी काही सूचना करणार आहे. या पुतळयांच्या सुरक्षिततेसाठी या पुतळयांभोवती लोखंडी कम्पाऊंड उभारण्याची आवश्यकता आहे. त्या पुतळयांना कोणीही हात लावत असतात आणि हे टाळण्यासाठी त्या पुतळयांभोवती लोखंडी कम्पाऊंड बांधण्याची आवश्यकता आहे. ज्यांचे पुतळे असतील त्यांच्या जयंतीच्या वेळी त्या पुतळयांची आणि आजुबाजूच्या परिसराची सफाई करावी. उद्यानामध्ये, रस्त्याच्या कडेला, चौकामध्ये पुतळे उभारलेले असतात. उद्यानाचे सुशोभीकरण केले तर शहराच्या सौदर्यीकरणामध्ये भर पडेल.

यानंतर कु.जयश्री.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ प्रथम श्री.बोरले..... 19:55

श्रीमती सुधा जोशी.....

आणि म्हणूनच मला या निमित्ताने "भाई कोतवाल उद्यान " जे दादरला आहे, त्याच्याबद्दल सांगावेसे वाटते. मागेही मी याचा उल्लेख केला होता की, दादरच्या या उद्यानाची अवस्था फार वाईट आहे. भाई कोतवाल यांच्या पुतळयाची सुध्दा दुरावस्था झालेली आहे,असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. हायकोर्ट ते चर्चगेट या रस्त्यांवर देखील अनेक पुतळे आहेत. कुर्ला येथील एल.बी.एस.मार्गावरील पुतळयांची दुरावस्था झालेली आहे. ते सगळे पुतळे असुरक्षित आहेत, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या पुतळयांच्या आजुबाजूचा जो परिसर आहे, तो सुशोभित केला पाहिजे आणि मुंबईच्या सुशोभिकरणासाठी हातभार लावला पाहिजे.

उद्योग विभाग,पृष्ठ क्रमांक 139,बाब क्रमांक 171, यात मध्यम आणि मोठया उद्योगांना अर्थसहाय्य करण्याचा उल्लेख आहे. पण मुंबईतील जे कारखाने आहेत ते कारखाने बंद होत आहेत,त्याचा विचार का केला जात नाही ? मुंबईतील मोठमोठे जे उद्योग आहेत त्या उद्योगपतींकडे हजारो एकर जमीन आहे, पण ते आपले कारखाने बंद करुन बाहेर गावी म्हणजे मुंबईबाहेर त्यांचे उद्योग नेत आहेत आणि मुंबईतील त्यांच्या उद्योगाच्या ठिकाणी टोलेजंग इमारती बांधून कोटयवधी रुपये कमवित आहेत. याचा परिणाम असा झालेला आहे की, ते उद्योगपती न राहता बिल्डर्स व्हायला लागलेले आहेत. या उद्योगपतींच्या कारखान्यांमध्ये काम करणारे हजारो कामगार त्यांनी उद्योग मुंबईबाहेर हलविल्यामुळे किंवा बंद केल्यामुळे बेकार बनत चालले आहेत. भविष्यात मुंबईमध्ये बिकट परिस्थिती येणार आहे,अशी भिती वाटावयाला लागली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना मी विनंती करते की, याकडे त्यांनी प्रकर्षाने लक्ष द्यावे.

गृहनिर्माण विभाग,पृष्ठ क्रमांक 173,बाब क्रमांक 208 ,एस.आर.ए.ची अवस्था बिकट झालेली आहे. देशाचे जे नवीन गृहनिर्माण धोरण आहे, ते अजून काही तसे निश्चित झालेले नाही त्यामुळे पहिले जे प्रस्ताव मंजूरीसाठी आलेले होते,ते तसेच पडून आहेत,आणि अर्धवट अवस्थेमध्ये आहेत. त्यांची जी अवस्था आहे, ती अत्यंत वाईट आहे. याकरिता अनेक झोपडया पाडल्या गेल्या होत्या आणि त्या जागेवर सुरु झालेले बांधकाम देखील अर्धवट अवस्थेत आहे. काही लोक संक्रमण शिबिरात अडकलेले आहेत. सेल बिल्डींगचे जे बांधकाम झालेले आहे त्याच्यामध्ये सामान्य माणसांनी लाखो रुपयांचे कर्ज काढून फ्लॅट बुक केलेले आहेत आणि त्यांचे बांधकाम पूर्ण झालेले नसून तसेच,अर्धवट अवस्थेत पडून असल्यामुळे कर्ज काढून तेथे फ्लॅट बूक करणारे सामान्य लोक

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी..........

आता पश्चाताप करीत आहेत. याचा सर्वे शासनाने करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये अर्धवट जी बांधकामे आहेत,ती पूर्ण करण्याकरिता आर्किटेक्ट आणि डेव्हलपर्स यांना म्हाडाकडून आवश्यक त्या परवानग्या मिळवून देऊन नियमाप्रमाणे अर्धवट राहिलेली बांधकामे विनाविलंब पूर्ण करण्यास सांगण्याची आवश्यकता आहे. या अर्धवट बांधकामांवर देखरेख करण्याकरिता दक्षता पथके निर्माण केली गेली पाहिजेत. एस.आर.एस.योजना सक्षमपणे कार्यान्वित केली पाहिजे. माननीय मंत्रिमहोदयांना मी यानिमित्ताने अशी विनंती करीन की,त्यांनी एस.आर.ए.कडे प्रकर्षाने लक्ष द्यावे.

महसूल विभाग,पृष्ठ क्रमांक 26 बाब क्रमांक 33, अनेक गावांमध्ये अद्यापि तलाठी कार्यालये नाहीत,त्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे. दोन - तीन गावांना एकच तलाठी असतो,तेथे अनेक अडीअडचणी असतात. अनेक ठिकाणी तलाठयाच्या हाताखाली काही जण शिकाऊ म्हणून काम करतात त्यांना कायम करण्याची गरज आहे.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 20:00

श्रीमती सुधा जोशी .....

सभापती महोदय, शेतजमिनीबाबत माननीय सदस्य श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी मुद्दा मांडला आहे की, शेतजमिनीचे वाद लक्षात घेतले तर असे लक्षात येईल की, जमिनीची 1930 नंतर पुर्नमोजणी झालेली नाही. तरी या जमिनीची पुर्नमोजणी करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण त्यानंतर विभक्त कुटुंब पध्दती झाल्यामुळे जमिनीचे छोटे-छोटे तुकडे पडलेले आहेत. जाण्या-येण्यासाठीसुध्दा रस्ते नाहीत. त्यावरुन वाद निर्माण होत आहेत. त्यामुळे जमिनीची पुर्नमोजणी करणे हा एक उपाय आहे, यासाठी जरुर जमिनीची पुर्नमोजणी करणे आवश्यक आहे.

पृष्ठ क्रमांक 52, बाब क्रमांक 74 शालेय शिक्षणाबाबत आहे. शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे व्यवसाय शिक्षणाला एक वेगळे महत्व प्राप्त झालेले आहे. त्यासाठी लहानपणापासून मुलांना व्यवसाय शिक्षणाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाने प्रत्येक प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये हस्तकला, कार्यानुभव या विषयांचे शिक्षक नेमणे आवश्यक आहे. हा विषय अनिवार्य करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी अशा प्रकारे शिक्षकांची सोय नसेल त्यांचे अनुदान थांबवायला हरकत नाही. याची सक्ती करावी कारण व्यवसाय शिक्षणाची अतिशय आवश्यकता आहे. याबाबत शासनाचे काय धोरण आहे ? हे मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

पृष्ठ क्रमांक 233, बाब क्रमांक 284 महिला व बालविकास विभागाच्या बाबतीत आहे. शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याबाबत यामध्ये उल्लेख केलेला आहे. ग्रामीण भागातील निराधार, विधवा, परित्यक्त्या महिलांना आधार देण्यासाठी त्यांना मिळणारे अनुदान अनेक ठिकाणी बंद केलेले आहे. त्यांचे अर्ज पडून आहेत. हे अनुदान एक महिन्याच्या आत त्यांना मिळावे, याबाबत ताबडतोब निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तसेच स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याकरिता केंद्रशासनाकडे महाराष्ट्र शासनाचे प्रस्ताव वेळेवर पाठविले जाण्याची गरज आहे. एवढे मी या निमित्ताने आपल्या माध्यमातून शासनाला सांगू इच्छिते व पुरवण्या मागण्यांना पाठींबा देते.

**तालिका सभापती** : मला एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून द्यायची आहे की, अजून 11 सदस्य या मागण्यांवर बोलणार आहेत. आपण एखाद्या प्रश्नांवर फार अन्याय करावा असे मी म्हणणार नाही. परंतु प्रश्न किंवा मागण्या मांडत असताना जास्त विश्लेषण न करता मांडाव्यात. यानंतर माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना बोलण्यास मी परवानगी देते.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते येथे उपस्थित आहेत, माझी त्यांना एक विनंती आहे की, सभागृहात पुरवणी मागण्या किंवा अर्थसंकल्पावरील मागण्या मांडल्या जात असतील तेव्हा भाषणे झाल्यानंतर कंटाळवाणे स्वरुप सभागृहाला येते. आता मी गृहनिर्माण खात्यातील भ्रष्टाचाराबद्दल व अनागोंदी कारभाराबद्दल बोलणार आहे. परंतु याची नोंद करण्यासाठी कोणतेही संबंधित मंत्री उपस्थित नाहीत. माझी विनंती आहे की, हया पुरवण्या मागण्यांचे बजेट 5 हजार कोटी रुपयांचे आहे. जगामध्ये असे कोठेही होत नाही. तुम्ही जलसंपदा मंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या खात्याला 1100 कोटी रुपये दिलेले आहेत. 30 कोटी रुपये वस्त्रोद्योग खात्याला दिले आहेत. महाराष्ट्र शासनातील 10 कोटी जनतेला न्याय मिळण्यासाठी किती पैसे देणार ? माझ्या खात्याला किती आणि तुमच्या खात्याला किती ?

यानंतर कु.धनश्री.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण......

एखादी बिल्डींग रिपेअ्र बोर्डमार्फत ज्यावेळी बांधण्यात येते त्यावेळी या कामासाठी बजेट तयार करण्यात येते. त्यासाठी 100 रुपये लागतील असे गृहीत धरण्यात येते. भिंत फोडल्यानंतर त्या ठिकाणी किती नुकसान झालेले आहे, हे लक्षात येते म्हणून त्यामध्ये 10 ते 20 टक्के व्हेरीएशन करण्यात येते. बजेटमध्ये अशा काही नियमित तरतुदी आहेत, या सप्लीमेंटरी बजेटमध्ये येता कामा नये. सभागृहातील माननीय मंत्रिमहोदयांना माझा असा प्रश्न आहे की, या बजेटमध्ये प्रोव्हीजन केल्यानंतर, मंत्रिमंडळाची आढावा बैठक होते काय ? अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीची अंमलबजावणी प्रशासनाच्या माध्यमातून होत आहे किंवा नाही ? मघाशी एक सन्माननीय सदस्य म्हणाले की,आता सभागृहातील सर्व पत्रकार निघून गेले आहेत. सगळया गोष्टी आम्ही प्रेस करीता बोलत नाही. प्रेस त्या बाबींची अंमलबजावणी करणार नाही. राज्यामध्ये सध्या असे झाले आहे की, फूल खुदा का,मुल्क बादशाहा का और अमल कंपनी सरकार का. माझे असे म्हणणे आहे की, या बजेटम्ध्ये अनेक चुकीच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 5 वर बोलणार आहे. जे प्रशासकीय अधिकारी असतात त्यांच्यावर काही बंधने असतात, श्री.खोब्रागडे यांचे नाव मी येथे यासाठी घेत आहे, कारण त्यांनी सर्व प्रशासनाचा अपमान केलेला आहे. मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे आणि तिच्या अंतर्गत बी.ई.एस.टी.आहे. प्रशासक म्हणून एखाद्या आयुक्ताची नेमणूक शासन तेथे करीत असते. श्री.खोब्रागडे असे म्हणाले की, मी कोणाचेही ऐकणार नाही. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांचे ऐकण्याचा तर संबंधच येत नाही. माननीय बाळासाहेबांचा हा खरे तर त्यांनी अपमान केलेला आहे. आम्ही सत्तेवर असतो तर याबाबबत जरुर काही तरी केले असते. सहाव्या मजल्याचे मी ऐकणार नाही असे ते ज्यावेळी बोलले त्यावेळी लगेच दुस-यादिवशी त्यांची बदली व्हावयास पाहिजे होती. याचाच अर्थ आपली घोडयावरील मांड व्यवस्थित नाही. घोडयाला वाटते की, माझ्यावर जो सत्ताधीश स्वार झालेला आहे त्याला मी कधीही फेकून देऊ शकेन. जर घोडा आपल्याला हवा त्या दिशेला न्यायचा असेल तर त्यावरील मांड व्यवस्थित पाहिजे. सहाव्या मजल्याने आदेश दिला असता की, कामगारांच्या बोनस बाबत खर्चाची जी काय तरतूद करावयाची असेल ती करा व आपण कामगारांना बोनस द्या. तर ती गोष्ट योग्य झाली असती. यांच्यामध्ये

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण......

ही मिजास कशी आली ? सभापती महोदया,अनेक मंत्री साधे असतात. त्यांना त्यांचे पद टिकवायचे असते म्हणून ते बोलत नाहीत,पुरवणी मागण्याच्या वेळेला मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यवेळी आम्ही बातम्या वाचल्या की,माझे म्हणणे मान्य नसेल तर मी जातो असे सांगून श्री.सुबोधकुमार बैठकीमधून उठून गेले. यासंदर्भात नंतर आपण उत्तरामध्ये सांगावे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदया,सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आता जी माहिती दिली आहे ती असत्य आहे. पुरवणी मागणीच्या संदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा झ ाली त्यावेळी कोणतेही सनदी अधिकारी अशा प्रकारचा त्रागा करुन निघून गेले नव्हते. किंवा अशा प्रकारचे वक्तव्य करण्यात आले नव्हते. अशा प्रकारचे विधान रेकॉर्डवर राहणे हे अनुचित आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदया,मुंबईच्या 11 वर्तमानपत्रामध्ये ही बातमी छापून आली. त्यावेळी आपल्या माहिती संचालनालयाकडून याबाबत स्पष्टीकरण का देण्यात आले नाही ? यासंदर्भात मला दुसरी एक गोष्ट साांगवयाची आहे की, मंत्रालयातील अनेक अधिकारीहे कोर्टामध्येच असतात. प्रथम श्रेणी,द्वितीय श्रेणी अधिका-यांना जर उत्तर देता आले नाही तर सनदी अधिका-यांना बोलाविले जाते. त्यानंतर असे लक्षात येते की, प्रश्न सोडविण्यासाठी जनता ही मंत्रालयामध्ये असते व ज्यांच्याकडे फाईल असते असे अधिकारी कोर्टामध्ये असतात.

यानंतर श्री.सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

म्हणून माझ्या माहितीप्रमाणे त्या ठिकाणी महसूल विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती नीला सत्यनारायण ज्या आहेत त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली की, यातून मार्ग काढणे आवश्यक आहे. कारण सनदी अधिकाऱ्याला कोर्ट कोठल्याही वेळेस कोर्टात बोलावू शकतो. कारण अशाच विषयासंदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये अलिकडेच गुजराथ संबंधी एक निर्णय लागला आहे. त्यात सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला आहे की, सनदी अधिकाऱ्यांना समन्स बजाविण्याचा हायकोर्टाला पूर्ण अधिकार आहे मात्र अत्यंत अपवादात्मक आणि अत्यावश्यक परिस्थितीतच असे व्हावे असेही मत त्यांनी व्यक्त केले आहे. सुप्रीम कोटाच्या या निर्णयाचा आधार घेऊन राज्य सरकारने यामध्ये तोडगा काढावा अशी अपेक्षा अधिकाऱ्यांनी व्यक्त केलेली आहे. सभापती महोदया, मला असे वाटते की, अत्यंत कार्यक्षमतेने अधिकाऱ्यांनी प्रशासन चालविणे आवश्यक असेल तर याही बाबीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदया, त्यानंतर शालेय शिक्षण विभागाची पूरक मागण्यांवर मी माझे विचार मांडणार आहे. पृ.43, बाब क्रमांक 68 आणि त्या पुढील 2,3 बाबींवर मी बोलणार आहे. सभापती महोदया, या ठिकाणी 10वी च्या पाठ्यपुस्तकांबाबत साऱ्या महाराष्ट्रभर, मुंबईतच नव्हे, चर्चा झाली आहे. 10 वी पाठ्यपुस्तके जी काढली त्यात अनेक चुका असल्याने ती नंतर रद्द करावी लागली आणि त्यामुळे 13 लाख पुस्तके रद्द केली गेली आणि पुन्हा दुसरी 13 लाख पुस्तके छापून घेतली. सभापती महोदय, मी शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ साहेबांना सांगू इच्छितो की, मी त्यांच्या खात्याच्या विषयाबाबत माझे विचार मांडत आहे, चर्चा करीत आहे आणि त्यांना जर ही चर्चा ऐकावयाची नसेल तर मग आम्हालाही ही वांझोटी चर्चा करण्यात काही स्वारस्य राहणार नाही. तरी कृपया त्यांनी किमान त्यांच्या खात्याविषयीची चर्चा तरी ऐकावी. सभापती महोदय, 10वी च्या पाठ्यपुस्तकांच्या 13 लाख प्रती दुसऱ्या वेळी छापल्यानंतर तेथील काही अधिकाऱ्यांनी सांगितले की, पुढील वर्षी हा अभ्यासक्रम बदलणार असल्याने ही 13 लाख पुस्तके जी आता पुन्हा छापून घेतली आहेत त्यांचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणजे दोन वेळा 13, 13 लाख पुस्तके छापून घेतल्यामुळे ही 26 लाख पुस्तके ज्यांच्या चुकीमुळे छापून फुकट जाणार आहेत त्याला जबाबदार कोण ? त्याचे उत्तरदायित्व आपण ठरविणार आहात की नाही ? त्याचे उत्तरदायित्व मंत्र्यांवर नाही, अधिकाऱ्यांवर नाही तर मग कोणावर राहणार आहे ? म्हणून मला वाटते या कडे लक्ष देणे

..... 4एल 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आवश्यक आहे असे माझे मत आहे. सभापती महोदया, दुसरी गोष्ट म्हणजे कोकण विभागासाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करावे अशी मागणी केली असता सरकारकडून घोषणा केली गेली की, पुढील अधिवेशनापूर्वी कोकणासाठी शिक्षणमंडळ निर्माण केले जाईल आणि मार्च 2007 च्या 10वी आणि 12वीच्या परीक्षा त्या मंडळा मार्फत घेण्यात येतील. पण अद्याप पर्यंत त्याबाबत काहीही झाले नाही. इतकेच नव्हे तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी रत्नागिरी येथे जेव्हा मंत्रिमंडळाची बैठक झाली त्यावेळी देखील तेथे असेच सांगण्यात आले की, कोकणासाठी वेगळे शिक्षण मंडळ केले जाईल. तुम्ही जेथे जाता तेथे तेथील जनतेला फसविण्यासाठी अशा प्रकारे मायाजाल पसरविता. कशासाठी आपण असे करता ? तर मते कशी मिळतील याचीच चिंता तुम्हाला असते म्हणूनच तुम्ही अशा घोषणा करता. पण प्रत्यक्षात मात्र काहीही होत नाही. म्हणून मला या निमित्ताने आपल्याला असे सुचवावेसे वाटते की, दर महिन्याला आपण जशा मंत्रिमंडळाच्या बैठका घेता त्याप्रमाणे आपण आढावा बैठका देखील घ्याव्यात. म्हणजे मग आपण घोषित केलेल्या किती गोष्टी प्रत्यक्ष अमलात आल्या हे आपल्यालाही समजून येईल. शेवटी तुम्ही राज्यकर्ते आहात. कालच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गिरीश गांधी यांनी सांगितले की, तुम्हाला राज्य करायला अजून वेळ आहे. आम्हीच येथे नेहमी राज्यकर्ते म्हणून राहणार आहोत. जरूर परमेश्वराने तुम्हाला उदंड आयुष्य दिले आणि राज्यकर्ते म्हणून तुम्ही राहिलात तरी त्यामुळे जळायला आमचे काही कारण नाही. परंतु जेव्हा राज्यकर्त्याचा मुगुट डोक्यावर ठेवला आहे तो जनतेच्या सेवेसाठी ठेवला आहे. तेव्हा तुम्हाला अशा काही गोष्टी या कराव्या लागतील याचेही भान ठेवा. मी आपल्याला सांगतो की, आपण कितीही काहीही सांगितले तरी रत्नागिरी येथील शिक्षणाधिकारी, फुलवान नावाचा अधिकारी आहे तो इ टीव्हीला असे सांगतो की, मंत्री काहीही सांगोत, पण 2008 च काय पण 2009 वर्षामध्ये देखील हे शिक्षण मंडळ स्थापन होणार नाही. राज्यकर्ते तुम्ही आहात की हे अधिकारी आहेत ? कोकणासाठी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ होण्यासाठी आम्हाला जागा पाहिजे आणि त्यासाठी तुम्ही कलेक्टराला विचारता. आम्ही जेव्हा शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना या संदर्भात पुढे काय झाले म्हणून विचारतो तेव्हा ते सांगतात की, काय करू, आम्ही कलेक्टरला याबद्दल विचारतो पण आम्हाला कलेक्टर यासाठी जागा देत नाही. हे राज्य तुम्ही चालविता की कलेक्टर चालवितो ? राज्यकर्ते तुम्ही आहात ना ? मग अर्जन्सी क्लॉज

...... 4एल 3 ..



KBS/ कु. गायकवाड नंतर --- 20:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

लावून तुम्ही यासाठी जमीन ताब्यात घेऊ शकत नाही का ? चिपळूण किंवा संगमेश्वर अशा ठिकाणी किंवा जी कोणती मध्यवर्ती ठिक्राणी जागा असेल ती जागा तुम्ही घेऊ शकत नाही का? पण तुम्ही कलेक्टर जागा देत नाही म्हणून सांगता. कलेक्टर रूलर आहे का ? ते म्हणतात की, आम्हाला आमच्या प्रशासकीय व्यवस्थेतून जावे लागते. वारे वा, तुमची प्रशासकीय व्यवस्था. म्हणून मला वाटते की, या ठिकाणी अतिशय तातडीने कोकणासाठी या सभागृहात दिलेले जे आश्वासन आहे ते पाळण्यासाठी, त्याची पूर्तता करणे अत्यंत आवश्यक आहे असे माझे मत आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 4एम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

सभापती महोदया, नगर विकास विभागाच्या पान क्रमांक 57 वरील बाब क्रमांक 80 मध्ये केंद्र पुरस्कृत योजनेअन्वये चालू वित्तीय वर्षात बृहन्मुंबई पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प हाती घेण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याकरिता 10 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सभापती महोदया, वास्तविक एम.एम.आर.डी.ए.चे स्वत:चे बजेट आहे, त्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचे स्वत:चे बजेट असतांना आपण 10 कोटी रुपये कशासाठी ठेवले? हे याठिकाणी सांगणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर पालिका क्षेत्रातील नागरिकांना 6 कोटी 10 लक्ष रुपयांच्या विशेष सुविधा देणार आहात? त्या कोणत्या देणार आहात? याकरिता एम.एम.आर.डी.ए. मध्ये आणि मुंबई महानगरपालिकेमध्ये वेगळी तरतूद असतांना आपण ही तरतूद करण्याची गरज काय? यासंबंधी खुलासा होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील महानगरपालिका आणि नगरपालिकांना मिळून 16 कोटी रुपये ठेवले आहेत. या ठिकाणी महाराष्ट्राचे शहरीकरण झपाटयाने होत आहे. महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेपैकी 48 टक्के जनता शहरामध्ये रहाते. आज शहरे भकास होत चालली आहेत. त्याठिकाणी सांडपाण्याची व्यवस्था नाही, गटाराचे पाणी वाहून जाण्याची व्यवस्था नाही, रस्ते व्यवस्थित नाहीत, पार्किंगची व्यवस्था नाही, प्राथमिक आरोग्य केंद्राची व्यवस्था नाही. अनेक नागरी सुविधांची आवश्यकता असतांना, इन्फ्रास्ट्रक्चरची आवश्यकता असतांना व त्यांची कमतरता असतांना महाराष्ट्रातील नगरपालिकांना आणि महानगरपालिकांना आपण 16 कोटी रुपयांचे कोणत्या प्रकारचे अनुदान देणार आहात? हा याठिकाणी महत्वाचा प्रश्न आहे

सभापती महोदया, मुंबई महानगरपालिकेचे संगणकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबत तरतूद करीत असतांना कारण असे सांगण्यात आले की, या प्रणालीमुळे पाणी खाते कर संकलन निर्धारक आणि त्या वॉर्डातील जनतेला गुड गव्हर्नन, चांगले प्रशासन मिळेल. त्यामुळे चांगल्या प्रकारे ऑक्ट्रॉय वसूल होईल. त्याठिकाणी श्री.श्रीकांत सिंह नावाचे अधिकारी होते. मघाशी म्हटल्याप्रमाणे काही आय.ए.एस. अधिकारी हे स्वत:ला " Above all, we are the real rulers". अशाप्रकारे काही अधिकाऱ्यांच्या मनामध्ये भावना आहे. त्यामध्ये काही अधिकारी चांगले आहेत. प्रशासनामध्ये कीन इंटरेस्ट घेवून काम करीत आहेत. श्री. स्वाधीन क्षत्रिय यांच्यासारखे गृहनिर्माण विभागामध्ये अधिकारी चांगले काम करीत होते. मी सर्वच अधिकाऱ्यांवर टीका करीत नाही हे आपण लक्षात घ्यावे. या सिंह साहेबांनी आपला हट्ट कशाप्रकारे पूर्ण केला? मुळात या सर्व योजनेकरिता 40 कोटी रुपयांचा जास्त खर्च केला. 10 कोटी रुपयांचा खर्च होत असतांना 30



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. मधुकर चव्हाण...

कोटी रुपयांचा जास्त खर्च केला. संगणकीकरण करण्याकरिता निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये सॅप, सिमेन्स, ओरलॅप या कंपनीच्या निविदा मागविण्यात आल्या. या निविदांपैकी कोणती निविदा स्वीकारावी  याकरिता टाटा कन्सल्टंसी सर्व्हिसेसची नेमणूक करण्यात आली. त्यांनी सॅपऐवजी ओरलॅप कंपनी, ओरॅकल कंपनीची नियुक्ती करावी. ही कंपनी स्वस्त होती अशाप्रकारे त्यांनी आपल्या अहवालामध्ये प्रस्तुत केले होते. सभापती महोदया, दुसरी गोष्ट अशी की, या सर्व कंपन्यांनी आमची कंपनी किती चांगली आहे, आणि तुम्हाला चांगली सेवा कशी देवू हे दाखविण्यासाठी एक टेंपो भरुन कागदपत्रे सादर केली. आमचे अभ्यासू नगरसेवक श्री. आशिष शेलार यांनी प्रामाणिकपणे, पोटतिडिकीने सभागृहामध्ये भंडाफोड केला. तरीही त्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळाला नाही. अशारितीने महानगरपालिकेचे नुकसान करणारी योजना त्याठिकाणी रेटून राबविण्यात आली. तांत्रिकदृष्टया सर्व गोष्टींची पहाणी करण्याकरिता यांच्या निविदा बरोबर आहेत की नाहीत, संगणकीकरण करु शकतील की नाही यासाठी असिस्टंट इंजिनिअर (रोड), एक्झि क्युटिव्ह इंजिनिअर (रोड), आणि गायनॅकॉलॉजिस्ट अशा तिघांची समिती नेमण्यात आली. संगणकीकरण करण्यासाठी ज्या निविदा मागविल्या आहेत त्या योग्य आहेत की नाहीत, समर्पक आहेत की नाहीत? फायनान्शिअली त्या व्हायेबल आहेत की नाहीत, तांत्रिकदृष्टया  त्या बरोबर आहेत की नाहीत? हे बघण्यासाठी असिस्टंट इंजिनिअर (रोड), एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर (रोड) आणि गायनॅकॉलॉजिस्ट डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. काय कारभार चालू आहे?

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण.......

त्यांनी एका दिवसात म्हणजे पूर्ण 24 तासात नाही तर अवध्या 8 ते 10 तासात एक टेम्पोभरुन असलेल्या कागदपत्रांची छाननी केली. ही काय जादू आहे ? वर्तमानपत्रामध्ये ही सगळी कात्रणे आल्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी त्याची दखल घेतली काय ? राज्यकर्ते हे टिपकागदासारखे असले पाहिजेत. टिपकागद जसा शाई टिपून घेतो त्याप्रमाणे शासनाने जनतेची सुखदु:खे टिपून त्याबाबत योजना कार्यान्वित केल्या पाहिजेत. आपल्याला चार-पाच सचिव असतात, सहाय्यक असतात. ते नको त्या फाईल्स बघण्यासाठी असतात काय ? जनतेच्या हिताच्या फाईल्स बघावयाच्या नसतात काय ? हा सगळा प्रोजेक्ट 16 महिन्यांमध्ये पूर्ण होईल असे सांगितले होते. नगरविकास खाते फक्त एफ.एस.आय. वाटणे आणि यू.एल.सी.च्या फाईल्स क्लिअर करणे यासाठी आहे काय ? जनतेला नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी हे सर्व करीत असताना 16 महिन्यात पूर्ण करावयाचा प्रोजेक्ट 24 महिने झाले तरी अजून पूर्ण झालेला नाही. असे सांगण्यात आले की, आम्ही घरी बसून संगणकावरुन कोट्यवधी रुपयांचा ऑक्ट्रॉय गोळा करणार. त्या ठिकाणी श्रीमती व्ही. राधा या आय.ए.एस. अधिकाऱ्यांना स्वत: मुलुंड नाक्यावर जावे लागते. सगळ्या दलालांपासून त्यांच्या जीवाला धोका असल्यामुळे त्यांना संरक्षण देण्याची एकमुखी मागणी सर्वपक्षीय नगरसेवकांनी केली. याबाबतीत सुध्दा शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, यानंतर पृष्ठ क्रमांक 127 वरील विधी व न्याय विभागाच्या संदर्भात एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण मते मिळविता आणि राज्य करता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूलभूत अधिकारांबरोबरच काही मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत. त्यामध्ये असे म्हटले आहे की, जनतेला जलद न्याय मिळाला पाहिजे व त्यासाठी वेगवेगळी न्यायालये उभारणे अत्यंत आवश्यक आहे. मग जिल्हा न्यायालये असतील, तालुका स्तरावरील न्यायालये असतील, ती उभारली पाहिजेत. विधान परिषदेमध्ये बुधवार, दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजी अनुक्रमांक 16 वर तारांकित प्रश्न क्रमांक 35302 विचारण्यात आलेला होता. सदरहू प्रश्न सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. संजय केळकर, श्री. विनोद तावडे, मी तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्री. गोविंदराव आदिक, श्री. संजय दत्त, श्री. रमेश निकोसे आणि श्री. धनाजी साठे या सन्माननीय

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. मधुकर चव्हाण .....

सदस्यांनी विचारलेला होता. त्यामध्ये शासनाने असे उत्तर दिले आहे की, राज्यातील 81 तालुक्यांमध्ये अद्याप दिवाणी व प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी यांची न्यायालये कार्यरत नाहीत. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे. 81 ठिकाणी न्यायालये नाहीत. त्यामध्ये पुढे असे उत्तर दिले आहे की, राज्यातील ज्या तालुक्यांमध्ये न्यायालये नाहीत अशा तालुक्यांना जोडलेल्या न्यायालयांमधील अंतर व थकीत प्रकरणे याचा विचार होऊन उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार 53 तालुक्यांमध्ये टप्प्याटप्प्याने दिवाणी न्यायालये व प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालये सुरु करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. शासनाने फक्त निर्णय घेतला आहे. या देशामधील जनतेला जर न्याय मिळावयाचा असेल तर याबाबतीत कार्यवाही होणे आवश्यक आहे. न्यायालयांच्या इमारतींची अवस्था सुध्दा भयानक आहे. या ठिकाणी त्वरित न्यायालयांचा आणि न्यायालयांच्या इमारतीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदया, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 151-152 वरील सामाजिक न्याय विभागाच्या संदर्भात बोलावयाचे आहे. मी राजकीय अभिनिवेशातून बोलत नाही. मुस्लीम बांधवांसाठी आर्थिक, शैक्षणिक सुधारणा केल्या पाहिजेत. कारण तेही या देशाचे मुख्य घटक आहेत. ते या देशाचे नागरीक आहेत. त्यांच्यासाठी वेगळ्या मंत्रालयाची घोषणा करण्यात आली. परंतु जे दलित आहेत, पिडित आहेत त्यांच्यासाठी वेगळ्या मंत्रालयाची घोषणा करावयास पाहिजे होती. जे मागावर्गीय आहेत, ओ.बी.सी. आहेत, आदिवासी आहेत त्यांच्यासाठी अर्थसंकल्पात जी आर्थिक तरतूद केलेली आहे त्याचा विनियोग योग्य प्रकारे होतो की नाही, त्यांच्या ताटात ते पैसे जातात की नाही, त्यांच्या पोटात ते अन्न जाते की नाही, हे पाहिले पाहिजे. त्यासाठी वेगळे मंत्रालय निर्माण करावयास पाहिजे होते. जे भटके विमुक्त असतील, दलित असतील, ओ.बी.सी. असतील, आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतील, मंडल आयोगाच्या अंतर्गत येणारे असतील त्यांच्यासाठी जी आर्थिक तरतूद केलेली आहे त्यासंदर्भात नीट पूर्णपणे अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी वेगळे मंत्रालय करु असे सांगितले असते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेण्याचा आपल्याला काही तरी अधिकार आहे असे वाटले असते.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 20:25

(श्री. मधुकर चव्हाण...)

म्हणजे आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेऊन मते मिळवून सत्तेवर येता. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर प्रेम करणा-या कोटयवधी अनुयायांसाठी जी काही तरतूद करुन ठेवलेली आहे तिचा योग्य प्रकारे विनियोग होतो की नाही हे मात्र पहात नाही.

बाब क्रमांक 194मध्ये मागासवर्गीयांसाठी 98 कोटी 53 लाख रुपयांची, इतर मागासवर्गीयांसाठी 18 कोटी 82 लाख रुपयांची तरतूद केली आहे. या सगळया नियमित बाबी आहेत. या अचानक समोर उभ्या राहिलेल्या बाबी नाहीत. मग त्यामध्ये गरीब विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची बाब असेल, विद्यार्थ्यांना अन्य सोयी सवलती देण्याची बाब असेल, या सर्व बाबींसाठी मूळ अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावयास पाहिजे. आता या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये ही तरतूद करीत आहात. या पुरवणी अर्थसंकल्पाला काय अर्थ आहे ? ज्यांना सकाळ संध्याकाळ आपल्या पोटाला अन्न मिळेल की नाही याची भ्रांत आहे अशा गरीब लोकांसाठी ज्या तरतुदी राज्य शासनाने केलेल्या आहेत त्यांचा विनियोग योग्य प्रकारे होतो की नाही हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, गृहनिर्माणाच्या बाबतीत सर्व आनंदी आनंद आहे. मागील अधिवेशनामध्ये घुसखोरांच्या बाबतीत सी.आय.डी. इन्क्वायरी करुन पावसाळयानंतर घुसखोरांना बाहेर काढू असे सांगितले होते. प्रोसिडिंगवर हे आलेले आहे. तेव्हा सी.आय.डी. इन्क्वायरी केली की नाही हे मंत्री महोदयांनी सांगावे. म्हाडाच्या अंतर्गत जेवढा सेस गोळा होतो तेवढा अतिरिक्त निधी मुंबई रिपेअर बोर्डाला देणे आवश्यक आहे. सुमारे 110 कोटी रुपये शासनाच्या तिजोरीमध्ये ठेवलेले आहेत.त्यातील एक रुपयाही दिलेला नाही. सेस रिकव्हरी करणारी एजन्सी बीएमसी आहे. ती पैसे गोळाकरुन शासनाच्या तिजोरीत भरते आणि शासनामार्फत ते पैसे म्हाडाला देण्यात येतात. सभापती महोदय, अतिरिक्त गाळ्यांचे वाटप गृहनिर्माण खाते विशेषत: म्हाडा करते. या ठिकाणी आय.ए.एस. अधिकारी दीड वर्षापेक्षा अधिक काळ राहात नाही. त्या ठिकाणी आलेला आय.ए.एस.अधिकारी चांगले काम करायला लागला की त्याची राजभवनामध्ये सेक्रेटरी म्हणून बदली होते. जेथे ज्ञानाचा आणि प्रामाणिकपणाचा उपयोग होत नाही अशा ठिकाणी त्याची नियुक्ती केली जाते. एखाद्या इमारतीमध्ये 50 लोक राहात असतील आणि त्या ठिकाणी नवीन 100 गाळयांची इमारत बांधली असेल तर त्या इमारतीमध्ये मूळ 50 लोकांचे पुनर्वसन करुन उर्वरित

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/

(श्री. मधुकर चव्हाण...)

गाळे मास्टर लिस्टवरील लोकांना द्यावयाचे असतात. ज्यांच्या इमारती रिझर्व्हेशनमुळे विकसित होत नाहीत अशा इमारतीमधील लोक 30-35 वर्षे म्हाडाच्या ट्रान्झिट कॅम्पमध्ये खितपत पडलेले आहेत. कोंडवाड्यामध्ये कोंडलेली जनावरे जशी कोंडवाड्याचे दार केव्हा उघडते याची वाट पहात सैरभैर झालेली असतात तशी अवस्था या ट्रन्झीट कॅम्पमधील लोकांची झालेली आहे. त्यांचे सारे लक्ष मास्टर लिस्टकडे लागलेले आहे. मला वाटते म्हाडा हे भ्रष्टाचाराचे आगार झालेले आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी जबाबदारीने बोलतो. मंत्री अधिका-यांना बोलावतात ते जनहिताची कामे करण्यासाठी नाही तर बिल्डरची फाईल मला का दाखवली नाही, एनओसीची फाईल का दाखवली नाही, एफएसआयची फाईल माझ्याकडे का आली नाही हे विचारण्यासाठी ते अधिका-यांना बोलावतात.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मागण्यांवर बोलावे.

श्री. मधुकर चव्हाण : मी मागण्यांवरच बोलत आहे. मी तीन उदाहरणे देतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोडवरील नेकजात इमारतीमध्ये 225 चौ.फुटाचे 40 गाळे दीड वर्षापासून पडून आहेत. ते मास्टरलिस्टमधील लोकांना का देण्यात येत नाहीत ? हिंदमाता लेन मधील बावला इमारतीमध्ये 100च्या आसपास अतिरिक्त गाळे आहेत. लोअर परेल येथील पटेल इमारतीमध्ये अतिरिक्त गाळे पडून आहेत. हे गाळे मास्टरलिस्टमधील लोकांना का दिले नाहीत. दोन वर्षे झाली, तीन वर्षे झाली. आता आपले राज्य संपायला आले आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..........

दिल्लीच्या इशाऱ्यावर नाचत बसला आहात. म्हाडाअंतर्गत 9 मंडळे आहेत. फक्त एका मंडळाची बॉडी जाहीर केली. सगळ्या मोठा विनोदाचा भाग म्हणजे तुमचे राज्य कसे चालले आहे बघा. मुंबई इमारत दुरुस्ती मंडळ हे मुंबई बेटापुरते मर्यादित आहे. त्या मंडळाचे अध्यक्ष श्री.सचिन अहिर आहेत. त्या मंडळाचे 19 सदस्य असून ते मुंबई बेटावरचेच असावेत असा म्हाडाचा कायदा म्हणतो. तुम्ही भिवंडीच्या एका सदस्याला नेमले. श्री.कमरुद्दीन मर्चंट जे वांद्र्याला राहतात त्यांना नेमले. केवळ कार्यकर्त्यांची व्यवस्था चालविण्यासाठी म्हाडाच्या कायद्याची ऐशीतैशी करुन टाकली आहे. मी वापरणारा शब्द अनपार्लमेंटरी असेल तर काढून टाकावा. परंतु तुम्हाला लाज वगैरे काही आहे की नाही? तुमच्या मनाला काही वाटते की नाही?

सभापती महोदया, 35 वर्षे तुम्ही ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहू शकता का? दोन दिवस राहिल्यानंतर तिसऱ्या दिवशी राहू शकणार नाही इतकी दुरावस्था आहे. अधिकाऱ्यांच्या डोक्यामध्ये भूसा भरला आहे का? घुसखोरांना रेग्युलराईज करायला निघाले आहेत. हायकोर्टाने निर्णय दिला की, घुसखोरांना नियमाने रेग्युलर करता येत नाही. परंतु तुम्हाला मते पाहिजेत, दलालांचे हप्ते मिळतात म्हणून त्यांना रेग्युलर करायला निघाला आहात. या प्रकरणाची सीआयडी चौकशी झाली की नाही? घुसखोरांना पावसाळ्यानंतर काढू असे सांगण्यात आले होते त्याना बाहेर काढले की नाही? अतिरिक्त गाळे मास्टर लिस्टमधील लोकांना दिले का? लोकांकडून वसूल केलेले 110 कोटी रुपये कायद्याने तुम्हाला वापरता येत नाहीत ते तुम्ही का वापरले?

सभापती महोदया, बाब क्रमांक 288, 289, 290 बाबत मी बोलणार आहे. सांस्कृतिक कार्य विभागासंबंधी बोलत असताना या सभागृहामध्ये अनेकदा या विषयावर चर्चा झाली होती. गोरेगाव येथे फिल्मसिटीची जमीन आहे. शासनाच्या दुग्धविकास खात्याची 3200 एकर जमीन असून त्यापैकी 149 एकर जमीन महाराष्ट्र रंगभूमी, चित्रपट व सांस्कृतिक विकास महामंडळाला दिली गेली. अद्याप ही जमीन हस्तांतरित झालेली नाही. 2003 मध्ये ही 70 कोटी रुपये किंमत असलेली जमीन केवळ 28.20 कोटी रुपयांना श्री.सुभाष घई यांच्या कंपनीला विकण्यात आली. शासनातील आदर्श अधिकारी श्री.गोविंद स्वरुप यांना या प्रकरणी शिक्षा झाली, प्रकरण कोर्टात गेले, त्यांना जामीन मिळाला. जमिनीचा घोटाळा कॅगने निदर्शनास आणला. सभागृहात चर्चा झाली असताना शासनाने आश्वासन दिले होते. सुभाष घई यांना जमीन देताना भ्रष्टाचार झाल्याचे

श्री.मधुकर चव्हाण..........

शासनाने मान्य केले होते. त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, त्यांच्याकडून जमीन परत घेऊ किंवा बाजारभावाने पैसे घेऊ. मग जमीन परत घेतली का? तर परत घेतली नाही. बाजारभावाने किंमत घेतली का? दोन दिवसापूर्वी सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम सभागृहात भाषण करताना म्हणाले होते की, शेतकऱ्यांना मदत द्यायची तर नोटा छापायच्या का? तुम्ही नोटा घरी नेता ना! 70 कोटी रुपयांची जमीन 20 कोटी रुपयांना विकताना 40 कोटी रुपये कोणी छापले? याचा विचार करा. गोविंद स्वरुप यांना जेलमध्ये घातले. त्यांनी कोणाच्या इशाऱ्यावर या गोष्टी केल्या?

(नंतर श्री.जुन्नरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जुन्नरे प्रथम श्री. भोगले... 8.35

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, आज मुंबईमध्ये कोठेही ओपन जागा नसतांना शासनाने चित्रपट निर्माता श्री. सुभाष घई यांना दिलेली आहे. ही जमीन चित्रपट महामंडळाची नसतांना ही जमीन परस्पर सुभाष घई यांना दिलेली आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, एक तर ही जमीन शासनाने सुभाष घई यांच्याकडून परत घ्यावी किंवा ही जमीन शासनाने चांगल्या कामासाठी दिली असेल तर त्या जमिनीची बाजार भावाप्रमाणे जी किंमत येते त्या किंमतीने त्या जमिनीचे पैसे घ्यावेत. सभापती महोदया, चित्रपट अभिनेत्री मल्लिका शेरावत चित्रपटात एका डान्ससाठी 50-50 लाख रुपये घेते. एवढेच मानधन कलाकार सुध्दा घेत असतात. सुभाष घई या जागेवर स्टुडिओ बांधून कोटयावधी रुपये मिळवत आहे. त्यामुळे शासनाने ही जमीन परत घ्यावी किंवा तीचा योग्य मोबदला घ्यावा अशी माझी विनंती आहे.

सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, फिल्मसिटी महामंडळाकडून 28 वर्षात शासनाने एक पैसा देखील गोळा केलेला नाही. 28 वर्षात 108 कोटी रुपये चित्रपट विकास महामंडळाकडे शासनाचे थकलेले आहेत. प्रोडयुसर करोडो रुपये कमावित असतांना त्यांनी शासनाचे 108 रुपये भाडे अद्यापपर्यंत दिलेले नाही. यासंदर्भात जेव्हा वर्तमान पत्रात बोम्बाबोंम्ब झाली तेव्हा कुठे हे पैसे मिळण्यास सुरुवात झाली. त्यामुळे हे शासन वर्तमानपत्र आणि कोर्ट चालवित आहे असा जनतेला वाटावयास लागलेले आहे.

सन्माननीय सभापती महोदया, आपण सुध्दा आपल्या बीड जिल्हयातील प्रश्न या ठिकाणी मांडलेले आहेत. परंतु जेव्हा त्या आसनावर पीठासीन अधिकारी बसतो तेव्हा तो वेगळेच बोलत असतो. त्यामुळे यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, पुढच्या अधिवेशनामध्ये या अधिवेशनात कोणकोणत्या विषयावर चर्चा झाली व त्यासंदर्भात कोणते निर्णय घेतले गेले याची माहिती दिली गेली तर हे राज्य आदर्श आहे, हे राज्य शिवशाहीचे आहे, महात्मा फुले-आंबेडकराचे राज्य आहे असे म्हणता येईल. सभापती महोदया, आता महाराष्ट्रात हत्ती घुसला आहे. या हत्तीची आम्हाला भिती नाही तर तुम्हालाच खरी भिती आहे. आम्हाला तर असे वाटते की, या राज्यामध्ये हत्ती आला तर चांगलेच होईल. सभापती महोदया, या ठिकाणी आम्ही जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या सर्व मुद्यांना उत्तरे मिळण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

....2



असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदया, मी नगरविकास विभागावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभी आहे. 1970 साली नव्या मुंबई मध्ये सीडकोने जमीन संपादन केली होती. 30-40 वर्षे झाली तरी या ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना सीडकोने न्याय दिला नाही. त्यामुळे नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त शासनाकडे आशेने पाहत आहे. दोन तीन महिन्यापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांसाठी एक चांगला निर्णय घेतलेला आहे त्यामुळे नवी मुंबईमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे. या निर्णयामध्ये प्रकल्पग्रस्तांनी जी घरे बांधलेली आहेत ती नियमित केली जावीत, शैक्षणिक संस्थांना जागा द्याव्यात असे काही निर्णय झालेले आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी सांगितले आहे की, हे प्रशासन अधिकारी चालवित आहेत की, मंत्री-आमदार चालवित आहेत हे एकदा स्पष्ट होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे..............

माननीय मुख्यमंत्री नवी मुंबईत येऊन प्रकल्पग्रस्तांची घरे कायम स्वरुपी झाली पाहिजेत असे सांगतात. पण त्याबाबत अधिकारीवर्ग कोणतीही कार्यवाही करीत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा करून तीन महिने झाले, अजूनपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. माननीय मुख्यमंयत्र्यांनी केलेल्या घोषणेवर काय कार्यवाही हे पाहण्यासाठी मी सतत मंत्रालयात फेऱ्या मारत आहेत. पण अधिकारी वर्ग मला काही दाद लागू देत नाही. किंबहुना माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेचे मिनिटस् सुध्दा मुख्यमंत्री कार्यालयात अजून गेलेले नाही. याठिकाणी नगर विकास राज्यमंत्री उपस्थित आहेत त्यांनी सुध्दा याबाबतीत लक्ष घालावे अशी मी त्यांना विनंती करते.

सभापती महोदया, मी आपणास अधिकाऱ्यांचा दुसरा एक किस्सा सांगते. नवी मुंबईतील बेलापूर प्राथमिक आरोग्य केंद्राशी संबंधित आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राचा आजुबाजूच्या लोकांना भरपूर फायदा होतो. आपण ग्रामीण भागातील असल्यामुळे ते आपणास चांगलेच ज्ञात आहे. या विषयाच्या संदर्भात मी मागील अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे, विशेष उल्लेखाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ग्रामविकास मंत्री श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांनी हे रुग्णालय ताबडतोब हस्तांतरीत करावे असे सांगितले. त्यावर नवी मुंबईचे आयुक्त श्री.नाहटा यांनी तसा प्रस्ताव तयार केला. संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. हस्तारंणाचा निर्णय सभागृहात झालेला आहे असे सांगूनही त्यावर कोणातीही कार्यवाही झालेली नाही. मी आपणास अधिकाऱ्यांचा नमुना सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे पुरवणी मागण्यांच्यावेळी कोणती आश्वासने देण्यात आली ,ती पूर्ण करण्यात आली किंवा कसे याची माहिती पुढील अधिवेशनात द्यावी. म्हणजे आम्ही मांडलेल्या प्रश्नाला योग्य न्याय मिळेल.

सभापती महोदया, मी बेलापूर गावात एकाच्या लग्नासाठी गेले होते. त्या ठिकाणी ओवा कॅम्प आहे. तेथे कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन केलेले आहे. पण त्या कॅम्पची अतिशय वाईट अवस्था झालेली आहे. आपण प्रकल्प करण्यासाठी लोकांच्या जमिनी घेतो. मात्र त्यांचे पुनर्वसन अशाप्रकारे होत असेल तर अन्य प्रकल्पासाठी जमिनी देण्यास लोक तयार होणार नाहीत. तेव्हा अशाप्रकारचा संदेश जाऊ नये म्हणून त्या कॅम्पची दुरावस्था दूर करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...............

बाब क्रमांक 134, पृष्ठ क्रमांक 145 - महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी, त्यांना निर्णय प्रक्रियेत आणण्यासाठी माननीय श्री.शरद पवार यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. महिलांना निर्णय प्रक्रियेत आणण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सभापती महोदय, आपण महिला सरपंचाना झेंडावंदन करण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु झेंडावंदन करण्याचा अधिकार देऊन महिलांचा आर्थिक विकास होणार आहे काय ? ज्या राज्यात महिलांना मान-सन्मान दिला जातो, महिला सुखी असते ते राज्य सुखी असते असे आपले नेते सांगतात. महिला संरपंचाना एस.टी.चा मोफत पास द्यावा अशाप्रकारची मागणी मी मागील अधिवेशनात केली होती. विशेष उल्लेखद्वारे देखील मी हा विषय उपस्थित केला होता. हा पास फक्त तालुक्यापुरता देण्यात यावा, जिल्ह्यात वा राज्यात फिरण्यासाठी नको. राज्यात साधारणत: 9500 महिला सरपंच आहेत. त्यासाठी जवळपास 4 ते 5 कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. तेव्हा महिला संरपंचाना एस.टी.चा मोफत पास देण्यात यावा अशी मी पुन्हा मागणी करीत आहे.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ पूर्वी श्री.अजित... 20:45

श्रीमती मंदा म्हात्रे.....

बाब क्रमांक 186, पृष्ठ क्रमांक 149--केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत खार जमीन विकासाची कामे करण्यासाठी आपण तरतूद केलेली आहे. सांगली जिल्हयातील मिरज येथील कसबा दिग्रज येथील खार जमिनीचा विकास करण्यासाठी आपण याठिकाणी पुरक मागणी आणलेली आहे. परंतु याठिकाणी मला माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, ज्यावेळी 26 जुलैला मोठा पाऊस येऊन महापूर आला त्यावेळी ठाणे व रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये पावसाचे पाणी शिरल्यामुळे त्यांची जमीन नापिक होऊन तेथील शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. ठाणे व रायगड जिल्हा समुद्रकिनारी असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये समुद्राचे पाणी जाऊन मोठयाप्रमाणात त्यांचे नुकसान झाले. खार जमिनीबाबत मी गेल्यावेळी अर्धातास चर्चा उपस्थित केली होती, त्यावेळी माननीय प्रा.प्रीतमकुमार शेगांवकर यांनी असे आश्वासन दिले होते की, यासंदर्भात मी लवकरावत लवकर बैठक लावतो. परंतु अजूनपर्यंत ती बैठक लावलेली नाही. त्यामुळे या पुरवणी मागणीच्या निमित्ताने माझी मागणी आहे की, सांगली जिल्हयाप्रमाणेच ठाणे व रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांचाही यामध्ये समावेश करुन तेथील शेतक-यांनाही न्याय द्यावा.

बाब क्रमांक 284, पृष्ठ क्रमांक 233--विदर्भ प्रदेशातील शेतकरी व शेतात काम करणाऱ्या कामगांराच्या मुलींच्या सामुहिक विवाहाकरिता आपण याठिकाणी तरतूद केलेली आहे, याबद्दल शासनाचे करावे तेवढे अभिनंदन कमी आहे. परंतु याठिकाणी मला माननीय मंत्रिमहोदयांच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, यामध्ये आपण विदर्भ प्रदेशाप्रमाणेच ठाणे-रायगड, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेशातील शेतक-यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहाकरिता त्यांचाही समावेश करावा. सगळयाच प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी असते. कोकणामध्ये पाऊस खूप पडतो परंतु पावसाचे पाणी आपण आडवू शकत नाही. त्यामुळे आपण याठिकाणी विदर्भातील शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहाच्या दृष्टीने ज्याप्रमाणे तरतूद केली, त्याप्रमाणे या पुरक मागणीमध्ये आपण राज्यातील सर्वच विभागांचा समावेश करावा, ही विनंती.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे...

बाब क्रमांक 294, पृष्ठ क्रमांक 242--ऐतिहासिक वारसा लाभलेल्या वस्तूंचे संवर्धन व जतन करण्यासाठी आपण याठिकाणी तरतूद केलेली आहे. ज्या शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, त्या शिवरायांनी अनेक ठिकाणी किल्ले निर्माण करुन त्यांचा उपयोग आरमार ठेवण्यासाठी, सैन्यांसाठी किंवा लोकांसाठी केला. माझ्या ठाणे जिल्हयातील बेलापूर गावात फार पुरातन किल्ला असून तो दुर्लक्षित आहे. मी हा विषय वारंवार अंदाज समितीमध्ये उपस्थित केला व माननीय मंत्रिमहोदयांच्या समोरही उपस्थित केला. परंतु याबाबतीत पुढे काहीच झालेले नाही. या पुरातन किल्ल्याची दुरुस्ती होणे फार आवश्यक आहे. हा किल्ला फार पुरातन असून या किल्ल्याने पानिपतची लढाई पाहिलेली आहे. ज्यावेळी पानिपतची लढाई सुरु होती त्यावेळी या किल्ल्यामध्ये आरमार जमा करुन ठेवण्यात आले होते व ते समुद्रमार्गी तेथे पाठविले जात होते. पंरतु आज हा किल्ला नादुरुस्त असून फारच वाईट अवस्थेत पडलेला आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.......

या किल्ल्याची डागडुजी झाली आणि त्या ठिकाणी जर पर्यटन क्षेत्र उभे राहिले तर महापालिकेला कर स्वरुपात त्याचा फायदा होईल. या मागणीच्या निमित्ताने बेलापूर गावठाण किल्ल्याचा समावेश नव्याने करण्यात येणा-या पर्यटन क्षेत्रामध्ये करावा, अशी मागणी करते. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------------

....2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, पुरवणी मागणी हा विषय असा आहे की, त्यामध्ये आम्ही मुद्दे मांडतो त्यावर ताबडतोब विचार झाला नाही तरी लेखी उत्तर त्या त्या विभागांकडून आम्हाला मिळते. त्यामुळे जे प्रश्न समाजाच्या हिताचे आहेत ते सुटण्यास मदत होते. सहनशीलता ठेवून उशिरापर्यन्त सभागृह चालविले जाते याबद्दल सदनाचे प्रथम मी आभार मानते.

सभापती महोदया, पहिला मुद्दा हा आहे की, पुरवणी मागणीची जी प्रक्रिया आहे त्यामध्ये मूळ अर्थसंकल्पाच्या 25 टक्क्यांपेक्षा अधिक रक्कम पुरवणी मागणीत असता कामा नये. संसदीय कार्य विभाग, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, पणन, गृहनिर्माण, महिला व बालकल्याण विभाग आणि जलसंपदा विभाग या विभागांनी उशिरा का होईना बजेट मागितले असेल तर ते चुकीचे आहे, असे मी म्हणणार नाही. अर्थसंकल्पामध्ये न्याय मिळाला नाही म्हणून पुरवणी मागण्या त्यांना मांडाव्या लागतात की काय याबद्दल आम्हाला लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने किंवा इतर माध्यमातून आम्ही जेव्हा चर्चा करीत असतो त्यावेळी जर सत्य काय आहे हे कळले तर आम्ही सुध्दा विरोधी पक्ष त्यात राजकारण न करता त्यांच्या विभागाच्या ज्या अनिर्णीत मागण्या आहेत त्या मान्य करुन घेण्यासाठी निश्चितपणे आमची सद्भावना त्यांच्याबरोबर असेल. परंतु दुर्देवाने पुरवणी मागण्यांच्या स्वरुपामध्ये आले की अनेक जुन्या मागण्या आहेत, त्या का प्रलंबित राहिल्या यावर काही स्पष्टता येत नाही. सर्वात प्रथम काही विभागांसाठी म्हणून 'महाराष्ट्रातील सद्य:स्थिती' हा नागरी समाजाचा अहवाल युवा रुरल, नागपूर या संस्थेने तयार केलेला आहे. त्यामध्ये प्रत्येक विभागाला राज्य सरकारची स्वत:ची उद्दिष्टे आणि केंद्र सरकारकडून येणारी उद्दिष्टे याबाबत पूर्तता करण्यासाठी जे मिलिनियम डेव्हलपमेंट गोल, ज्याचा उल्लेख माननीय अर्थमंत्री नेहमी करीत असतात, त्याच्या तुलनेमध्ये तुमचा विभाग कुठे आहे याबद्दल राज्यस्तरावरील अभ्यास केला आहे. आपल्यामार्फत सहस्त्रक विकास, ध्येय, अभिवचने आणि महाराष्ट्रातील सत्यस्थिती या विषयाचे अहवाल मी विविध सहा-सात विभागांना आपल्यामार्फत देणार आहे. सामाजिक न्याय विभाग, शिक्षण महिला व बालकल्याण विभाग, त्याचबरोबर उपमुख्यमंत्री व आदिवासी कल्याण अशा व इतर विभागाना जर काही रस असेल तर त्यांना देखील मी हा अहवाल निश्चितपणे देईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे........

सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवर बोलत असतांना सामाजिक न्याय आणि व्यसनमुक्तीसंबंधी पहिल्यांदा मी काही मुद्दे मांडणार आहे. बाब क्रमांक 199 मध्ये दारुबंदी प्रचार कार्याचा उल्लेख आला आहे. दारुबंदी प्रचार कार्यासाठी आपण जो निधी देत आहोत तो निधी जी महिला मंडळे गावोगावी संघर्ष करतात, ज्यांच्या गावामध्ये दारुबंदी झाली पाहिजे अशा मागण्या करतात, 50 टक्के मतदानाने दारु पण बंद करतात. नवी मुंबई सारख्या ठिकाणी मतदान करुन महिलांनी स्वयंस्फुर्तीने दारुबंदी केली आहे. कारण ग्राम विकास विभागाचा तसा निर्णय आहे. दारुबंदी प्रचार कार्याचा निधी वाढवून मागून यासाठी वापरात आणावा. दारु मुक्ततेसाठी काम करणारी महिला मंडळे आहेत, ज्यांनी साध्य केले आहे, ते कार्य सातत्याने चालू रहावे यादृष्टीकोनातून आपण अधिका-यांवर अवलंबून न रहाता महिला मंडळांना सामाजिक न्याय विभागामार्फत अंतर्भाव केला तर ख-या अर्थाने दारुबंदी प्रचारासाठी मदत होईल.

सभापती महोदया, भूमीहिन दलितांसाठी स्वाभीमान योजना याबाबत मी नियम 93 अन्वये मुद्दा उपस्थित केला होता. भूमीहिन दलित पुरेसे मिळाले नाहीत, असे उत्तर सामाजिक न्याय मंत्र्यांनी दिले होते. या पुरवणी मागणीमध्ये यासंबंधी किती निधी वापरला गेला याबद्दल अद्ययावत माहिती पुरेशी दिलेली नाही. जमीन अधिकार आंदोलन, मराठवाडा यांनी एक अहवाल केला आहे. त्यामध्ये माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांनी शासन निर्णय काढला होता. भूमीहिन पती-पत्नींना जमीन दिली गेली पाहिजे. ज्या वादातीत आहेत, वादग्रस्त नाहीत, अशा कुठल्या कुठल्या जमिनी लोक कसत आहेत परंतु त्या भूमिहिनांना जमिनी मिळालेल्या नाहीत याबद्दलची वस्तुस्थिती यामध्ये आहे. धाराशीव जिल्हयातील जमीन अधिकार आंदोलन कार्यकर्त्यांचा अहवाल आपल्यामार्फत मी सामाजिक न्याय मंत्र्यांकडे पाठविणार आहे.

सभापती महोदया, तिसरा मुद्दा जो आपण स्वत: मांडला होता तो म्हणजे ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या संदर्भातील आहे.

यानंतर श्री.बोरले...........

GRB/ प्रथम श्री.रोझेकर .......... 20:55

डॉ.नीलम गो-हे .......

आश्रमशाळा काढणे आणि त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था असणे यासंदर्भात आम्हाला सभागृहामध्ये वारंवार उत्तरे मिळालेली आहेत की, ऊस तोड कामगारांसाठी आम्ही निश्चितपणे योजना आणू. त्यांच्या मुलांसाठी हॉस्टेल तयार करु. परंतु त्याची अजूनही पूर्तता झालेली नाही. हजारो ऊस तोड कामगार वेगवेगळया भागात कामासाठी स्थलांतर करीत असतात, या स्थलांतरीत मजुरांना अद्याप पुरेसे संरक्षण मिळालेले नाही.

सभापती महोदया, सामाजिक न्याय आणि व्यसनमुक्ती कार्य विभागासंदर्भात माझा अजून एक शेवटचा मुद्दा आहे. हा मुद्दा फुड ॲण्ड ड्रग्ज विभागाशी संबंधित आहे. मी त्यावर 93 ची सूचना दिलेली आहे. परंतु अद्याप त्या सूचनेला उत्तर मिळालेले नाही. अहमदाबाद येथील सेंट टोबॅको नावाच्या कंपनीने गौतम बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र छापून तंबाखूची जाहिरात सुरु केलेली आहे. त्याचे फोटोग्राफ्स् चंदपूर जिल्हयातील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेले आहेत. सामाजिक न्याय विभागाने स्वत:हून अशा विषयांची दखल घेऊन फुड ॲण्ड ड्रग्ज विभागाकडे जाऊन जनहितार्थ आवाज उठविला पाहिजे, याकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदया, उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार विभागासंदर्भात मला मुद्दा मांडावयाचा आहे. सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी मागच्या वेळी आम्हाला असे आश्वासन दिले होते की, मुंबई, ठाणे अशा मोठया शहरांमध्ये जी मल्टीप्लेक्स थिएटर आहेत ती मराठी चित्रपटांसाठी उपलब्ध करुन दिली जातील. मल्टीप्लेक्स थिएटर मराठी चित्रपटांसाठी उपलब्ध करुन देणे ही चांगली गोष्ट आहे. दिग्दर्शक श्री.रमेश देव यांनी चाफेकर यांच्यावर चित्रपट तयार केलेला आहे. सांस्कृतिक कार्य विभागाकडून मदत मिळेल अशी त्यांना अपेक्षा आहे. आपण अनुदान दिलेले आहे. हुतात्मा राजगुरु यांच्यावरील चित्रपटामध्ये जो गफला झालेला आहे त्याकडे सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मंत्री महोदयांचे लक्ष वेधले होते. परंतु ही मल्टीप्लेक्टस थिएटर मराठी चित्रपटांसाठी कामाच्या दिवशी सकाळी 9 ची वेळ देतात. माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला आश्वासन दिले होते की, आम्ही आढावा घेऊ आणि मराठी चित्रपटांसाठी

..2...

डॉ.नीलम गो-हे ........

मल्टीप्लेक्स थिएटर उपलब्ध करुन देऊ त्याची कितपत अंमलबजावणी झाली हे आम्हाला कळले पाहिजे.

सभापती महोदया, बाब क्र.289, 290 यामध्ये स्वातंत्र्य समरातील सेनानी आणि संयुक्त महाराष्ट्रातील सेनानी यांच्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यांची प्रतिष्ठा राखली जाणे, त्यांच्या ज्या विविध समस्या आहेत त्याकडे सांस्कृतिक कार्य विभागाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदया, पणन, रोजगार हमी योजना, संसदीय कार्य, महिला व बालविकास विभागावर मला बोलावयाचे आहे. महिला व बालविकास मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. एक अतिशय महत्वाचा मुद्दा असा आहे की, डोमेस्टीक व्हायलन्स बील शासनाने स्वीकारले आणि संरक्षक अधिकारी नेमण्यात येईल, असे शासनाने सांगितले होते. माझी अशी अपेक्षा होती की, शासनाने या बिलाच्या अंमलबजावणीची जबाबदारी ज्या अधिका-यांवर टाकलेली आहे त्यांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था शासन करेल, जेणेकरुन संरक्षण अधिकारी या कायद्याचा उपयोग करु शकतील. काल 25 तारखेला जवळ जवळ 80 संघटना नागपूरमध्ये जमल्या होत्या आणि या सर्व संघटनांची हीच मागणी होती की, संरक्षण अधिका-यांना प्रशिक्षण मिळालेले नसल्यामुळे ज्यावेळी महिला त्यांच्याकडे जातात त्यावेळी ते अधिकारी असे सांगतात की, आम्हालाच कायदा माहीत नाही. म्हणून महिला व बालविकास विभागाने संरक्षण अधिका-यांच्या प्रशिक्षणासाठी तरतूद केली पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे. याखेरीज माझ्याकडे दैनिक सकाळ वृत्तपत्रातील कात्रण आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, केवळ 8 हजाराच्या मानापमानात वर्षभर हुंडाबंदीची जागृती. 25 नोव्हेंबर हा हुंडाबंदी व देवदासी निर्मुलन दिवस म्हणून पाळला जातो. शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी 8 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये हुंडाबंदीचे काम करणा-या संघटनांची बैठक सुध्दा होऊ शकत नाही किंवा एखाद्या मुलीला हुंडयाचा त्रास होत असेल तर त्याची तक्रार करण्यासाठी त्या मुलीपर्यंत मदत पोहोचवायची असेल तर आपण तिच्यापर्यंत जाऊ शकत नाही. हुंडाबंदी दिनाच्या काळामध्येच अधिवेशन सुरु झालेले आहे. या निधीमध्ये वाढ केली पाहिजे, असे मला खास करुन सांगावयाचे आहे.

..3...



GRB/ प्रथम श्री.रोझेकर .......... 20:55

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

सभापती महोदया, कृषि, जलसंधारण आणि खार जमीन विभागामध्ये बाब क्र. 52 ते बाब क्र. 62 पर्यंतच्या बाबींचा समावेश आहे. काल दिनांक 25 नोव्हेंबर पासून शेतकरी आधार संस्थेने यवतमाळमध्ये काम सुरु केलेले आहे.

यानंतर कु.जयश्री.........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.......

त्यांनी दिलासा नावाने वेगवेगळया ठिकाणी पाटबंधारे योजना जर अंमलात आणल्या आणि त्या कशा काम करु शकतील, या संदर्भामध्ये त्यांनी जी माहिती पेपरमध्ये दिलेली आहे, त्याची पण शासनाने दखल घेतली पाहिजे. असे खासकरुन मला आपल्यासमोर सांगावेसे वाटते.

महसूल विभाग, बाब क्रमांक 30, यामध्ये भूसंपादनाच्या कार्यासाठी तसेच कार्यरत पदांसाठी आपण मोठया प्रमाणात निधीची तरतूद केलेली आहे. आपण केलेली तरतूद लोकांना मिळत नाही आणि ती त्यांना मिळण्यासाठी आपल्याला अनेकवेळा विचारविनिमय करुन याच्यावर मार्ग काढावा लागतो आणि त्याला मोठया प्रमाणामध्ये उशिर झालेला असतो, हे चित्र आपण सातत्याने बघत आहोत. या सगळयांचा पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून आपण पाठपुरावा करीत असतो, त्याबद्दल देखील विचार व्हावा, असे मी यानिमित्ताने या ठिकाणी सांगु इच्छिते.

या ठिकाणी विविध विभागांचे ठराव पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने आलेले असतांना महिला आणि बालविकास विभाग जो आहे, यासंदर्भात मला अजून एक मुद्दा मांडावयाचा आहे. राज्य महिला आयोगाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. राज्य महिला आयोगाला आम्ही आमच्या महिलांचे हक्क व कल्याण समितीच्या मार्फत आतापर्यंत एकूण सहा वेळा बोलाविण्याचा प्रयत्न केला की जेणेकरुन त्यांच्या अडचणी आम्ही जाणून घेऊन त्यांना मदत करु शकू. परंतु दुर्देवाने महिला आयोगाची आज अशी परिस्थिती आहे की, राज्य महिला आयोगाकडे अधिकारी नाहीत, कौन्सेलर नाहीत, कर्मचा-यांसाठी सोयीसुविधा नाहीत. या आयोगावर काम करण्याकरिता शासनाच्या विविध विभागातून डेप्युटेशनच्या स्वरुपात अधिकारी व कर्मचारी तेथे रुजू होतात परंतु त्यांना आपल्या विभागामध्ये जाण्याची नेहमी घाई असते. राज्य महिला आयोग, महिला आर्थिक विकास महामंडळ हे दोन महिला व बालविकास विभागाचे महत्वाचे भाग आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळाला तरी बचत गटाच्या माध्यमातून थोडी चालना मिळालेली आहे. परंतु काही ठिकाणी महिला बचत गटाचा उपयोग काही ठिकाणी फक्त गर्दी जमविण्यासाठी केला जात आहे. परंतु प्रत्यक्षामध्ये त्यांची जी अपेक्षा आहे. प्रत्येक जिल्हापरिषद, पंचायत समितीमध्ये बचत गटांकरिता उत्पादनाची व्यवस्था झाली पाहिजे. यासाठी बचत गटांच्या उत्पादनाकरिता

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

फेडरेशनची व्यवस्था केली पाहिजे. बचत गटांच्या ॲसेट्साठी एक बिल केंद्रसरकार आणत आहे,असे आम्ही ऐकेलेले आहे,परंतु अद्यापही त्याची माहिती बचत गटांना विश्वासात घेऊन देण्यात आलेली नाही. या बिलाचा परिणाम त्यांच्या कामावर काय होणार आहे म्हणून ग्रामविकास विभागाने बच गटाच्या संदर्भात लक्ष घालून त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : पान क्र.04बाब क्र.05, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली हे महाराष्ट्रातील आमदार महोदयांना दिल्लीमध्ये सहकार्य व्हावे, त्यांच्या वाहतूक, निवास, भोजन आदि सुविधा वेळेवर मिळण्याकरिता असले पाहिजे, परंतु महाराष्ट्र सदनात आमदारांना वेगळा अनुभव येतो आणि त्यामुळे त्या ठिकाणचा कार्यालयीन खर्च वाढवितांना निवासी आयुक्तांना आमच्या सुविधेकडे लक्ष पुरविण्यास सांगावे, अशा प्रकारची मी यानिमित्ताने मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 11,पान क्रमांक 04 माहिती आणि प्रसिध्दी विभाग, सभापती महोदय विविध शासकीय योजनांची माहिती जी आहे ती निरनिराळया प्रदर्शने, पत्रके अशा योजना फक्त शहरी भागातच चालविल्या जात असल्यामुळे शासनाच्या विविध योजनांची माहिती शहरी भागामधील लोकांनाच मिळते. निरनिराळया प्रदर्शनाच्या माध्यमातून ही जी माहिती आहे ती ग्रामीण, डोंगराळ, दूर्मिळ भागांमध्ये विविध प्रकारे शासकीय योजनांची माहिती उपलब्ध झाली तर तेथील जनतेला त्याचा फायदा निश्चितपणे होऊ शकतो. शासनाच्या निरनिराळया योजनांवर आधारित ज्या डॉक्युमेंट्रीज दाखविल्या जातात,त्या एन.जी.ओ.महिला बचत गटांच्या माध्यमातून ठिकठिकाणी दाखविल्या जाव्यात.

बाब क्रमांक 36 पान क्रमांक 27 जुलै, 2005मध्ये संपूर्ण कोकणामध्ये अतिवृष्टी आणि महापूर येऊन त्या दरम्यान समुद्रात आल्यामुळे नदीकिनारी असलेल्या गावांचे प्रचंड नुकसान होऊन हे नुकसान झाल्यानंतर त्या दरम्यान जी हानी झाली त्यांचे पंचनामे झाले त्यामधील पूरग्रस्त लोक अजूनही मदत निधीसाठी मागणी करीत असूनही काही ठिकाणी अद्यापही निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. आणि त्यामुळे त्या ठिकाणी ज्यांची हानी झालेली आहे, त्यांना मदत निधी उपलब्ध झाले नाही. हीच वस्तुस्थिती कोकणातील उर्वरित जिल्हयात रत्नागिरी जिल्हयात मदत निधी जितका मागितला आहे तो अजून मिळालेला नाही. उर्वरित मदत निधी त्यांना मिळाला पाहिजे.

यानंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ पूर्वी कु.खर्चे 21:05

श्री.संजय केळकर .....

सभापती महोदय, बाब क्र.80, पान क्रमांक 57 - बृहन्मुंबई पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (ब्रिमस्टोवॅड) यासाठी तरतूद केली आहे. केंद्रसरकारची कोणतीही पुरस्कृत योजना ही मुंबईत प्रथम राबविली जाते. मुंबई शहराला मागील 50 वर्षांपासून ठाणे जिल्हयातील धरणातून पाईपलाईनमधून पाणी दिले जाते. येथील पाईपलाईन नादुरुस्त होत असल्याने त्यातून गळती होते. ती पाईपलाईन अनेकवेळा तोडली जाते. पाईपलाईनच्या बाजूला जी गावे आहेत., या गावातील लोकांचे कायमस्वरुपी शेतीचे फार मोठया प्रमाणावर नुकसान होते. त्यामुळे अशा जलवाहिन्या बदलून नवीन टाकण्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. या जलवाहिन्यांना दुरुस्तीची गरज आहे. जलवाहिनी दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करावी अशा प्रकारची मी मागणी करतो.

बाब क्र.81, पान क्रमांक 58 : लोकसंख्या वाढीचा विचार करीत असताना आज प्रश्नोत्तराच्या तासात एम.एम.आर.डी.ए. चा विषय आला आहे. मुंबईच्या लोकसंख्येइतकी ठाणे जिल्हयाची लोकसंख्या झालेली आहे. ठाण्याची लोकसंख्या कोटीपर्यत लोकसंख्या पोहचली आहे. तेथे सहा महानगरपालिका आहेत. देशामध्ये एखाद्या जिल्हयामध्ये एवढया महानगरपालिका कोणत्याही जिल्हयामध्ये नाहीत. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतून 27 गावे वगळण्यात आलेली आहेत. या गावांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत त्यामुळे मुंबई व्यतिरिक्त आसपासच्या परिसरात लोक प्रचंड संख्येने राहतात, त्यांना सुविधेची नितांत गरज आहे. ही बाब शासनाने लक्षात घेऊन त्या भागात तातडीने नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधीची तरतूद केली जावी.

बाब क्रमांक 192, पान क्र.155 : व्यावसायिक महाविद्यालयाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणेबाबत तरतूद आहे. अशा वसतिगृहातील भटक्या जाती व जमाती आणि विशेष मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याची रक्कम 6-6 महिने दिली जात नाही. रक्कम दिल्यास त्याचे चेक वेळेवर क्लिअरन्स होत नाहीत. त्यामुळे अर्थसंकल्पात तरतूद होऊनसुध्दा येथे शासन व मागासवर्गीय विद्यार्थी यामध्ये शासकीय यंत्रणेमधील ज्या त्रुटी आहे, त्या दूर करण्याची आवश्यकता आहे. हया त्रुटी दूर कराव्यात अशा प्रकारची मी मागणी करतो. याला अनुसरुन विद्यार्थ्यांची फी निरनिराळया शिक्षणासंस्थांकडे शासन म्हणून आपण भरत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.संजय केळकर .....

असतो. परंतु या विद्यार्थ्यांची फी वेळेवर न भरली गेल्यामुळे तेथील शैक्षणिक संस्था मुलांना ओलीस धरतात. त्या मुलांना निरनिराळया प्रकारच्या धमक्या देतात. मागील महिन्यामध्ये अशा 15 मागासवर्गीय विद्यार्थ्यांना घेऊन मी जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलो. या 15 विद्यार्थ्यांना शिक्षण संस्थेने सांगितले होते की, फी भरल्याशिवाय तुम्हाला हॉलतिकीट देणार नाही कारण शासनाकडून अजून तुमचे पैसे अजून आलेले नाहीत. परंतु असे प्रकार या पुढच्या काळामध्ये होता कामा नये. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये. विद्यार्थ्यांची फी शासनाच्या माध्यमातून योग्य वेळी शिक्षण संस्थंना पोहचावी अशा प्रकारची मी मागणी करतो.

बाब क्र.159 -विधी व न्याय विभागासंबंधी आहे. न्यायालयाचा दर्जा वाढविणे व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष अनुदान अशी तरतूद केलेली आहे. मी कोकणातील अनेक न्यायालयांना भेटी दिलेल्या आहेत. वसई न्यायालयाचा प्रश्न माननीय मुख्यमंत्री व संबंधित मंत्री महोदयांच्या माध्यमातून सुटला आहे. कल्याण महानगरपालिका क्षेत्रात जे न्यायालय आहे. त्या न्यायालयाची इमारत अतिशय जुनी आहे. न्यायालयाची नवीन इमारत तयार आहे. परंतु त्याचे हस्तांतरण न झाल्यामुळे नवीन ठिकाणी न्यायालय भरत नाही. मी स्वत: कल्याण येथील न्यायालयात गेलो असताना पाहिले की, त्या न्यायालयाची मोठी दुर्दशा झालेली आहे. वकील संघटनांना आम्ही भेट दिली तेव्हा दिसले की, तेथे मोठया प्रमाणावर महिला वकील तेथे आहेत. महिलांसाठी तेथे प्रसाधनगृहाची देखील व्यवस्था नाही. न्यायाधिशांना बसण्यासाठी अडचण होत आहे. लोक ज्या मार्गाने येतात त्याच मार्गाने न्यायाधिशांना यावे लागते व त्याच मार्गाने त्यांना परत जावे लागते. त्यांना त्यांचा कोट चढविण्यासाठी पडदा टाकावा लागतो. अशा प्रकारे त्यांना ड्रेसअप होऊन न्यायाधिशाच्या खुर्चीवर बसावे लागते.

यानंतर कु.धनश्री....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

त्या न्यायालयामध्ये ठिकाणी मोठया प्रमाणात अंधार आहे. कोठलाही कागद तेथे वाचता येत नाही अशी अवस्था आहे. त्यामुळे तेथील जुन्या इमारतीची डागडूजी करण्यात यावी व त्यासाठी आपण निधीची तरतूद करावी अशी मी मागणी करीत आहे. मांडगाव येथे न्यायालयाची इमारत तयार आहे. मी त्या ठिकाणी भेट दिली होती. न्यायाधीशांच्या नेमणुकीकरीता पदांना मंजुरी देण्यात आली आहे परंतु न्यायाधीशांच्या निवासी व्यवस्थेसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. माननीय राज्य मंत्र्यांना मी या संदर्भामध्य पत्र दिले होते. त्यांनी देखील या पत्रावर लिहिले की, या कामासाठी नागपूर अधिवेशनामध्ये निधी प्रस्तावित करण्यात यावा - श्री. जयंत पाटील. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी देखील यासंदर्भात निधी प्रस्तावित करावा असे सांगितलेले आहे. माझी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, मांडगाव येथील न्यायाधीशांच्या निवासी व्यवस्थेसाठी 25 लाख रुपये निधीची आवश्यकता आहे. ती तरतूद आपण पुरवणी मागणीच्या माध्यमातून करावी. मांडगाव प्रमाणेच कल्याण येथील न्यायालयाची देखील अवस्था आहे. अशा अनेक न्यायालयाची प्रकरणे प्रलंबित आहेत. न्यायव्यवस्था ही सामान्य जनतेला न्याय देणारी व्यवस्था आहे त्यामुळे यासंदर्भात निधीची तरतूद शासनाकडून करण्यात यावी.

सभापती महोदया, आता मी बाब क्रमांक 201 यावर शासनाचे लक्ष वेधू इच्छतो. विधानपरिषद हे ज्येष्ठ सभागृह आहे त्यामधील सन्माननीय सदस्य हे ज्येष्ठ गणले जातात. डोंगरी विकास प्रकल्प अंतर्गत सुचविण्यात येणारी विकास कामे स्वीकारली जात नाहीत. आम्ही या सदनामध्ये मतदारसंघामधून निवडून येतो. त्या मतदारसंघामध्ये देखील दुर्गम व डोंगराळ भाग आहेत. तेथे आम्ही जी विकास कामे सुचवितो, ती विकास कामे स्वीकारली जात नाहीत. त्यामुळे ही कामे स्वीकारली जावीत अशाप्रकारची विनंती मी आपणास सभागृहाच्या माध्यमातून करीत आहे. आमच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या डोंगरी विकास कामांना प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी मी येथे करीत आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ 21:10

श्री. संजय केळकर.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 77 याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. मी स्वत: खेळाडू आहे. विद्यार्थी दशेमध्ये मी अनेक राज्य पातळीवरील खेळामध्ये सहभाग घेतला होता. त्यामुळे मला याबाबत चांगला अनुभव आहे. खेळाडू राज्य पातळीवर किंवा राष्ट्रीय पातळीवर खेळायला जातात. महाराष्ट्रातील अनेक खेळाडूनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळामध्ये नाव कमावले आहे. या खेळाडूंची निवासाची, प्रवासाची व्यवस्था करण्यासाठी शासनाने तरतूद करणे आवश्यक आहे. खेळाडू जेथे खेळावयास जातात तेथे योग्य प्रकारची व्यवस्था नसेल तर त्यांच्यामध्ये खेळण्यासाठी आवश्यक असा उत्साह राहणार नाही. आज अशी अवस्था असूनदेखील अनेक खेळाडूनी क्रीडा क्षेत्रामध्ये महाराष्ट्राचे नाव कमावले आहे. संबंधित खात्याच्या मंत्र्यानी यासंदर्भात लक्ष देऊन निधीची तरतूद करावी अशी मी येथे विनंती करतो.

सभापती महोदया, बाब क्रमांक 290 याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र हे देशातील सांस्कृतिक केंद्र आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारचे उपक्रम होतात. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून विविध नाटय संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी, विविध कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य नाटय स्पर्धा आयोजित केल्या जातात. आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये, या स्पर्धेच्या माध्यमातून अनेक कलाकार निर्माण झाले.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

अनेक सिनेनिर्माते आणि सिनेनट निर्माण झाले आहेत. अशा प्रकारे राज्य नाट्यस्पर्धेसाठी ज्या प्रकारे त्या ठिकाणी निधीची तरतूद केली जायची, पूर्वी तर या स्पर्धा व्हायच्या तेव्हा वर्तमानपत्रातून त्याची जाहिरात येत होती त्यामुळे कलाप्रेमी नागरिक त्या नाट्यस्पर्धेला हजर रहात असत. परंतु आता चटावरचे श्राद्ध उरकल्यासारख्या विभागीय राज्य स्पर्धा होतात, त्या केव्हा होतात ते कलाप्रेमी प्रेक्षकांनाही माहीत होत नाही आणि तेथील नाट्यसंस्थांनाही कळत नाही. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, अशा प्रकारे जेव्हा राज्य नाट्यस्पर्धा होतात तेव्हा त्यांची वर्तमान पत्रातून जाहिरात झाली पाहिजे, त्यांच्यासाठी निधीची योग्य ती तरतूद केली पाहिजे. दुसरे असे की, त्या त्या जिल्ह्यातील सांस्कृतिक विभागाचे जे कार्यालय असते ते कार्यालय या नाट्यस्पर्धा योग्य प्रकारे घेत नाही, त्यामुळे त्यांचे आयोजन देखील चांगले नसते. त्यासाठी त्यांनी स्थानिक हौसी नाट्यसंस्थांना त्या स्पर्धांच्या आयोजनामध्ये सहभागी करून घेतले तर या स्पर्धाही चांगल्या प्रकारे आयोजित केल्या जाऊ शकतील, त्यातून स्थानिक कलाकारांना देखील प्रोत्साहन मिळेल. म्हणून मी या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो की, या राज्य नाट्यस्पर्धांसाठी निधीची योग्य ती तरतूद केली जावी तसेच या स्पर्धांची जाहिरात योग्य प्रकारे दिली जावी आणि स्थानिक नाट्य संस्थांनाही त्यांच्या आयोजनामध्ये सहभागी करून घ्यावे.

सभापती महोदय, यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर मी माझे विचार मांडणार आहे. मघाशी या ठिकाणी सांगितले गेले की, ठाण्यामध्ये शहरी भाग आहे तसाच आदिवासी, दुर्गम भाग देखील आहे आणि तिसऱ्या बाजूला सागरी किनारपट्टीचादेखील भाग आहे. सभागृहामध्ये आरोग्य विभागाचा विषय आला की वेळोवेळी मंत्री सांगत असतात की, आम्ही ही व्यवस्था करू, ती व्यवस्था करू. त्या संबंधातच माननीय आरोग्य मंत्र्यांनी मध्यंतरी सांगितले की, ठाण्यासाठी 200 खाटांचे महिलांसाठीचे रूग्णालय उभारण्यात येईल. जरूर असे रूग्णालय आपण उभारा. पण ठाण्यामध्ये आज रूग्णवाहिकेची सोय नाही. ठाण्याच्या आदिवासी, दुर्गम भागामध्ये विशेषत: ही सोय अजिबात नाही त्यामुळे त्या भागात होणाऱ्या सर्पदंशामुळे नुकतीच दोन मुले मृत्यूमुखी पडली आहेत. कारण सर्पदंश झाल्यानंतर त्यांना शहरामध्ये उपचारार्थ आणण्यासाठी रूग्णवाहिकेची सोय वेळेवर होऊ शकली नाही आणि खाजगी रूग्णवाहिका त्यांना परवडत नव्हती.

...... 4वाय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केळकर ....

तेव्हा वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा या सारखा जो दुर्गम भाग आहे तेथे आपण 6 आरोग्य केंद्रे निर्माण केली पाहिजेत आणि त्याचबरोबर रूग्णवाहिकांची देखील व्यवस्था केली गेली पाहिजे. त्यासाठी निधीची तरतूद केली पाहिजे अशीही मागणी मी या निमित्ताने शासनाकडे करतो.

सभापती महोदया, अनेक खात्यांच्या बाबतीत मी या ठिकाणी मागण्या केलेल्या आहेत त्या आपण संबंधित मंत्र्यांपर्यंत पोहोचवाव्यात अशी मी आपणाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

***

( यानंतर श्रीमती फौजिया खान यांचे हिंदी भाषण श्री.तालेवार यांचेकडे )

( यानंतर श्री. सरफरे ....4झेड 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान ( नामनियुक्त ): सभापति महोदय, मैं अपना भाषण शुरु करने से पहले एक प्रश्न आपसे पूछना चाहती हूं कि चर्चा पर भाषण करने के लिए सभापति के स्थान से जो नाम पुकारा जाता है वह सीरियल आर्डर से पुकारा जाता है या सीनयरिटी से पुकारा जाता है, इस का क्या क्रायटेरिया है ? क्योंकि इस चर्चा में भाग लेने के लिए मैंने सबसे पहले नाम दिया था और मेरा नाम सब से आखिर में पुकारा जा रहा है. यह ठीक नहीं है.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 36/37 के संबंध में यह कहना चाहती हूं कि " समान काम और समान वेतन " के प्रिंसीपल का पुरस्कार करने हेतु वन मजदूर को वेतन की थकबाकी मिलनी चाहिए. इस संबंध में सर्वोच्च न्यायालय ने निर्णय दिया है और उसके मुताबिक निधि का प्रावधान किया जा रहा है. इसलिए मेरा यह अनुरोध है कि वन मजदूरों कों उनके वेतन की थकबाकी का वितरण जल्द से जल्द किया जाना चाहिए.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 9 के बारे में यह कहना चाहती हूं कि महाराष्ट्र में जितने भी स्कूलों ने अनुदान के निकष पूरे किए हैं, उन स्कूलों को अनुदान मिलना चाहिए.लेकिन ऐसा होते दिखाई नहीं दे रहा है. अल्पसंख्यक और अल्पभाषिक जो स्कूल है, उन्हें कायम बिना अनुदान ट्रिट न करते हुए अनुदान देने के संबंध में विचार होना चाहिए. अगर वह स्कूल अच्छा परफार्मंस दे रहा है, अच्छा दर्जा मेन्टन कर रहा है और अच्छा रिजल्ट दे रहा है तो इस स्थिति में शासन को अनुदान देने के संबंध में धोरणात्मक निर्णय लेना चाहिए. अल्पसंख्याक स्कूलों को कायम बिना अनुदान तत्व के बजाए ग्रांट देकर स्कूल चलाने की इज़ाजत दे तो अल्पसंख्याक समाज को न्याय मिल सकता है. सुहेब उर्दू हाई स्कूल, परभणी और ज्ञानोपासक उर्दू हाई स्कूल ने अनुदान के निकष पूरे करने के बावजूद अनुदान नहीं दिया जा रहा है अत: इन दोनों स्कूलों को जल्द से जल्द अनुदान दिया जाना चाहिए. इन स्कूलों को स्थानिक कमेटी ने 95 मार्क्स दिए है और स्टेट कमेटी ने 71 मार्क्स दिए है. फिर भी इन स्कूलों को किस वजह से अनुदान से वंचित किया जा रहा है ? इन स्कलों पर अन्याय हो रहा है, इसलिए यह अन्याय दूर किया जाए. उसी प्रकार से जैनब एजुकेशन सोसायटी, धनेगांव, जिला नांदेड स्थित उर्दू स्कूल ने परिपूर्ण प्रस्ताव सादर करने के बावजूद आज तक मान्यता नहीं दी गई है. हालांकि अल्पसंख्याक आयोग, भारत सरकार और अल्प भाषिक आयोग, भारत सरकार ने इसकी सिफारिश राज्य सरकार को की है. इन स्कूलों को मान्यता क्यों नहीं दी जा रही है, मान्यता प्राप्त करने के

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान ....

लिए क्या करना चाहिए, इस के लिए क्या स्कूलों को कम्युनिकेट किया जाता है, इस बारे में सम्माननीय मंत्री जी जानकारी दें.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 285, महिला व बाल विकास विभाग के संबंध में यह कहना चाहती हूं कि विदर्भ में शेतकरी और खेती के काम करने वाले लोगों की लड़कियों की शादी के लिए अनुदान दिया जाता है. विदर्भ में किसान बड़ी संख्या में आत्महत्या कर रहे हैं. विदर्भ के किसानों पर कर्ज का बोझ है इसलिए उनको यह लाभ दिया जा रहा है. मैं इस निर्णय के संबंध में शासन का अभिनंदन करती हूं लेकिन जिस प्रकार से विदर्भ में यह योजना लागू की गई है, उसी प्रकार से मराठवाड़ा में भी यह योजना लागू की जाए, ऐसा मेरा अनुरोध है. मराठवाड़ा में किसानों की हालत खस्ता हो चुकी है. मराठवाड़ा के किसान भी कर्ज के बोझ के कारण आत्महत्या कर रहे हैं. इसलिए इस योजना का लाभ मराठवाड़ा के किसानों को भी दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 212, सार्वजनिक आरोग्य विभाग के संबंध में यह कहना चाहती हूं कि परभणी के अस्पताल में यंत्र सामग्री एवम् निधि का जो प्रावधान किया गया है वह काफी नहीं है. इस अस्पताल में एडवांस सुविधाएं मुहैया कराने के लिए और निधि का प्रावधान किया जाना चाहिए. दूसरी बात यह है कि परभणी में महिला अस्पताल बनाया गया है वह अभी तक शुरु नहीं किया गया है. केवल कर्मचारियों के वेतन के लिए बजट में प्रावधान किया गया है. अस्पताल नाम के लिए है. इसलिए मेरा सरकार से अनुरोध है कि वहां स्वास्थ्य सुविधाएं प्रदान करने के लिए निधि का प्रावधान किया किया जाए.

सभापति महोदय, मैं बाब क्रमांक 194, सामाजिक न्याय विभाग के संबंध में यह कहना चाहती हूं कि ओबीसी विद्यार्थियों के लिए शिष्यवृत्ति का जो प्रावधान किया गया है, वह प्रावधान बजट में ही होना चाहिए ताकि ओबीसी विद्यार्थियों को समय पर शिष्यवृत्ति मिल सके और योजना का उद्देश्य सफल हो सके. लेकिन ऐसा नहीं होता है जिसकी वजह से विद्यार्थियों को समय पर शिष्यवृत्ति नहीं मिलती है. इसलिए मेरा सरकार से अनुरोध है कि सरकार इस ओर ध्यान दें.

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3

श्रीमती फौजीया खान....

माननीय सभापति महोदय, महिला व बाल कल्याण विभाग की बाब क्रमांक 285 के अनुसार माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे जी ने जो मांग महिला सरपंचों के बारे में रखी है कि महिला सरपंचों को प्रवास करने के लिए एस. टी. का फ्री पास दिया जाए, वही मांग मैं भी दोहराती हूं. फ्री एस.टी. पास महिला सरपंचों को मिलना चाहिए और इस काम के लिए बजट प्रोवीजन की जानी चाहिए.

बाब क्रमांक 200 पर अपने विचार रखते हुए मैं कहना चाहूंगी कि जहां तक व्यक्तिगत बीमा योजना का सवाल है उस बारे में मैं कहना चाहूंगी कि किसानों को भी उनका इंडीविज्युअल नुकसान ध्यान में रखकर उसका फायदा किसान को देना चाहिए.

बाब क्रमांक 257 पर बोलते हुए मैं कहना चाहूंगी कि परभणी और हिंगोली में जो खड़ा ऊस जल गया है उसका सर्वे कलेक्टर के जरिए हो चुका है लेकिन सिर्फ हरे गन्ने के लिए ही उनको पैसा दिया गया है जो सूखा गन्ना था उसके लिए पैसा नहीं दिया गया है. सूखे गन्ने का भी पैसा किसानों को देने के बारे में शासन की ओर से डायरेक्टिव निकाले जाने चाहिए. यह बहुत आवश्यक है. यह आदेश जल्द से जल्द निकाले जाएं, इस तरह की मांग मैं यहां पर करना चाहूंगी.

बाब क्रमांक 9 के बारे में मैं यहां पर बोलना चाहूंगी. मेरा कहना है कि तीन भाषा फार्मूले को अमल में लाया जाना चाहिए, यह बहुत आवश्यक है. एजुकेस्निस्ट्स और साइकॉलाजिस्ट्स का कहना है कि बच्चों में जल्दी भाषा सीखने की क्षमता 10 साल से कम उम्र में होती है. यदि हम पांचवी कक्षा के बाद दूसरी भाषा सिखाते हैं तो उस समय बच्चों में जल्दी भाषा सीखने की क्षमता नहीं रहती है, जल्दी भाषा सीखने की उम्र उस समय गुजर चुकी होती है. इसका फर्क उस बच्चे की आगे की पढ़ाई पर पड़ता है तथा उसकी मेरिट पर भी इस का असर पड़ता है. इसलिए त्रिभाषा फार्मूले पर अमल होना बहुत जरुरी है. एक और बात मैं यहां पर कहना चाहूंगी कि हम अपने आपको सेक्युलर कहते हैं इसलिए स्कूल की पाठ्य पुस्तकों में या पुलिस भर्ती के बाद जो ट्रेनिंग दी जाती है या यू.पी.एस.सी. तथा एम.पी.एस.सी. परीक्षा के बाद जो ट्रेनिंग होती

...4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान...

है, उन सब का सिलेबस इस तरह का होना चाहिए कि उस सिलेबस की वजह से पूरे समाज में सेक्युलर की भावना फैल सके या सेक्युलर की भावना बढ़ सके तथा ब्युरोक्रेसी की मानसिकता भी सेक्युलर बन सके. इस तरह का सिलेबस तैयार करके हम ब्युरोक्रेसी में और पूरे समाज में सेक्युलर की भावना फैला सकते हैं

एक आखिरी बात मैं यहां पर कहना चाहूंगी. वह बात महिला और बाल कल्याण विभाग से संबंधित है.मुझे कहना है कि ंमहिला आयोग के अंदर जो तीन सदस्यों के नॉमिनेशन की बात है वह नॉमिनेशन जल्द से जल्द किया जाये. इन्हीं मांगों के साथ मैं अपना स्थान ग्रहण करती हूं. धन्यवाद.

----.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदया, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

प्रथम मी शालेय शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 50 वरील बाब क्रमांक 71 बाबत बोलणार आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना 4 टक्के सादिल अनुदान देण्याच्या बाबतीत 5 कोटी 37 लाख रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. एक तर शासनाकडून शाळांना अनुदान मिळत नाही आणि दुसरीकडे शासनाने दिलेले अनुदान अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांकडून खर्ची पडत नाही. सन 2003-04, 2004-05 आणि 2006-07 या तीन वर्षासाठी 4 टक्के सादिल अनुदान शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना मंजूर केले होते. परंतु संबंधित जिल्हा परिषदांनी कोषागारातून रक्कम काढली नाही आणि त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांना त्या रकमेचे वाटप झाले नाही. त्यामुळे ती रक्कम खर्ची पडली नाही. ती रक्कम त्या वर्षात खर्ची पडली नाही तर पुढच्या वर्षामध्ये ती रक्कम खर्ची पडण्यासाठी प्रस्ताव येणे आवश्यक असताना पुढच्या वर्षी प्रस्ताव आला नाही. अशा प्रकारे या पाच जिल्ह्यांची 3 वर्षाची 4 टक्के सादिलची रक्कम 5 कोटी 37 लाख रुपये आहे. या पुरवणी मागणीच्या संदर्भात आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. अशा प्रकारे शासकीय अनुदान मिळाले असताना अधिकाऱ्यांनी कोषागारातून रक्कम का काढली नाही आणि ती खर्ची का टाकली नाही किंवा शाळेसाठी खर्च का केली नाही ? त्याचे कारण काय ? ते वेळेवर का खर्च करु शकले नाहीत ? किमान पुढच्या वर्षी तरी खर्च करण्यासाठी वेळेवर प्रस्ताव का पाठविला नाही यासंदर्भातील माहिती तसेच याला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची माहिती मिळणे आवश्यक आहे. ती माहिती देण्यात यावी.

सभापती महोदया, यानंतर पृष्ठ क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 73 बाबत मला बोलावयाचे आहे. नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील प्राथमिक शाळांना गेल्या दहा वर्षापासून वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. आम्ही वारंवार मागणी करीत होतो. या खाजगी संस्थांना शासनाने तातडीने अनुदान देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यामुळे या खाजगी शाळांना त्यांचे वेतनेतर अनुदान तातडीने मिळाले पाहिजे. गेली दहा वर्षे वेतनेतर अनुदान मिळत नव्हते. 1 कोटी 43 लाख 27 हजार रुपये एवढे दहा वर्षाचे थकित

...2...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

बरवड

श्री. रामनाथ मोते ....

वेतनेतर अनुदान देण्यासाठी ही पुरवणी मागणी आलेली आहे. दहा वर्षानंतर ही पुरवणी मागणी आलेली आहे. या ठिकाणी शासनाने असा उल्लेख केलेला आहे की, सन 2003-04 या वर्षापर्यंतची ही रक्कम आहे आणि यापुढे या खाजगी अनुदानित शाळांना कोणत्याही प्रकारचे वेतनेतर अनुदान देण्यात येणार नाही. त्यांना वेतनेतर अनुदान न देण्याचे कारण काय. शासनाने वेतनेतर अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. ही गोष्ट बरोबर नाही.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 21:30

(श्री. रामनाथ मोते...)

प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या क्षेत्रामध्ये सेवाभावी किंवा शैक्षणिक संस्था खाजगी शाळा चालवून शासनाला मदत करतात, शासनाची जबाबदारी त्या संस्था उचलतात. अशा शाळांचे वेतनेतर अनुदान बंद करता येणार नाही. किमान या प्राथमिक शाळांचे वेतनेतर अनुदान पुढे चालू ठेवणे गरजेचे आहे.

पान क्रमांक 51 वरील बाब क्रमांक 74 मध्ये काही विनाअनुदानित शाळा आणि तुकड्यांना अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने तरतूद केली आहे. मागच्या वेळी खाजगी शाळांच्या बाबतीत या सदनामध्ये उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये अनुदानास पात्र असलेल्या खाजगी शाळांच्या तुकड्यांची संख्या 827 आहे. परंतु या पुरवणी मागण्यामध्ये अनुदानास पात्र असलेल्या तुकड्यांची संख्या फक्त 261 दाखविलेली आहे. उच्च माध्यमिक तुकड्यांची संख्या उत्तरामध्ये 493 अशी सांगितलेली होती. या मागण्यामध्ये 414 तुकडयांसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. म्हणजे वर्षानुवर्षे अनुदानास पात्र असलेल्या तुकड्यांना शासनाने अनुदान दिलेले नाही. 10-12 वर्षापूर्वी ज्या शाळांना विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली त्या शाळांची नावे यादीमध्ये नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. वसंत पवार यांची अभिनव प्राथमिक विद्यालय सिन्नर, या शाळेला 1996-97मध्ये विनाअनुदान तत्वावर मान्यता दिली. त्यानंतर समता विद्यालय, काटेमानवली, कल्याण, या शाळेचे नाव अनुदान द्यावयाच्या यादीमध्ये नाही. या शाळेतील तुकड्या गेली 10-12 वर्षे विनाअनुदान तत्वावर सुरु आहेत. अनुदानावर आलेल्या तुकड्यांना 10-12-15 वर्षे अनुदान न देणे हे काही बरोबर नाही. या सर्व तुकड्यांना अनुदान मिळणे आवश्यक आहे. या सदनामध्ये दोन दिवसापूर्वी कायम विनाअनुदान शाळांच्या बाबतीत चर्चा झाली. माननीय सभापतींनी निर्देश दिल्यानंतर त्याबाबतीत कोणत्याही परिस्थितीमध्ये विनाअनुदानित शाळांचा प्रश्न, आदिवासी उप योजना क्षेत्रातील कायम विनाअनुदानित शाळांचा प्रश्न तातडीने सोडविला जाईल असे उत्तर देण्यात आले. तोही प्रश्न शासनाने लवकरात लवकर सोडवावा. सभापती महोदय जोपर्यन्त या तुकड्या किंवा शाळा विनाअनुदान तत्वावर चालतात तोपर्यन्त शिक्षक आणि कर्मचा-यांमध्ये सहनशिलता असते. परंतु शासनाच्या माध्यमातून या शाळांना, तुकडयांना अनुदान सुरु झाले की ते टप्पानिहाय 20 टक्के असेल, 40 टक्के असेल, ते फेब्रुवारी पासून तीन महिने मिळते आणि नंतर बंद होते. पुन्हा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

जुलै पासून डिसेंबरपर्यन्त अनुदान मिळते आणि पुढचे 6 महिने ते बंद होते. असे होता कामा नये. एकदा शाळा किंवा तुकडी टप्पानिहाय अनुदानावर आली की त्यांचे अनुदान कोणत्याही परिस्थितीमध्ये बंद होता कामा नये. म्हणून ज्या शाळांना आणि तुकड्यांना टप्पानिहाय अनुदान मंजूर केलेले आहे त्यामध्ये सातत्य असणे अत्यंत आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती सुधाताई जोशी यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. प्राथमिक शाळेमध्ये हस्तकला आणि चित्रकेला यासाठी शिक्षक असणे आवश्यक आहे. या हस्तकला आणि चित्रकला शिक्षकांचा कार्यभार 10 टक्के आहे असे शासन सांगते. अनेक प्राथमिक शाळांमध्ये चित्रकला आणि हस्तकला या विषयांसाठी शिक्षक नाही. चित्रकला आणि हस्तकला या विषयासाठी शिक्षक नेमण्याचा विषय दोन वर्षापूर्वी शिक्षण संचालकांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणला होता. परंतु कला विषयासाठी शिक्षकाला मान्यता देऊ नये अशा प्रकारचा निर्णय शिक्षण संचालकांनी परस्पर घेतला. अशा प्रकारे कला शिक्षकाला मान्यता न देण्याचे शासनाचे धोरण योग्य नाही .

सभापती महोदय, पान क्रमांक 70 वरील बाब क्रमांक 50कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. शालेय पोषण आहाराच्या संदर्भात तरतूद करण्यात आलेली आहे. सर्वच शाळांसाठी पोषण आहाराकरिता तरतूद होणे अत्यंत आवश्यक आहे. अंबरनाथ नगरपालिकेच्या शाळेमध्ये जून, जुलै, ऑगस्ट आणि 14 सप्टेंबर पर्यन्त पोषण आहार मिळाला नव्हता.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 21:35

श्री.रामनाथ मोते.........

म्हणजे एका बाजूला सर्व पात्र विद्यार्थ्यांना हा पोषण आहार मिळाला पाहिजे, त्यांना मध्यान्ह भोजन मिळाले पाहिजे आणि दुसरीकडे तीन-साडेतीन महिने पोषण आहार द्यायचा नाही, धान्य द्यायचे नाही, तांदूळ द्यायचा नाही. अशा प्रकारे पात्र विद्यार्थ्यांना पोषण आहारापासून वंचित ठेवणे बरोबर नाही. राज्यात तीन-साडेतीन महिने ज्या ज्या ठिकाणी तांदूळ मिळाला नाही, तो का मिळाला नाही? याला जबाबदार कोण आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, बाब क्र.75, पृ.क्र.52 वर संत तुकाराम महाराज हायस्कूल, कराड या संस्थेला 100 वर्षे पूर्ण झाली त्या निमित्ताने खास बाब म्हणून 75 लाख रुपये अनुदान दिले आहे. अशाप्रकारे जून्या शाळांना आर्थिक मदत करण्याच्या संदर्भात, स्वातंत्र्यपूर्व काळातील ज्या शाळा आहेत त्या शाळांना आर्थिक मदत करण्याचे धोरण शासनाने स्वीकारले ही अत्यंत चांगली बाब आहे. मी या निमित्ताने शासनाला विनंती करणार आहे, अशा प्रकारची ही एकच शाळा नाही. याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. अशा प्रकारे 100 वर्षे पूर्ण झालेल्या महाराष्ट्रात किती शाळा आहेत? एका शाळेला 75 लाख रुपये देत असताना अशाच प्रकारच्या इतर शाळांना 10 लाख रुपये, 15 लाख रुपये मदत देऊन चांगला प्रथा पाडता येईल. यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. 100 वर्षे पूर्ण झालेल्या सर्व शाळांना काही ना काही प्रमाणात आर्थिक मदत देण्याचे धोरण शासनाने स्वीकारावे आणि पुढील बजेटमध्ये याचे चित्र दिसावे अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदया, बाब क्र.77, पृ.क्र.23 अन्वये एटीपी किंगफिशर खुल्या टेनिस स्पर्धेसाठी 2 कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे. या संदर्भात अनेकांनी आपले विचार मांडले आहेत. ही चांगली गोष्ट केलेली आहे. खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक असेल तर जरुर अनुदान दिले पाहिजे. परंतु जिल्हा स्तरावरच्या शालेय क्रीडा स्पर्धा होतात, तालुका स्तरावर शालेय क्रीडा स्पर्धा होतात, आदिवासी व दुर्गम भागातील गरीब मुले या स्पर्धांमध्ये सहभागी होतात. शासन या स्पर्धांना अनुदान देत नाही, खर्च देत नाही आणि दुसऱ्या बाजूला तालुक्यामध्ये विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून, वेळप्रसंगी शिक्षकांना स्वत:चा खर्च करुन स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे लागते. ठाणे जिल्हयाच्या क्रीडा समितीकडे 38 लाख रुपये शिल्लक आहेत. सन्माननीय जिल्हाधिकारी त्या समितीचे अध्यक्ष आहेत. क्रीडा स्पर्धांसाठी एक पैसा मिळत नाही. याठिकाणी दोन-दोन कोटी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.........

रुपये देत आहात, ही आनंदाची बाब आहे. परंतु शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन देण्यासाठी शाळांना सुध्दा आर्थिक मदत करण्याची, आर्थिक भार उचलण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदया, बाब क्र.287, पृ.क्र.237 वर बेरोजगारांना मार्गदर्शन करण्यासाठी पुस्तके घेण्यासाठी आणि काही वाङ:मयीन पुस्तके घेण्यासाठी खर्चाची तरतूद केली आहे. यासाठी 30 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. कोणत्या प्रकारची पुस्तके घेणार आहात, किती पुस्तके घेणार आहात, किती संस्थांना ही पुस्तके दिली जाणार आहेत याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, बाब क्र.292, 293, पृ.क्र.241, 242 वर हिंदी अकादमीसाठी 31 लाख रुपयांची तरतूद केली असून गुजराथी अकादमीसाठी 35 लाख रुपयांची तरतूद केली आहे. या राज्याच्या विकासामध्ये हातभार लावणाऱ्या सिंधी समाजाची उल्हासनगर शहरात फार मोठी लोकसंख्या आहे. त्यांची सुध्दा सिंधी अकादमी आहे. या सिंधी अकादमीसाठी सुध्दा अशा प्रकारचे अनुदान देण्याचा शासनाने विचार का केला नाही? केला असेल तर आनंदाची बाब आहे. हिंदी अकादमीसाठी, गुजराथी अकादमीसाठी जरुर अनुदान द्या. परंतु सिंधी अकादमीसाठी सुध्दा अशा प्रकारचा निधी देण्याचा विचार करावा लागेल व तो शासनाने करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदया, बाब क्र.84, पृ.क्र.62 वर विक्रीकर विभागासाठी नवीन पदे निर्माण करण्याचा शासनाने विचार केला. वेगवेगळया प्रकारची पदे भरली जाणार आहेत. संगणकीकरण युगामध्ये आपण आहोत. असे असताना 943 टंकलेखकाची पदे भरली जाणार आहेत. टंकलेखन यंत्रे उपलब्ध आहेत का? संगणकावर काम करण्यासाठी पदे भरली जाणार असतील तर संगणक कोर्स केलेल्या व्यक्तींची नेमणूक करणे आवश्यक आहे. आमचे शिक्षणमंत्री कमी पडतात का हे आम्हाला कळून येत नाही. वित्तमंत्र्यांकडे व कॅबिनेटमध्ये आमचे विषय कितपत लावून धरतात याबद्दल आम्हाला शंका वाटते. याठिकाणी विक्रीकर विभागासाठी लिपीक पदाची 943 पदे भरण्यासाठी आणि ती नियमित वेतनश्रेणीमध्ये भरण्यास मान्यता मिळते.

(नंतर श्री.जुन्नरे...

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

दुस-या बाजूला मात्र शिक्षण विभागामध्ये शिक्षकांची पदे, शिक्षण सेवकांची पदे 2-2,3-3 हजार रुपये दर महिना या प्रमाणे भरली जात आहे. अन्य विभागामध्ये मात्र हजारो पदे नवीन वेतन श्रेणीमधून भरली जात आहे. त्यामुळे माननीय शिक्षण मंत्र्यांनी शिक्षण विभागासाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघ ) : सभापती महोदया, पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

पहिल्यांदा मी बाब क्रमांक 1 वर माझे विचार मांडणार आहे. राज्यामध्ये निवडणूकींच्या मतदार याद्या तयार करण्याच्या कामासाठी शासन करोडो रुपये खर्च करीत असते. औरंगाबाद, पुणे, नागपूर, अमरावती शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूकींची यादी तयार करण्यासाठी केवळ 40 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. विधानसभेच्या मतदार संघाच्या निवडणूकीच्या याद्या तयार करण्यासाठी शासन मतदारांच्या घरी जाते, त्यांची सर्व माहिती जमा करते, फाईल जमा करते परंतु पदविधर मतदार संघ, शिक्षक मतदार संघाचे जे मतदार आहेत त्यांनी आपले सर्टीफिकेट घेऊन स्वत: जिल्हयाच्या निवडणूक कार्यालयामध्ये उपस्थित राहून माहिती द्यावी अशा प्रकारचा मुहम्मद तुघलकी आदेश दिलेला आहे. सभापती महोदया, जे मतदार नोकरीमध्ये आहेत, शासकीय सेवेमध्ये आहेत ते आपले सर्टीफिकेट घेऊन निवडणूक कार्यालयामध्ये येऊ शकतील परंतु जो मतदार नोकरीत नाही, गुराढोरांमागे आहे, शेती करतो, किरणा दुकान चालवतो असा मतदार आपले काम सोडून 100-150 रुपये खर्च करुन निवडणूक कार्यालयामध्ये सर्टीफिकेट घेऊन कसा काय येऊ शकेल ? त्यामुळे या मतदाराला आपल्या मतदानाचा हक्क बजावता येत नाही, आपल्या हक्कापासून हा मतदार लोकशाहीमध्ये वंचित राहतो आहे त्यामुळे पदवीधर मतदारांची किंवा शिक्षक मतदारांची नोंद करण्यासाठी त्यांच्या घरी जाऊन निवडणूक कार्यालयाने नोंद करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदया, मी आता बाब क्रमांक 4 वर माझे विचार मांडणार आहे. महत्वाच्या व्यक्तीसांठी 22 नवीन मोटार गाडया घेतल्या जाणार असून त्यासाठी 1,01,96,000/- रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. शासन ज्या नवीन 22 मोटार गाडया घेत आहे त्यासंदर्भात मला काही बोलावयाचे नाही परंतु जिल्हयाच्या आणि तालुक्यांच्या कार्यालयामध्ये अनेक जुन्या मोटार गाडया भंगार म्हणून धूळ खात पडलेल्या आहेत. या मोटार गाडया आपण भंगाराच्या भावाने जरी विकल्या तरी शासनाला करोडा रुपये मिळतील व हा पैसा शासनाच्या महसुलात जमा होईल शासनाने दक्षता घ्यावी एवढी विनंती आहे.

सभापती महोदया, बाब क्रमांक 9 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. नागपूर येथे हज हाऊस बांधण्यासाठी हज समितीला 2 कोटी रुपयांची मदत देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री. विक्रम काळे....

शासनाने हज समितीला हज हाऊस बांधण्यासाठी पैसे दिले त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. शासन मुस्लीम बांधवासाठी ज्या प्रकारे मदत करीत आहे त्याच पध्दतीची मदत हिंदू बांधवासाठी सुध्दा करावी अशी माझी विनंती आहे. एखाद्या हिंदू बांधवाला पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन घ्यावयाचे असेल , वैष्णो वदेवीचे दर्शन घ्यावयाचे असेल, काशी विश्वेश्वराचे दर्शन घ्यावयाचे असेल तर त्यासाठीही काही तरी मदत मिळण्याची आवश्यकता आहे, त्याला त्याच्या अराध्य दैवताचे दर्शन घेता यावे यासाठी शासनाने रेल्वे किंवा बस भाडे द्यावे याचा शासनाने भविष्यात तरी विचार करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदया, आता मी बाब क्रमांक 18 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. शासनाने दोन बुलेट प्रुफ सफारी मोटार गाडया खरेदी करण्यासाठी 1.20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. यासंदर्भात शासनाने बुलेट प्रुफ सफारी गाडयांसाठी जी तरतूद केलेली आहे त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. या गाडयांचा वापर कोणत्या अतीमहत्वाच्या व्यक्तींसाठी होणार आहे याची माहिती अवगत होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...........

बाब क्रमांक 54 पृष्ठ क्रमांक 37- विदर्भ, मराठवाडा व खानदेश येथील ऊस विकास कार्यक्रमासाठी शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी 1 कोटी 63 लाख 22 हजार इतक्या रकमेची पुरवणी मागणी मांडण्यात आलेली आहे त्याबद्दल मी कृषि मंत्र्यांचे अभिनंदन करतो. याठिकाणी कृषि राज्यमंत्री उपस्थित आहेत त्यांचे देखील मी अभिनंदन करतो. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत असताना काही साखर कारखाने मात्र शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे. तेरणा सहकारी साखर कारखान्याने ऑक्टोबर महिन्यात 14 रुपयांनी स्पीरिट विकले जात असताना ते 11 रुपये दराने विकून शेतकऱ्यांची फसवणूक केलेली आहे. या संदर्भात शासन कोणती कार्यवाही करणार आहे याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे.

बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 40 - मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूर यांच्या इमारतीचे मजबुतीकरण करण्यासाठी 4 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे यासाठी मी कृषि मंत्र्यांचे अभिनंदन करतो. परंतु भविष्यात या कृषि महाविद्यालयाचे रुपांतर उप केंद्रात झाले तर ती अभिनंदनीय बाब राहील. त्यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 69, पृष्ठ क्रमांक 49 - बालवाडी सेविकांना भाऊबीज भेट देण्यासाठी 34 लाख 34 हजार रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे. बालवाडी सेविकांना दरवर्षी 500 रुपये भाऊबीज भेट देण्यात येते. पण ही भेट दिवाळीपूर्वी देण्यात यावी अशी मी मागणी करीत आहे.

बाब क्रमांक 68, पृष्ठ क्रमांक 49 - कनिष्ठ महाविद्यालये व संस्था यांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 1 जुलै 2007 पासून महागाई भत्ता देण्यासाठी 2,07,72,60,000 इतक्या रकमेची मागणी करण्यात आलेली आहे. या कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्यास उशीर झालेला आहे. परंतु उशिरा का होईना हा निर्णय घेतल्याबद्दल मी शिक्षणमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 77 - शालेय पोषण आहार योजनेसाठी 83 कोटी 18 लाख 51 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आलेली आहे. शालेय पोषण आहारासंदर्भात माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाने गुरुजींना आचारी बनविले आहे. आपणास माननीय उच्च न्यायालयाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...........

निर्णयावर काही बोलता येत नाही. माननीय उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत की, आठवड्यातील सहा दिवस मुलांना दररोज वेगवेगळ्या प्रकारचा भात दिला पाहिजे. कधी गोड भात, कधी खिचडी, कधी वरणभात, कधी मसालाभात दिला पाहिजे. परंतु शालेय पोषण आहारामध्ये शासनाकडून फक्त तांदूळ दिला जातो. त्यामुळे बाकीचा सर्व खर्च त्या त्या शाळांना करावा लागतो. तांदूळ शिजविण्यासाठी किलोमागे दोन रुपये दिले जातात. परंतु ते ही रक्कम त्यांना वेळेवर मिळत नाही. त्यासाठी मुख्याध्यापकांना लक्ष्मीदर्शन करावे लागते. तेव्हा याबाबतीत मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करीत आहे.

बाब क्रमांक 71,पृष्ठ क्रमांक 50- नांदेड, उस्मानाबाद, पुणे, भंडारा, सिंधुदुर्ग या जिल्हा परिषदांना 2003-04, 2004-05, व 2005-06 या वर्षासाठी अनुदान दिले होते. हा निधी मंजूर झ ाला असतानाही संबंधित जिल्हापरिषद खर्च करु शकली नाही ही अत्यंत खेदाची बाब आहे. परंतु उशिरा का होईना शालेय शिक्षण मंत्र्यांनी 5 कोटी 37 लाख 57 हजार इतक्या रकमेची पुरवणी मागणी मांडलेली आहे याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 73, पृष्ठ क्रमांक 51 - सन 2004-05 पासून खाजगी शाळा, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये वेतनेतर अनुदान दिले जात होते.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे..

ते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मागे दोन महिन्यापूर्वी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांसोबत बैठक झाली होती, त्यावेळी त्या बैठकीस शिक्षण विभागाचे व वित्त विभागाचे सचिव उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आता शाळांनी आपला स्वत:चा स्त्रोत निर्माण करावा, तो करण्यासाठी शाळांतील विद्यार्थ्यांकडून फी घ्यावी व त्यातून सगळा खर्च करावा, असे त्यांनी बैठकीमध्ये सांगितले. त्या बैठकीस स्वत: शिक्षणमंत्रीही उपस्थित होते. या राज्यामध्ये जेवढया शाळा आहेत, त्यातील 90 टक्के शाळा हया ग्रामीण भागामध्ये चालतात व त्या शाळांत गोरगरिबांची पोरं शिक्षण घेतात. परंतु याठिकाणी सचिव महोदय म्हणतात की, शाळांनी आपले स्तोत्र निर्माण करावे व मुलांकडून फी घेऊन त्यातून खर्च करावा. आज आपण पाहतो की, मुंबई-पुणेसारख्या शहरांमध्ये पहिलीच्या वर्गामध्ये ॲडमिशन घेण्यासाठी पालक 2-3 लाख रुपये देतात. असे असतानाही तेथील प्रवेश जून महिन्यांच्या अगोदर बंद होतात, तेथे पालकांच्या मोठमोठया रांगा लागलेल्या असतात. परंतु याउलट परिस्थिती ग्रामीण भागातील शाळांची असून त्याठिकाणी प्रत्यक्षात परीक्षेची फीही तेथील पालक देऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. आज आमच्या शिक्षकांना स्वत:च्या खिशातून मुलांची फी भरावी लागते. याचे कारण असे आहे की, शाळेमध्ये मुले राहिली तर शाळा राहते व त्यांची नोकरीही राहते. त्यामुळे त्यांना पगारातून खर्च करावा लागतो. त्यामुळे यादृष्टीने माझी मागणी आहे की, पूर्वी ज्याप्रमाणे 12 टक्क्यांचे वेतनेत्तर अनुदान दिले जात होते, त्याप्रमाणे यापुढेही ते चालू ठेवावे. परंतु यानिमित्ताने आपण सन 1997 पासून ते 2003-04 पर्यंतचे जे थकित अनुदान देण्याचे मान्य केले, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो.

बाब क्रमांक 74, पृष्ठ क्रमांक 52--अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये जादा तुकडया सुरु करण्यासाठी आणि असहाय्यित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना सहायक अनुदान देण्याच्या दृष्टीने आपण तरतूद केलेली आहे. आपण याठिकाणी तरतूद केल्याप्रमाणे अनुदानास पात्र ठरलेल्या 2006 पासूनच्या तुकडयांना अनुदान मिळणार आहे. आपण याठिकाणी 1170 तुकडयांना अनुदान देत आहेत. पंरतु यामध्ये आमचा मराठवाडा विभाग मागे आहे. मराठवाडयातील 325 तुकडया यामध्ये वंचित राहिलेल्या आहेत.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

याबाबत आम्ही सतत पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळे याही बाबतीत आपण विचार करावा. काल शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, कायम विनाअनुदानित शाळांचा प्रश्न 3 महिन्यांत मार्गी लावला जाईल. कायम विनाअनुदानाचे धोरण आपण सन 2001 मध्ये स्वीकारले. त्यापूर्वी आपण जेवढया काही शाळा व तुकडया दिल्या त्या अजून अनुदानावर आलेल्या नाहीत. म्हणून माझी विनंती आहे की, येत्या मार्चपर्यंत त्यांचे जे काही मागील देणे आहे ते द्यावे व त्या सगळया शाळांना व तुकडयांना कायम अनुदानावर आणण्याचे काम करावे.

बाब क्रमांक 75, पृष्ठ क्रमांक 52--स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूरसाठी आपण अनुदान प्राप्त करुन देत आहात. संत तुकाराम महाराज हायस्कूल, कराड, जिल्हा सातारा या शाळेचे आयूष्य 100 वर्षे झाल्यामुळे त्या शाळेस आपण 75 लाखांची तरतूद केलेली आहे. सदरची रक्कम आपण देणगी स्वरुपात त्या संस्थेस देणार आहात.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.विक्रम काळे........

त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. त्याचबरोबर या राज्यामध्ये आज अनेक संस्था अतिशय उत्कृष्ट काम करीत आहेत, अनेक शाळा चांगले काम करीत आहेत, गोरगरीबांच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम करीत आहेत. भविष्यामध्ये अशा संस्थांना, शाळांना देखील अनुदान दिले गेले पाहिजे, अशी विनंती मी या ठिकाणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 78, अपंगांसाठीचा एकत्रीकृत शिक्षण योजनेत काम करणा-या विशेष शिक्षकांच्या वेतनाकरिता अतिरिक्त तरतूद करण्यात 25 लक्ष 42 हजार रुपयांची केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपल्यालाही धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------------

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सकाळी 10.45 वाजता सभागृह सुरु झाले आहे, आता रात्रीचे 10.00 वाजत आले आहेत, त्यामुळे उर्वरित कामकाज उद्या घ्यावे, अशी आमची विनंती आहे. त्यात आज अंगारकी चतुर्थीचा उपास आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, वेळेचे बंधन निश्चितपणे असले पाहिजे. दोन्ही बाजुकडील सन्माननीय सदस्यांना वेळेची आठवण करुन दिली पाहिजे. आम्ही शांतपणे सर्व सदस्यांच्या भावना जाणून घेतल्या आणि येथे बसलो आहोत. अतिशय चांगले मुद्दे सन्माननीय सदस्यांनी मांडले आहेत. आता या चर्चेचा शेवट आहे. मंत्री महोदयांच्या उत्तरानंतर कामकाज स्थगित करावे, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आज पुरवणी मागण्या मंजूर करण्याच्या दृष्टीने आपल्या सगळयांचे सहकार्य अपेक्षित आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी आपले भाषण सुरु करावे.

.....2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असतांना बाब क्रमांक 35, पृष्ठ क्रमांक 27 बाबत मी माझे म्हणणे मांडणार आहे. सन 1993 मध्ये लातुर जिल्हयामध्ये किल्लारी येथे भूकंप झाला होता. भारतीय वायुसेना यांच्याकडून हवाई सेवा पुरविण्यात आली होती त्यांचे 37 लक्ष 40 हजार रुपयांचे बिल 14 वर्षानंतर पुरवणी मागणीव्दारे अदा करण्यात येणार आहे. माझा शासनाला सवाल आहे की, 14 वर्षे बिल थकित राहण्याचे कारण काय आहे ? हे बिल निधीअभावी प्रलंबित राहिले की भूकंपग्रस्तांसाठी गोळा करण्यात आलेला निधी संपला की संपविला ? यासंबंधी मंत्रीमहोदयांनी कृपया माहिती द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 77, पान क्रमांक 53 अन्वये किंग फिशर एअरलाईन्सने पुरस्कृत केलेल्या खुल्या टेनिस स्पर्धेसाठी अनुदान देण्यासाठी रुपये 2 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मेसर्स ग्लोबल स्पोर्टस इंडस्ट्रिज लिमिटेड या खाजगी कंपनीला हे अनुदान देण्यात येणार आहे. अशा खाजगी कंपनीला अनुदान देण्याचा पायंडा कितपत योग्य आहे ? असा माझा प्रश्न आहे. 1 लक्ष 40 हजार कोटी रुपयांचे कर्ज असलेल्या महाराष्ट्राला अशी विकतची प्रतिष्ठा कितपत परवडेल, याचाही विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, उद्योग खात्याच्या बाब क्रमांक 171 व 139 बाबत सांगत असतांना भारतातील प्रतिष्ठित उद्योगपती टाटांच्या मालकीच्या इंडिका कार प्रकल्पासाठी 100 कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याची मागणी केली आहे. या प्रकल्पातून किती रोजगार उपलब्ध होणार आहे ?

यानंतर श्री.बोरले.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ........

तसेच ही जी रक्कम आपण देणार आहात ती एक रकमी देणार आहात की जशी कामगार भरती होईल किंवा रोजगार निर्मिती होईल त्याप्रमाणात देणार आहात, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. या अनुदानाव्यतिरिक्त आपण अजून काही अनुदान देण्याचे मान्य केलेले आहे काय ? "अ" वर्ग महानगरपालिका असलेल्या पुण्यासारख्या शहरामध्ये एवढे मोठे अनुदान देण्याचा पायंडा कितपत योग्य आहे, मुंबईमध्ये एखादा कारखाना होणार असेल तर त्याला सुध्दा आपण अनुदान देणार आहात काय, मग मागास भागासाठी आपण काय देणार आहात ? असा माझा शासनाला सवाल आहे.

सभापती महोदय, बाब क्र.172, पृष्ठ क्र.139 सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत अर्थसहाय्यचा अनुशेष दूर करण्यासाठी 100 कोटी रुपये इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही प्रोत्साहनपर रक्कम, लघू, मध्यम व मोठया उद्योगांना आणि विशाल प्रकल्पांना देण्याचे ठरविण्यात आले आहे. कृपया कोणत्या उद्योगांना हे अनुदान मंजूर झाले आहे याचा खुलासा होणे आवश्यक आहे. शासनाने या उद्योगांकडून किती रोजगार निर्मितीची अपेक्षा केलेली आहे, कोणत्या भागाला हा विकास निधी देण्यात येणार आहे याची सभागृहाला माहिती मिळणे आवश्यक आहे. यातील काही वाटा सांगली भागातील कायम दुष्काळी असलेल्या कवठेमहांकाळ, आटपाटी, जत या भागांना मिळणार आहे की नाही ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

सभापती महोदय, सहकार विभाग, बाब क्र.260 नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व त्यांचे काम योग्य प्रकारे सुरु राहण्यासाठी 6 टक्के कामाच्या दराने रुपये 100 कोटी रुपये कर्ज उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले आहे. सरकारने जनतेच्या पैशातून या बँकेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद करावयाची अशा प्रकारचा सहकार जनतेने आणि शेतक-यांनी किती वर्षे सहन करावयाचा ? असा माझा शासनाला सवाल आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे ........

सभापती महोदय, बाब क्र.257 शासनाने गाळप न झालेल्या ऊसाला एकरी 25 हजार रुपये वित्तीय सहाय्य मंजूर करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गाळप न केलेल्या ऊसासाठी अंदाजे 83 कोटी 89 लाख 76 हजार रुपयांची तरूद करण्यात आली आहे. या अनुदानात प्रशासकीय अधिका-यांकडून बरेच घोटाळे होत आहेत. उस्मानाबाद जिल्हयामध्ये पंचनामे होउन सुध्दा बरेच शेतकरी अजूनही अनुदानापासून वंचित आहेत. प्रशासकीय अधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे, असा माझा शासनाला सवाल आहे.

सभापती महोदय, बाब क्र.253 रेशीम किडयांच्या उत्पादकांकडून रेशीम किडयांचे कोश आणि त्यासंबंधी असलेली रोगमुक्त अंडी उबविण्यासाठी केंद्रीय रेशीम मंडळाकडून खरेदी करुन राज्यातील रेशीम किडयांच्या कोश उत्पादकांना पुरविण्यात आली आहेत. त्यासाठी 8 कोटी 26 लाख रुपयांचा निधी प्रस्तावित केला आहे. हा निधी अनुदान म्हणून आहे की कर्ज म्हणून आहे याचा उल्लेख यामध्ये करण्यात आलेला नाही, याचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभाग, बाब क्र.194 इतर मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांसाठी शिकवणी फी व परीक्षा फी च्या प्रदानावर 58 कोटी 73 लाख 44 हजार रुपये निधी प्रस्तावित केलेला आहे. मी असे म्हणेन की, सरकारला उशिरा सुचलेले हे शहानपण आहे. ही बाब स्वागतार्ह आहे. मी सरकारचे अभिनंदन करतो. तसेच, भटक्या विमुक्तांच्या आर्थिक विकासासाठी स्थापन केलेल्या कै.वसंतराव नाईक महामंडळासाठी मूळ अर्थसंकल्पात सुध्दा तरतूद केली नाही आणि पुरवणी मागणीमध्ये सुध्दा तरतूद केली नाही. भटक्या विमुक्तांना अर्थसहाय्य करण्यासाठी एकमेव असलेले हे महामंडळ या सरकारने वाळीत टाकले आहे. या महामंडळाचे विद्यमान अध्यक्ष श्री.लक्ष्मण माने यांनी गेली अनेक वर्षे भटक्या विमुक्तांचे नेते म्हणून काम केलेले आहे. त्यांनी गेल्या सहा महिन्यांपूर्वी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे आज त्यांची प्रतिमा दलित नेत्यांमध्ये गणली जाऊ लागली आहे. त्यामुळे त्यांना भटक्या विमुक्तांच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळ नसेलही. या महामंडळाच्या अध्यक्षपदी भटक्या विमुक्त नेत्यांची नेमणूक करण्याची प्रथा असून श्री.लक्ष्मण माने यांना या महामंडळाच्या अध्यक्ष पदावरुन दूर करुन भटक्या समाजाच्या नेत्याला अध्यक्ष करावे जेणेकरुन तो चांगले काम करेल, अशी मी मागणी करतो.

यानंतर कु.जयश्री.......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे.....

नुकतेच मौलाना आझाद महामंडळास माननीय मुख्यमंत्र्यांनी 50 कोटी रुपये जाहीर केले. ही बाब अभिनंदनीय आहे. त्यानुसार महाराष्ट्राच्या तिजोरीमधील भटक्या व विमुक्त जमातींकरिता असलेला वाटा आम्हाला मिळणार आहे की नाही ? आपण तो केव्हा जाहीर करणार आहात ? की त्याकरिता आम्हाला निवडणूकीच्या जाहीरनाम्याची वाट पाहावी लागणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्काराकरिता महाराष्ट्रातील अनेक भागांमधून देशातील अनेक क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी बजाविलेल्या महिलांचे अर्ज मागविले जातात, परंतु चार वर्ष झालेले आहेत अद्यापित ते अर्ज तसेच धुळ खात पडलेले आहेत. शासनाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी पुरस्कार नसेल द्यावयाचा तर तसे जाहीर करावे परंतु अर्ज मागवूनही पुरस्कार जाहीर न करणे म्हणजे अर्जदार महिलांची एक प्रकारे चेष्टा करणे आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा अपमान करणे आणि हे आम्ही कदापि सहन करणार नाही. मागच्या अधिवेशनात सांगितले की, शासन लवकरात लवकर सदर पुरस्कार जाहीर करेल परंतु अद्यापही हा पुरस्कार जाहीर करण्यात आलेला नाही, या पुरस्काराकरिता आम्हाला अजून किती अधिवेशने वाट पाहावी लागणार आहे ? याचाही खुलासा करण्यात यावा.

आश्रमशाळेबाबत बोलावयाचे झाले तर भटक्या व विमुक्त जातींच्या आश्रमशाळा या धनदांडग्यांना त्यांची चराऊ कुरणे म्हणून त्यांचे वाटप केले जात आहे. या ज्या आश्रमशाळा आहेत,त्या भटक्या व विमुक्त जातीचे संचालक असलेल्या संस्थानांच चालविण्याकरिता देण्यात याव्यात म्हणजे या आश्रमशाळा ते अधिक आत्मीयतेने चालवतील आणि त्याठिकाणी विकास घडवून आणतील,अशी अपेक्षा मी याठिकाणी व्यक्त करतो. विकासाच्या बाबतीमध्ये भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांना जाणीवपूर्वक फाटा देण्यात आलेला आहे. तांडा सुधार योजना आता पूर्णपणे ठप्प झालेली आहे. निधीची तरतूद दिलेली नाही. आज हजारो वाडया वस्ती, वीज, शाळा, पाणी इत्यादि मुलभूत सुविधांपासून अजूनही वंचित आहेत. शासन याकडे कधी लक्ष देणार आहे हा माझा सवाल आहे.

बाब क्रमांक 194 ऐतिहासिक वास्तुंचे जतन करण्यासाठी 12.50 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शिवरायांच्या पराक्रमाच्या जाज्वल्य इतिहासाचा वारसा सांगणा-या प्रतापगडाची

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश शेंडगे ....

अवस्था अतिशय वाईट आहे. मी तेथे गेलो असता पाहिले की, त्याचे बुरुज आता ढासळत चाललेले आहे. ऐतिहासिक वास्तुंच्या जतनाकरिता असलेल्या निधीची आज अतिशय कमतरता आहे. आपण याकरिता थोडा निधी डायव्हर्ट करुन द्या प्रतापगड पुनरुज्जीवित करावा,अशी मी मागणी करतो व माझे दोन शब्द संपवितो.

---------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन,सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण खनिकर्म, महिला व बालविकास ) : सभापती महोदय, आजच्या महिला व बालविकास, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्गीय आणि परिवहन विभागाच्या मागण्यांवर चर्चा करण्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, रमेश निकोसे, प्रकाश शेंडगे, अरविंद सावंत, प्रा.फौजिया खान, श्री.विक्रम काळे अशा सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे. यासाठी जे जे शासनाला करता येईल ते ते करण्याच्या दृष्टीकोनातून मी प्रयत्न करेन. यासंदर्भात ज्या चांगल्या सूचना आलेल्या आहेत त्या सर्व कायान्वित करण्याच्या दृष्टीकोनातून मी प्रयत्न करेन. मी इतकेच सांगू इच्छितो की, महिला व बालविकास, इतर मागासवर्गीय विकास,परिवहन विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय मुख्यमंत्र्याच्या खात्यासंबंधी ज्या मागण्या आहेत, त्यांच्या खात्याशी संबंधित जे मंत्री येथे उपस्थित आहे, त्यांनी उत्तर द्यावे.

तसेच उपस्थित मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, येथे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विविध मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्या सर्व मुद्दयांचे येथे पूर्ण उत्तर देणे कठीण असण्याची शक्यता आहे हे मला माहिती आहे. परंतु जे महत्वाचे प्रश्न आहेत, त्याचे उत्तर जरुर द्यावे. बाकी मुद्दयांची लेखी उत्तरे देण्यात यावीत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय,औकाफ, विधी व न्याय राज्यमंत्री): सभापती महोदय, विधी व न्याय, शालेय शिक्षण व क्रीडा या विभागाच्या पुरक मागण्यावर चर्चा झाली. या चर्चेमध्ये माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, श्री.अरविंद सावंत, श्री.विनोद तावडे, श्रीमती सुधाताई जोशी, श्री.मधुकर चव्हाण, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, प्रा.फौजिया खान, श्री.विक्रम काळे यांनी आपले विचार मांडलेले आहेत.

विधी व न्याय विभागामध्ये चार सदस्यांनी त्यांचे मत मांडत असताना मराठी भाषेमधून कारभार होण्यासाठी आता आपण तालुका व जिल्हा न्यायालयामध्ये मराठी भाषेची सक्ती केलेली आहे व त्याचे सॉफ्टवेअर घेण्यासाठी पुरक मागणी केलेली आहे, त्याबद्दल माननीय सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केलेले आहे. जलद न्यायालय झाले पाहिजे असे माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी सांगितले आहे. 81 तालुक्यात न्यायालये नाहीत. उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत की, प्रत्येक तालुक्यामध्ये ही न्यायालये स्थापन व्हावीत. लवकरात लवकर न्यायालये स्थापन करण्यासाठी व त्यासाठी जागा शोधण्यासाठी हायकोर्टाने प्रायोरीटी द्यावी असे म्हटले आहे. त्याप्रमाणे आम्ही न्यायालये स्थापन करु. विशेषत: शिक्षण विभागात शालेय पोषण आहार ही केंद्र व राज्याची 75:25 या प्रमाणातील योजना आहे. यासाठी आपण मागील अधिवेशनात पुरवणी मागणी आणली होती. त्यावेळी जास्त पुरवणी मागण्या आल्यामुळे ती गरज भागली नाही. त्यामुळे यावर्षी सुध्दा 83 कोटीची पुरवणी मागणी आणलेली आहे.

सभापती महोदय, मालेगाव महानगरपालिकेतील वेतनाची थकबाकी आहे. तेथील महानगरपालिकेची परिस्थिती नसल्यामुळे ते रक्कम भरु शकले नाही म्हणून सर्वोच्च न्यायालयाने शासनाने आदेश दिला आहे की, ही जबाबदारी शासनाची आहे. तसेच किंगफिशर एअरलाईन्सवर शासनाने खर्च का करावा अशा सूचना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील विवेकानंद शिक्षण संस्थेस 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत, त्यामुळे त्यांना 75 लाख रुपये देण्याची मागणी आणलेली आहे. ज्या संस्थांना 100 वर्षे पूर्ण झालेली आहेत, त्यांना मदत देण्याचा शासन जरुर विचार करील. अशा संस्था तपासून त्यांच्यासाठी तरतूद करण्यात येईल.

.....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हसन मुश्रीफ .....

सभापती महोदय, कर्मचाऱ्यांना दरमहा वेतनातून महागाई भत्ता दिला जातो. परंतु दिनांक 1 जुलै, 2007 पासून केंद्र सरकारने महागाई भत्ता वाढविल्यामुळे महाराष्ट्र शासनानेही वाढविला आहे. त्याकरिता हयाच अधिवेशनात पुरक मागणी मंजूर करणे आवश्यक होते. तसेच बालवाडी सेविकांनासुध्दा जास्त मानधन मिळावे अशी आमची इच्छा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी प्राथमिक शाळेमध्ये कला व कार्यानुभव अभ्यास अनिवार्य करावा व यासाठी शिक्षकांची नियुक्ती करावी, अशी मागणी केली आहे. माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितले आहे की, 26 लाख पुस्तके चुकीची छापली गेली आहे. यासाठी दोन सभागृहातील सदस्यांची संयुक्त समिती नेमली आहे. त्यानुसार जबाबदारी फिक्स करुन ही रक्कम वसूल करण्यात येईल. सध्या या समितीचे कामकाज सुरु आहे. त्याची मुदतही यावेळी आपण वाढविली आहे. अनेक सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत, त्याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, खाजगी शाळांना वेतनेत्तर अनुदान देणे दिनांक 30 मार्च 2004 पासून बंद केलेले आहे. याबाबत परवा माननीय मुख्यमंत्र्यासोबत बैठक झालेली आहे. निश्चितपणे शासन यातून मार्ग काढेल. शेवटी या ग्रामीण भागातील शिक्षण संस्था आहेत. त्यांना खर्च भागविणे फार अवघड जात आहे याची कल्पना शासनाला आहे. ज्या विनाअनुदानित तुकडया अनुदानावर येणे बाकी आहेत, त्यांना या अधिवेशानातील पुरक मागण्यामध्ये आपण तरतूद करु शकलो नाही.

यानंतर कु.धनश्री.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे... 22:15

श्री. हसन मुश्रीफ .....

सभापती महोदय, या सर्व तुकडयांच्या बाबतीत शिक्षण खात्याची एकही पैशाची थकबाकी ठेवायची नाही असा प्रयत्न शासनाकडून मार्च अधिवेशनामध्ये करण्यात येईल. यासर्व तुकडयांना शासनाकडून अनुदान देण्यात येईल. विधी व न्याय खात्याच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात याव्या अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकण विभागासाठी, रत्नागिरी जिल्हयामध्ये दहावी आणि बारावीसाठी एसएससी बोर्ड व्हावे अशी मागणी करण्यात आली होती त्याबाबत आपण उत्तरात खुलासा केलेला नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयामध्ये दहावी आणि बारावीसाठी एसएससी बोर्ड व्हावे अशी मागणी करण्यात आली होती त्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला होता. तेथे जागा मिळालेली नाही हे खरे आहे. पालकमंत्री या नात्याने तेथे मी जागा मिळवून देईन तसेच शिक्षण मंडळ 8 -10 वर्षे होऊ शकत नाही असे सांगितले त्याबाबत चौकशी करुन कार्यवाही करण्यात येईल.

..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( नगर विकास, सामान्य प्रशासन ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. जयंत पाटील, विनोद तावडे, अरविंद सावंत, विक्रम काळे, संजय केळकर व सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यासर्व सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी सामान्य प्रशासन आणि नगर विकास या खात्याच्या पुरवणी मागण्यांवर आपले विचार मांडले आहेत.याबद्दल मी त्याचा आभारी आहे.......

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा येथे हरकतीचा मुद्दा आहे. मी असा मुद्दा मांडला होता की, आपला एक शिक्षण अधिकारी, शासनाने जरी सांगितले तरी 2008 साली काय तर 2009 साली देखील मंडळ होणार नाही. हा तुमचा अपमान आहे. हे आपण समजून का घेत नाही ?

**सभापती** : याबाबत मी रेकॉर्ड तपासतो व चुकीची माहिती असेल ती दुरुस्त करुन काढून टाकली जाईल. सन्माननीय सदस्य श्री. राजेश टोपे आपण बोलावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी वेळे अभावी सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाना उत्तरे देऊ शकणार नाही. पण मी आपणास सांगू इच्छितो की, या सर्व मुद्दयांची नोंद मी गांभीर्याने घेतलेली आहे. महत्वाच्या प्रश्नांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न करीन परंतु इतर सर्व प्रश्नांची उत्तरे सन्माननीय सदस्यांना यानंतर पाठविण्याची दक्षता घेण्यात येईल.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागातील दिल्ली येथील महाराष्ट्र सदन आहे त्यासंदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी मते व्यक्त केली. तेथे दिल्या जाणाऱ्या सोयी सवलतींबाबत सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी त्यांची मते मांडली. त्याचबरोबर निवासी आयुक्त यांनी केंद्रातील अनेक योजनांचा पाठपुरावा करावयाचा असतो. त्यांनी इतर राज्याप्रमाणे काम करावे असे सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले. या दोन्ही सूचना अतिशय योगय आहे. केंद्रशासनाकडून निधी आपल्या राज्यामध्ये ओढून आणण्यासाठी अनेक राज्ये निवासी आयुक्त व तेथील कर्मचाऱ्यांचा उपयोग करीत असतात. यासंदर्भात आपल्या राज्याकडूनही कार्यवाही होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्यात येईल. एमपीएससी मधील मेडीकल स्टाफच्या ज्या जागा आहेत, त्या लवकरात लवकर भराव्यात यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले.

..3...



DVG/ प्रथम श्री. गागरे... 22:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे..........

युपीएससी मधील रिक्त जागा एक वर्षामध्ये भरल्या जातात त्याप्रमाणे एमपीएससी मधील जागा लवकरात लवकर भराव्यात या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेण्यात येणार असून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. प्रत्येक विभागाने आपल्या रिक्त जागा कळविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. यापुढील गॅझेटेड ऑफीसर यांच्या जागा एमपीससी यांच्या माध्यमातून लवकरात लवकर भरल्या जाऊन नियुक्ती व पोस्टींगही लवकर करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, पदवीधर मतदारसंघाच्या माध्यमातून जी नोंदणी केली जाते त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी आता सांगितले आहे. पदवीधरांना ही नोंदणी करण्यासाठी स्वत: कलेक्टर ऑफीसमध्ये जावे लागते. ही बाब निवडणुक आयोगाच्या संबंधी आहे परंतु सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने निवडणूक आयोगाला या संदर्भात कार्यवाही करण्याच्या संदर्भात काही सूचना देण्यात येतील. जास्तीत जास्त पदवीधरांनी आपली नोंदणी करावी यादृष्टीने सोपी पद्धत असण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे ....

अनेक ठिकाणी मतदारांचे फोटो काढण्यात आले पण त्यामध्येही चुका झाल्या आहेत. नाव एकाचे आणि फोटो दुसऱ्याचा असे प्रकार झाल्याचे सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी अलिबागचे एक उदाहरण देऊन सांगितले आहे. तरी त्याचीही चौकशी करण्यात येईल एवढेच मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या बाबतीत जे काही महत्त्वाचे प्रश्न येथे उपस्थित केले गेले आहेत त्यात सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रामुख्याने बृहन्मुंबई महानगर पालिकेसाठी 6 कोटी 1 लाख रूपयांची तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये कशासाठी करण्यात आली याची विचारणा केली आहे. दलित वस्त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी तसेच इतर भागामध्ये ज्या काही सोयी सुविधा करावयाच्या असतील तर त्यासाठी ही 6 कोटी 1 लाख रूपयांची पुरवणी मागणी करून तरतूद आपण केलेली आहे. या शिवाय 10 कोटी रूपयांची मागणी देखील कशासाठी केली असेही विचारण्यात आले. त्याबद्दल मी सांगू इच्छितो की, स्टॉर्म वॉटर ड्रेन आहे त्यासाठी केंद्राकडून आपल्याला निधी मिळाला आहे त्या शिवाय आपणही 10 कोटी रूपयांची आकस्मिकता निधी म्हणून तरतूद या ठिकाणी केलेली आहे. सभापती महोदय, एमएमआरडीएच्या बाबतीत असे सांगण्यात आले की, बीएमसी वर या एमएमआरडीएचे अतिक्रमण होत आहे. त्यामुळे काही योजना या एमएमआरडीएकडून राबविल्या जात आहेत. पण एमएमआरडीए ही संस्था मोठ्या रिजनसाठी म्हणजे ठाणे,रायगड आणि मुंबई महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र असलेला काही भाग या सगळ्यांचा समन्वय साधून काम करीत आहे. विशेष करून वाहतुकीचे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याचे काम ही संस्था करीत आहे म्हणजे रेल्वे किंवा रेल्वेवरील ओव्हरब्रिजेस असतील त्यांचे कामे यांच्याकडून होणार आहेत. तेव्हा एमएमआरडीए मुळे महापालिकेवर अतिक्रमण होत आहे असे आपणास वाटत असेल तर तसे काही नाही इतकेच मी आपल्याला सांगेन. या शिवाय इतरही अनेक कामे आपण त्याच्या माध्यमातून करून घेणार आहोत. मिठी नदीचा गाळ काढला नाही म्हणून तक्रार होती. परंतु झुत्शी समितीने असे कोठेही म्हटलेले नाही की, गाळ काढला नाही. तरीही दहिसर, मंडाळे आणि ठाण्यातील राबोडी वगैरे ठिकाणी गाळ काढण्याचे काम केले आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी अनेक सूचना केल्या आहेत. पार्किंगची सोय व्हावी वगैरे अशा बऱ्याचशा सूचना त्यांनी केल्या आहेत. त्या सगळ्या व्हाव्यात या दृष्टीने जरूर

...... 5एल 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

महापालिकेला कळविण्यात येईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी काही लोक कमी करावेत आणि जे काही बरेचसा अधिकारी वर्ग मिडीयाकडे जातो, मुलाखती वगैरे देतात तर त्यासाठी देखील कोड ऑफ कॉंडक्ट नाही, पण सरकारी अधिकाऱ्यांच्या बाबतीत आपण चांगली सूचना केली आहे तिचा जरूर विचार करण्यात येईल आणि काही अधिकारी मिडियासमोर जाऊन वेगळी वागणूक करीत असतील तर त्याबद्दल निश्चितपणे त्यांना सूचना देण्यात येतील. सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सिडकोचे जे सोशल अमेनिटीज प्लॉटस् आहेत त्यांच्या बाबतीत जे सांगितले त्याबाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांकडून लवकरच मान्यता घेऊन या बाबतीतील धोरण जाहीर करण्यात येईल इतकेच मी सांगेन.

सभापती महोदय, अनेक सदस्यांनी या ठिकाणी आपापल्या सूचना व विचार मांडले आहेत. त्यामुळे मी त्या सगळ्याच बाबतीत भाष्य न करता नगरविकास विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि हौसिंग विभागाच्या पुरवणी मागण्या आपण मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

**

( यानंतर श्री. सरफरे .... 5एम 1 ..

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सहकार, वस्त्रोद्योग, पणन या विभागाच्या मागण्यांवर माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, जयंत प्र. पाटील, भाऊसाहेब फुंडकर, श्रीमती उषाताई दराडे, श्रीमती फौजिया खान व इतर माननीय सदस्यांनी भाग घेतला व ज्या काही सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, ऊसाच्या बाबतीत पक्षभेद न करता ऊसाचे गाळप करण्यात येईल. त्याबाबत मी माननीय सदस्यांना खात्री देतो. द्राक्षाचे पिक वाळले आहे, त्यावरील शेतकऱ्यांच्या कर्जाचे व्याज भरण्याची काय व्यवस्था केली आहे? याबाबत माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी विचारले आहे. मी सभागृहाला सांगतो की, पॅकेजमधून व्याज भरण्यासाठी तरतूद केली आहे . एकूण किती व्याज होते आणि पॅकेजमधून बँकांना किती व्याज दिले? याबाबत माहिती विचारण्यात आली. एकूण 9.33 लाख शेतकऱ्यांना 1400 कोटींच्या कर्जावर 833 कोटींचे व्याज माफ करण्यात आले. आणि पुन्हा 2000 कोटींचे कर्ज वितरण करण्यात आले. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी बँकेला डिव्हिडंड देण्यास परवानगी देण्याबाबत, आणि कर्जदार, थकबाकीदार यांचेबाबत प्रश्न विचारला होता. त्याबाबत लक्ष घालण्यात येईल. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी राज्य सरकारचा वाटा किती आणि केंद्र सरकारचा वाटा किती आहे, आणि तो राज्यसरकारला दिला आहे काय? याबाबत प्रश्न विचारला. याबाबत सांगू इच्छितो की, राज्य सरकारने 356 कोटी आणि केंद्र सरकारने 356 कोटींचे व्याज दिले आहे. त्याचप्रमाणे नागरी सहकारी बँकांना 8 कोटी दिले आहेत आणि 10 कोटीं रुपयांचे प्रस्ताव दाखल झाले आहेत. उर्वरित 57 कोटींची तरतूद केली जाईल. वैद्यनाथन समितीच्या बाबतीत नुकसान भरपाई देण्याबाबत विचारण्यात आले. भ्रष्टाचार झालेल्या प्रकरणाच्या बाबतीत त्या रकमेची भरपाई करण्यात येणार नाही. माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी रेशीम उद्योगासाठी मदत मागितली आहे. त्यासाठी 50 लाखाचा निधी दिला गेला आहे. त्यांच्या विभागामध्ये जर रेशीम केंद्र उघडावयाचे असेल तर त्याकरिता प्रयत्न केले जातील. 33 पतसंस्थांच्या बाबतीत दखल घेऊन त्यासाठी काय करता येईल याबाबत निर्णय घेण्यात येईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्रीमती फौजिया खान यांनी परभणी येथील जळालेल्या उभ्या ऊसाला नुकसान भरपाई मिळाली नाही. तो ऊस उभा असून त्याला नुकसान भरपाई मिळाली पाहिजे असे विचारले आहे. त्याबाबतच्या याद्या घेऊन त्या जिल्हयामध्ये नुकसान भरपाई दिली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयप्रकाश दांडेगावकर....

जाईल. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतला त्याबद्दल त्यांचे आभार मानून सभागृहाने सहकार, वस्त्रोद्योग आणि पणन विभागाच्या मागण्या मान्य कराव्या अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त विभागाशी संबंधित 6 मागण्या आहेत. त्यांची एकूण किंमत 163 कोटी 33 लाख आहे. त्यापैकी 127.57 लाख भारीत आणि 35.76 लाख दत्तमत आहेत. माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, माझ्या वित्त विभागाच्या सदरहू मागण्या आपण संमत कराव्यात एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, बंदरे विभागाच्या पूरक मागण्यांवर बोलत असतांना सभागृहाच्या माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी या विभागाची एक बैठक सभागृहातील सदस्यांबरोबर घ्यावी असा आग्रह धरला होता. त्याबाबत आश्वासन दिले होते. परंतु बंदरे खात्याचा कार्यभार माननीय मुख्यमंत्र्यांकडे येत असल्यामुळे त्यांच्या संमतीसाठी फाईल पाठविण्यात आली होती. त्यामुळे ही बैठक वेळेवर झाली नाही. तेव्हा ही बैठक निश्चितपणे लवकरच घेण्यात येईल. सभापती महोदय, बंदर विभागाच्या बाब क्र. 25 च्या संदर्भात मोराबंदर, तालुका उरण, जिल्हा रायगड येथे प्रसाधनगृहाचे बांधकाम करणे व हाडी व पानखोल, तालुका मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथे एल आकाराच्या प्रवासी धक्क्याचे बांधकाम करणे याकरिता 24 लक्ष 85 हजार रुपयांची पूरक मागणी करण्यात आली. या मागणीला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राणा जगजितसिंह पाटील (कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार) : सभापती महोदय, कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार या पाच विभागाच्या पूरक मागण्यावर चर्चा करीत असतांना अनेक माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यानिमित्ताने काही महत्वाचे प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्यात आले. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी डाळिंबावर तेल्या रोग पडल्याबाबत विचारणा केली होती.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

शासनाने या डाळिंबावर जो तेल्या रोग येतो त्याचे निर्मुलन करण्याची योजना राबविण्यास सुरुवात केलेली आहे. साधारणत: 39 कोटी रुपयांची तरतूद या वर्षी करण्यात आलेली आहे. त्यापैकी 10 कोटी रुपये रिलीज करण्यात आलेले आहेत. छोट्या अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी हेक्टरी 22500 रुपये 2 हेक्टरपर्यंत आणि इतर शेतकऱ्यांसाठी हेक्टरी 13500 रुपये 2 हेक्टरपर्यंत असे त्या योजनेचे स्वरुप आहे. त्याचबरोबर केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी 4 नोव्हेंबरला एक पॅकेज जाहीर केले आहे. त्यामध्ये हेक्टरी 50 हजार रुपये असे पॅकेज आहे. त्यामध्ये केंद्र सरकारचा वाटा 50 टक्के, राज्य शासनाचा वाटा 25 टक्के आणि 25 टक्के शेतकऱ्यांचे अशी योजना आहे. त्याचबरोबर ॲग्रीकल्चर कॉलेजचे प्राध्यापक श्री. डी.एम.सावंत यांच्याकडे तेल्या रोगाच्या बाबतीत रिसर्च करण्याचे काम देण्यात आलेले आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी चर्चा करीत असताना खामगाव एमआयडीसी येथील रिलायबल नावाच्या कंपनीचा उल्लेख केला. त्या कंपनीची जागा ट्रान्सफर करण्याच्या बाबतीत थोडीशी अनियमितता झालेली आहे. बुलढाण्याच्या बँकेने लिलाव करण्यापूर्वी परवानगी घ्यावयास पाहिजे होती. त्याचबरोबर पॅकेज स्किम ऑफ इंसेन्टिव्हज च्या माध्यमातून रिलायबल कंपनीला जी मदत मिळाली होती ती परत करण्यात आलेली नाही. लेबर कमिशनर यांची एन.ओ.सी. लागते ती देखील दिली गेली नाही. या दोन तीन गोष्टींची पूर्तता केली तर निश्चितपणे जमीन ट्रान्सफर करण्यात येईल. जे उद्योग आजारी पडतात त्यांच्यासाठी स्पेशल पॅकेज तयार केलेले आहे. खामगावच्या रिलायबल नावाच्या कंपनीला या पॅकेजचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी बीड-परळी दरम्यान रेल्वेच्या कामाच्या बाबतीत तसेच रोजगार हमीच्या माध्यमातून काम करण्याच्या बाबतीत उल्लेख केला. या कामासाठी केंद्र सरकारची परवानगी लागणार आहे. भूसंपादन रेल्वे खाते करणार आहे. राज्य शासनाकडून निश्चितपणे थोडीफार प्रक्रिया होणे बाकी आहे. येत्या पंधरा दिवसामध्ये बैठक आयोजित करुन हे काम मार्गी लावण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी टाटा मोटर्स यांना 100

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

कोटी रुपये दिले त्याबाबतचा उल्लेख केला. हा जो निर्णय आहे तो 1995-2000 या दरम्यान घेण्यात आला होता. त्याचे प्रमुख कारण स्पष्ट आणि साधे होते. टाटा मोटर्स म्हणजे तेव्हाच्या टेल्को कंपनीला सेल्स टॅक्सच्या माध्यमातून मदत हवी होती. पॅकेज स्किम ऑफ इंसेंन्टिव्ह 1993 यामध्ये 'ए' आणि 'बी' झोनमध्ये अनुदान देत नव्हतो. परंतु भारतामध्ये पहिल्यांदाच संपूर्ण भारतीय बनावटीची अशा पध्दतीची गाडी बनत होती म्हणून त्यांना अनुदान देण्याचा निर्णय झाला होता. 1995 ते 2000 च्या दरम्यान हा निर्णय झालेला होता. परंतु त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. कारखाना सुरु झाला. त्या प्लँटमध्ये इंडिका गाडीची निर्मिती सुरु झाली. एकदा शासनाने त्यांना होकार दिला होता की, आम्ही मदत करु. परंतु ते पैसे आपण देऊ शकलो नाही. त्यामुळे कदाचित त्यांचे काही उद्योग आपल्या राज्याच्या बाहेर गेलेले होते. गेल्या सहा महिन्यामध्ये याबाबत चर्चा झाली आणि पैसे 2 टप्प्यामध्ये देण्याच्या संदर्भात निर्णय झाला. खरे म्हणजे त्यांना 200 कोटी रुपये देण्याचे मान्य केले होते. त्यांचे 100 कोटी रुपये आता देत आहोत. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी चितळी डिस्टिलरीला पैसे का देत आहात असा प्रश्न उपस्थित केला होता. ही डिस्टिलरी बंद आहे. त्याच्या खाजगीकरणाची प्रोसेस सध्या वित्त विभागाच्या माध्यमातून चालू आहे. एकदा खाजगीकरण झाल्यानंतर कर्जाचे जे पैसे दिलेले आहेत ते शासनाला परत मिळू शकतील. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेबांनी फिल्मसिटीचा मुद्दा उपस्थित केला. मला नमूद करावयाचे आहे की, आपण कोणालाही जमीन विकलेली नाही. ते जॉईन्ट व्हेंचर आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जमिनीची किंमत कमी पकडण्यात आली होती. त्याचा आपण फेरविचार करण्याचे ठरविलेले आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राणा जगजितसिंह पाटील...)

जे मूल्यांकन आहे त्याप्रमाणे जॉईण्ट व्हेन्चरमध्ये बदल केला जाईल असे सांगितले होते.त्याप्रमाणे ती प्रक्रिया चालू असून ती लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. भाड्याच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आला. ही जागा सांस्कृतिक कार्य विभागाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाला वेगळे भाडे देण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. सन्माननीय सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यांनी बेलापूरच्या किल्ल्याचा आणि सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी प्रतापगडाचा उल्लेख केला. या आणि पुढच्या अशा दोन वर्षासाठी केन्द्र सरकारकडून 25 कोटी रुपये मिळत आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग तसेच पुरातत्व विभाग यांच्या माध्यमातून जेव्हा यासाठी मागणी करण्यात येईल त्यावेळी प्रतापगडाचा विचार केला जाईल. सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी मल्टीप्लेक्सचा मुद्दा उपसिथत केला. पुढच्या 15 दिवसामध्ये याबाबतीत एक बैठक घेऊन या प्रलंबित राहिलेल्या विषयाला न्याय देण्याचा आपण प्रयत्न करु. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी राज्य नाट्य स्पर्धांचा उल्लेख केला. ज्या विभागीय नाट्यस्पर्धा होतात त्यामध्ये हौसी नाट्य संस्थांचा देखील सहभाग घ्यावा असे त्यांनी सांगितले. तेव्हा ती देखील व्यवस्था असावी अशा प्रकारचे आदेश देण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सिंधी ॲकॅडमीला अनुदान देण्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केला. आपण त्यांना अनुदान देत असतो. त्यांना किती अनुदान दिलेले आहे याची माहिती देण्यात येईल. या चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. तेव्हा सभागृहाने कृषी, उद्योग, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांवरील चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी महात्मा गांधी हॉस्पिटलचा उल्लेख केला. तसेच अन्य ई.एस.आय.एस. हॉस्पिटलचा देखील उल्लेख केला. महात्मा गांधी हॉस्पिटलच्या संदर्भातील कार्यवाही केन्द्र शासन आणि राज्य शासन यांच्या स्तरावर आहे. या बाबतीत केन्द्रीय मंत्र्यांसोबत मी चर्चा केली. त्यांनी 300 बेडस्‌ची मान्यता दिलेली आहे. 300 बेडस्‌मध्ये आणखी कोणकोणत्या गोष्टींचा समावेश केला पाहिजे याचे प्लॅनिंग करुन बहुतेक मार्चमध्ये त्यासाठी तरतूद करण्याचा प्रयत्न होईल. अंधेरी येथील हॉस्पिटलचा देखील उल्लेख करण्यात आला. ते हॉस्पिटल एक मॉडेल हॉस्पिटल बनविण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी 4 कोटी 70 लाखाची तरतूद कशासाठी अशी विचारणा केली. मागील अधिवेशनामध्ये आम्ही 22 कोटीची मागणी केली होती. त्यापैकी फक्त 18 कोटी मंजूर झाले. उर्वरित रकमेसाठी ही मागणी केलेली आहे. ड्रग्ज, सुपरस्पेशॅलिटी ट्रिटमेण्ट, पॅथालॉजी डिपार्टमेण्टचा खर्च, सर्जिकल इक्विपमेण्टचा खर्च आपण करीत असतो. आय.पी.ची संख्या वाढलेली असल्यामुळे आमच्या विभागाची मागणी देखील वाढलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी ॲम्ब्युलन्सचा मुद्दा उपस्थित करुन ॲम्ब्युलन्ससाठी 10 हजार रुपया ऐवजी 15 हजार रुपये दिले पाहिजेत असे सांगितले. मी सांगू इच्छितो की, 14 हजार रुपये दर ठेवलेला आहे. जेथे ॲम्बुलन्स नसेल तेथे 14 हजार रु.पर्यन्त कोणतीही गाडी घेता घेईल. सन्माननीय सदस्य श्रीमती उषाताई दराडे यांनी प्राथमिक आरोग्य केन्द्राचा उल्लेख करुन ते प्राथमिक आरोग्य केन्द्र पडण्याच्या अवस्थेत आहे असे सांगितले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे........

सभापती महोदय, एनआरएचएममध्ये आपण प्रत्येक प्रा.आ.केंद्राच्या दुरुस्तीसाठी निधी दिलेला आहे. प्रा.आ.केंद्राच्या इमारतीची अवस्था फार वाईट असेल तर कार्यकारी अभियंत्यांनी एनआरएचएममध्ये तसा प्रस्ताव दिला की, नवीन बांधकामासाठी देखील तरतूद करता येईल. मी स्वत: सीईओ आणि डीएचओ यांच्यासोबत चर्चा करुन सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांना माहिती देईन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मालेगाव येथे शासनाने हॉस्पिटल बांधण्याचे जाहीर केले त्यासंदर्भात मुद्दा मांडला होता. मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, मागील वर्षी जवळपास 4 कोटी रुपयांची तरतूद केली होती आणि याच कामासाठी दीड कोटी रुपयांची मागणी करीत आहोत. हे 200 खाटांचे रुग्णालय यावर्षी होणार आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी बेलापूर येथील प्रा.आ.केंद्राचा प्रश्न उपस्थित केला आहे. बेलापूर येथील प्रा.आ.केंद्र हे नवीमुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत आलेले आहे. महानगरपालिकेने अशी मागणी केली की, हे आरोग्य केंद्र आम्हाला चालविण्यास द्यावे. त्यामुळे जिल्हा परिषदेने तसा ठराव मंजूर करुन घेतला आणि जो दर निश्चित केला आहे त्यानुसार महापालिका रुग्णालय चालविण्यास सहमत आहे. तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे आलेला असून लवकरात लवकर शासन परवानगी देणार आहे. मला खात्री आहे, सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक याठिकाणी उपस्थित आहेत, नवीमुंबई महानगरपालिका लवकरात लवकर हे रुग्णालय सुरु करील.

सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांनी ठाणे जिल्हयातील आदिवासी भागाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. आजच्या स्थितीत ठाणे जिल्हयातील जवळपास 20 ग्रामीण रुग्णालये आणि 28 प्रा.आ.केंद्रे येथे रुग्णवाहिका उपलब्ध आहे. त्याशिवाय उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय याठिकाणी एनआरएचएम अंतर्गत अनटाईड फंड उपलब्ध करुन दिलेला आहे. प्रत्येक उपकेंद्र, प्रा.आ.केंद्राच्या ठिकाणी एएनएम आणि सरपंच यांच्या संयुक्त बँक खात्यात 10 हजार रुपये ठेवण्यात आले असून प्रा.आ.केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णाला इमर्जन्सीमध्ये शिफ्ट करावयाचे असल्यास स्थानिक स्तरावर अधिकार देण्यात आलेले आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे........

कोणत्याही पेशंटला ट्रान्सपोर्टेशन करण्यामध्ये अडचण येणार नाही याची काळजी एनआरएचएममध्ये घेण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी आरोग्य विभागाच्या मागण्यांबद्दल जे विचार मांडले आहेत त्या सर्व मुद्यांना मी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री.विनोद तावडे : ठाणे जिल्हयामध्ये जी 6 ग्रामीण रुग्णालये 17 महिन्यापूर्वी आदेश काढून मंजूर केली ती केव्हा सुरु होणार आहेत?

श्री.रणजित कांबळे : त्याची माहिती आता उपलब्ध नाही. मी सन्माननीय सदस्यांना उद्यापर्यंत या संदर्भातील माहिती दिली जाईल. मी सभागृहाला आपल्या माध्यमातून विनंती करतो की, आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, समाजकल्याण, अपंग कल्याण व दारुबंदी प्रचार कार्य या विभागाच्या सन 2007-08 या आर्थिक वर्षाच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यासाठी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्र.188, 189, 196, 197, 198, 199 या सहा पुरवणी मागण्यांपैकी सामाजिक न्याय विभागाच्या 2, अपंग कल्याण विभागाच्या 3 आणि दारुबंदी विभागाची एक मागणी आहे. बाब क्र.188 अन्वये ज्या जात पडताळणी समित्या विभागीय स्तरावर आहेत त्या संदर्भात पुरवणी मागणी सादर केली आहे. गेल्या 2-3 वर्षामध्ये जात प्रमाणपत्रांसाठी मोठया प्रमाणात अडचण निर्माण झाली होती. दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या प्रयत्नामुळे सातत्याने जात पडताळणी सुलभ व्हावी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे...

सभापती महोदय, नागरीकांना कुठलाही त्रास होऊ नये, कामामध्ये सुलभता यावी यासाठी जातपडताळणीच्या कमिटयांच्या संख्येत वाढ करण्यात आली असून आता जातपडताळणीच्या 15 कमिटया झालेल्या आहेत. या 15 कमिटयांच्या आस्थापनेसाठी 183 अधिकारी, कर्मचारी लागणार असून त्यासाठी वार्षिक खर्च 2.60 कोटी रुपये येणार आहे. 3 महिन्याच्या कालावधीत 86.82 लक्ष रुपये एवढा खर्च येणार असून या खर्चाला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नाशिक, अमरावती येथे नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्यासाठी 6 विभागीय स्तरावर 6 आयटीआय संस्था सुरु करण्याचे ठरविण्यात आले असून त्या प्रमाणे 4 ठिकाणी काम सुरु असून दोन ठिकाणचे काम पूर्ण देखील झालेले आहे. या कामासाठी कर्मचा-यांच्या वेतनावर 80.11 लक्ष रुपये खर्च येणार असून वार्षिक खर्च 75.40 लक्ष रुपये एवढा येणार आहे.

सभापती महोदय, अपंग कल्याण विभागात गेल्या वर्षा दीड वर्षामध्ये 540 अपंगाच्या विशेष शाळेतील कर्मचा-यांचे वेतन आणि वेतनेतर अनुदान, भाडे तसेच विद्यार्थ्यांच्या आहाराचे दीड दोन वर्षापासून पैसे देण्याचे राहिले होते त्याचा खर्च 36.44 कोटी रुपये आहे. हा खर्च त्यांना मिळावा यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.

सभासपती महोदय, बाब क्रमांक 197, अपंग पुनर्वसन केंद्र, विरार यांच्यासाठी 80.60 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अपंग पुनर्वसन कैंद्र, विरार, जिल्हा ठाणे हे भारतभारत सरकारद्वारे चालविण्यात येते होते. भारत सरकारने दिलेलया निर्देशानुसार हे केंद्र 1 एप्रिल 2006 पासून राज्य शासनाने ताब्यात घेतले आहे. त्यानुसार वेतन व कार्यालयीन खर्च यासाठी हा खर्च आहे. या संदर्भात देशात एकूण 11 संस्था होत्या, या संस्था राज्य सरकारने ताब्यात घ्याव्यात अशा प्रकारचा केंद्रशासनाने निर्णय घेतला होता. तसेच या संस्था महाराष्ट्र, शासनाने चालवाव्यात असा विधानसभा तसेच विधानपरिषद सदस्यांनी सभागृहात आग्रह धरला होता त्यामुळे या संस्था महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतलेल्या आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे...

या संस्था चालवण्यासाठी त्या ठिकाणी 37 कर्मचा-यांचा स्टाफ असून त्यासाठी दर वर्षी 80 लाख रुपये इतका खर्च वेतनावर होणार आहे. त्यातील 28 लक्ष रुपये खर्च मार्चपर्यंत होणार आहे त्यामुळे ही पुरक मागणी मांडण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 198,मध्ये अंपगांची विशेष शाळा / कार्यशाळा यांना मान्यता देणे, अशासकीय संस्थाद्वारे चालविण्यात येणा-या विनाअनुदानित अंपगांच्या 7 विशेष शाळा/कार्यशाळा यांना मान्यता देण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार चालू वित्तीय वर्षी प्रत्येक शाळा/कार्यशाळा यांना रु. 40,000 इतके तदर्थ अनुदान देण्यात येणार आहे. या प्रस्तावात रु. 2,80,0000 इतका वार्षिक सरासरी खर्च अंतर्भूत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 199 मध्ये दारुबंदी प्रचार कार्यासाठी नशाबंदी मंडळाळाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी 5 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. नशाबंदी मंडळ राज्यात व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात मागील 50 वर्षापासून कार्यरत आहे. म्हणून नशाबंदी मंडळाला सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी 5 लक्ष रुपये एवढा निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविण्यात आले आहे. या मंडळासाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे तसेच मधुकर चव्हाण यांनी सुध्दा जास्तीत जास्त प्रोत्साहन द्यावे अशा सूचना केल्या होत्या. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोसे यांनी संत चोखा मेळा स्मारक बांधावे यासंदर्भात सूचना केलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपण हे बजेट उशिरा का मांडले असा उल्लेख केलेला आहे. यासंदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, काही वेळेस बजेट उशिरा मांडावे लागते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे.......

सामाजिक विभागाचे बजेट 95 टक्के अगोदर झालेले आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी टोबॅकोच्या डब्यावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो छापण्यात आल्याचे सांगितले. त्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन संबंधितांवर कडक कारवाई करण्याची त्यांना विनंती करु.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विद्यार्थ्यांना निवार्ह भत्ता वेळेवर देण्यात यावा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्कॉलरशीपची फी लवकर रिएम्बर्स करावी अस मुद्दा मांडलेला आहे. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.विक्रम काळे व प्रकाश शेंडगे यांनी मांडलेल्या मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

महात्मा फुले व शाहू महाराज पुरस्काराबाबत सांगू इच्छितो की, या संदर्भात निर्णय घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये या विभागाचे मंत्री व राज्यमंत्री , वेगवेगळ्या विद्यापीठांचे कुलगुरू, पत्रकार असे जवळपास 25 मान्यवर या समितीवर आहेत. एप्रिल महिन्याच्या अगोदर हा पुरस्कार देण्याच्या दृष्टीने आमचा प्रयत्न राहील.

पुण्यश्लोक अहिल्याबाई पुरस्काराबाबत सांगू इच्छितो की, ही बाब संबंधित मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे ( मसहूल व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, महसूल व पुनर्वसनाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला त्यांचे मी आभार मानतो.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एस.ई.झेड.चा मुद्दा मांडत असताना एस.ई. झेड.मध्ये ज्या शेतकऱ्यांची शेती गेली असेल त्यास शेती करण्यासाठी शेतकरी दाखल्याची गरज नसावी असे सांगितले. एखाद्या प्रकल्पामध्ये एखाद्या शेतकऱ्याची जमीन घेतल्यास तो शेतकरी दहा वर्षे शेतकरी म्हणूनच असतो. परंतु यामध्ये काही त्रुटी असल्यास त्यामध्ये दुरुस्ती करण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल. शेतकरी शेती करण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता शासनाकडून घेण्यात येईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी बीड जिल्ह्यातील भूसंपादन अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याचा मुद्दा मांडला. त्या संदर्भात सांगू इच्छितो की, तहसिलदार आणि एस.डी.ओ. यांना पदोन्नती दिलेली आहे. तसेच एम.पी.एस.सी.कडून पदे मिळेपर्यंत 50 पदांना ॲडव्हॉक पध्दतीने पदोन्नती दिलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांनी एम्प्रेस मिलचा मुद्दा याठिकाणी मांडला. त्या मिलची 30 वर्षाची लीज संपली असताना त्या मिलचे रिन्युअल होत नाही हे तपासण्याची गरज आहे असे सांगितले. त्यादृष्टीने प्रयत्न केला जाईल असे मी यानिमित्ताने सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी रिलायन्सचा मुद्दा मांडला. भूसंपादनाची प्रक्रिया शासनाच्या वतीने केली जाते. शेतकऱ्यांची संमती असेल तरच शेतकऱ्याकडून जमीन संपादित केली जाते. जर त्या शेतकऱ्यांची संमती नसेल तर त्याची जमीन संपादित केली जात नाही हे मी पुन्हा एकदा नमूद करू इच्छितो. भविष्यात ज्या कंपन्यांमार्फत एस.ई.झेड. होतील त्यांच्याकडून आपण कर्मचाऱ्यांच्या पगाराची वसुली करणार आहोत.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सन 1993 मध्ये किल्लारी येथे झालेल्या भूकंपामध्ये काम केल्यासंबंधी मदत देण्यास 14 वर्षानंतर पुरवणी मागणी आणली असे सांगितले. भारतीय वायू सेनेच्या दिनांक 30.8.2001 आणि दिनांक 9.2.2004 च्या पत्राद्वारे काही देयके प्रलंबित असल्याबद्दल कळविले होते. भूकंपातील पुनर्वसनाचे बहुतांश काम पूर्ण झाल्यामुळे ती देयके कोणत्या लेखाशिर्षामध्ये घ्यावयाची याबद्दल विचार विनिमन करण्याच्या दृष्टीने वेळ गेलेला आहे. यासाठी आपण आता नवीन उपशीर्ष उघडलेला आहे. त्या माध्यमातून आपण नंतरची देयके देण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये विलंब लागलेला आहे, ही गोष्ट खरी आहे.

सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी शेतकऱ्यांची जमीन मोजण्याकरिता काही मोहीम हातात घेण्याच्या दृष्टीने सूचना केली. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आता आपण सर्व जिल्हयांत पोटहिस्सा मोजणीस सुरुवात केलेली आहे. तसेच काही संस्थाच्यामार्फतही आपण मोजणी करीत आहोत. तसेच इटीएस सिस्टीमच्या माध्यमातूनही आपण मोठयाप्रमाणात काम करीत आहोत. या सिस्टीमच्या माध्यमातूनही आपण प्रलंबित प्रकरणांची मोजणी पूर्ण करणार आहोत. सन 1930 मधील सेटलमेंट करण्याच्या दृष्टीने कोणत्या अडचणी येतात, त्यासाठी किती खर्च येईल तसेच शेतकऱ्यांवर किती भूर्दंड पडेल याचा संपूर्ण अभ्यास करुन त्यासंदर्भात निर्णय घेणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी राज्यामध्ये डूप्लीकेट मुंद्राक विकले जात असल्याचे निदर्शनास आणले. ही बाब निश्चितपणे गंभीर असून ही बाब ताबडतोबीने उच्च स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत तपासून घेतली जाईल व त्याबाबतीत चौकशी केली जाईल. कारण ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळेच ही बाब उच्च स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत तपासून ताबडतोबीने चौकशी केली जाईल. याबाबतीत पोलिसांचीही मदत घेऊन कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी यांनी तलाठयांच्या पदाचा मुद्दा उपस्थित केला. अनेक गावात तलाठयांच्या हाताखाली शिकाऊ तलाठी काम करतात, असे त्यांनी सांगितले. राज्यातील बऱ्याच जिल्हयांत तलाठयांची पदे रिक्त होती, ती आपण आता भरण्यास सुरुवात केलेली आहेत. अनेक जिल्हयातील तलाठयांची रिक्त पदे आपण भरणार आहोत.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे....

सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी कोयनेच्या पुनर्वसनाचा मुद्दा उपस्थित केला. सकाळी प्रश्नाच्या निमित्ताने उत्तरात मी सांगितले होते की, आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आपण एक समिती स्थापन केलेली आहे. तसेच तेथील वसाहतींनाही आपण भेट देणार आहोत. सदर भेटीवेळी आपल्यालाहीसोबत घेतले जाईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी निवाडे प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित केला. याबाबतीत आपण एक कन्सेप्ट केलेली असून त्यामार्फत भू-संपादनाची कारवाई करणार आहोत. निवाडयाच्याबाबतीत आपण दोन वर्षांची अट केली होती, ती आता आपण एक वर्षावर आणलेली आहे. एक वर्षाचा कालावधी ॲव्हॉड कमी करण्यास केलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती ग्रामीण भागातील लोकापर्यंत पोहचत नाही, असे सांगितले. याबाबत मी सांगू इच्छितो की, निश्चितपणे याबाबतची माहिती जनमानसापर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रयत्न केले जातील. सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या असून त्या सर्वांचा मी थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे याठिकाणी मी सभागृहाला विनंती करतो की, त्यांनी महसूल, क्रीडा व माहिती व जनसंपर्क विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

--------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार विभाग) : सभापती महोदय, पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार विभागाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी विविध कामगार न्यायालयामध्ये असलेली परिस्थिती व तेथील वातावरण यानुषंगाने सुधारणा होण्याच्या दृष्टीने अपेक्षा व्यक्त केली. कामगार विभागाच्या चार बाबींमध्ये कामगार आयुक्तालयातील व्यवस्था संगणकीकृत व्हावी. तसेच ठाणे औद्योगिक न्यायालय आणि कामगार न्यायालयांच्या इमारतींमध्ये सुधारणा व्हावी व बॉयलर विभागाचेही संगणकीकरण व्हावे, असे मत मांडले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक...........

अन्य ऑफीस दुरुस्ती करण्याकरीता चार बाबींमधून 68 लाख 16 हजार रुपये पुरक मागणीतून मागण्यात आले आहेत. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, त्यांनी या विभागाच्या पुरक मागण्यांना मंजूरी द्यावी.

**सभापती** : पूरक मागण्यांवरील पहिल्या दिवसाची चर्चा या ठिकाणी पूर्ण झाली आहे. सर्व मागण्यांना आपण मान्यता द्यावी, अशी विनंती करतो.

सन्माननीय मंत्री महोदयांना यापूर्वीच सूचना दिल्या आहेत की, सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने ज्या सूचना केलेल्या आहेत त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात त्याचा उल्लेख केला आहे. परंतु अन्य काही सूचना असतील ज्याचा उल्लेख राहून गेला असेल त्यांची लेखी उत्तरे सन्माननीय सदस्यांना पंधरा दिवसाच्या आत पाठवावे.

उद्या, बुधवार दिनांक 28 नोव्हेंबर 2007 रोजी सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.45 ते 12.45 या काळात घेण्यात येईल. यामध्ये अर्धा-तास चर्चेच्या सूचना घेण्यात येतील व सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, बुधवार दिनांक 28 नोव्हेंबर 2007 रोजी सकाळी 10.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 1 मिनिटांनी, बुधवार , दिनांक 28 नोव्हेंबर 2007 च्या सकाळी 10.45 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

-----------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही